

# एक अविस्मरणीय व्यक्तिमत्व

**शंकरराव काळे** बी. एस्सी., बी. ई. (सिव्हील)
माजी खासदार,
चेअरमन,
दि. कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि.,
गौतमनगर, पोष्ट - कोळपेवाडी, पिन - ४२३ ६०२.
तालुका - कोपरगांव, जिल्हा - अहमदनगर.

कै. मारुतराव घुले पाटील यांची व माझी मी जिल्हा परिषदेचा अध्यक्ष झाल्यानंतर म्हणजेच १९६२ मध्ये ओळख झाली. त्यावेळी ते शेवगांव-नेवासा मतदार संघातून महाराष्ट्र विधनसभेवर आमदार म्हणून निवडून आले होते. त्यावेळेपासून त्यांचे व माझे जिव्हाळ्याचे स्नेहसंबध होते. मारुतरावजी, कै. आबासाहेब निंबाळकर व मी असे आम्ही तिघे जिल्ह्याचे राजकारण एकत्रितपणे करीत होतो. एकदिलाने व एकमताने जिल्ह्याच्या सर्वच प्रश्नांबाबत विचारपूर्वक आम्ही निर्णय घेत असू. कै. मारुतराव तसे सात्विक वृत्तीचे, शांत व निगर्वी स्वभावाचे आणि समन्वयवादी होते. कधीही अतिरेकी भूमिका ते घेत नसत. सर्वांच्याच बाबतीत त्यांच्या मनात नितांत आदर असे.

कॉ. वकीलराव लंघे पाटील हे कम्युनिस्ट पक्षाचे जिल्ह्याचे नेते होते. नेवासा-शेवगांव विधानसभा मतदारसंघातून कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवाराचा पराभव करून ते महाराष्ट्र विधानसभेवर निवडून गेले. असे असतांना देखील स्व. मारुतरावांनी त्यांना कारखान्याच्या कारभारात सहभागी करून घेतले. सहकारी चळवळीत काम करणाऱ्या प्रत्येकाने आपले राजकीय विचाराचे जोडे सहाकर मंदिराच्या बाहेर काढून ठेवले पाहिजेत, यावर स्व. मारुतरावांचा विशेष कटाक्ष होता. सहकारी चळवळीचे प्रणेते, थोर अर्थतज्ज्ञ व भारतीय नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष कै. धनंजयराव गाडगीळ यांचा हा संदेश स्व. मारुतराव पाटलांनी तंतोतंत अंमलात आणला होता. ह्या संदेशाचे प्रात्यक्षिक त्यांनी कारखान्याच्या व्यवस्थापनात विरोधी पक्षाच्या आमदारांनाही सामावून घेवून करून दाखविले होते. Example is better than precept हे वचन कै. मारुतरावांनी खरे करून दाखविले. त्यांचे ठायीचा हा गुण त्यांचे विचाराचे मोठेपण सिद्ध करण्यास पुरेसा आहे असे मला वाटते.

सन १९६७ ला कोपरगांव मतदार संघातून मला कॉंग्रेस पक्षाच्या वतीने उमेदवारी मिळावी म्हणून मारुतराव घुले पाटील व डॉ. बाबूराव तनपुरे यांनी आटोकाट प्रयत्न केले. अहमदनगर जिल्ह्यातील



अनेक कार्यकर्त्यांची ही इच्छा होती. तिच्या पुर्ततेसाठी त्यांनी काँग्रेस पक्षातील कांही वरिष्ठांचा रोष पत्करून देखील मला काँग्रेस पक्षाची उमेदवारी मिळवून दिली. माझ्या राजकीय जीवनात मारुतरावांनी केलेले मोठेच उपकार म्हणावे लागतील. परंतु नियतीला हे मान्य नसावे असे वाटते. त्यावेळी मला पराभव पत्करावा लागला. माझ्या पराभवाने त्यांच्या पदरी नामुष्कीच आली होती. परंतु त्यांनी कधीही बोलून दाखविली नाही.

मारुतराव पाटलांचे वैवाहिक जीवन तसे आरंभीची काही वर्षे अत्यंत सुखाचे गेले. आपली धर्मपत्नी, तीन मुले, दोन मुली असा भरल्या गोकुळासारखा जीवनक्रम सुरू होता. परंतु नंतर कांही वर्षातच त्यांची धर्मपत्नी इहलोक सोडून गेली. मुले-मुली अजून लहान. त्यांचे शिक्षण, पुढील भवितव्य यांची संपूर्ण जबाबदारी मारुतरावांवरच पडली. परंतु असा भयंकर आघात छातीवर झेलीत त्यांनी मुलामुलींच्या शैक्षणिक ध्येयासाठी जिवाचे रान केले. आज त्यांचे थोरले चिरंजीव श्री. नरेंद्र घुले पाटील हे नेवासा शेवगांव मतदार संघातून विधानसभा सदस्य आहेत. लोकप्रतिनिधी म्हणून शेतकऱ्यांचे विविध प्रश्न शासनासमोर मांडण्यासाठी, शासनाच्या विविध योजना आपल्या मतदार संघात खेचून आणून सर्वसामान्यांना त्यांचा लाभ मिळवून देण्याच्या कामी त्यांचा चांगला लौकिक आहे. द्वितीय चिरंजीव राजेंद्र हे उच्च शिक्षण घेवून परदेशामध्ये चांगल्या पदावर नोकरीस आहेत. तिसरे चिरंजीव चंद्रशेखर हा तर असामान्य मनुष्य आहे. सतत कार्यकर्त्यांबरोबर ते कार्यमग्न असतात. मधुर वाणी, अत्यंत गोड स्वभाव, कार्यकर्त्यांना व नवतरुणांना हवेहवेसे वाटणारे हे उदयोन्मुख नेतृत्व. आज श्री. चंद्रशेखर पाटील श्री ज्ञानेश्वर सहाकारी साखर कारखन्याच्या चेअरमनपदाची धुरा उत्तमप्रकारे सांभाळत आहेत. अशी गुणी मुले निपजणें हेही एक मोठे भाग्यच होय. मारुतरावजी या दृष्टीने खरोखर भाग्यवान होते . परंतु पत्नीनिधनाचा जो दुर्दम्य आघात त्यांच्यावर झाला, तो पचवून मुलामुलींच्या भवितव्यासाठी आपल्या स्वतःच्या आशा-अपेक्षा त्यांनी पायातळी तुडविल्या. त्यांच्या मनाचा हा केवढा मोठेपणा ! त्यांनी त्यांच्या जीवनाचा मोठा आदर्श जनसामान्यांसमोर ठेवलेला आहे. अहमदनगर जिल्ह्यातील मुळा धरणाच्या परिसरात स्वतंत्र सहकारी साखर कारखाना निघून त्यांना भरपूर प्रमाणत गाळपासाठी ऊस मिळेल अशी परिस्थिती त्यावेळी निर्माण झाली होती. त्याचवेळी आपल्या जिल्ह्याचे नेते कै. अण्णासाहेब शिंदे हे भारत सरकारमध्ये होते. तरीपण महाराष्ट्र शासनाने अहमदनगर जिल्ह्यात नवीन साखर कारखाना द्यायचा नाही असा निर्णय घेतला होता. त्याप्रमाणे नेवासा, शेवगांव, पाथर्डी तालुक्यातील सहकारी चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची मोठी कुचंबणा झाली होती. महाराष्ट्रात काँग्रेसचे सरकार, केंद्रातही काँग्रेसचे सरकार आणि आमचे प्रतिनिधी केंद्रीय मंत्रीमंडळात असूनही या तालुक्यात साखर कारखाना मिळू नये याची खंत कार्यकर्त्यांच्या मनात होती. परंतु कै. मारुतराव घुले पाटील हे अत्यंत हुशार; चलाख व धोरणी होते. त्यांना ही अडचण लक्षात आली. सोलापूर जिल्ह्यातील सासवड माळी शुगर फॅक्टरी हा खाजगी साखर कारखाना एक्स्पॅन्शन करण्याचे विचारात होता. तसा त्यांनी निर्णयही घेतलेला होता. मशिनरीची ऑर्डरही दिली होती. परंतु



अंतर्गत मतभेद निर्माण होवून १२५० मे. टन क्षमतेचा प्लॅन्ट उभा करायचा नाही असा त्यांनी निर्णय घेतला. ही गोष्ट मारुतराव घुले पाटलांन समजली. त्यांनी प्रयत्न करून स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब व स्व. अण्णासाहेब शिंदे यांची मदत घेवून त्या कारखान्याच्या संचालक मंडळाशी बोलणी केली आणि तो १२५० मे. टन क्षमतेचा कारखाना लायसेन्ससह खरेदी केला. तो उभा करून उत्तम तऱ्हेने चालविला. मारुतराव घुले पाटलांवर व त्यांच्या नेतृत्वावर जनतेचा पूर्ण विश्वास असल्याने आज तो भरभराटीस आलेला आहे. कै. मारूतरावांचे परिश्रम इथे मूळ कारण ठरले. त्यामुळेच श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्यास आज जे आर्थिक स्थैर्य लाभले आहे ते त्यांच्या परिश्रमाचेच फळ आहे. हाच कारखाना आज प्रतिदिन ५००० मे. टन क्षमतेने चालू आहे. याच कारखान्याचे माध्यमातून अनेक उपसा जलसिंचन योजनाही कार्यान्वित आहेत.

मारुतरावजींचे राजकीय, सामाजिक, सहकार, शिक्षण व कृषि क्षेत्रात मोठेच योगदान आहे. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ते संस्थापक संचालक होते. याच बँकेचे ते अनेक वर्षे चेअरमनही होते. याच बँकेच्या माध्यमातून जायकवाडी धरणाच्या बॅक वॉटरवर जलसिंचन योजनांसाठी उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत करून ऊसाचे क्षेत्रात भरीव वाढ झाली आहे. त्यामुळे श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना स्वतःची गरज भागवून आमच्या कोपरगांव सहकारी साखर कारखान्यास तसेच जवळपासच्या सहकारी साखर कारखन्यांना देखील त्यांना आवश्यकता असेल तेव्हा ऊसपुरवठा करू शकतो. मारुतरावजी घुले पाटलांनी अत्यंत कुशलतेने व काटकसरीने कारखाना चालविला आहे. त्यामुळे आर्थिक सुबत्ता असलेल्या या कारखान्याचा क्रमांक अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखानदारीत बऱ्याच वरच्या क्रमांकावर आहे. सहकारी चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी त्यांचा आदर्श घ्यावा अस त्यांचे मोठे काम आहे. या सहकारी साखर कारखान्याचे माध्यमातून अनेक शैक्षणिक संस्थाही त्यांनी निष्ठापूर्वक कार्यरत ठेवलेल्या आहेत. श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय हे मारूतरावांच्या शैक्षणिक प्रेमाचेच प्रतीक म्हणावे लागेल. त्यांची निरलस व निरपेक्ष सेवावृत्ती प्रशंसनीय आहेच. अहमदनगर जिल्हा काँग्रेसचे ते बरीच वर्षे अध्यक्षही होते. जिल्हा काँग्रेसच्या संघटन कार्यात त्यांचे परिश्रम बऱ्याचअंशी कारणीभूत आहेत. **आज अहमदनगर जिल्हा जो काँग्रेसमय दिसतो आहे त्याचे बरेचसे श्रेय मारूतराव घुले पाटील यांचेकडेच जाते.** आम्ही सर्व कार्यकर्ते त्यांना मालक म्हणूनच संबोधत होतो. जरी मालक म्हणून त्यांना संबोधले जात असले तरी त्यांनी दिलेला समानतेचा, ममतेचा विचार, प्रेमाची वागणूक हे गुण जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना व जनतेला मिळालेली मोठीच देणगी आहे असे निश्चितपणे म्हणावे लागते. त्यांच्या सेवामय पवित्र स्मृतीस मी अभिवादन करतो.

✧ ✧ ✧



# माझे मित्र
# मारूतराव शंकरराव घुले पाटील

**भाऊसाहेब सं.थोरात**
संस्थापक अध्यक्ष
संगमनेर भाग स.सा.का.लि.अमृतनगर

पाच सहा वर्षांपूर्वीची गोष्ट. त्यावेळी माजी खासदार श्री.दादा पाटील शेळके हे जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष होते. नेहमीप्रमाणे मी संचालक मंडळाचे मीटिंगसाठी नगरला गेलो होतो. जातानाच श्री घुले पाटील आजारी असून डॉ.निसळ यांचेकडे वैद्यकीय उपचार घेत आहेत असे कळले. त्यांना भेटून नंतरच बँकेत जायचे मी ठरवले. दवाखान्यात त्यांना भेटण्यासाठी गेलो. एका मोठ्या रूममध्ये कॉटवर ते पोटदुखीने तळमळत आहेत असे दिसले. त्यांची गंभीर अवस्था पाहवेना. मी त्यांचेशी बोलू शकलो नाही. बँकेत जाऊन दादा पाटील शेळके व सुधाकर शेरकरांना हे सांगितले. मारूतराव पाटील अत्यवस्थ असल्याने आपली मीटिंग तहकूब करा हेही सांगितले. मारूतरावांना ताबडतोब पुण्याला उपचारासाठी हलविले.

महाराष्ट्र राज्यातील माझ्या अनेक मित्रांपैकी श्री मारूतराव घुले हे माझे परम स्नेही. सहकारी समविचारी स्नेही म्हणून आम्ही एकत्र राहिलो. १९६० पासून आबासाहेब निंबाळकर, मारूतराव घुले पाटील ही नवीन मंडळी काँग्रेसमध्ये आली होती. दहिगांव-ने हे शेवगांव तालुक्यातलं अत्यंत आडवळणी गांव. भरपूर शेतीवाडी, आर्थिक सुबत्ता, गावांत पाटीलकी, आदराचे स्थान होते.

जिल्हा सहकारी बँकेच्या स्थापनेनंतर व्यक्तिगत सभासद केल्याच्या कारणावरून फार मोठा वाद निर्माण झाला होता.

१९६१ ची बँकेची संचालक मंडळाची निवडणूक फार संघर्षाची झाली. तीत पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटलांना प्रोसेसिंग संस्थेमधून उभे केले होते. मारूतराव घुले पाटील यांनी शेवगांव तालुका सहकारी जिनिंग प्रेसिंग संस्था काढली होती. त्या संस्थेचे मतदार म्हणून स्वतः मारुतराव पाटील होते. पद्मश्रीना निवडून आणावे म्हणून स्वतः अण्णासाहेब शिंदे मारूतराव पाटलांना भेटण्यासाठी गेले व त्यांचे मत विठ्ठलरावांना मिळाले. एक मताने विखे पाटील निवडून आले.

जिल्हा सहकारी बँकेच्या संघर्षात एम्.के. फिरोदिया, के.बी.रोहमारे हे एका बाजूने तर अण्णासाहेब शिंदे, विठ्ठलराव विखे पाटील, बाबुराव दादा तनपुरे, शंकरराव काळे, मारूतराव घुले पाटील हे दुसऱ्या बाजूने. १९६० ते १९६४ पर्यंत हा असा संघर्ष चालू होता. त्यामध्ये आम्ही एकत्र काम केले हे विशेष होय.

बँकेतील व्यक्तिगत सभासदांसंबंधाचे संदर्भात फार मोठा संघर्ष झाला. कारण एम्.के.फिरोदिया, के.बी.रोहमारे आदिंनी व्यक्तिगत सभासदांतून चार संचालकांची निवड ठरविली. त्यावेळी जिल्ह्यातील जिल्हा सहकारी बँकेच्या सभासदांनी रिक्विझशन सभा बोलावली. त्यात व्यक्तिगत सभासदांचे जे चार सभासद होते त्यांचे संचालकपद रद्द करण्याची मागणी झाली. जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्ते त्या विषयावर एकत्र होते. त्यात मारूतराव पाटील हेही एक प्रमुख होते. त्या ठरावाच्या बाजूने २/३ मते न पडल्यामुळे ठराव नापास झाला. पुढील वर्षी २१ संचालकांपैकी ११ संचालक आमच्या बाजूने आहेत हे समजून चेअरमन निवडीचे वेळी११ सभासदांना आम्ही बाहेर फिरतीवर घेऊन गेलो. त्यावेळी मारूतराव पाटील हे या प्रयत्नात प्रमुख होते. परंतु चेअरमन निवडीच्या दिवशी एका संचालकाने विरूध्द बाजूने मत दिल्यामुळे आमचा पराभव झाला.

१९६५ मध्ये मी जिल्हा सहकारी बँकेचा अध्यक्ष झालो. सतत आम्ही एक विचाराने काम करायचो. बँकेची आर्थिक परिस्थिती सुधारत चालली. परंतु वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे, पाणी टंचाईमुळे बँकेची थकबाकी वाढत चालली. परंतु शासन व रिझर्व बँकेकडून कर्ज वसुलीला तहकुबी देऊन कर्जाचे मध्यम मुदतीत रूपांतर केले.

मी जिल्हा बँकेचा अध्यक्ष असता अहमदनगरला गेलो होतो. मारूतराव पाटलांच्या धर्मपत्नी सौ.जिजाबाई आजारी होत्या. त्यांना उपचारासाठी नगरला दवाखान्यात ठेवले होते. त्या अल्पशा आजारातच त्यांचे दुःखद निधन झाले. श्री.मारूतराव पाटलांच्या कुटुंबियांवर हा भयंकर आघात होता. मुले लहान होती. त्यांच्या कुटुंबावर हे मोठे संकट कोसळले होते. मारूतरावांच्या वृध्द आईने लहान मुलांचा सांभाळ केला.

१९६२ मध्ये ते शेवगांव मतदार संघातून महाराष्ट्र विधान सभेचे सदस्य (M.L.A.) झाले. १९६४ ते १९७४ अखेर ते जिल्हा काँग्रेस समितीचे १० वर्षे अध्यक्ष होते. पुढील सात वर्षे ते विधान परिषद सदस्य (M.L.C.) होते. तो काळ महाराष्ट्रात व नगर जिल्ह्यात काँग्रेसचा सुवर्णकाळ म्हणावा लागेल. याच काळात मुळा धरणाचे काम पूर्ण होऊन उजव्या कालव्याचे पाणी राहुरी, नेवासा, शेवगाव व पाथर्डीच्या काही गांवासाठी मिळू लागले. तसेच १९६७ नंतर गोदावरीच्या पैठणजवळ जायकवाडी धरणाचे काम सुरू झाले. त्या धरणात नेवासा, शेवगांव तालुक्यातील ६८ गांवे गेली. मारूतराव पाटलांनी धरणग्रस्त

शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन शासन दरबारी पाठपुरावा केल. त्यांचे पुनर्वसनाचे महत्वाचे काम त्यांनी केले. ते सतत स्मरणात ठेवले पाहिजे.

शेवगांव - नेवाश्यात मुळेचे शाश्वत पाणी फिरल्यामुळे सहकारी साखर कारखानदारीला महत्व आले. डॉ. अणासाहेब शिंदे यांचेकडे मध्यवर्ती सरकारमध्ये अन्न व शेती खाते होते. त्यातून पाथर्डी व कर्जत तालुक्यात एक एक साखर कारखाना उभारण्याचा निर्णय घेतला. ते काम पाथर्डीमध्ये श्री.दादा पाटील राजळे यांनी वृध्देश्वर स.सा.कारखाना, तर कर्जतमध्ये श्री. आबासाहेब निंबाळकर यांनी जगदंबा स.सा.कारखाना उभारुन केले. शेवगांव - नेवासे तालुक्यात मारुतराव पाटलांनी श्रीज्ञानेश्वर स.सा.कारखान्याची उभारणी केली. तर सोनईला यशवंतराव गडाखांनी मुळा स.सा.कारखान्याची निर्मिती केली.

उसाचे उत्पादन १३ लाख मे. टनावर गेल्याने मारुतराव पाटलांनी ज्ञानेश्वर कारखान्याची दररोजची १२५० टी.सी.डी. कार्यक्षमता वाढवून ५००० टी.सी.डी. वर नेली. उपपदार्थ निर्मितीचा (डिस्टिलरी) प्रकल्पही सुरु ठेवला. मुळा कारखान्यानेही १० लाख लिटर मद्यनिर्मितीची क्षमता वाढविली. हे दोन्ही कारखाने महाराष्ट्रात उत्कृष्ट व्यवस्थापनाच्या बाबतीत प्रसिध्दीस आले आहेत.

मारुतराव पाटील हे गोड स्वभावाचे व मितभाषी आहेत. **कोणाला दुखवायचे नाही व स्वतःचा मुद्दा सोडावयाचा नाही हा त्यांचा दंडक होता.** १९७७ साल असावे. ते नगर जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष होते. वार्षिक सभा सुरु झाली होती. महाराष्ट्रात काँग्रेस कमिटीत दुफळी माजली होती. त्या वेळी महाराष्ट्रात पुलोद चे सरकार आले होते. वार्षिक सभेच्या अध्यक्षस्थानी मारुतराव पाटील होते. त्यावेळी मी व मारुतराव पाटलांनी सर्वांना शांत केले. ग्रामसभा शांततेत पार पडली.

मारुतराव पाटलांच्या पोटाचा विकार वाढतच चालला होता. डॉ. अण्णासाहेब शिंदे यांचे जामात डॉ. धांडे हे नुकतेच लंडन येथून F.R.C.S. होऊन आले होते. त्यांनी नागपूरला गॅस्ट्रेलॉजी संबंधी दवाखाना टाकला होता. त्यांचेकडे उपचार घेण्यासाठी मी पुष्कळ आग्रह धरला. परंतु मारुतराव नुसते 'पाहू पाहू' म्हणत. त्यानंतर पुण्याला त्यांच्या पोटाचे मोठे ऑपरेशन झाले. त्यावेळी मी त्यांना भेटण्यासाठी जाऊन आलो. त्यानंतर त्यांची प्रकृती पूर्ववत होऊ लागली. मध्यंतरी मी पुणे येथे आजारी असता तेही मला भेटायला आले. दोन तास चर्चा केली. जिल्हा सहकारी बँकेच्या २००२ च्या निवडणूका आपण एकत्र लढवू व जिंकू असे ठरविले. परंतु काही मंडळीच्या वेडेपणामुळे बँकेच्या निवडणुकीत अडचणी आल्या. परंतु त्यांनी आमचे बाजूनेच मतदान केले. बँकेचे धोरण ठरविताना एक विचाराने निर्णय घेत असू. तेथे गट-तट पक्षभेद पाहिले जात नसत.



मे महिन्याचा शेवटचा आठवडा असावा. मृत्युपूर्वी तीन चार दिवस आधी ते नाशिकहून पुणे येथे जातांना संगमनेर कारखान्यावर (३-७-२००२) आले होते. तसा मला निरोप मिळाला. मी कारखान्यावर आलो. एवढ्या रात्री पुण्यास न जाता येथेच थांबून विश्रांती घ्या असा मी आग्रह केला. त्यांची सर्व व्यवस्था केली. दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजतां कारखान्यावर गेलो. खूप खूप गप्पा सप्पा झाल्या.

.....अन् एक दिवशी दुपारी (८-७-२००२ रोजी) असाच फोन खणाणला. मारुतराव पाटील शेवगावला जातांना त्यांना हार्ट अॅटॅक आला आणि ...... त्यांच्या दुःखद निधनाची अनपेक्षित वार्ता जिल्ह्यात वाऱ्यासारखी पसरली. आपल्या घरातलाच हाच कुणी तरी गेल्यासारखा जो तो हळहळत होता.

**मारुतरावांच्या जाण्याने नगर जिल्ह्याचीच नव्हे तर महाराष्ट्राची मोठी हानी झाली आहे. ही पोकळी भरून येणारी नाही.**

मराठी मातीशी इमान राखणारा व समाजाशी नाते सांगणाऱ्या माझ्या मित्रास - त्यांच्या स्मृतीस माझे शतशः प्रणाम्.



# परिवर्तनाच्या प्रतिसृष्टीचा निर्माता

**मा. श्री. रावसाहेब पांडुरंग शिंदे** (ॲडव्होकेट)
श्रीरामपूर

श्री.मारुतराव पाटलांना प्रथम पाहिलं ते १९६२ च्या निवडणुकीच्या वेळी. तसे त्या अगोदरही त्यांच्याविषयी ऐकून होतो. पण त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विशेष प्रत्यय आला मा.यशवंतराव चव्हाणसाहेबांनी मुंबईला बोलाविलेल्या काँग्रेस आमदारांच्या मेळाव्यात. त्यावेळचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.यशवंतरावजींनी बोलाविलेल्या या मेळाव्यासाठी नगर जिल्ह्यातील काँग्रेसच्या आमदारांना घेऊन श्री.आबासाहेब निंबाळकर मुंबईला गेले होते. माझे बंधुही याच निवडणुकीत (खासदार श्री.अण्णासाहेब पांडुरंग शिंदे) खासदार म्हणून निवडून आले होते. त्यावेळी तेही मुंबईत होते. मीही माझ्या काही कामानिमित्त मुंबईत होतो आणि माझ्या बंधूंचीही भेट घ्यायची होती. M.L.A. होस्टेलजवळ माझी व श्री.आबासाहेब निंबाळकरांची भेट झाली. ''काय फार कामात आहात का ?'' असं त्यांनी विचारलं. ''थोडं कोर्टाचं काम होतं'' मी खुलासा केला. माझे बंधु आणि आबासाहेबांचा दाट स्नेह होता.

आबासाहेबांनी मलाही मुख्यमंत्र्यांच्या सह्याद्री बंगल्यावर नेले. सर्व काँग्रेस आमदारांचा ग्रुप तिथे होता. सह्याद्री बंगला हे त्यावेळी मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान होते. आम्ही सगळे यशवंतरावांना भेटायला तिथे गेलो. यथोचित आगत स्वागत झालं. सगळेजण बसले. यशवंतरावांनी सर्वांच्या नमस्काराचा स्वीकार केला. **अगदी सुरवातीसच त्यांनी मारुतरावांची चौकशी केली. आबासाहेबांना म्हणाले, ''अहो, मारुतराव आलेत का ?''** ''हो, आलेत हे काय माझ्या शेजारीच बसले आहेत.'' आबासाहेबांनी सांगितले. मारुतराव पाटील उठून उभे राहिले आणि यशवंतरावजींना नमस्कार केला. मारुतराव पाटलांच्याविषयी असा निःसीम आदर मुख्यमंत्र्यांकडून व्यक्त झाला होता. मारुतरावांना त्यांच्या मतदार संघात किती मतं मिळाली, विरोधकांना किती मिळाली, मतदार संघाची एकूण परिस्थिती कशी काय आहे, अशी इत्थंभूत माहिती यशवंतरावांनी घेतली. त्यावेळी मारुतरावजींच्या संदर्भात, त्यांच्या कौतुकास्पद कार्याविषयीचं अनौपचारिक प्रेमाचं दर्शन मला घडलं. त्यांचं उमदं व्यक्तिगत, तरूण वय, शरीरयष्टी,



तडफदारी इ.चा विशेष उल्लेख यशवंतरावजींनी केला. त्यांच्या त्या व्यक्तिमत्वाचा जो ठसा माझ्या चित्तावर उमटला तो चिरंतन तसाच राहिला आहे. दोघेही एकाच पक्षाचे. दोघांचीही यशवंतरावांवर असीम श्रध्दा होती. त्यांच्या स्वभावसाधर्म्यामुळे त्यांचा परस्पराविषयीचा स्नेहभाव आहे तसाच कायम टिकून राहिला. पहिल्या भेटीतला मारुतरावजी व मी आम्हा दोघांचाही स्नेहसंबंध अखेरपर्यंत तसाच राहिला.

महाराष्ट्रातल्या सहकारी चळवळीला एक अनिष्ट प्रवृत्तीचं वळण लागू पहात होतं. १९६८ चा तो काळ. मी त्या अनिष्ट प्रवृत्तीविरूध्द चळवळ उभारली. सहकारी चळवळीतल्या भ्रष्टाचाराच्या अनिष्ट प्रवृत्तीविरूध्द जनमत कसं संघटित करता येईल यासाठी मी माझं सारसर्वस्व पणाला लावून चळवळीत उतरलो. माझा त्यावेळी वकिलीचा व्यवसाय अत्यंत यशस्वी रितीने चालला होता. अशा अवस्थेत तोही मी सोडून दिला आणि तीन वर्षे तनमनधनाने मी त्या चळवळीस वाहून घेतले. भ्रष्टाचार विरोधातली माझी ही चळवळ महाराष्ट्रभर खूप गाजली आणि त्या चळवळीत एका सहकारी साखर कारखान्यातील अत्यंत अनिष्ट व्यवहार कागदोपत्री पुराव्यानिशी मी बाहेर काढला. आणि त्याबाबत महाराष्ट्र शासनाने योग्य ती चौकशी करावी असा आग्रह मी धरला. त्यावेळी स्व.विनायकराव पाटील सहकार मंत्री होते. त्यांचेकडे जाताना मारूतराव पाटलांनी मला मनापासून साथ केली. स्वतः माझ्याबरोबर आले. इतकेच नाही, तर त्यांनी नुकतेच राजकारणात प्रवेश केलेले श्री. बाळासाहेब विखे पाटील यांनाही बरोबर घेतले. माझ्याबरोबरच वकिलीचा व्यवसाय करणारे गोविंदरावजी आदिक हेही होते. आम्ही सहकार मंत्री ना.विनायकराव पाटलांकडे गेलो. तेव्हा त्या तथाकथित संस्थेची सहकारी कायद्यानुसार चौकशी करावी असा आम्ही आग्रह धरला. त्यानुसार तसा आदेश ना.विनायकराव पाटलांनी काढला. आम्ही अत्यंत आनंदात होतो, समाधानात होतो. नागपूरहून येतांना आम्ही खूप संत्री खरेदी केली. मारुतरावांना त्यांच्या घरी दहिगांवी सोडले आणि नंतर आम्ही श्रीरामपूरला आलो. रात्री दोन वाजून गेले होते. सहकार मंत्रालयाने संबंधित सहकारी संस्थेची चौकशी केली. शासनाने त्या संस्थेचं संचालक मंडळ बरखास्त केलं. हे प्रकरण त्या काळी महाराष्ट्रभर खूपच गाजलं. या प्रवासात मारुतराव पाटलांचा सुखद सहवास मिळाला. त्यांची मिस्किल मार्मिक बोलण्याची हातोटी, नर्म विनोद, हास्य करण्याचं कौशल्य यामुळे त्यांच्या संगतीत खूपच प्रसन्न वाटलं.

जायकवाडी धरण व्हायचे निश्चित झाले. नेवासा, शेवगांव , गंगापूर, पैठण तालुक्यातील बरीच खेडी धरणात जाणार होती. हजारों शेतकरी कुटुंबावर विस्थापित व्हायची वेळ होती. त्यांच्या पुनर्वसनाचा बेरोजगारीचा त्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणाचा असे एक ना दोन शेकडो प्रश्न उपस्थित झाले होते. अशा गंभीर परिस्थितीला सामोरे जाताना लोकप्रतिनिधी या नात्याने मारुतरावांच्या नेतेपणाला खरोखर कसोटी

लागली होती. त्याच काळात मुळा धरणाच्या पाण्यामुळे बरीचशी जमीन ओलिताखाली येणार होती. आपल्या भागात एखादा सहकारी साखर कारखाना काढल्यास वरील अडचणींवर बऱ्यात प्रमाणावर मात करता येईल, असं मारुतरावांच्या मनानं घेतलं. अनेक कार्यकर्त्यांनीही त्यांच्या या विचाराला साथ दिली. सहकारी तत्वावर आपल्या भागात साखर कारखाना काढण्यासाठी जिद्दीने प्रयत्न सुरू झाले. मात्र हा विचार प्रत्यक्षात उतरवितांना अनेक अडचणी होत्या. लायसन्स मिळविण्यासाठी खूप कडक नियम होते. सहजासहजी परवाना मिळेल अशी परिस्थिती नव्हती. शिवाय कारखाना उभारणीसाठी लागणारे सिमेंट, स्टील यावरही नियंत्रणे होती. अनेक शासकीय चाचण्यामधून जावं लागायचं. खूपच प्रयासाचं काम होतं.

योग असा की, नेमके याच काळात मा.श्री.अण्णासाहेब शिंदे केन्द्रीय मंत्रिमंडळात होते. त्यामुळे साहजिकच मारुतराव पाटलांनी याबाबत अण्णासाहेबांचे मार्गदर्शन व सहकार्य घेऊन पावले टाकण्यास सुरवात केली. आणखी एक योग असा की, नेमका त्याच काळात सोलापूर जिल्ह्यातील माळीनगर साखर कारखान्यास विस्तारवाढ (expansion) करायचं घाटत होतं. त्यांना नवीन मशिनचं लायसन्स मिळालं होतं. आणि इकडे मारूतरावांना माळीनगरची पहिली मशिनरी विकत घेतल्यास लायसन्सचा प्रश्न सुटेल असं वाटत होतं. माळीनगर कारखान्याला स्टील, सीमेंट व वाढीव मशिनरी (वाढीव क्षमतेची) खरेदी संदर्भात मा. ना. आण्णासाहेब शिंदे यांनी केंद्रामार्फत मदत करायचा विचार पुढे आला. त्यामुळे आपल्याला शेवगांव-नेवासा भागात साखर कारखाना काढणं सुलभ होईल अशी कल्पना होती. त्याबाबत माळीनगर साखर कारखान्याशी वाटाघाटी करून कायदेशीर करार करण्याचे ठरले. माळीनगरची मंडळी, मा. ना. अण्णासाहेब शिंदे आणि मारूतराव पाटील यांनी ही योजना निश्चित करण्याचे ठरले. त्यासाठी पुण्याला दहा बारा बैठका घ्याव्या लागल्या. माळीनगर कंपनीच्या वतीने पुण्यातले त्यावेळचे सुप्रसिद्ध वकील श्री. जे. जे. उर्फ नानासाहेब कर्णिक असत आणि मारूतराव पाटील मला घेऊन जात. त्या काळी जिल्हा काँग्रेस पक्षात केवळ एकोपाच होता असे नव्हे, तर एकमेकांविषयी जिव्हाळा असायचा. एकमेकाच्या कार्यात सर्वजण तत्परतेने उभे राहायचे. पुण्याला जाण्यासाठी वाहनाचे प्रश्न असत. बऱ्याच वेळा श्री. बाळासाहेब विखे पाटील आपल्या वाहनाने माझ्याकडे येत. मला सोबत घेत. मग आम्ही दोघे मारूतरावांना घ्यायला दहिगांवला जात असू. त्यांना घेऊन पुण्याला बैठकीसाठी जायचो. अशा दहा बारा बैठका झाल्या. बैठका शक्यतो रविवारी असत. ॲड. नानासाहेब कर्णिक आणि अण्णासाहेब यांचे मैत्रीचे संबंध होते. त्यामुळे माझेही त्यांचेशी पुढे स्नेहसंबंध दृढ होत गेले. आणि बैठकीही खेळीमेळीच्या वातावरणात पार पडत. ॲग्रीमेंटसंदर्भात असणारा गुंता उकलणं सुकर झालं. मारूतरावांशी माझा स्नेहसंबंध घट्ट होण्याचं कारण त्यांच्याकडून मला अर्थार्जन व्हावं हा उद्देश नव्हता. समाजाचं एक काम आहे, ग्रामीण भागातील बहुजन समाजाचं, शेतकऱ्यांचं काम त्यांनी हाती घेतलं होतं. ही गोष्ट माझ्या दृष्टीने खूपच प्रशंसनीय होती. त्यांच्या कामात मला अत्यंत समाधान वाटायचं. त्यांच्या हाती घेतलेल्या मोठ्या कामात



आपलाही खारीचा वाटा असावा अशी माझी भावना होती. सामाजिक कार्यात मारूतरावांनी स्वतःला झोकून दिलं होतं. तनमनधनानें त्यांचं समर्पण मी पहात होतो. गांधीजी म्हणत असत, When I give , I give all गांधीजींच्या ध्येयवादी आदर्शाचा साक्षात्कार मला त्यांची धडपड पहाताना होत असे. त्या कामाचा जणू त्यांनी ध्यासच घेतला होता. धावपळ, कष्ट, शारीरिक व मानसिक तशीच आर्थिक झळही त्यांना झेलावी लागत असे. हे मी करीत आहे किंवा माझ्यामुळेच हे होत आहे असा अहंकार त्यांना कधी शिवला नाही. त्याचं प्रदर्शनही त्यांनी कधी केलं नाही, सहकारी साखर कारखान्याचं असं बीजारोपण मा. ना. अण्णासाहेबांमुळेच झालें. साखर कारखान्याचा श्री गणेशा अशा तऱ्हेने मारूतराव पाटलांच्या अफाट परिश्रमातून झाला आहे. नंतरही मी अनेकदा कारखान्यावर गेलो. त्यांचेबरोबर तास न् तास बोलणी होत. माझ्याविषयी त्यांच्या ह्यदयात निःसीम प्रेम होतं. ते जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष होते. श्रीरामपूर येथील सहाकरी बँकेसाठीच्या नवीन इमारतीचं उद्‌घाटन होतं. त्या दिवशी गुढी पाडवा होता. कार्यक्रमासाठी मारूतराव आले. उद्‌घाटनानंतर ते आमच्या घरी आले. त्या दिवशी भोजनाचा कार्यक्रम आमचेकडेच पार पडला.

मी लिहिलेल्या 'शिक्षण आणि समाज' व 'चरित्र आणि चारित्र्य' या दोन पुस्तकांचं प्रथम प्रकाशन श्रीरामपूर येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात दि. १९-८-२००१ रोजी झालं. प्रकाशन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. ना. बाळासाहेब थोरात होते. प्रकाशन कविवर्य ना. धों. महानोर यांचे हस्ते झाले. या कार्यक्रमासाठी मारूतराव पाटलांना खास निमंत्रण देण्यात आले होते. मारूतराव पाच मिनिटेच बोलले पण त्यांनी सारे सभागृह डोक्यावर घेतलें. भाषणाच्या ओघात ते म्हणाले, हे रावसाहेब कसे आहेत ? तर -

***जरी आले चंद्र सूर्य हातीं,***
***तरी ना विसरले पायाखालची माती.***

माझ्याविषयी त्यांनी केलेलं हे भाषण म्हणजे **माझ्या जीवनध्येयावर मारूतरावांनी केलेलं अचूक भाष्यच होतं.** सभागृहातील सगळे श्रोते म्हणाले, मारूतरावांइतकं उत्कृष्ट भाषण कुणीच केलं नाही. टाळ्यांचा कडकडाट पाच मिनिटं चालू होता. ते पाच मिनिटांचं भाषण मारूतरावांच्या रसिक ह्यदयाची साक्ष देऊन गेलं.

दहिगांवला कुणा एका डॉक्टरांकडे मंदिरात मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होणार होती. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी मारूतराव मंदिरात गेले होते. दहिगांवला याच दिवशी मारूतराव पाटलांना भेटायला म्हणून गेलो. त्यांच्या वाड्यावर गेलो. त्यांची चौकशी केली. ''साहेब मंदिरात प्राणप्रतिष्ठेच्या कार्यक्रमला गेले आहेत. तिथे भेटतील.'' वाड्यातीलच कुणी एकानें सांगितले. मी त्या मंदिरात गेलो. मारूतराव तिथे होतेच, देवतेच्या प्राणप्रतिष्ठेनिमित्त तिथं होमहवन, पूजाअर्चा इ. कार्यक्रम सुरू होते. माझ्या अनपेक्षित आगमनाने मारूतरावांना जणू अत्यानंद झाला. आणि त्यांनी मलाच पूजेला बसवलं. माझ्या हस्तेच पूजेचा



कार्यक्रम उरकण्यात आला. नंतर सत्कार-सोहळा संपन्न झाला. त्यांच्या मनाचा मोठेपणा सांगणाऱ्या अशा कितीतरी घटना, प्रसंग सांगता येतील. **या खरोखर मोठ्या माणसाला मोठेपणाचं जणू वावडं** (allergy) **होतं.** वरील दिवशी श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. र. कि. आगळे हेही माझ्या बरोबर होते. देश, माणूस, प्रश्न, विषय यांची खूप जाण असणारं त्यांचं सुसंस्कृत व्यक्तिमत्व मला खूप भावलं. मा. ना. यशवंतरावजी चव्हाण व मा. ना. अण्णासाहेब शिंदे ही त्यांची श्रद्धास्थाने होती.

असेच एकदा - मला वाटतं मागच्याच एप्रीलच्या अखेरीस मारूतराव श्रीरामपूरला माझेकडे आले होते. ते ''नको नको'' म्हणत असतानाही मी त्यांना मुक्कामास ठेवून घेतले. संध्याकाळचे जेवण आटोपले. बंगल्यासमोरील हिरवळीवर दिलखुलास गप्पा झाल्या. त्यावेळी मी मारूतरावांना म्हणालो होतो - ''शेवगांव - नेवाश्या सारख्या दुष्काळी भागाचा कायापालट करण्याच्या उद्देशाने दोन्ही तालुक्यात सहकारी संस्थांचे जाळे तुम्ही निर्माण केले. आणि सहकार-सेवेतून, तुमच्या अथक परिश्रमांतून तुमच्या **कर्तृत्वाचा कलशाध्याय** ठरावा असा **श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना** तुम्ही उभा केलात. **इवलेसे रोप आज गगनावरी गेले आहे.** तुमच्या या कार्याला कुठं तरी लिखित स्वरूपात जतन करून ठेवा. तुम्ही जो त्याग केला, कष्ट उपसले, खस्ता खाल्ल्या हे नव्या पिढीपुढं आलं पाहिजे. फक्त गाड्या-घोड्या, हार-तुरे, वैभव, सत्कार-सोहळे एवढंच त्यांच्या नजरेत बसतं. पण यात कोणाचे किती तरी परिश्रम खर्ची पडलेले असतात, त्याकडे नव्या पिढीचे लक्षच जात नाही. आणि त्यामुळे कष्टातून उभे राहिलेल्या कार्याचा विकृत संदेश ते घेतात. ही सगळी माहिती समाजापुढे येणं अत्यंत आवश्यक असतं. याबाबत तुम्हाला जी माहिती असते, ती इतरांना नसते, **यासाठी तुमचं कार्य ग्रंथरूपात चिरंजीव करून ठेवा.''**

मारूतरावांना माझ्याविषयी किंवा मला मारूतरावांविषयी वाटणाऱ्या प्रेमामुळे मी असं म्हणतो, असं नाही. हे कार्य त्यांच्या हयातीतच व्हायला हवे होते. ही जी खंत मला वाटत आहे, तिला एक सामाजिक आशय आहे. माझी ही खंत मारूतरावांकडे मी अनेकदां व्यक्त केली होती. तसा माझा आग्रह असे. ते हयात असतानाच व्हायला हवे असणारे काम **त्यांचे सुपुत्र चि. नरेंद्र (आमदार श्री. नरेंद्र पाटील)** व **चि. चंद्रशेखर (श्री. चंद्रशेखर पाटील) यांनी हाती घेतले आहे.** त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

माझ्या षष्ठ्यब्दीपूर्तीनिमित्त १९८८ मध्ये मा. ना. श्री. शरदराव पवार - मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे हस्ते महाराष्ट्र पातळीवर एक मोठा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात गौरवग्रंथ, गौरविका, वैचारिक चर्चासत्र यांचेही आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी सत्कार-समितीचे उपाध्यक्ष स्वा. सै. पोखरकरसाहेब आणि समितीचे सचिव प्रिं. शिवाजीराव भोर हे मारूतराव पाटलांना भेटायला गेले. कार्यक्रमाची रूपरेषा, माहिती त्यांना सांगितली. ''तुम्ही काही तरी



द्या'' असं म्हणायची संधीही त्यांना न देता मारूतराव म्हणाले, ''अरे, रावसाहेबांचा षष्ठ्यब्दीपूर्ति सोहळा आहे काय ? कोरा चेक आण. मी त्यावर सही करतो. मी हे त्यांच्यावरील प्रेमामुळे बोलतो आहे, असं नाही. श्री ज्ञानेश्वर कारखान्याच्या उभारणीवेळी रावसाहेबांनी जी वणवण, दगदग सोसली, तें सार काही माझ्यावाचून इतरांना ठाउक नाही.'' कृतज्ञतेची अशी अजब अभिव्यक्ती करीत त्यांनी श्री. पोखरकर व प्रिं. भोर यांना आश्चर्याचा सुखद धक्का देऊन टाकला.

यानंतरही अनेकदा मारूतरावांशी वार्तालाप करायला कारखान्यावर जाणें झाले. त्या वेळी त्यांचे व माझेही अतिशय जवळचे स्नेही श्री. सुमनभाई शहा हेही बरोबर असायचे. कामाचा एवढा जबरदस्त व्यापही आमच्या संगतीत रमताना ते विसरून जात.

प्रसिद्धी माध्यमं सारी शहरी प्रभावाखाली आहेत. त्यामुळे शहरी भागांचाच उदो उदो होत आहे. ग्रामीण भाग मात्र दुर्लक्षित राहिला आहे. ग्रामीण भागात होणारे सामाजिक परिवर्तन सर्वदूर पोहोचत नाही. **ग्रामीण भागातही सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिवर्तन–आणि तेही सहकाराच्या माध्यमातून–घडवून आणणारी कै. मारूतरावांसारखी माणसं म्हणजे प्रतिसृष्टीचे निर्माते–विश्वामित्र होत**, असं मला मुद्दाम नमूद करावंसं वाटतं.

✧ ✧ ✧



# विवेकशील व्यक्तिमत्वाचा राजकारणी ..... स्व.मारुतराव घुले

**आमदार शंकरराव गेणूजी कोल्हे**
कोपरगांव

महाराष्ट्रातील पावन नेवासा परिसरांत एक विवेकशील व्यक्तीमत्व राजकीय क्षेत्रात प्रसिध्दीस पावले. नेवासा-शेवगांव या दोन्ही तालुक्याच्या जोड परिसरात स्व.मारुतराव घुले पाटील यांच्या रूपाने हे विवेकशील व्यक्तीमत्व केवळ अहमदनगर जिल्ह्याच्याच नव्हे तर महाराष्ट्र राज्याच्या राजकारणांत स्वतःचे वैशिष्ट्य राखून ठेवणारे ठरले. स्व.मारुतराव घुले यांच्या या यशस्वी व्यक्तीमत्वाची उणीव आजपर्यंत अहमदनगर जिल्ह्याच्या राजकारणातील सर्वच राजकीय नेत्यांना प्रकर्षांने जाणवते.

नेवासा-शेवगांव या दोन्ही तालुक्याचा परिसर तसा पूर्वीपासून दुष्काळी परिस्थितीचा. तालुक्यातील उपलब्ध जमिनीचे क्षेत्र बहुअंशी काळ्या कसदार व खोल स्वरूपाचे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात मुळा व जायकवाडी ही दोन धरणे झाली. यामुळेच तसेच मूळच्या विहीर बागायती क्षेत्रात झालेल्या वाढीमुळे उसाखालच्या बारमाही पिकांचे क्षेत्रांत या परिसरांत वेगांने वाढ होत गेली. त्यामुळेच नेवासा शेवगांव परिसरांसाठी स्वतंत्र साखर कारखाना काढण्याची गरज निर्माण झाली. स्व.मारुतराव घुले पाटील यांनी सहकाराच्या माध्यमातून संत ज्ञानेश्वरांच्या या पावन भूमीत या जोड परिसरांचे विकासासाठी श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना १९७५ साली काढला. ह्याच सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमांतून विकासाच्या अनेकविध योजना व परिसरांमध्ये विकासकेंद्रे मारुतरावजींनी कार्यान्वित केली.

स्व.मारुतराव घुले पाटील यांच्या विषयी दोन शब्द लिहीतांना मनस्वी समाधान वाटते. मूळचे श्रीरामपूर तालुक्यांतील पढेगांव निवासी स्व.मारुतराव घुले पाटील हे पढेगांव येथील कै.रावसाहेब दादाजी बनकर पाटील यांचे कनिष्ठ बंधु. त्यांचे बालपण पढेगांव येथेच गेले. परंतु १९४९ साली झालेल्या दत्तक विधानानंतर शेवगाव तालुक्यातील दहीगांव-ने या गावी स्थलांतरीत झाले. तीच त्यांची खरी कर्मभूमी



ठरली. नेवासा शेवगांव परिसरात त्यांनी विकासाची गंगोत्री श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्यांच्या रूपाने आणली व त्याचेच आजचे विकसित रूप म्हणजेच ज्ञानेश्वर उद्योग समूह.

ग्रामीण भागात सहकाराच्या माध्यमातून काम करतांना त्यांनी प्रामुख्याने समाजकारणांवर विशेषभर दिला. समाजकारण व राजकारण यांचा योग्य समन्वय साधून प्रामुख्याने राजकारणांत जिल्हास्तरांवर स्वतःचे विशिष्ट स्थान निर्माण केले. नेवासा - शेवगांव परिसर हा पुर्वीपासून कमुनिस्टांचा भाग आहे. परंतु या परिसरांत काँग्रेस पक्षाला रूजविण्याचे व वाढविण्याचे कार्य स्व.मारुतरावाजीनी अत्यंत तळमळीने केले. काँग्रेस पक्षांत राहुन त्यानी जिल्ह्याच्या राजकारणांत व सहकार क्षेत्रात विविध महत्वाच्या पदावर कामे केली. या पदांवर कार्यरत असतांना जिल्ह्याच्या तत्कालीन बहुअंशी नेत्यापैकी त्यांचे वेगळे गुण विशेष प्रकर्षाने भावले. **स्व.यशवंतरावजी चव्हाण यांची स्व.मारूतराव घुले पाटलांवर विशेष मेहेरनजर होती.** स्व.यशवंतरावजींच्या आग्रहांमुळेच स्व.मारूतरावजींनी विधानसभेची निवडणूक लढविली. सन १९६२ ते १९७२ पर्यंत नेवासा - शेवगांव मतदार संघाचे लोकप्रतिनीधी म्हणून विधानसभेत व नंतर विधान परिषदेत काम केले.

स्व.यशवंतरावजींच्या राजकीय सान्निध्याचा फायदा स्व.मारूतराव घुले यांचे व्यक्तिमत्व घडविण्यांत झाला होता. राजकारणांत एरव्ही प्रकर्षाने आढळून येणारा संयम हा गुणधर्म स्व.मारूतरावजींच्या ठायी होता. या संयमशीलपणाला विवेकशील व्यक्तीमत्वाची जोड लाभल्यामुळे स्व.मारूतरावजींचे व्यक्तीमत्व राजकीय जीवनांत आगळे वेगळ्या वैशिष्ट्याने झळकत राहिले. शेवटपर्यंत त्यांची तीच जीवनशैली राहिली होती.

जायकवाडीचे, मुळेचे पाणी शेवगांव तालुक्यास मिळावे म्हणून साडेतीन कोटी रूपयांची सडे ताजनापूर उपसा सिंचन योजना त्यांनी कार्यान्वीत केली. त्याच बरोबर जायकवाडी धरणाचे प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावण्याचे कामही त्यांनी मोठ्या धडाडीने पार पाडले. गांवच्या पोलिस पाटलांपासून ते जिल्हा बँकेच्या चेअरमन पदांपर्यंत तसेच साखर कारखान्याचे चेअरमन पदापासून विधानसभेवर आमदार या सर्वच राजकीय प्रवासांत त्यांचे संयमी व सत्त्वशील जीवन मला प्रकर्षाने भावले. आशियाखंडातील अग्रगण्य अशा अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे नेतृत्व त्यांनी दीर्घकाळ केले. अहमदनगर जिल्हा बँक विकासांत स्व.मारूतरावजींचा सहभाग फार मोठा आहे. वास्तविक पाहता राज्याच्या राजकारभारांत कॅबिनेटस्तरांवर मंत्रीपदावर काम करण्याची पात्रता त्यांची होती. परंतु दुर्दैवाने जिल्ह्यांतील अंतर्गत राजकारणामुळे त्यांना शेवटपर्यंत ती संधी उपलब्ध झाली नाही. अन् त्यांनीही कधीही त्याचा फारसा हव्यास धरला नाही.



सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रात कार्यरत असतांना स्व.मारूतराव घुले पाटील यांनी स्थानिक व बाह्य अशा दोन्हीही क्षेत्रांत भरपूर लोकसंग्रह केला आहे. वैचारिकदृष्ट्या पाहिले तर ते तसे अजातशत्रु होते. सहकारक्षेत्र, तसेच जिल्हा पातळीवर व राज्यभर राजकारणांत रत असतांना असंख्य मैत्रीचे संबंध जोडले व टिकविले होते. सौहार्दपूर्ण स्वभावामुळे त्यांच्या अनेकविध राजकारणी नेत्यांबरोबर प्रस्थापित झालेले संबंध शेवटपर्यंत दृढ राहिले. सामाजिक व राजकीय क्षेत्रांत त्यांनी नेवासा-शेवगांव या जोड परिसरांत तसेच संपूर्ण जिल्ह्यासाठी दिलेले योगदान महत्वपूर्ण ठरले आहे. गैरवाजवी व अनावश्यक वक्तृत्वाला त्यांनी सातत्याने फाटा दिलेला होता.

संत ज्ञानेश्वरांच्या पवित्र व पावन भूमीत कर्तव्यशील राहिलेले स्व.मारूतराव घुले पाटील यांनी संत ज्ञानेश्वरांसारखेच विवेकशिल व संयमशिल जीवनप्रणांलीने समाजकारण व राजकारण केले. त्यांनी राजकारणांत समाजसेवेला प्रथमप्राधान्य देऊन राजकारणाला दुय्यम स्थान दिले. अहमदनगर जिल्ह्याच्या समाजकारणांत व राजकारणांत स्व.मारूतरात घुले पाटलांनी स्वतःचा असा आदर्शवादी वैशिष्टपूर्ण ठसा उमटविलेला आहे., हे कोणीही नाकारू शकणार नाही.

✧ ✧ ✧



# मारूतराव घुले पाटील - एक सर्वांगीण व्यक्तिमत्व

**महंत श्री. भास्करगिरी महाराज**

श्री. मारूतरावजी घुले पाटील यांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यांत जीवनभर आपल्या कार्यकुशलतेचा खोल ठसा उमटविला आहे. सर्वांना बरोबर घेऊन चालणे, मोठ्यांचा आदर व लहानांचे कौतुक करणे, कार्यकर्त्यांकडून वेळीप्रसंगी घडलेल्या चुका नीटपणे समजून घेणें, त्यांना प्रेमानें जवळ घेऊन समज देणे व आपल्या समंजस विचारांनी त्या चुका दुरूस्त करणे इत्यादी गुणसमुच्चय त्यांचे ठिकाणी विशेष रूपाने पहावयास मिळतो. भेंड्याच्या उजाड-ओसाड माळरानावर एक सुंदर कल्याणकारी सहकारी साखर कारखाना उभा करून त्यांनी सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी मोठा हातभार लावला. बहुजन समाजाच्या जीवनात प्रकाश आणून त्यांचे जीवन सुखी केले. राजकीय क्षेत्रातही त्यांची कामगिरी मोलाची होती. आमच्या संस्थानावर वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमांना ते आवर्जून उपस्थित राहात. **अंतःकरणात असलेल्या धार्मिकतेचें त्यांनी कधी प्रदर्शन केले नाही** किंवा **अवडंबरही माजविले नाही.** धार्मिकतेचे अधिष्ठान कायम पक्के ठेवून संपूर्ण जीवनभर त्यांनी राजकारण केले ते केवळ राजकारणाकरिताच. आणि हे करीत असता आपल्या सर्वसमावेशक विचारांची कधीही पायमल्ली होऊ दिली नाही. हें त्यांच्या राजकीय कर्तृत्वाच्या वेगळेपणाचे वैशिष्ट्य डोळ्यात भरणारे आहे. संतमहात्म्यांविषयी आदर-भाव ठेवून त्या विचारांची स्वीकृती करणे ही त्यांच्या जीवनात एक जमेची बाजू होती.

आज शरीराने ते आपल्यात नाहीत, याविषयी सर्वांनाच दुःख आहे. त्यांचं लोकोपकारक अस्तित्व आणखी काही वर्षे हवे होते. पण ईश्वरेच्छा बलीयसी हेंच खरे. त्यांनी समाजसेवेसाठी केलेले कार्य, त्यांचे विचार चिरंतन काळपर्यंत असेच तळपत राहातील. याबद्दल आनंदच वाटतो. त्यांचे जीवनविषयक कार्याचा स्मृतिग्रंथ लिहण्याचे काम श्री. भा. शं. जोंधळे यांनी हाती घेतले आहे. **तो ग्रंथ सर्वांना मार्गदर्शक ठरेल.** या कामी जोंधळे यांना समाजातील सर्व घटकांचे सहकार्य लाभणार आहेच. त्यांच्या या स्मृतिग्रंथाचे अभिनंदन करतो. सर्व कार्यकर्त्यांना शुभ संदेश देऊन दोन शब्द पुरे करतो. आपला देश वैभवसंपन्न होऊन सर्व जनता सुखी समाधानी होवो. त्यांना संत विचाराची सहानुभूती लाभो अशी प्रार्थना करतो.

इति शम् !

✧ ✧ ✧



# एक लोभस व्यक्तिमत्व - श्री. मारूतराव घुले पाटील

**स्व. नरुभाऊ लिमये**

**स्वातंत्र्यसेनानी व ज्येष्ठ पत्रकार, पुणे**

**यांनी मारुतराव घुले-पाटीलसाहेब यांच्या ५१ व्या वाढदिवसानिमित्त व्यक्त केलेले विचार**

महाराष्ट्र राज्याच्या विधान परिषदेत मी बारा वर्षे होतो. अनेक सभासद आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषणांनी प्रश्नांनी किंवा आरडा ओरड्यांनी लक्षात राहिले पण त्या सर्वापेक्षा एक निराळ्या अबोलपणाने, दुसऱ्या दारातून आत येऊन चौथ्या रांगेत बसणारे मारूतराव घुले एका निराळ्या कारणााने लक्षवेधून घेत असत. सभागृहात ते बोलत कमी. पण जे बोलत ते अचूक आणि माहितीपूर्ण असे. त्यांच्या भाषणात आकडेवारी व ज्ञानाचे अवडंबर नसे पण शेतकरी भूपुत्राला जे रोजच्या रोज अनुभव येत ते साध्या सरळ शब्दात सांगणारे आमदार म्हणजे मारूतराव घुले पाटील.

त्यांच्याकडे वळून पाहिले की एक प्रसंन्न स्मितहास्य पहावयास मिळते. रागावलेला, दु:खी असलेला माणूससुद्धा जरा सुखावतो. त्याला जरा मोकळेपणा वाटतो. नदीचे पात्र स्वच्छ पाण्याने खळखळून वहात असतांना दोन ओंजळी पाणी पिऊन तृप्त व्हावे असा निर्मळपणा आमदारांच्या चेहऱ्यावरच प्रतिबिंबित होतो.आणि एकदम जवळीक निर्माण होते.

मी त्यांचा मित्र बनलो तो या निर्मळपणामुळे. राजकारणात सुद्धा काही माणसे अबोल असतात. पण ती आपल्या मनातले काहीतरी दडविण्यासाठी अबोल बनलेली असतात. मारुतराव तसे नाहीत. 'मला शेतकऱ्याला काय कळते, काम करत रहावं, अडीअडचणी मोकळ्या मनाने मांडाव्यात, यश देणारा तो ज्ञानोबा आहेच !' या निर्मळ श्रद्धेने घुलेसाहेब वागताना दिसले की माझ्या मनातला लेखक पत्रकार जागा व्हायचा आणि अशाच एका दुपारी मी त्यांच्या जीवनाचा मागोवा घेऊ लागलो. विचाराव्या त्या प्रश्नाचे सरळ उत्तर मिळू लागले आणि आढळले की,या माणसाच्या बालपणात, शालेय जीवनात आणि घरात संस्कार झाले ते त्याच्या गावचे एक शिक्षक श्री. जांभेकर आणि महाराष्ट्राच्या त्या काळच्या नव्या पिढीला देशभक्तीचे शिक्षण देणारे पू. साने गुरूजींचे वाङ:मय !



त्यांच्या घरात गावच्या अडीअडचणींची चर्चा घरात चाले. छोटा मारुतराव ती एकत असे. दहिगावच्या पाटलांचा पंचक्रोशीच्या बाहेर दूरवर पोचलेला लौकीक ऐकून रोज माणसे जमत. थोरले पाटिल त्यांना समजून घेत आणि समजावून सांगत. मारुतरावांचे जनक घराणे चांगले संपन्न. दहिगावला आले ते सुखवस्तू कुटुंबात. त्यामुळे मनातल्या सुप्त आशांना नवे साधन मिळाले. प्रेरणा फुलू लागली. त्या काळात स्वातंत्र्य आले, येऊ घातले तो काळ. १९४९ साली त्यांचे दत्तकविधान झाले. समाजवाद, भांडवलशाही, गरिबाचे कल्याण, देशाचे  स्वातंत्र्य असे शब्द कानावरुन जात. बी रुजत असे पण त्यांच्या नंतरच्या स्वभाव घडणीचा वेल कोठे रुजला असा शोध घेतला तर तेच म्हणले, सभ्य आणि सुजाण नागरिक बनावे ह्या शिकवणीचे बी त्यांच्या मनोभूमीत रुजले, घरी- दारी त्या बीजाला योग्यखतपाणी मिळाले आणि म्हणून आज  एका वरिष्ठ राजकीय मतप्रणाली व नेतृत्वावर नितांत निष्ठा ठेवणारे मारुतराव सर्वाचे झाले. मित्राइतकेच राजकीय विरोधक त्यांना मानतात. मतभेद असू शकतात आणि सहिष्णुत्वााने मान्य करणे म्हणजे सुजाणपणाची लोकशाही त्यांच्या अंगवळणीच पडली आहे. दुसऱ्याचे प्रथम ऐकून घेऊन सत्य शोधन करावे हा स्वभावच बनला आहे. म्हणूनच प्रतिकूल परिस्थितीतही एक साखर कारखाना उभारुन कमीत कमी काळात तो गळीतापर्यंत आणण्याचे यश त्यांना लाभले. कोठे विरोधाचा डाग त्यांच्या प्रगतीच्या मार्गात आडवा पडला लनाही. ते एका पक्षाचे मताचे असले तरी जणू मतमतांतरातले लवाद बनत. सर्वाचे बोलून झाले म्हणजे निर्णय मारूतरावांनी द्यावा आणि इतरांनी तो ऐकावा. अशी शक्ती त्यांनी आपल्या कतृत्वाने, सौजन्याने आणि निष्ठेने आपल्या शब्दाला मिळवून दिली आहे.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातल्या माणसांना माहीत  आहे की १९५२ ते१९७२ च्या काळात श्री. यशवंतराव चव्हाण यांनी देशात घडत असलेले राजकीय नेतृत्वाचे परिवर्तन अचूक ओळखले होते. जुनी पाने गळून पडत होती. वसंताची नवी पालवी फुटली होती. गावागावातून त्यांनी ही पिढी शोधून उजेडात आणली. जे कृतज्ञ असतील ते आजही कबूल करतील की राजकारणात काम करत असताना आपल्याला अंधारातून प्रकाशात खेचण्याचे काम साहेबांनी  केले आहे. साऱ्या महाराष्ट्रात हे घडत होते. जिल्हा काँग्रेस, सहकारी संस्था, जिल्हा परिषदा अशा अनेक जागावर नवे तरूण दिसू लागले. विशेषत: ग्रामिण भागाचा अर्थिक कायापालट करणाऱ्या सहकारी क्षेत्रात आणि शेती मालावर प्रक्रिया कारखानदारीला सहकारी क्षेत्रात स्थिर करण्याचे मोलाचे काम यशवंतरावानी केले. मारूतरावांसारख्या अनेक  तरूणांनी त्यांच्यावर सोपविलेले काम चोख बजावले. राजकीय दृष्टीने मोजमाप केले ती १९६७-७२ या कालखंडात काँग्रेस पक्षाला निवडणूकीची कसोटी लागत होती. अशा वेळी सहज निवडून येण्याची शक्यता होती. त्यावेळीही मला तिकिट नको  म्हणणारे जे तरूण चव्हणसाहेबांनी वेचून आपला मित्रमंडळीचा खजीना भरला होता तोच त्याना उपयोगी पडला.



राजकारणाच्या चढउतारात निष्ठा टिकत नाहीत असा अनुभव सर्वांना येतो. आजच्या जमान्याचा तो रूढ संकेत झालेला आहे. पण मारूतराव त्याला अपवाद आहेत. उगवत्या सुर्यनारायणाला अर्ध्य आणि पश्चिमेकडे कललेल्याला 'टा टा' म्हणणारी ती निष्ठा नाही. उलट घरात, बाहेर वैयक्तिक जीवनात कसल्याही अडचणी असल्या तरी 'आधी लगीन कोडांण्याचे' ही मराठी शिकवण प्रत्यक्ष जीवनात उतरविणारे मारुतराव घुले हे एक अभिमानाचे लेणे आहे.

असे निष्ठावान सेवाभावी लोभस नेतृत्व कसे घडले असेल याचा विचार माझे मित्र मारुतरोवजीकडे पाहताना पुन्हापुन्हा येतो आणि कल्पनेला पंख फुटले की वाटते ज्ञानेश्वर माऊलीच्या चरणस्पर्शाने पुनीत झालेल्या भागात हे सहज शक्य आहे. त्यातच घराचा उंबरा ओलांडण्यापूर्वीच सेवाभावाचे दर्शन त्या छोट्या मुलाला घडले. घरात पाळण्यातल्या मुलावर पहिले संस्कार होतात ते मातेचे. पू. विनोबा म्हणतात मातृदेवतेइतकी मोठी शक्ती दुसरी नाही. मारुतरावांना त्रिमाता लाभल्या. जनक आई, दत्तक घरी दोन माता. सर्वांचे प्रेम त्यांना लाभले. सहज आठवण झाली महाभारताची बालकृष्णाची जन्मदाती माता देवकी, नंदाघरची यशोदा आणि राधा. मातृप्रेमाचे हे पाझर बाल मारुतीला पुष्ट न करतील तरच नवल. **अशा वातावरणात घडलेले मारुतराव घुले पाटील आज सर्वमान्य झाले. अजातशत्रु झाले. जणू त्या भागातल्या राजकीय सामाजिक जीवनाचे ते एक विश्वस्त बनले आहेत.**

(गौरव अंकातून साभार उद्धृत)

✧ ✧ ✧



# अबोल विधायक कार्यकर्ता - नेता

**अनंतराव पाटील, पुणे**

माजी खासदार, ज्येष्ठ पत्रकार,

**पक्ष जिल्हाध्यक्ष पद --**

श्री. मारूतराव घुले म्हणजे नगर जिल्ह्यातील कमी बोलणारा पण खूप काम करणारा एक निष्ठावंता कार्यकर्ता. काँग्रेसच्या कामात १९६० पासुन लक्ष घालण्यास सुरवात केल्यानंतर मारूतरावांनी हातचे राखून कामा केले नाही तर संघटनेच्या कामाला वाहून घेतले आणि आबासाहेब निंबाळकर आण्णासाहेब शिंदे, शंकरराव काळे, बाबुराव तनपुरे आदिंच्या सहकार्याने नगर जिल्ह्यात काँग्रेस संघटना बळकट केली. १९६२ मध्ये जिल्हा काँग्रेसतर्फे आमदार म्हणून निवडून गेले. १९६२ ते १९७२ अशी १० वर्षे त्यांनी जिल्हाध्यक्षपदाची धुरा वाहिली आणि आपल्या कारकिर्दीत महाराष्ट्र काँग्रेसचे राहुरी शिबिर उत्तम प्रकारे पार पाडले.

**कर्तबगारीने पुढारी बनले**

याच शिबिरात मारूतरावांचा आणि माझा जवळचा संबध आला. आणि आम्ही अल्पावधीतच निकट आलो. मारूतरावांचा खरा पिंड सहकार व शिक्षण क्षेत्रात विधायक काम करण्याचा, राजकारणांची धकाधक त्यांना किती जमेल याची माझ्यासारख्याला शंका वाटायची. कारण मारूतराव स्वभावाने साधे सरळ. छक्के पंजे नहीत. मारूतराव म्हटले की प्रथम मंद स्मित काणार आणि प्रसंन्न मुद्रेने व हास्य वदनाने अगदी थोडक्यात संभाषण करणार.

१९६७ च्या पार्लमेंटच्या निवडणूकीत जिल्हाध्यक्ष या नात्यानं मारूतरावांच्या नेतृत्वाखाली मी लोकसभा निवडणुक पार पाडली. आणि त्यात प्रचंड मतांनी विजयी झालो. मारूतरावही त्यावेळी शेगाव मतदारसंघातून विधानसभेस उभे होते. या निवडणूकीच्या प्रचारात दहिगावला जायचा योग आला. आणि तेथे मारूतरावांनी आपल्या गावचा विकास केलेला पहायला मिळाला. मारूतराव तसे श्रीरामपूर तालुक्यातील पढेगावचे बनकर पाटिल घराण्यातले. पण पुढे दहिगाव घुले घराण्यात दत्तक म्हणून गेले आणि मारूतराव घुले या नावाने कार्य करून त्यांनी किर्ती संपादन केली. मारूतरावांचे शिक्षण तसे फारसे झालेलेच नाही. तरीही त्यांनी जे काम उभे केले, ज्या पद्धतीने केले ते पदवीधरांना मागे टाकणारे आहे. त्यांच्या गावातील कामे पाहतांना विशेषत: धरणग्रस्तांसाठी त्यांनी केलेले काम पाहतांनला संबंधित लोक त्यांना किती दुवा देतात हे स्वत: मी डोळ्यांनी पाहिलेले आहे. त्यांच्याकडे जिल्ह्याचे पुढारपण आयते



टपकन आले नाही तर गावापासून, तालुक्यापासून काम करित ते जिल्हा व राज्य पातळीपर्यंत जाऊन पोहोचले. त्यांची जिनिंग प्रेसिंग सोसायटी म्हणजे त्या भागातली आदर्श सहकारी संस्था मानली जाते.

### सालस,निरहंकारी स्वभाव

नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर संचालक म्हणून निवडून गेल्यावर त्या बँकेचे अध्यक्ष पद मारूतरांकडे चालून आले. त्यानी बँकेचा कारभार उत्तम प्रकारे चालविला. जिल्हा काँग्रेचे अध्यक्ष, आमदार आणि बँकेच्या अध्यक्षपदी विराजमान झालेल्या मारूतरावांनी अहंकार कधी शिवू दिला नाही. उलट सालस, सरळ सेवाभावी स्वभावामुळे लोकांमध्ये लाक लोकप्रियता मिळवली.

बँकेवर गेल्यावर त्यांच्या मनाने शेतकऱ्यांच्या सहकारी साखर कारखाान्याचा ध्यास घेतला. आणि ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीचे कामाला त्यांनी जुंपून घेतले. या कामात त्यांना श्री. आण्णासाहेब शिंदे आणि बाळासाहेब विखे पाटिल यांचे बहुमोल सहकार्य लाभले. कारखान्याच्या नोंदणीपासून कारखान्याची उभारणी व पहिल्या गळीत हंगामापर्यत मारूतरावांनी विश्रांती घेतली नाही. बहुधा त्याचाच परिणाम त्यांच्या प्रकृतीवर झाला असावा.

### शेतकऱ्यांच्या शिक्षणाची सोय

हाती घ्याल ते तडीस न्या, हे मारूतरावांचे ब्रीद. कारखाान्याची उभारणी त्यांनी जशी केनी तशीच ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या स्थापनेतही महत्वाचा भाग घेतला. नुसती ऊस शेती किंवा साखरेचा कारखाना उभारून चालणार नाही तर शेतकऱ्यांची मुले शिकतीन म्हणून त्यांनी नेवासा व शेवगाव येथे महाविद्यालये सुरू करण्याबाबत खूपच खटपट केली.

श्री. मारूतराव घुले हे राजकिय जीवनात श्री. यशवंतरावजी चव्हाण यांना आपला नेता मानतात आणि त्यांनाआपली निष्ठा देतात. हे मी वेळोवेळी पाहिलेले आहे. साहेब हे नगर जिल्ह्याचे राजकिय दैवत होते.

१९७६ मध्ये भरलेल्या शेतकरी मेळाव्यात यशवंतरावजींनी मारूतराव घुले यांच्या कार्याचा यथायोग्य गौरव करून त्यांना त्याच्या कामाची पावती दिली. एके काळी कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी भरून गेलेला आणि भारावून गेलेला नगर जिल्हा काँग्रेसच्या मागे आणिून जिल्ह्यात काँगेस संघटना भक्कम करण्यात ज्यांनी ज्यांनी मोलाचे काम केले त्यात मारूतरावांचा सर्वात मोठा वाटा आहे. २८-३-८१ रोजी महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण साहेब यांनी त्यांचा ५१ व्या वाढदिवसानिमित्ताने कारखान्यावर सत्कार केला. त्या समयी मी व माझे स्नेही कै. नरूभाऊ लिमये आलो होतो. चव्हाण साहेबांनी त्यांच्या कार्याचा गौरव करून ते म्हणाले, मारूतरावांच्या सत्काराचे वेळी जमलेला जनसमुदाय पाहून माझे डोळ्याचे पारणे फिटले. असा गौरव होण्याचे भाग्य त्यांना लाभले. प्रकृती अस्वास्थामुळे श्री. मारूतराव घुले राजकारणात सक्रीय भाग घेत नसले तरी ते मार्गदर्शन मात्र करीत आहेत.

(गौरव आंकातून साभार उद्‌धृत.)

✧ ✧ ✧

# असा न होणे पुन्हा

## श्री.नारायण गणपतराव तथा बाबासाहेब नरवडे पाटील – सुसरे

(माजी चेअमन - श्री ज्ञानेश्वर स. सा. का. लि.)

१९५६ पासून मी श्री. मारूतरावांच्या संपर्कात आलो ते बूथ हॉस्पीटल, अहमदनगर येथे ते उपचारार्थ दाखल झाले होते तेव्हा. भागवतराव कोळसे आणि काही मित्रांसह मी त्यांच्या भेटीसाठी गेलो होतो. त्या वेळेपासून आतापर्यंत मी त्यांच्या सहवासात वावरत आहे. त्यांच्या या पहिल्या वहिल्या भेटीपासूनच त्यांनी मला जिंकून घेतले. आजही मी त्यांचाच आहे. आजारातून बरे झाल्यावर ते षष्ठीसाठी पैठणला आले होते. तिथून पुढे त्यांचा संपर्क वाढतच गेला. तसे पाहू जातां आम्ही कम्युनिस्ट विचाराची माणसं. परंतु मारूतराव पाटलांच्या संपर्कात आमचे पूर्ण परिवर्तन झाले. आजही या परिवर्तित विचाराशी आम्ही बांधलेले आहोत. आम्हाला या नवीन विचारांनी भरून आणि भारून टाकण्याची किमया मारूतरावांनी केली आणि १९६० पासून मी त्यांच्यामुळे कॉँग्रेसमध्ये आलो तो कायमचाच.

१९६५ पासून जायकवाडी प्रकल्पाचं काम सुरू झालं. प्रकल्पासाठी ही जागा योग्य नाही असा या भागातील सर्वांचाच आग्रह. येथे धरण होऊ नये म्हणून सामाजिक स्तरावर पुष्कळ विरोधही करण्यात आला. इथे हे धरण होऊ नये म्हणून सर्वंकष पाहणीसाठी चाफेकर या रिटायर्ड इंजिनिअरची नेमणूक करून पुन्हा पाहणी करण्यात आली. त्यांनीही हाच निर्णय दिला. परंतु त्यावेळचे महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री ना.श्री.शंकरराव चव्हाण यांनी धरण इथेच होण्याचा आग्रह धरला. आणि धरणाचं काम सुरू झालं. त्याचा विशेष लाभ मराठवाड्यासाठी होणार होता. म्हणून या भागातील जनतेच्या विरोधाला न जुमानताही धरणाचं काम सुरू झालं. या धरणामुळे गंगापूर, नेवासा, शेवगांव व पैठण या चार तालुक्याच्या ६०-६५ गावांना त्या गांवातील हजारो शेतकऱ्यांना विस्थापित व्हायचा फटका बसला. राजहट्टापुढे इतर हट्ट चालत नाही असं म्हणतात ते अगदी खरं झालं.


जे होऊ नये ते झालं आणि धरणप्रभावित हजारो शेतकऱ्यांवर विस्थापित व्हायची पाळी आली. लोकप्रतिनिधी या नात्याने श्री.मारूतराव पाटलांवर या दुर्धर प्रसंगाला सामोरे जायची पाळी आली.



त्यावेळी ना.राजाराम बापू पाटील हे महाराष्ट्राचे महसूल मंत्री होते. मा.ना.श्री वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते. सरकार काँग्रेसचेच, पण करणार काय ? त्यातूनही मारूतराव पाटलांनी मार्ग काढण्यासाठी सर्व प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यांनी विस्थापितांचे दावे मांडण्यासाठी नासिकची कुंडलिक कंपनी आणली. तिचे मार्फत दाव्याविषयक काम पाहणे सुरू झाले. पुनवर्सनाचा कायदा करून घेतला. विस्थापितांना पुनर्वसनासाठी प्रति एकरी रू.७०० ते १४०० रू.प्रमाणे पेमेंट करण्यात आले. तेही दोन हप्त्यात. शासनातर्फे केली जाणारी ही तरतूद तशी खूप तोकडी होती. पेमेंटमधून शेतकऱ्यांची सोसायटी, तगाईची कपात केली गेली. तशातही १९७२ चा भीषण दुष्काळ. धरणग्रस्त भागात दुष्काळी कामे दिली जाणें शक्य नव्हते बेरोजगारीची जीवधेणी समस्या खूप भेडसावणारी होती. मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे फक्त ४० टक्के लोकांचे बरे झाले, परंतु ६० टक्के शेतकरी अगदी पूर्ण संपल्यागत झाले.

अशा तिहेरी संकटाच्या आव्हानांना पेलणे सामान्य माणसांना शक्य नव्हते. त्यावेळी साहेब आमदार होते. लोकप्रतिनिधी या नात्याने ते पुढे झाले. त्यांनी आव्हानांना आपल्या छातीवर झेलले. लोकांच्या अडचणी आपल्याच मानल्या. लोकांना जणू आश्वासन दिले, ''भिऊ नका, डगमगू नका. मी तुमचे पाठीशी आहे.'' प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या अडचणीतून वर काढण्यासाठी शासकीय पातळीवर जिवापाड प्रयत्न केले. श्री ज्ञानेश्वर साखर कारखान्यासारखा प्रकल्प उभारून बेरोजगारीच्या भयानक समस्येवर उपायच केला. या कारखान्याच्या अध्यक्षपदी मला बारा वर्षे सेवा करण्याची संधी मारूतरावंनीच दिली. त्यांचे असे स्नेहसंबंध चिरंतन राहिले आहेत. त्यांच्यासारखा लोकनेता पुन्हा होणे नाही.

✧ ✧ ✧



# राजकारणाला सामाजिक आशय देणारे घुले पाटील

**भानुदास मुरकुटे**
माजी आमदार (श्रीरामपूर)

" कै. मारुतराव घुले पाटील आणि सहकार चळवळ हे नगर जिल्ह्यातील एक समीकरण मानले जाते. अहमदनगर जिल्ह्यात सहकार क्षेत्राची जी पायाभरणी झाली त्यात घुले पाटील यांचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. मुळचे श्रीरामपूर तालुक्याचे सुपुत्र असणाऱ्या कै. मारुतरावांची नेवासा-शेवगांव तालुका ही कर्मभूमी बनली. **एखाद्या परिसस्पर्शाने लोखंडाचे सोने व्हावे तसे कै. घुले पाटील यांच्या राजकीय व सामाजिक स्पर्शाने** नेवासे तालुक्याचे परिवर्तन घडले.

एक मृदु मितभाषी आणि अजातशत्रू व्यक्तिमत्व असाच कै. मारुतराव घुले पाटील यांचा उल्लेख करावा लागेल. जिल्ह्याच्या सहकार चळवळीची आणि राजकीय व सामाजिक क्षेत्राची स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या जडणघडणीत घुले पाटील यांचा वाटा मोलाचा आहे. राजकारण आणि सहकारी चळवळ ही लोकाभिमुख आणि जनहिताची असावी आणि या क्षेत्राची नाळ सामान्य माणसाच्या विकासाशी जोडलेली असली पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. या भूमिकेतूनच अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना अशा विविध संस्थांमध्ये काम करताना कै.घुले पाटील यांनी सामान्यांच्या विकासाशी नाते राखले. त्यामुळेच माणसांचे मोहोळ त्यांच्याभोवती आयुष्यभर राहिले.

स्वतःशेतकरी कुटूंबातील असल्याने कै. घुले पाटील यांना शेतकऱ्यांची व्यथा, वेदना, समस्या यांची जाणीव होती. कष्ट करुनही शेतकऱ्यांची होत असलेली दुर्दशा त्यांनी जवळून पाहिली होती. या स्थितीतून शेतकरी बाहेर पडावा आणि त्याला स्वाभिमानाने जगता यावे, अशी त्यांची विचारधारा होती. या विचारधारेतूनच त्यांनी ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या कार्याला कुटुंबासारखे वाहून घेतले. ज्ञानेश्वर कारखाना आणि घुले पाटील असे अतूट नाते जन्माला आले. अखेरच्या क्षणापर्यंत कै. घुले पाटील यांनी शेतकऱ्यांशी इमान राखले आणि भूमिपुत्र म्हणुन जीवनही सार्थ ठरविले. "

घुले पाटील यांचा जिल्ह्यातील माझ्या समकालीन राजकारणातल्या पिढीवर दबदबा होता. "**सध्याच्या राजकारणातून नैतिक मूल्ये हद्दपार होत असताना घुले पाटील यांनी मात्र हयातभर राजकारणात राहूनही नीतिमूल्ये जोपासली.** त्यामुळेच त्यांचा वेगळा धाक राजकीय क्षेत्रात होता माझ्यासारख्या सामान्य शेतकरी कुटूंबातल्या तत्कालीन राजकीय क्षेत्रातील नवागतापुढे कै. भास्करराव गलांडे पाटील यांच्या बरोबरच कै. मारुतराव घुले पाटील यांचाही आदर्श होता. सामान्यांशी नाते जोडल्यानंतर ते कोणत्याही परिस्थितीत तुटता कामा नये भले त्यासाठी कोणताही त्याग करावा लागला तरी चालेल ही प्रेरणा गलांडे पाटील व घुले पाटील यासारख्या त्यावेळच्या राजकारणातल्या जेष्ठांकडूनच जिल्ह्यातील नव्या पिढीला मिळाली. सर्व सामान्यांबाबतची हीच प्रेरणा माझ्या राजकीय वाटचालीतील शिदोरी ठरली, हे आवर्जून सांगावेसे वाटते.

घुले पाटील यांनी तात्विक राजकारण केले. त्यासाठी प्रसंगी उपेक्षा स्विकारली पण तडजोडी केल्या नाहीत. याचा अनुभव मला अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या सन २००२ मध्ये झालेल्या निवडणुकीत आला. वेगवेगळ्या तडजोडी होत असतांना घुले पाटील मात्र तात्विक भूमिकेशी ठाम राहिले. जिल्ह्यातील राजकीय दबावाला त्यांनी जुमानले नाही. या निवडणुकीत घुले पाटील आणि मी विजयी झालो. या विजयात वेगळी तात्विक झळाळी जाणविली. या क्षणापासून घुले पाटील यांच्याबाबत माझ्या मनात वेगळेच आदराचे स्थान निर्माण झाले.

या निवडणुकीनंतर काही दिवसांनी घुले पाटील माझे निमंत्रण स्वीकारुन अशोक बँकेच्या टाकळीभान येथील नवीन शाखेच्या शुभारंभासाठी आवर्जून उपस्थित राहिले. यावेळी घुले पाटील यांनी बँकेच्या वाटचालीबद्दल आणि संकटातून बाहेर पडलेल्या अशोक कारखान्याच्या सद्य:स्थितीबाबत समाधान व्यक्त केले, तसेच मोलाचे मार्गदर्शन केले. दुर्दैवाने ही त्यांची अखेरची भेट ठरली." **घुले पाटील काळाच्या पडद्याआड गेले असले तरी काळाच्या पडद्यावरील त्यांच्या कर्तृत्वाच्या खुणा मात्र नियतीलाही पुसता येणार नाहीत.**

✧ ✧ ✧



# औदार्य-धैर्यवृत्तीचा अत्युच्च आदर्श

**श्री. पांडुरंग ग. अभंग**
(माजी विधानसभा सदस्य)

सन १९६७ पासून आदरणीय घुले पाटील व माझे निकटचे स्नेहसंबंध आले. त्यावेळी मी कुकाण्याचा सरपंच होतो. कुकाणा या गावच्या विकासासाठी त्यांनी सर्वतोपरी साहाय्य केले. कुकाणा परिसरासाठी दिलेले प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीसाठी निधी कमी असल्यामुळे बांधकाम अर्धवट पडले. अशावेळी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सदर इमारतीचे अर्धवट राहिलेले बांधकाम घुले पाटलांनी पूर्ण करून घेतले. त्या केंद्राचे उद्घाटन त्यावेळचे महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री ना. नरेंद्र तिडके यांचे हस्ते व मा. घुले पाटील यांचे अध्यक्षतेखाली पार पडले. ग्रामीण भागातील लोकांसाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.

१९७० साली नेवासा शेवगांव तालुक्यातील ऊस उत्पादकांचे फार मोठे नुकसान झाले. आणि म्हणून घुले पाटलांनी ध्यास घेऊन या भागात साखर कारखाना निर्मितीसाठी निर्णय घेतला. १९७२ मध्ये याबाबत मीटींग झाली. या मीटिंगला त्या वेळचे तालुका काँग्रेसचे अध्यक्ष ह. भ. प. श्री. बन्शी महाराज तांबे हेही उपस्थित होते. त्यांच्या समवेत चर्चा करीत असता कारखान्याचे नांव 'श्रीज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना' ठेवावे असे सुचविण्यात आले व सर्वानुमते मान्य केले गेले. म्हणून मशिनरीची सामुग्री घेऊन आलेला पहिला ट्रक श्रीज्ञानेश्वर मंदिरासमोर आणणेत आला. तेथे ह. भ. प. श्री. बन्शी महाराज तांबे यांचे शुभ हस्ते त्या मशिनरीची पूजा केल्यानंतरच मिरवणुकीने तो ट्रक कार्यस्थळावर आला. लगोलग दोन वर्षात कारखान्याची उभारणी झाली. १९७४ मध्ये कारखान्याचा चाचणी गळीत हंगाम झाला. पुढे १९७७ पर्यंत नॉमिनेटेड मुदत संपली, व कारखान्याचे इलेक्शन जाहीर झाले. इलेक्शन बिनविरोध झाले. त्यामध्ये संचालक म्हणून मा. घुले पाटलांनी माझी नियुक्ती केली, आणि व्हाईस चेअरमन म्हणून काम पहाण्याची जबाबदारीही त्यांनी माझ्यावर सोपविली. त्यानंतर १९७७-७८ मध्ये काँग्रेसची केंद्रातील सत्ता गेली व विरोधी पक्षाचे सरकार स्थापन झाले. साखर धंद्यावर गंडांतर आले. साखरेचे भाव गडगडले. त्यामुळे पुढील काळात साखरेचे उत्पादन घटले. त्याचा परिणाम साखरेच्या फिक्स केलेल्या किंमतीवर झाला. किंमतीवर ऑन घेण्याची प्रथा सुरू झाली. म्हणून आपणही ऑन घ्यावा असा विचार पुढे आला. त्यावेळी मा. घुले पाटील म्हणाले, ''ऑन घेणे म्हणजे विष आहे.ते घेऊ नये असे मला वाटते.'' नंतर संचालक मंडळातील सर्व विरोधक संचालकांची कमिटी तयार करून त्यांच्या ताब्यात त्या पैशांचे नियंत्रण



दिले. साखरेवर सरकारने परत निर्बंध घातल्यामुळे परिस्थिती पूर्ववत झाल्यावर ते जमलेले पैसे थेट ऊस उत्पादक सभासदांना वाटण्यात आले. असे करणारा ज्ञानेश्वर कारखाना हा महाराष्ट्रातला एकमेव कारखाना आहे. कारखान्याचा कारभार पारदर्शक ठेवण्यात मारुतराव पाटलांचा हा आदर्श सर्वांनी अनुसरावा असाच आहे.

कारखान्यावर शैक्षणिक संस्था स्थापन करून तिला ''श्री. मारुतराव पाटील शिक्षण संस्था'' असे नांव द्यावे असे आम्ही सर्व संचालकांनी म्हटले. त्याला घुले पाटलांनी विरोध केला आणि ''माझ्या इच्छेविरुद्ध असे नांव ठेवले तर मी कोर्टात जाईन'' असे म्हटले. परंतु त्यांच्या अनुपस्थितीत आम्ही तेच नाव ठेवण्याचा ठराव संमत केला. कारखान्याचे जे संचालक मंडळ अधिकारावर असेल तेच शिक्षण मंडळावरही असेल असा ठरावही संमत केला गेला. त्यामुळे दोन्ही संस्थात कधीच मतभेद झाले नाहीत व होणारही नाहीत.

त्यानंतर जायकवाडीमध्ये ज्यांच्या जमिनी गेल्या त्यांच्या उर्वरित जामिनीसाठी कारखाना व सहकारी बँकेच्या माध्यमातून कारखान्याने १४ लिफ्ट इरिगेशन योजना राबविल्या आणि धरणग्रस्तांच्या जमिनी बागाईत क्षेत्र केल्या. उरलेले इतर जे धरणग्रस्त होते त्यांना पाणी उचलण्याची परवानगी देऊन वैयक्तिक लिफ्ट करण्यासाठी कारखाना व बँकेचे सहकार्य घेऊन १०० % रक्कम उपलब्ध करून दिली. अशारितीने कोट्यवधी रुपयांच्या लिफ्ट योजना कार्यान्वित झाल्या. ही धरणग्रस्तांना मारुतराव घुले पाटलांनी दिलेली सर्वात मोठी देणगी होय.

माझे व त्यांचे एकत्रित कुटुंबात असल्यासारखे नाते होते. आणि म्हणून त्यांनी जिल्हा परिषद, जिल्हा सहकारी बँक, जिल्हा मजूर फेडरेशन अशा वेगवेगळ्या संस्थांवर काम करण्याची मला संधी निर्माण करून दिली.

१९९५ च्या विधान सभेसाठी त्यांनी स्वतःच्या मुलास डावलून मला नेवासा-शेवगांव मतदार संघासाठी काँग्रेस पक्षाचे तिकीट मिळवून दिले. संपूर्ण प्रचार यंत्रणा आणि खर्चाची जबाबदारी स्वतःवर घेतली. आणि विधान सभेसाठी प्रतिनिधित्व करण्यासाठी मला निवडून आणले. त्यांच्या उदार व मोठ्या मनाचं दर्शन घडविण्यासाठी एवढे उदाहरण पुरेसे आहे. असा उदार विचार महाराष्ट्रात अन्यत्र सापडणार नाही. त्यांच्या विचारामध्ये सर्वसामान्य माणसाला बरोबर घेऊन राजकारण करण्याची पद्धती असल्यामुळे माझ्यासारख्या असंख्य सहकाऱ्यांना बरोबर घेऊन त्यांनी जिल्ह्याची धुरा सांभाळली आहे. त्यांचे कार्य म्हणजे औदार्य व धैर्याचा अत्युच आदर्श होता.

✧ ✧ ✧



# लोकनेतृत्वातील राजकीय सहिष्णुता

## कॉ. शशिकांत विष्णुपंत कुलकर्णी – वडुलें (ता.शेवगांव)

एकोणीसशे बाहात्तरपासून मी मारूतराव पाटलांच्या दाट संपर्कात आलो. १९७२ ते १९७८ या काळात कॉ.वकीलराव लंघे पाटील आमदार होते. तो श्री ज्ञानेश्वर कारखान्याच्या उभारणीचा काळ होता. मी आणि वकीलराव लंघे अण्णा प्रथम कारखान्याच्या शासननियुक्त कमिटीवर नव्हतो. परंतु या मोठ्या कार्यात विरोधकांच्या देखील सहकार्याची अपेक्षा आणि आवश्यकता असते, हे श्री.मारूतराव पाटलांच्या लक्षात येऊन त्यांनी वकील अण्णा व मी अशा दोघानाही सदर कमिटीवर घेतले. नंतर कारखाना उभारणीच्या काळात शेअर गोळा करण्याचे कामात आमचेही सहकार्य त्यांना लाभले. सहकारी संस्थेच्या स्थापनेच्या आणि तिच्या सक्षम वाढीसाठी कार्यकर्त्यांनी आपापले राजकीय विचाराचे जोडे बाहेरच काढून ठेवायला हवेत, असा थोर विचार आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थतज्ज्ञ डॉ.धनंजयराव गाडगीळ यांनी दिला होता. मारूतरावांनी जिल्ह्याच्या सहकारी चळवळीत काम करताना हा विचार पूर्णपणे अंगी बाणविला होता. त्यांच्या सर्वसमावेशक नेतृत्वाची प्रकर्षाने जाण होते आहे. १९७८ साली ज्ञानेश्वर चे पहिले संचालक मंडळ अस्तित्वात आले, त्यावेळी कम्युनिस्ट विचाराच्या आम्हा दोघांना मारूतरावांनी संचालक मंडळात घेतले आणि सर्वांच्या सहकार्याने कारखान्याची निवडणूक बिनविरोध करून एक आदर्श निर्माण केला.

धरणग्रस्तांच्या चळवळी आम्ही व गोदावरी धरण परिषदेमार्फत होत होत्या. मारूतराव पाटील त्यावेळी सत्ताधारी पक्षाचे आमदार होते आणि धरणात जाणारी गांवे ही शेवगांव नेवासा तालुक्यातीलच होती. अशा परिस्थितीत धरणग्रस्तांचे प्रश्न हाताळतांना ते अगदी मेटाकुटीला आले होते. तो त्यांच्या राजकीय आयुष्यातील अत्यंत कसोटीचा काळ होता, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. तरीसुध्दा त्यांनी सरकारशी सहकार्याचे धोरण ठेवीत आमच्यासारख्या विरोधकांशीही असेच सामंजस्य राखून चळवळीला मदत केली. एवढेच नव्हे, तर धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी त्यांच्यापरीने शासनदरबारी प्रयत्नांची शर्थ केली. अशा कोंडीतून वाट काढतांना त्यांच्या परिश्रमांची परिसीमा झाली. अशारीतीने



जनता व सरकार यांच्यात शिष्टाई करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे लोकप्रतिनिधी म्हणून जनतेने त्यांच्यावर कधीही रोष व्यक्त केला नाही. जनता व सरकार या दोहोत समन्वय साधण्यात ते पूर्ण यशस्वी झाले. नंतर त्यांनी ताजनापूर लिफ्टचा प्रश्न मार्गी लावण्याचाही प्रयत्न सरकारी माध्यमातून केला.

श्री ज्ञानेश्वर कारखान्याची प्रतिदिन १२५० मे.टन ते प्रतिदिन ५००० मे.टन अशी प्रगती व विकास हे मारूतराव पाटलांच्या नेतृत्वाचे फळ आहे. हे सारे करीत असता ऊस उत्पादक सभासदांबरोबरच सामान्य जनतेसही सहकार्याच्या माध्यमातून न्याय देण्याचा प्रयत्न केला. ज्ञानेश्वरचा कारभार स्वच्छ आणि पारदर्शक ठेवून विरोधकांनाही आपल्या विचारात सामावून घेणाऱ्या या लोकनेत्यातील राजकीय सहिष्णुतेचे दर्शन घडते. मारूतराव पाटील आणि वकील अण्णा या दोन्ही नेत्यांच्या गेल्या ३० वर्षांच्या सहभागातून ज्ञानेश्वर हा आदर्श उभा राहिला आहे.

१९९५ च्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत नरेंद्र पाटलांच्या विरोधात माझ्या पक्षाने व सर्व विरोधकांनी मला उमेदवारी देउन उभे केले. त्यामध्ये मी पराभूत झालो. तरीसुध्दा निवडणुकीनंतर माझी व मारूतराव पाटलांची भेट झाल्यावर त्यांनी माझे अभिनंदन केले. आणि म्हणाले. ''तू केवळ एक चांगला कार्यकर्ता आहेस, म्हणूनच एवढी मते मिळाली. एरव्ही दुसऱ्याला एवढी मते मिळाली नसती.'' त्यांच्या मनाचा हा मोठेपणा माझ्या कायम स्मरणात राहील.

त्यांचे व आमचे राजकीय स्वरूपाचे मतभेद ज्ञानेश्वर कारखान्याच्या कारभारात कधीही आड आले नाहीत. त्यांच्यासारखा नेता नजीकच्या काळात मिळणे वा होणे मुष्किल आहे.

✧ ✧ ✧



# माणुसकीचा गहिवर

**ॲड.देसाई भा.देशमुख**
व्हाईस चेअरमन,
श्री ज्ञानेश्वर स.सा.का.लि.

गेल्या चार पाच दशके मारूतराव पाटील आपल्या भागाचे राजकीय व सामाजिक नेतृत्व समर्थपणे करीत आहेत. सर्वसामान्य माणूस हा त्यांच्या या दोन्ही विचारांचा केंद्रबिंदू होता. त्यांच्या या कार्यकाळातच माझे पिताश्री भाऊसाहेब नारायणराव देशमुख कुकाणकर हेही साहेबांचे परम स्नेही होते. मारूतराव पाटलांनी लहानांचं कौतुक केलं, समवयस्कांशी संवाद साधला आणि मोठ्यांपुढे नम्र भाव ठेवला होता. त्यांच्या वृत्तीची ही त्रिविध तऱ्हा पक्षीय किंवा राजकीय विचारांपासून त्यांनी अस्पृष्ट अशी राखली होती. जे चांगलं आहे ते कुणापासूनही घ्यायला हवे, असा त्यांचा आग्रह असायचा. त्यामुळे स्वसमर्थक किंवा विरोधक या दोघांनाही ते सारखेच हवेहवेसे वाटत. त्यांच्या नेतृत्वाला माणुसकीचा असा आगळा वेगळा शृंगार होता. श्री. भाऊसाहेब देशमुख, बाबासाहेब नरवडे पाटील, वकीलराव लंघे पाटील अशी प्रौढ व प्रगल्भ विचारांची माणसं मारूतराव पाटलांच्या खांद्याला खांदा लावून समाजाचं काम करत होती.

तसं पाहिल्यास शेवगांवचा बराचसा भाग कम्युनिस्ट विचाराने प्रभावित होता. सहकारावर विश्वास न ठेवणारी बरीच मंडळी होती. परंतु त्यांचेही विचार परिवर्तन घडवून आणून मारूतरावांनी शेवगांव तालुका सहकारी जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी ही सहकारी संस्था सुरू केली. श्री. बाबासाहेब नरवडे, भाऊसाहेब देशमुखही त्यांचेबरोबर होते.

विरोध करणारी माणसंही समाजात असतातच. पण त्यांच्याशी द्वेषाने न वागता खालच्या थरापासून वरच्या थरापर्यंत सर्वांशीच विचाराने जवळीक साधून त्यांनाही सामाजिक सेवाकार्यात सामावून घेण्याचा खूप यशस्वी प्रयत्न मारूतराव पाटलांनी केला आहे. कॉ. वकीलराव लंघे, शशीकाका कुलकर्णी यांनाही आपलसे करून घेतले. जिल्ह्याच्या राजकारणात मारूतरावांच्या सच्छीलतेमुळेच हें शक्य झाले, ही त्यांच्या मोठेपणाची यशोदायी बाजू आहे, असे मला म्हणावेसें वाटते.



**माणुसकीचा गहिवर**

नेवासा पंचायत समितीचे सुर्वे नामक एक इंजिनिअर अचानक हार्ट अॅटॅकने वारले. त्यांना दोन मुली होत्या. त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी भाऊसाहेब व श्री. मारूतराव पाटील गेले होते. त्यावेळी सुर्वे यांच्या लाहानग्या मुलीचें बोलणें ऐकून मारूतरावांना अश्रु आवरणे कठीण झाले.

कारखान्यावर साखर शाळेचा उपक्रम तीन वर्षांपासून राबविला जातो. गेल्या वर्षी साखर शाळेतर्फे एक संमेलन आयोजित केले गेले. भेंड्याच्या शाळेतील सर्व विद्यार्थी आले होते. त्या कार्यक्रमाला मा. घुले पाटील प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. मीही या कार्यक्रमास उपस्थित होतो. बँक ऑफ बडोदासमोर भव्य मंडप दिलेला होता. विद्यार्थ्यांच्या जेवणाची व्यवस्था कारखान्याने केली होती. उुस तोडणी कामगारांची ती साखर शाळेतील मुले पाहून घुले पाटील लगेचच भावनाविवश झाले. त्यांच्या डोळ्यातून आसवे टपकताना पाहून सर्वांचे अंतःकरण गलबलून गेले. त्या गरीब विद्यार्थ्यांच्याही जीवनात आनंद फुलावा असे त्यांना वाटले. लगेचच त्यांनी त्या गरीब विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक गणवेश वाटप केला. सर्वसामान्यांच्या सुखदुःखाशी असे ते समरस होत.

इंदिरा गांधी प्रियदर्शिनी पारितोषिक घेण्यासाठी मी, घुले पाटील व निवृत्तीअण्णा मोटे असे आम्ही तिघे दिल्लीला गेलो होतो. कॅनॉट सर्कलवरील पर्ल हॉटेलमध्ये रात्री थांबलो. हॉटेल कनिष्कमधील दरबार हॉलमध्ये पारितोषिक वितरण झाले. उपस्थितांनी हॉल खचून भरला होता. नेहरू शर्ट, धोतर, गांधी टोपी अशा पेहरावातील मारूतराव पाटलांचं उमदे व्यक्तिमत्व सर्वांची लक्ष वेधून घेत होतं. दुपारी थोडा वेळ होता म्हणून निजामुद्दीन दर्ग्याच्या दर्शनास फुले व चादर घेऊन गेलो. जवळच अमीर खुसरोचाही दर्गा होता. तिथेही दर्शन घेतले. नंतर परतीचा प्रवास सुरू झाला. सर्वधर्मसमभावाचे असे ते लोभस दर्शन होते.

**अभिरूचि संपन्नता –**

सर्वच धर्मातील संतांचे विचार सर्व समाजासाठी मार्गदर्शक, उपकारक असतात, असे ते नेहमी सांगत. त्यांचे साहित्य चालू जमान्यातही तेवढ्याच मोलाचे आहे असे त्यांचे सांगणे असे. कुशाग्र बुध्दीमत्ता व अफाट स्मरणशक्ती हा मारूतरावांचा स्थायीभाव होता.

**नम्र स्वभाव –**

मी नेता आहे म्हणून वेगळा माणूस आहे, असं त्यांना कधी वाटलं नाही. एखाद्या अडीअडचणीच्या प्रसंगी काय निर्णय घ्यावा असं वाटलं तर अशा वेळी ते मुद्दाम श्री.भाऊसाहेबांकडे येत. तासभर चर्चा करत. योग्य ती सल्लामसलत होई. मोठ्यांच्या चरणी आदरभाव दाखवण्याचा तेवढा मनाचा मोठेपणा त्यांचेकडे होता.

अशा गुणसमुच्चयामुळे व दीनदुबळ्यांविषयी कणव असल्यामुळे ते सर्वप्रिय, सर्वांचे झाले होते.



**आत्मपरिक्षण आवश्यक –**

कार्यकर्त्याच्या यशस्वितेबद्दल मारूतराव पाटील म्हणत असत - एखादा नामांकित खेळाडू असेल तर त्याचा खेळ पहाताना लोक उंच टाचा करून बघत असतात. तसं तुम्ही एखाद्या उंच पदावर, सत्तास्थानावर काम करीत असता तेव्हा लोक तुमच्याकडे असेच विशेष बारकाईने बघत असतात. त्या पदावरील तुमच्या वागण्याचा परिणाम संस्काररूपाने सामान्यांवर होत असतो. म्हणून कार्यकर्त्याने स्वतःच आत्मपरिक्षण करणे आवश्यक आहे. कार्यकर्त्यांना विचाराने ते असे प्रेरित करीत.

✧ ✧ ✧

# भाग्यबळे लाभला होता आम्हा असा लोकनेता

**दिलीपराव न. लांडे पाटील,**

**सभापती,**

**शेवगांव, ता. पंचायत**

व्यक्ती, वस्तु यांच्याप्रमाणे एखाद्या भागाचंही भाग्य असतं. भाग्य उजळण्याचा क्षण येतो, त्यावेळी व्यक्तीचं, वस्तूचं अथवा त्या भागाचं जीवन विकासोन्मुख होत असतं. याचे कितीतरी दाखले आपल्या सांस्कृतिक, पौराणिक, सामाजिक इतिहासात पहायला मिळतात. नगर जिल्हयातील शेवगांव तालुक्याचा परिसर असाच अज्ञान, दुःख, दारिद्रय, उपेक्षा, नैसर्गिक अवकृपा यांच्या गर्तेत खितपत पडलेला. मारुतराव पाटलांचे नेतृत्त्व अशा विषम परिस्थितीत या भागाला लाभले आणि परिवर्तनाची चक्रे फिरु लागली. जिल्ह्याच्या सरहद्दीवरच्या या पट्ट्यात याआधी कम्युनिस्ट विचाराचे प्राबल्य होते. आणि राजसत्ता कॉंग्रेस पक्षाची होती. सरकार दरबारी लोकांची गाऱ्हाणी मांडायला लोकप्रतिनिधी त्या पक्षाचा हवा असतो. आपापल्या मतदार संघातल्या मागण्यांची, कामांची पूर्ति याद्वारे होत असते. त्यासाठी लोकप्रतिनिधी खंबीर असावा लागतो. आमच्या परिसराच्या भाग्याने १९६० पासून यशवंतनिष्ठ नेतत्व मारुतराव पाटलांच्या रुपात उदय पावलें आणि आमच्या भागाच्या दुर्दशेचा जणू शेवटच झाला.

मा. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या क्रांतिकारी व प्रभावी नेतृत्वाचा पाठपुरावा करणारा व त्या माध्यमातून ग्रामीण भागातही कॉंग्रेसी संघटना बळकट करण्याचे फार मोठे कार्य मारुतराव पाटलांनी केले. या ध्येयवादी कार्यकर्त्याने हजारो कार्यकर्ते तयार केले.

**जैसे दीपे दीप लाविजे ।**

**तेथ आदील कोण हे नोळखिजे । (श्री ज्ञानेश्वरी)**

एका दिव्याने अनेक दिवे पेटवावेत आणि मग आधीचा कोणता व नंतरचा कोणता हे ओळखता येऊ नये तसे झाले. आणि मारुतरावांमागोमाग जायला व त्यांच्या सेवाभावी नेतृत्वाला साथ द्यायला शेवगांव-नेवासा परिसरच कटिबद्ध झाला. जिल्ह्यातील राजकीय पुढाऱ्यांनी मग मा. ना. यशवंतराव चव्हाण साहेबांकडे मारुतराव पाटलाना कॉंग्रेसतर्फे १९६२ सालीच्या निवडणुकीत आमदारकीचे तिकीट



देण्याविषयी आग्रह धरला. शेवगांवच्या प्रचार सभेच्या प्रसंगी मा. यशवंतरावजींनी घुले पाटलांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केले आणि कम्युनिस्टांचा प्रभाव असलेल्या या मतदार संघातून विरोधी उमेदवाराचा ११००० मतांनी पराभव करुन घुले पाटील साहेब आमदार म्हणून निवडुन आले. १९६५ त जायकवाडी धरणामुळे हजारो शेतकरी विस्थापित झाले. त्यांच्या पुनर्वसन कार्यासाठी साहेबांनी अहोरात्र परिश्रमांची पराकाष्ठा केली. जिवाचे रान केले. विस्थापितांच्या व्यथांनी ते पुरते व्याकुळ झाले. परंतु अशाही अवस्थेत लोकप्रतिनिधी या नात्याने त्यांनी स्वत:च्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करीत हा सेवायज्ञ सुरुच ठेवला. धरणग्रस्तांच्या दुरावस्थेवर कायम स्वरुपी तोडगा काढण्याच्या प्रयत्नातूनच कारखान्याची उभारणी करण्यात साहेबांच्या दूरदृष्टी, अचूक निर्णयक्षमता, धडाडी, परिश्रम या नेतृत्वगुणांची सत्वपरीक्षाच होती.

आपल्या गावापासून तो जिल्हा पातळीपर्यंत उभे केलेल्या सहकारी प्रकल्पातून सामान्य जनतेच्या कल्याणाचाच कळवळा त्यांनी जोपासला. श्री ज्ञानेश्वर साखर कारखाना हा एक उद्योगसमूह असून जवळपास एक लाख लोकांचे ते पोषणस्थान आहे. सहकाराच्या व सत्तेच्या माध्यमातून मारुतराव पाटलांनी ही विकासाची गंगा सर्वसामान्यांच्या अंगणात आणून सोडली.

मारुतराव पाटील नुसते नेतेच नव्हते. त्यांच्या नेतृत्वाला निस्पृह सेवाभावाचा सुगंध होता, लोकोद्धाराची तळमळ व कळवळा होता, त्याला कर्तव्यभावनेचे अधिष्ठान होते. असा लोकसेवक नेता आम्हाला भाग्यबळानेंच लाभला होता. राजसत्तेत तीन चार दशके राहूनही त्यांनी स्वकार्य हे निष्कलंकच ठेवलं होतं. **आमच्यासारखे छोटे मोठे हजारो कार्यकर्ते बरोबर घेऊन हा 'जगन्नाथाचा रथ' त्यांनी येथवर ओढून आणला.** त्यांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून हा सहकाराचा रथ असाच पुढे पुढे नेत रहाणे हे आता आपणां सर्वांचे कर्तव्यच ठरेल.

✧ ✧ ✧



# आधी सेवक, नंतर मालक

**भाऊसाहेब दादा पा. पटारे.**

(माजी व्हाईस चेअरमन, श्री ज्ञानेश्वर सह. सा. का.)

आदरणीय मारूतराव पाटील आमच्या शेवगांव-नेवासा तालुक्याचेच नव्हेत, तर नगर जिल्ह्याचे कुलदैवत होते. त्यांचं नेतेपण असं दोन तालुक्यांपुरतंच मर्यादित नव्हतं. जिल्हयातील काँग्रेसच्या सर्वच पुढाऱ्यांची साहेबांबद्दल अशी आदराची भावना होती. आमच्यासारख्या छोट्या मोठ्या कार्यकर्त्यांना आपुलकीने जवळ घेऊन करावयाच्या कामाची अगोदर कल्पना देत असत. कामांत येणाऱ्या अडचणींचा पूर्ण विचार करून त्यावर आपल्याला काय करता येईल हें सारं मातेच्या ममतेने समजावून सांगत. कार्यकर्त्यांना त्यांच्या प्रेमाच्या वागणुकीतून खूप उत्साह मिळायचा. सर्वांना बरोबर घेऊन मगच हाती घेतलेल्या कामावर तुटून पडताना आम्हा कार्यकर्त्यांना श्रम वाटतच नव्हते.

साहेबांनी आमदारकीचं पहिलं इलेक्शन लढवलं तेव्हापासून राजकीय मतभेदाचा काही काळ वगळता आम्ही त्यांच्याबरोबर राहिलो आहोत. आजही त्यांच्या शब्दाबाहेर गेलो नाही. कार्यकर्त्यांवर ते पूर्ण विश्वास टाकीत असल्यामुळे काम फत्तेच व्हायचे. भानस हिवऱ्यासारख्या छोट्या गांवाची सरपंच पदाची जबाबदारी त्यांच्या मार्गदर्शनामुळेच पेलता आली. ज्ञानेश्वर कारखान्याच्या संचालक मंडळावरही साहेबांनी मला पंधरा वर्षांहून अधिक काळ सेवेची संधी त्यांनीच दिली. त्यांच्या विश्वासाला तडा जाईल असं कधीच, काहीही घडलं नाही. ते कधी रागावल्याचे मी पाहिले नाही. कधी एखादा तणफण करीत त्यांचेकडे आला तरी, ते त्यांचे म्हणणें आधी शांतपणे ऐकून घेत. त्यांनी एकदा प्रेमाने पाठीवरून हात फिरवला की तो माणूस त्यांचाच होऊन जाई. लोक सांभाळण्याचं त्यांचं तंत्र विलक्षण कौशल्याचं होतं. पाटलांनी माझ्यावर तर अगदी पुत्रवत् प्रेम केलं. तसं त्यांचं प्रेम तर परिसरातल्या सर्वांवरच होतं.

मी कोणी तरी वेगळा आहे, पुढारी आहे, नेता आहे अशा तोऱ्यात न राहाता मी तुमचा सर्वांचा आहे असं ते म्हणत. गांवची पाटीलकी करीत असल्यामुळे गांवात त्यांना मालक म्हणत. असं करता करता **ते परिसराचे मालक बनले. तरीही त्यांनी आपली सेवकपणाची भावना सोडली नाही.**



ज्ञानेश्वर कारखान्याच्या सगळ्या विकासात त्यांची ही सेवकपणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. शेतकऱ्यांची, बहुजन समाजाविषयी त्यांच्या मनात खूप तीव्र तळमळ होती. शेतकरी समाज हां कायम अडचणीत असणारा समाजाचा घटक. त्याला शेतीसाठी, उसासाठी, विहिरींसाठी, सायफनसाठी सहकारी बँकेमार्फत आर्थिक मदत देण्यात ते सर्वांच्या पुढे होते. अडलेंल्यांना मदतीचा हात देण्यात त्यांनी कधीच मागेपुढे पाहिले नाही.

कारखान्याच्या कारभारात काटकसरीचे धोरण ठेवल्यामुळे 'ज्ञानेश्वर' त्याच्या स्थापनेपासून आतापावेतो आघाडीवर आहे. **त्यांच्या लोकसेवेचा गौरव करावा तेवढा थोडाच !**

ते या जगातून जाण्याआधी आठ दहा दिवसापूर्वीची गोष्ट. त्यांनी फोन करून मला दहिगांवी बोलावून घेतले. तसं कारण काहीच नव्हतं. उगाचच बोलावलं. ''भाउसाहेब, तुमच्याबरोबर दोन घास खावेसे वाटले'' साहेब म्हणाले. जेवण अगदी साधे, नेहमीचेच. ज्वारीची पांढरी शुभ्र भाकरी आणि अळुच्या वड्या. साहेबांच्या विशेष आवडीचं हें जेवण. माझ्याकडे आल्यावर हा मेनू करायला सांगितला. पोटभर जेवण झाले. पोटही भरले आणि हृदयही. माझं पोट पूर्ण भरलं तरीही त्यांचा आग्रह सुरूच.

मारूतराव पाटील साहेबाचं हें अनौपचारिक प्रेम मला गेल्या तीस पस्तीस वर्षांपासून सतत मिळत आलं आहे. तसं तें सर्वांसाठीच होतं. **त्यांच्या नेतेपणाला सेवकपणाची बैठक होती. आधी ते सेवक होते, नंतर मालक बनले.**

✧ ✧ ✧

# स्वच्छ विचाराचा माणूस

## श्री. बाणाभाऊ सुकाळकर

उस्थळ दुमाला


श्री. मारूतराव पाटलांशी परिचय तसा १९६० मध्येच झाला होता. मी कम्युनिस्ट विचाराचा माणूस. परंतु चीनने भारतावर केलेल्या आक्रमणाच्या वेळी (१९६२) पार्टी फुटली. १९६०-६१ पर्यंत आम्ही कोणत्याही पक्षात गेलो नव्हतो. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अधिवेशन शेवगांव येथे १९६१ मध्ये झाले. श्री. विनायकराव पाटील त्यावेळी महाराष्ट्र प्रांतिकचे अध्यक्ष होते. आमचे तालुक्याचे श्री. मारूतराव पाटील यांच्यासह आम्ही शेवगांवला गेलो होतो. श्री. मारूतराव पाटील जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांच्या समक्ष आम्ही काँग्रेसमध्ये प्रवेश केला. १९६२-६३ चे जिल्हा भूविकास बँकेचे इलेक्शन आले तेंव्हा मा. श्री. मारूतराव पाटलांनी व श्री. आबासाहेब निंबाळकर यांनी मला त्यासाठी उभे केले. त्यांच्याच पाठबळावर मी निवडून आलो आणि त्यांच्याच पाठिंब्यामुळे मी १९६२ ते १९७२ या दहा वर्षात सदर बँकेवर होतो. जिल्हा खरेदी-विक्री संघ, जिल्हा सुपरवायझिंग फेडरशेन येथेही मा. साहेबांमुळेच सेवेची संधी मिळाली.

जायकवाडी धरणामुळे शेवगांव-नेवासा तालुक्यांतील बरीच गांवे धरणाखाली गेली. शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा मोठा प्रश्न निर्माण झाला. त्यासाठीही साहेबांच्या परिश्रमामुळे बरीच कामे झाली. अनेक प्रश्न मार्गी लागले. विस्थापितांच्या मुलांच्या भवितव्याचा व बेरोजगारीवर उपाय शोधण्याच्या प्रयत्नातून श्री ज्ञानेश्वर साखर कारखान्याचा जन्म झाला. धरणग्रस्त शेतकऱ्यांची बरीच मुले कारखान्यात कामाला लागली. जायकवाडी धरणाच्या बॅकवॉटरवर सुमारे सतरा उपसाजलसिंचन योजना सुरू केल्या गेल्या. त्यामुळे उसाचे क्षेत्र वाढले. शेवगांवी धरणग्रस्तांच्या मुलांच्या तांत्रिक शिक्षणसाठी I.T.I संस्था शासनामार्फत सुरू करण्यात आली. याला मंजुरी मिळवितांना बऱ्याच अडचणी आल्या. परंतु साहेबांच्या दूरदृष्टीमुळे, प्रयत्नांमुळे त्या अडचणींवर मात करतां आली.

१९६५-६६ मध्ये राहुरीला जे जिल्हा काँग्रेसचे अधिवेशन झाले, त्याचे संपूर्ण नियोजन मारूतराव पाटलांकडेच होते. १९६८ मध्ये अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन गोव्याला झाले. तेव्हां अनेक कार्यकर्त्यांसह मारूतराव पाटील गोव्याला गेले. कार्यकर्त्यांना संघटीत करण्यात त्यांनी खूप कष्ट घेतले. काँग्रेस पक्ष जिल्ह्यात त्यांनीच बलवान केला.

जिल्हा सहकारी बँकेचेही ते संस्थापनेपासून संचालक होते. तसेच बँकेचे सात वेळा चेअरमनही बिनविरोध होते. लहानमोठ्या कार्यकर्त्यांना बरोबर घेअुन हा जगन्नाथाचा रथ त्यांनी ओढत आणला आहे. **समाजकारण, अर्थकारण, राजकारण अशा सर्वच क्षेत्रात आपल्या स्वच्छ विचारांनी सर्वांना सांभाळून घेणारा लोकनेता पुन्हा होणार नाही.**

✧ ✧ ✧



# सेवावृत्तीचा वटवृक्ष

## श्री. मोतीलाल मोहनसिंग परदेशी गुरुजी –

(जळका खु.)

दत्तकविधनानंतर दहिगांवी आल्यावर तीन चार महिन्यांनी श्री. मारुतराव पाटलांनी गांवातील तरुण मंडळाशी संपर्क साधला. पहिल्या वहिल्या भेटीतच त्यांची आमच्यावर अद्‌भुत अशी छाप पडली. आमचे विचार आणि त्यांचे विचार अगदी तंतोतंत जुळले. आणि ते आमच्याशी व आम्ही त्यांच्याशी पुरे समरस झालो. पहिल्या भेटीतच त्यांनी आम्हाला कायमचेच जिंकून घेतले.

मी दहिगांवचा रहिवासी माझी प्राथमिक शिक्षक म्हणून सगळी सेवा दहिगांवीच झाली. श्री.बापूसाहेबांनी (शंकरराव घुले पाटील यांनी) गांवात बोर्डिंग स्थापन १ जून १९४१ रोजी केली श्री. अनाजपुरे गुरुजी व मी अशा दोघांनी दरवर्षी फाल्गुन वद्य तृतीयेला शिवजयंती साजरी करण्याची प्रथा सुरु केली. त्यानिमित्त सकाळी गांवातून प्रभात फेरी आम्ही काढत असू. रात्री मुलांचा नाटकाचा कार्यक्रम असे. अशाच एका प्रसंगी अनाजपुरे गुरुजी व बापूसाहेब पाटील यांनी वसतिगृह असावे अशी कल्पना मांडली. त्यासाठी धान्यरुपाने रोख रकमेच्या स्वरुपात निधी जमविण्यास सुरवात केली. सर्वप्रथम श्री.बापूसाहेबांनी २१ पोते ज्वारी दिली. मग गांवातील लहानमोठ्या शेतकऱ्यांनी आपापल्या कुवतीनुसार धान्य आणून दिले. काहींनी रोख रक्कम दिली. सुमारे शे सव्वाशे पोती धान्य आणि १००० रुपये जमा झाले. १९४१ साली ही रक्कम तशी फार होती. आणि या निधीतून वसतिगृह सुरु झाले.

श्री. शंकरराव पाटील यांना बापूसाहेब म्हणत. त्यांना दोन पत्नी. थोरल्या सौ. लक्ष्मीबाई त्यांना आक्का असे म्हणत. धाकट्या सौ. रुक्मिणीबाई त्यांना ताई म्हणत. सौ. लक्ष्मीबाई उर्फ आक्का या अतिशय प्रेमळ अडीअडचणीच्या वेळी कुणीही आक्कांकडे यावें आणि आपली अडचण त्यांचेपुढे मांडावी. त्याची ती गरज भागविणें, वेळ प्रसंग निभावून नेणें हे जणू त्यांचे व्रत होतें. सौ. ताई याही स्वभावाने प्रेमळच पण तोंडाने थोड्या फटकळ. त्या तडकाफडकी बोलून जात. या दोघी सख्ख्या बहिणी. **दातृत्व हा श्री. बापूसाहेबांच्या कुटुंबात पिढीजाद गुण होता.** त्यांच्याकडे घरकाम, शेतीकाम यासाठी २५-३० माणसे होती ज्यांना घरदार नाही, ज्यांना कुणाचाही आधार नाही अशी ही निर्वासित मंडळी बापूसाहेबांचीच कुटुंबीय बनून राहिली होती. त्यांच्यात परकेपणाची भावना नव्हतीच.

गांवच्या शालेय कार्यक्रमात श्री. मारुतराव पाटील आवर्जून उपस्थित राहात. स्वातंत्रदिन १५ ऑगस्ट, प्रजासत्ताकदिन २६ जानेवारी, श्री शिवजयंती इत्यादी राष्ट्रीय कार्यक्रम शाळेत नियमित होत सदर प्रसंगी



त्यांची भाषणे म्हणजे एक बौध्दिक मेजवानी असे. जून १९५९ पासून गांवात हायस्कूलसाठी परवानगी मिळाली. आरंभी परवानगी मिळवीताना अनेक अडचणी आल्या. परंतु साहेबांनी त्या अडचणींवर मात करुन परवानगी मिळविलीच आणि नवजीवन विद्यालय सुरु झाले.

दरवर्षी गांधीजयंतीनिमित्त श्रमदान सप्ताहा चे आयोजन केले जाई. त्यात सर्व ग्रामस्थांना सहभागी करुन घेतले जात असे. या श्रमदान सप्ताहात दरवर्षी नवीन कामे निघत. गांवातील रस्ते दुरूस्ती, श्रीहनुमान मंदिरावरची माडी, गांवातील आड, विहिरी, बारव यातील गाळ काढून त्या स्वच्छ करणें, ग्रामसफाई, चावडीचें बांधकाम, शेतीशाळेसाठी असलेल्या विहिरीचें बांधकाम, वसतिगृहाची दुरूस्ती, तालीमखाना अशी कितीतरी कामे अशा सप्ताहातून केली गेली. माध्यमिक विद्यालय, प्रा.आरोग्य क्रेंद्र, मराठी शाळा यांच्या सर्व कामांसाठी श्रमदान केले जाई. श्रमदान कार्यक्रमांमधून श्रमप्रतिष्ठा व तिचे महत्त्व ध्यानी येत असे. साहेबांच्या अंगच्या सांघिक वृत्तीला अधिकच बळ मिळाले. त्यातून गांवच्या सामूहिक विकासाला योग्य ती दिशाही मिळाली.

साहेबांचा चौसोपी वाडा म्हणजे जणू भरले गोकुळच होतें. सगळी ऐहिक समृध्दी होती. कशाचीच कमी नव्हती धर्मपत्नी सौ.जिजाबाई अतिशय धार्मिक वृत्तीच्या, पतिसेवातत्पर, उदार वृत्तीच्या, कुटुंबवत्सल, सेवाभावी अशा सुखसमृध्दीने खचून भरलेल्या साहेबांच्या कुंटुंबावर मध्यंतरीच एक आपत्ती दैववशात् कोसळली. धर्मपत्नी सौ.जिजाबाई निवर्तल्या. सगळ्या कुटुंबावर जणू आकाश कोसळलें ईश्वरेच्छा बलीयसी हेच सत्य अनुभवावें लागले. मुलामुलींच्या शैक्षणिक जीवनावर व त्यांच्या भवितव्यावर तो मोठा आघात होता पण काय करणार ? त्याही प्रसंगाला सामोरे जाण्यात साहेबांचे नीतिधैर्य खर्ची पडले. चि.नरेंद्र, चि.राजेंद्र व चि.चन्द्रशेखर या तिघांनाही Pravara Public School मध्ये दाखल केले. तिघांचेही S.S.C. पर्यंतचे शिक्षण तिथेच झाले. मुली चि.बेबीताई व चि.छाया यांना शिकण्यासाठी पुण्याच्या हुजूरपागा हायस्कूलमध्ये ठेवण्यात आले. तिन्ही मुलांचे उच्च शिक्षण पुण्यात झाले. नरेन्द्र पदवीशिक्षणानंतर M.B.A. झाले, राजेंद्र B.E. आणि चंद्रशेखर M.Sc. (Agri.) झाले. अशा तऱ्हेने कौटुंबिक आघातातून सावरतांना मारुतराव पाटलांच्या जिवाची कोण ससेहोलपट झाली, केवढी त्रेधातिरपीट झाली असेल याची आपण कल्पनाही करु शकत नाही. हें सारं पोटात साठवून त्यांनी त्यांचं समाजसेवेचं, लोककार्याचं व्रत आहे त्याच नेटानं पुढ चालूं ठेवलं. यात त्यांच्या ठायी असलेल्या पौरुष प्रयत्नांचं दर्शन घडतं.

परिसरातल्या लोकांसाठी - मग तो कोणीही असो - साहेबांचं आर्थिक योगदान अतीव महत्त्वाचं होतं. अडचणीत असलेल्याची आर्थिक गरज आधी आपल्या स्वतःच्या पैशांतून भागवायची. त्याचं काम झाल्यावर बाकीची पूर्तता नंतर करवून घ्यायची, असा त्यांचा शिरस्ता होता. वसतिगृहाचें कामकाज, व्यवस्थापन, गांवातील इतर सामूहिक कामे या सर्वांना त्यांचा मोठा आधार होता.

गांवातल्या धार्मिक कार्यक्रमातही त्यांचे विशेष योगदान होते. हनुमान मंदिरातील दररोज रात्रीचे पोथीवाचन, वार्षिक हरिनाम सप्ताह, दरवर्षी मंदिराची रंगरंगोटी, रामनवमी - हनुमानजयंती-दत्तजयंती इ. धार्मिक उत्सवांचे आयोजन यांकडे त्यांचे विशेष लक्ष असे. मोहरमचा सर्व खर्च साहेबच करीत. दत्तमंदिराचा वर्धापनदिन, पितृपक्ष, दिवाळीचा फराळ, दसऱ्याच्या होमानिमित्त भोजन असे. **श्री. मारुतराव पाटलांच्या लोककार्याला असे अध्यात्माचें अधिष्ठान होतें.** म्हणूनच लोकांनी त्यांच्या हाती सोपविलेल्या सत्तेतून सेवावृत्तीचें रोप आज विशाल वटवृक्षात परिणत झालेले दिसते आहे.

दि. ३१-३-१९८३ ला मी शिक्षकी सेवेची स्वेच्छानिवृत्ती घेतली. तोपर्यंत त्यांचा सुखद सहवास लाभला, हे माझें परम भाग्यच मी समजतो.

**परिसरातील सर्वांचाच सच्चा मित्र म्हणून त्यांची प्रतिमा सर्वांनाच सतत स्फूर्ती देत राहील.**

✧ ✧ ✧



# माणूसपण जपणारे नेतृत्व

**डॉ. अच्युतराव रसाळ**

शेवगांव

मूळ पढेगांवचे बनकर दहिगांवी घुले पाटील झाले. शालेय जीवन चालू असताच त्यांना दत्तक म्हणून शंकरराव पाटील यांचे घरी यावे लागले. शालेय शिस्त, सांघिक वृत्ती, नीटनेटकेपणा, वक्तृत्व, नेमस्तपणा, प्रामाणिकपणा इत्यादी गुण मारुतरावांत त्यांच्या प्राथमिक शालेय जीवनापासूनच होते. त्यांच्या गुणविकासाला विशेष वाव मिळाला तो विद्यालयीन जीवनात.

घुले घराण्याची सांपत्तिक स्थिती तशी खूपच चांगली होती. आसमंतात श्रीमंत जमीनदार, सगेसोयरे, घरी सोळा आणे पाटीलकी, गांवचा न्यायनिवाडा करण्याचा अधिकारही त्यांचाच. श्री.शंकररावपाटील यांच्या मृत्यूनंतर मारुतराव पाटीलकीचे काम पाहू लागले. आपण पाटील सरकारचे की जनतेचे ? अशा दुहेरी विचारात ते गुरफटलेले कधी दिसले नाहीत. मी पाटील जनतेचा आहे, गांवचा आहे. आपली विद्या, आपलं शिक्षण, आपलं घराणं, आपल्यातले विशेष गुण यांना मारुतराव पाटलांनी जनताभिमुख केले. सरकारने दिलेल्या पाटीलकीच्या अधिकाराला त्यांनी ग्रामसुधार, ग्रामविकास, गांवातले कलह-संघर्ष मिटवणे या कामाला जुंपले. त्यांच्यात बालपणापासूनच असलेली सेवावृत्ती अशी समाजसेवेत परिणत झाली.

सामाजिक नेतृत्व करायला समाजातलाच माणूस असावा लागतो. म्हणून काँग्रेसवाल्यांनी मारुतरावांचा पाठपुरावा केला. त्यांच्या गुणांचा प्रचार केला व हा दहिगांवचा पाटील नेतृत्वाला योग्य आहे, असा दरारा निर्माण केला.

१९४२ च्या चळवळीत गांवोगांवची मने गांधी तत्वज्ञानाला व गांधी विचाराला पोषक करण्याचे मोठे काम मारुतरावांनी केले.

त्यांच्या आयुष्यात जनसेवा, जनजागृती, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव व धर्मातील राज्यव्यवस्थेची बीजे जागोजागी विखुरलेली दिसतील. सहकारी जीवनात प्रवेश केल्याशिवाय आणि शेतीला उद्योगधंदा म्हणून मान्यता मिळाल्याशिवाय शेतकरी सुधारणार नाही अशी त्यांची ठाम भूमिका होती व आहे. काँग्रेस सेवादलाच्या शाखा त्यांनी दहिगांव, शहर टाकळी देवटाकळी, भाविनिमगांव येथेही सुरू केल्या. एकूण १४ गावांत शाखांचे कामकाज सुरू झाले. फक्त घेवरी व चांदगांव या गांवी त्या थोड्या उशिराने सुरू झाल्या.



१९६२ त काँग्रेस कमिटीची सभा श्री. बाबासाहेब खिर्डीकर यांचे घरी झाली. तीत बाबासाहेबांना अध्यक्ष केले गेले. खिर्डी, दहिफळ, एरंडगांव, ब्राह्मणगांव इ.गांवी झालेल्या सभांचे अध्यक्ष बाबासाहेबच होते. बाबासाहेबामधील अबोलपणा, प्राणणिकपणा, निष्ठा हे गुण मारुतरावांनी अचूक हेरले आणि त्यांना पुरते आपलेसे करून घेतले. नवीन विचार करणारा माणूस भेटला की मारुतराव त्याला आपलासा करून घेतात. समाजातल्या सर्व स्तरातल्या माणसांशी त्यांनी आपल्याकडे सामोपचाराने ओढून घेतले. गांवेच्या गांवे काँग्रेस पक्षाच्या विचाराने भरून टाकण्यात त्यांचा असा हातखंडा होता.

दहिफळ हे कम्युनिस्ट विचाराच्या प्रभावाखालचे गांव. पण त्याही गांवी काँग्रेसचे राजकारण करणारी नवी पिढी त्यांनी निर्माण केली. राजकीय नवीन विचारातलं आपलं कसब वापरून त्यांनी तरूण रक्ताला वाव दिला. आपलं बल आणि ऐश्वर्य सर्व काही शेतकरी जीवनाच्या उत्क्रांतीसाठी, सर्वसामान्यांच्या उत्थानासाठी खर्च केलं. त्यावेळेपासून मारुतरावांचा प्रभाव आतापर्यंतही आहे तसाच कायम आहे. जिल्हा कँाग्रेस कमिटी, प्रदेश काँग्रेस कमिटी, जिल्हा सहकारी बँक यांवर त्यांच्या विचाराचं वर्चस्व आजही आहे. त्यांच्याकडे आलेल्या माणसाला मारुतराव आपलेच स्वकीय आहेत असे वाटे. दुसऱ्याच्या ठिकाणचे गुण हेरण्याची मारुतरावांची हातोटी काही औरच आहे.

शेवगांवी कॉलेज काढण्यासाठी प्रयत्न सुरू होते. मारुतरावांशिवाय इतर मंडळी या कामी पुढाकार घेऊ पहात होती. या कामासाठी आवश्यक तो निधी उभारण्याचे काम सुरू झाले होते. मारुतराव पाटील आणि इतर मंडळी यांनी जवळपास एक लाख रूपये निधी जमविला मध्यंतरी बराच काळ लोटला तरी प्रत्यक्ष कामास सुरवात व्हायचं चिन्हं दिसेना. तेव्हा मारुतरावांनी या कामी विशेष लक्ष पुरवून कामाचा पाठपुरावा केला. त्यांनी स्वतः एक लाख रूपये निधी म्हणून दिले आणि कॉलेज स्थापनेच्या कामाला वेग आला.

सामुदायिक जीवनात जिद्द, निष्ठा, चिकाटी, सेवाभाव, त्यागवृत्ती, स्वतःला कामात झोकून देण्याची तयारी या त्यांच्या अंगभूत गुणांमुळे **पुढारपण जणू त्यांच्या मागोमाग फिरत होते.**

✧ ✧ ✧



# सर्व धर्मप्रेमी राजकारणी


**ह.भ.प. बिहारीलाल वि. धूत**

शेवगांव


आमच्या तालुक्याचे आमदार म्हणून श्री.मारुतराव पाटील सर्वपरिचित असण्यात विशेष असं काही नाही. मला त्यांचं उत्तम व्यक्तिमत्व जाणवतं ते त्यांच्या **अध्यात्माधिष्ठित राजकीय कर्तृत्वामुळे.** अध्यात्मावर आधारित राजकारणामुळे सामाजिक कार्यांतही त्यांच्या व्यक्तिमत्वाचा वेगळा ठसा जनमानसावर उमटलेला दिसतो. यामुळेच त्यांचे राजकारण सत्तालोलुपतेपासून चार हात दूर राहिलेलं आहे. समर्थ रामदासांनी छत्रपती शिवाजी महाराजांना असाच उपदेश करतांना म्हटले होते. समर्थ म्हणाले -

**पहिले तें हरिकथा निरुपण ।**
**दुसरे तें राजकारण ।**
**तिसरें ते सावधपण ।**
**सर्व विषयी ।। (दासबोध)**

असाच एक प्रसंग आठवतो. १९८५ - ८६ च्या दरम्यान नेवाश्याला सर्वधर्मीय भक्तिमेळावा आयोजित केला होता. त्यांत सहभागी होण्यासाठी करवीर पीठाचे शंकराचार्य, ह.भ.प.धुंडा महाराज देगळूरकर, शीख धर्मगुरू, बौध्दांचे काही प्रमुख धर्मोपदेशक, जैनांचे धर्मगुरू, महानुभाव पंथाचे श्री.नागराज बाबा आणि कितीतरी संतमहानुभाव आले होते. भाविकांची उपस्थिती ८० हजाराच्या आसपास होती. पाकशाळेच्या उत्तरेस प्रवरेच्या विस्तीर्ण पात्रात (वाळवंटात) मोठा मंडप देण्यात आला. याच कार्यक्रमात सुमारे चार साडेचारशे धर्मांतरितांचा परावर्तन कार्यक्रमही पार पडला.

या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून मारुतराव पाटलांनी उपस्थित रहावे यासाठी त्यांना आमंत्रित करण्यासाठी मी आणि दिनकरराव ताके असे दोघेजण त्यांचेकडे विनंती करण्यास गेलो होतो. त्यांनी कुठलेही आढेवेढे न घेता 'येतो' म्हणून सांगितले. स्वागताध्यक्ष म्हणून ते अगत्याने वेळेवर हजर झाले. आलेल्या सर्वधर्मीय साधुसंताचा सत्कार-स्वागत सोहळा त्यांचा हस्तेच पार पडला. यानंतर त्यांनी

**समयोचित असे पाऊण तास भाषण केले.** भाषणात धर्म शब्दांची संकल्पना त्यांनी समजावून सांगितली - धर्म म्हणजे जो सर्वांना सावरून धरतो, समाजाला एकसंघ ठेवतो तो. **धर्म हा माणसे जोडणारा असतो.** परंतु त्याचे हे खरे तत्व निसटल्यामुळे धर्मा-धर्मात कलह, संघर्ष इ. उफाळून येतात. संपूर्ण मानवी जीवन अस्ताव्यस्त होते. प्रत्येकाने आपापल्या धर्माचा आदर ठेवला पाहिजे. त्याचबरोबर इतर धर्मांविषयीही पूज्य बुध्दी ठेवावी. त्यामुळे सामाजिक ऐक्य जोपासण्यास मदतच होईल. **श्री.मारुतराव पाटलांच्या त्या वेळच्या भाषणाने मोठमोठ्या कीर्तन प्रवचकारांनीही माना डोलावल्या.**

त्यांच्या दहिगांवपासून काळेगांव एक-दोन मैलांवर गोदावरी काठी आहे. तिथे प्राचीन शिवालय होते. प्रत्येक महाशिवरात्रीला तिथे काळेश्वराचे दर्शन घ्यायला पंचक्रोशीतले भाविक येत. काळेश्वराचे दर्शनासाठी जायला रस्ता दहिगांवहूनच होता. त्या दिवशी यात्रिकांची व भाविकांची वास्तपुस्त आणि सेवा करण्याची संधी त्यांनी सोडली नाही.,

शांतीब्रह्म एकनाथांच्या प्रतिष्ठान क्षेत्रात फाल्गुन व.६स हजारो वारकरी दुरदुरून नेमाने येतात. पैठणच्या वाळवंटात चांदेकरांच्या फडावर षष्ठीला कीर्तन होत असे. कीर्तनात मृदंग वाजवायला श्री.बाबासाहेब नरवडे पाटील आवर्जून उपस्थित असत. आणि त्यांचे बरोबर श्री.मारुतराव पाटीलही असत. गावात होणाऱ्या प्रासंगिक धार्मिक उत्सवातही उपस्थित राहून धर्मकार्याला हातभार लावणे हे ते आपले कर्तव्य मानीत. त्यांच्या सर्व कार्याला धार्मिकतेचे अधिष्ठान असल्यामुळे त्यांची लोकप्रियता उठून दिसते.

✧ ✧ ✧



# वैचारिक प्रदूषणमुक्त राजकारणी

**श्री.माधवराव कुलकर्णी**
भावीनिमगांव

आम्ही आणि घुले पाटील यांचे स्नेहसंबंध कैक पिढ्यांपासून निर्व्याज असे आहेत. सहकाराच्या माध्यमातून त्यांनी दिलेले योगदान खूप मोलाचे आहे. A.D.C.C. बँकेमार्फत शेतकऱ्यांना जायकवाडी बँक वॉटरमधून बागायत शेतीसाठी कर्जपुरवठा करण्याचे कामी त्यांनी मोठे सहकार्य केले आहे. आमच्या गांवच्या एकूण क्षेत्रापैकी ६० ते ७० टक्के जमीन आज बागायती क्षेत्र बनले आहे. **समाजसेवेच्या या कामी त्यांनी जात पात इ.कुठलाही भेदभाव बाळगलेला नाही.** शेती धंद्याला पूरक धंदा म्हणून शेतकऱ्यांना गायीसाठी ही कर्जपुरवठा केला गेला. त्यामुळे हरितक्रांती आणि त्याचबरोबर श्वेतक्रांतीही झाली. याचे सगळे श्रेय मारुतरावांनाच द्यायला हवे.

आजकाल बेरोजगारीची समस्या सर्वांना भेडसावणारी आहे. कोणतेही सामाजिक क्षेत्रात भ्रष्टाचार ठाण मांडून बसलेला दिसतो आहे. परंतु मारुतराव पाटील अशा प्रदूषणापासून अगदी मुक्त आहेत असे आम्ही विश्‍वसनीय रीतीने सांगू शकतो.

सुमारे दहा वर्षापूर्वी आमच्या गांवचे ८० - ८५ शेतकरी कारखान्याचे सभासद होते. (सध्या सभासद संख्या शे दोनशेच्या आसपास गेलीय.) अशाच एका इलेक्शन प्रसंगी गांवातील विरोधी पार्टीचे पक्षनेते माझ्याकडे आले. त्यावेळी मारुतरावांनी मला विचारले, मला किती मते पडतील ? मी स्पष्ट सांगीतले आपल्याला ७३-७४ मते पडतील आणि अगदी असेंच घडले.

✧ ✧ ✧



# सहकार पंढरीचा वारकरी

**डॉ. भवान महाजन**

माझे परमस्नेही श्री. मारुतराव घुले पाटील राहणार दहिगावने, ता. शेवगाव, जि. अहमदनगर, हे थोर व्यक्तिमत्व ८ जुलै २००२ रोजी कालवश झाले, यावर अजून विश्वास बसत नाही. निकटच्या वर्तुळात ते भाऊसाहेब या नावाने परिचित होते. प्रेमापोटी नगर जिल्ह्यातील कित्येकांनी त्यांना साहेब म्हणून हाक मारायची तर कित्येकांनी त्यांना मनोमनी मालक म्हणून मान्य केलेले होते. १५ सप्टेंबर १९३० या दिवशी श्रीरामपूर तालुक्यात पढेगावी बनकरांचे घरात जन्मलेला एक मुलगा दहिगावच्या घुलेपाटील घराण्यात दत्तक म्हणून आला. बाहेरून आलेल्या त्या मुलाला गावात, घरात या काळाला अनुसरून काही त्रास झाला असेलच. कुणी त्रास दिला नाही असे मानले तरी स्वतःच्या जागेतून मुळासकट आपल्याला उपटून आणल्याची जाण त्या मुलाला नसेल असे म्हणवत नाही. पण ह्या मुलाने लवकरच दहिगावी मूळ धरले अन् बघता बघता केवळ परंपरागत पाटीलकी न चालवता माणसं प्रेमानं आपलीशी करायला सुरूवात केली.

शाळेतल्या गुरूजनांची शिकवण अन् स्वतःवर सुसंस्कार करण्याची एक प्रबळ इच्छा यातून एक समंजस, सर्वांना बरोबर घेवून चालायची असलेली व्यक्ती हळू हळू आकाराला आली. पुढे राष्ट्र सेवा दलाचे संस्कार झाले. भाऊसाहेबांवर शाळेत असताना चांगले संस्कार झाले. स्वातंत्र्योत्तर काळात भाऊसाहेबांच्या मनावर ठसा उमटवण्यात यशंवतराव चव्हाण हे व्यक्तिमत्व फार मोठे ठरले. नगर जिल्ह्यात त्यावेळी म्हणजे १९६० चे सुमारास कम्युनिस्टांचे राजकीय बळ फार मोठे होते. तिथे भाऊसाहेबांनी काँग्रेसची मुळे रूजवायला सुरूवात केली. या समंजस नेतृत्वाची दखल चव्हाणांसारख्या गुणग्राही व्यक्तीच्या नजरेतून सुटली नाही. मग नगर जिल्हा परिषद, आमदारकी या सर्व ठिकाणी भाऊसाहेबांनी प्रचंड काम करून स्वतःचे स्थान निर्माण केले. यशवंतराव चव्हाणानंतर त्यांच्या स्वत:च्या भागात काम करून स्वतःचे स्थान निर्माण केले. यशवंतराव चव्हाणांनंतर त्यांच्या बरोबर मैत्रीचे संबंध

असलेले आबासाहेब निंबाळकर, भाऊसाहेब थोरात, पुढल्या काळात जवळ आलेले अण्णासाहेब शिंदे ह्या व्यक्तींना त्यांनी आयुष्यभर मानले. १५ वर्षे आमदार पदावर राहिलेल्या भाऊसाहेबांनी मंत्री होण्याचे टाळले. कारण सर्वसाधारण माणसात राहणे हे सर्वांत मोठे पद आहे, ही त्यांची धारणा होती. घरचे खावून लष्कराच्या भाकरी भाजणे ह्यात सर्वोच्च आनंद मानणे हा त्यांचा स्वभाव होता. त्यामुळे राजकारणाच्या माध्यमातून नगर जिल्ह्याच्या अग्रभागी ते वावरत असताना देखील, सहकारी बँकेसारख्या संस्थेकडे त्यांचा राजकीय गुरूंबद्दल काहींनी अशी टीका केली होती की, यशवंतरावांना गट करता येतो पण कट करता येत नाही. ते खरे असेलही पण मुळात माणुसकीला आवाहन करणाऱ्या गोष्टींकडे जसा चव्हाणांचा कल होता तसाच त्यांना श्रद्धास्थान मानणाऱ्या भाऊसाहेबांचाही स्वभाव होता. सहकार या शब्दाचा अर्थ स्वातंत्र्योत्तर काळात विस्तृत होत गेला, शासनाने त्या नावाने एक खातेही सुरू केले. महाराष्ट्रात या सहकारी चळवळीने मोठी क्रांती केली. पण भाऊसाहेबांइतका सहकार चव्हाणांनंतरच्या काळात कुणाला उमगला असे वाटत नाही. सहकाराची तत्त्वे सांगताना धनंजयराव गाडगीळांना या सहकारातून काय अपेक्षित आहे ह्याची संपूर्ण जाण भाऊसाहेबांना होती. नुसती पांडित्यपूर्ण चर्चा करण्यापेक्षा अर्थपूर्ण कृती करण्याचा त्यांचा स्वभाव होता. नगर जिल्ह्यातील सर्व पक्षीय नेत्यांची व्यक्ती म्हणून भाऊसाहेबांशी फार जवळीक होती. कारण पक्षीय राजकारणाच्या मर्यादा सोडून माणूस म्हणून माणसाशी जवळीक साधणे हे त्यांचे मुख्य धोरण होते. जायकवाडी धरणाला विरोध करणारे भाऊसाहेब धरण झाल्यानंतर विस्थापितांना पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी खरोखर झिजले. या बाबतीत त्यांनी राजकारण आणले नाही. शेवगांव-नेवासा ह्या पाणीटंचाईच्या भागात आज ऊसाची सळसळ दिसत्येय. त्यामागे भाऊसाहेबांची तळमळ आहे. एका मर्यादेपलीकडे तालुका पातळीचे खाली पक्षीय राजकारण आणू नये हे त्यांचे मत असायचे. ज्यात अधिक लोकांचे भले होईल ते धोरण राबवावे यासाठी ते आयुष्यभर धडपडले. एखाद्या निवडणुकीमध्ये एखाद्या विरोधकाबद्दल पक्षाच्या व्यासपीठावरून ते काही बोलले तरी हे व्यक्तिगत नाही, ह्याची खात्री विरोधकांना पूर्ण असायची. जहाल कम्युनिष्टांचे नेते कॉ. वकीलराव लंघे त्यांचे मित्र झाले अन् साखर कारखाना उभारते वेळी व नंतर या दोन नेत्यांच्या मैत्रीची साखर संपूर्ण जिल्ह्याने लुटली. अण्णासाहेब शिंदे यांचा सखोल अभ्यास, बाळासाहेब भारदे यांचे वक्तृव याबद्दल भाऊसाहेब भरभरून बोलत. त्यांचा खरा पिंड होता तो संघटकांचा अन् त्यांचा खरा परमेश्वर होता सहकार !

बँकांसारख्या संस्था चालतात त्या आर्थिक ठेवी आणि व्यवस्थेवर ! जिल्हा सहाकारी बँकेच्या स्थापनेपासून आजच्या तिच्या अवस्थेपर्यंत या बँकेला लाभली ती खरे भाऊसाहेबांसारखी सुवर्णमुद्रेची ठेव ! बँकाच्या निवडणुका, नेमणुकी या कामात सर्व नियमांचे पालन करायला लावणे ह्यासाठी ते प्रयत्नशील असायचे. स्वतःअध्यक्ष असो वा नसो, नव्या अध्यक्षांच्या कामात त्यांनी कधी अडचणी

आणल्या नाहित. ओळखीपाळखीच्या लोकांना अनियमितपणे मदत केली नाही. जेवढी व्यक्ति जवळची तेवढी नियमांची अंमलबजावणीही व्यवस्थित ही त्यांची धाटणी ! ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना उभारण्यापूर्वी त्या परिसरातून जाणारा कुणीही तिथे अशा प्रकारची वास्तु उभारणे शक्य होईल असे कधी म्हणाला नसता. शेवगांव-नेवासा ह्या रस्त्याचीच दुर्दशा अशी होती की, कारखाना तर सोडा पण आधी हा खड्डेमय रस्ता तर कुणी सुधारून दाखवा, असे मनात म्हणाला असता. पण त्या माळरानावर आज शेवगाव-नेवासा भागातील सर्वांच्या अभिमानाचे हे प्रतीक उभे केले ते भाऊसाहेब व त्यांच्या सहकाऱ्यांनी  कारखाना नुसता उभा केला नाही तर टिकवला, वाढवला अन् भरभराटीस आणला. अगदी सुरवातीला कारखान्याचे कार्यालय पत्र्यांच्या सावलीखाली होते. तिथे उकाड्याने बसणे शक्य नसायचे. पण कारखान्याची सर्व कार्यकारिणी तिथेच बसून बैठका घ्यायची. आपण आज पाहतो की, कित्येक कारखाने सुरू होताना त्यावर निवडून आलेले पदाधिकारी आधी त्यांच्या सोई, भत्ते यांकडे लक्ष ठेवून असतात. ज्ञानेश्वर कारखाना व्यवस्थित कार्यरत झाल्यावर काही दिवसांनी नवीन गेस्ट हाऊय बांधण्यात आले. पदाधिकाऱ्यांना त्यांची पदे उपभोगण्याआधी कारखान्याचे काम नीट झालेले आहे की नाही ? हे तपासून पाहण्याची सवय भाऊसाहेबांची होती आणि कोणत्याही कामात भपकेबाज खर्च, अनाठायी चमकधमक त्यांना मान्य नव्हती. सर्व काही प्रमाणशीर ठेवण्यावर त्यांचा स्वतःचा कटाक्ष होता. कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक यांचे कामाच्या व्यवस्थेबद्दलचे सल्ले ते आवर्जून मानीत. स्वतःची मनमानी ते स्वतः करायचे नाही. त्यामुळे व्यवस्थापनात सर्वांनी सोईची अशी रचना आपणहून अंगिकारली जायची. त्यांच्या बरोबर काम करणाऱ्यांची एक मोठी फळीच त्यांनी शेवगाव-नेवासा भागात उभी केली. लोकांच्या प्रेमामुळे अधिक काळ राज्य करता येते याबद्दलची त्यांची समज अतिशय व्यवहारी व सत्य होती. कुठे प्रवासाला गेले तरी किंवा कारखान्याच्या कामासाठी मुंबईत गेले तरी अकारण महागड्या हॉटेलात उतरून मौजमजा करणं ते टाळीत. काम होताच परतून निघत. कारखान्याचे विस्तारीकरण करणे असो किंवा इमारत वाढविणे असो, सर्व काही अगदी हिशोबीपणाने करण्याकडे त्यांचा कल असायचा ! प्रवासात असले तरी आजचे क्रशिंग किती आहे ? ही विचारणा कारखान्याकडे नियमितपणे संध्याकाळी ते करीत. पालकाने आपल्या पाल्याबद्दल चौकशी ज्या प्रेमाने करावी तेच प्रेम त्यांच्या वागण्यात दिसायचे ! या सर्व बाबतीत दिखाऊपणाचा अभाव होता. त्यांच्या अशा प्रकारच्या वृत्तीने आणि बरोबरच्या लोकांना खऱ्या अर्थाने बरोबर घेवून चालल्यामुळे 'ज्ञानेश्वरची' कीर्ती खरोखरीच सर्वदूर पसरली. भाऊसाहेबांच्या एकावन्नाव्या वाढदिवसाचे निमित्ताने स्व. यशवंतराव चव्हाण अगत्याने कारखान्यावर आले. त्यांनी सर्व पाहणी केली. दुपारच्या कडक उन्हात मंडपात बहुसंख्यनेने गर्दी झालेली होती. लोकांच्या या लाडक्या नेतृत्वावर यशवंतरावांनी त्यांच्या मार्दवपूर्ण भाषेत ममत्वाने मायेचा हात फिरविला. **''मारुतरावांसारखी दहा माणसे जरी मला महाराष्ट्रात मिळाली तरी मी मोठा कायापालट करून दाखवीन'' असे यशवंतराव**

बोलले ! त्यांच्या या वक्तव्याने उकाड्याच्या वातावरणात देखील थंड शिडकावा पसरला. गुरुशिष्याच्या परंपरेचे एक अनोखे दर्शन या कार्यक्रमांतून लोकांसमोर आले. यशवंतरावांवरची भाऊसाहेबांची श्रद्धा अतूट होती. पुढच्या काळात राजकीय रणधुमाळीत यशवंतरावांसारखी सुसंस्कृत व्यक्ती दिल्लीच्या वातावरणात त्रस्त झालेली पाहून भाऊसाहेब व्यथित होत. यशवंतरावांनंतर महाराष्ट्राचे नेतृत्व श्री. शरद पवार यांच्याकडे आले तेव्हा त्याच श्रद्धेने भाऊसाहेब त्यांच्याकडे पाहत. पण सर्व राजकीय चळवळीतून हळूहळू माघार घेत त्यांनी सहकार एके सहकार या न्यायाने कारखान्यावर लक्ष केंद्रित केले. जायकवाडीचे पाणी शेवगाव तालुक्यात उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी कोणतेही परिश्रम करायचे ठेवले नाही.

शेवगाव नेवासा भागातल्या लहानातल्या लहान भूधारकाला पाणी कसे मिळवून देता येईल याकडे ते पहात. त्यांच्याकडून आलेला ऊस कारखान्यात येवून पोहोचल्यावर त्याला खेट्या मारायला न लावता योग्य भावात पैसा पोचता करताना ते अतिव समाधानी व्हायचे ! त्यांच्या या प्रामाणिक धडपडीमुळे लोकांच्या मनावर त्यांनी खरोखरीच मालकी प्रस्थापित केली. या भागातले माळरान घालवून या भागाला ऊसाचे नंदनवन करण्याचे महान कार्य भाऊसाहेबांनी केले. कारखाना व्यवस्थित चालू झाल्यावर त्याच्या अनुषंगाने तिथेच शाळा, दवाखाना, तसेच नगरच्या डॉक्टरांच्या भेटी, कामगरांसाठी तंत्रज्ञांसाठी घरे या सोई त्यांनी आवर्जून भराभर उपलब्ध करून दिल्या. शाळेमधून चांगले शिक्षक, आणणे, शाळेतल्या मुलांसाठी विविध उपक्रम राबविणे ही कामे तिथल्या लोकांच्या अंगवळणी पाडण्यात भाऊसाहेबांनी मोलाचे काम केले.

कारखाना परिसरात त्यांनी ज्युनियर कॉलेजही सुरू केले अन् चांगलयाप्रकारे चालविले. नंतरच्या काळात त्यांनी राबविलेला फळकेंद्राचा प्रकल्प हा त्यांच्या शिरपेचातला मोठा मानांचा तुरा ठरला. विविध फळांची शिस्तशीर, वैज्ञानिक पद्धतीने लागवड करून योग्य अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने हा प्रकल्प त्यांनी असा काही उभा केला की, महाराष्ट्रातून अन् बाहेरून येवून य बागेतल्या सहकाराची रसाळ गोमटी फळे सर्वांनी पाहिली अन् चाखली. क्वचित कुणा बड्या नेत्याचे आगमन कारखान्यावर झाले तेव्हा सध्या कमानी लावून उभ्या केलेल्या मंडपात अत्यंत साधे, चवदार भोजनाचे कार्यक्रम त्यांनी घडवून आणले, येणाऱ्या नेत्याने नंतर त्याची आठवण ठेवो अथवा न ठेवो भाऊसाहेबांना कोणाबद्दल कडवटपणा मनात आला नाही. अगदी बोटाला धरून पुढे आणलेली माणसे, ज्यांना बोलायला शिकवले अशी काही माणसं पुढच्या आयुष्यात त्यांचे चांगुलपण विसरल्याचे अनुभव भाऊसाहेबांना आले. त्यामुळे कधी कधी ते विषण्णही झाले. आपल्या मुलांनीदेखील या क्षेत्रात यायचे तर मनापासून काम करण्याची तयारी ठेवावी हे त्यांचे महणणे होते. गॅरेजचा मालक व्हायचे असेल तर साध्या क्लीनरसारखे गाडीच्या खाली आडवे व्हायची लाज वाटायला नको, अंग खराब झाले तरी वाईट वाटायला नको, अशी त्यांची धारणा होती. कारण कामाचे स्वरूप मुळातून समजून घेणे हे महत्वाचे आहे हा त्यांचा दृष्टीकोन होता. आज त्यांची दोन



मुले सार्वजनिक क्षेत्रात यशस्वीपणे वावरत आहेत. थोरले चिरंजीव आता आमदार असले तरी गेली ८ - १० वर्षे नगर जिल्ह्याच्या राजकारणात वावरत होते. आमदार झाल्यानंतर भाऊसाहेबांच्या शिरस्त्याप्रमाणे सतत लोकसंपर्क वाढविण्याचे काम ते करीत आहेत. सार्वजनिक कामातून स्वतःच्या प्रपंचासाठी काही करणे हे निषिध्द मानायचे, भाऊसाहेबांची शिकवण मुलांनी आधीच शिकून घेतली आहे. नंतरचे चिरंजीव राजेंद्र हे अमेरिकेत स्थित असून इंजिनिअर आहेत. धाकटे चंद्रशेखर हे आता कारखान्याची धुरा वाहत आहेत. दोन मुलांना कामाचे वाटप केलेले आहे पण भाऊसाहेब स्वतः ही दोन्ही कामे करून जिल्हा बँकेत कृतीपूर्ण सहभागी असत ही गोष्टच त्यांच्या कामाचा आवाका कसा होता हे दर्शविते. त्यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी विविध पक्षाच्या नेत्यांनी त्यांच्याबद्दल काढलेले गौरवोद्गार अत्यंत महत्वाचे मानायला हवेत. चांगल्या कामासाठी कुणालाही मदत, एवढे साधे तत्व भाऊसाहेबांनी जोपासले.

कारखान्यातील तंत्रज्ञ, कामगार यांच्या कार्याची खरी जाण भाऊसाहेबांना होती. साहेब आपल्याला पूर्ण जाणतात ही गोष्ट परिसरातल्या सर्व संबंधित व्यक्तींना होती यातच त्यांच्या स्वभावाचे व्यापकत्व दिसते.

आमदारांचे अनुभव सांगताना ते आवर्जून ग.प्र.प्रधानांचा उल्लेख करीत. रामभाऊ म्हाळगींनी केलेल्या अभ्यासपूर्ण चर्चेचा उल्लेख करीत. वि.स.पागे यांच्या विद्वत्तेबद्दल आदराने बोलत. बाळासाहेब भारदे तर आपल्याच जिल्ह्याचे. त्यांच्याबद्दल आदरभाव व्यक्त करण्याची कोणतीही संधी ते कधी सोडीत नसत. **बाळासाहेबांसारखी भाषा आणि सर्वस्पर्शी बुध्दी अलीकडच्या काळात कुणापाशी नाही, असे ते म्हणत.** नगर जिल्ह्याचे हे एक भूषण आहे असे सांगत. आवर्जून पुण्यात त्यांना भेटायला जात. दोघेही अफाट प्रवास करणारे एकमेकांना आता जास्त दगदग करू नये असे सांगत तेव्हा गंमत वाटायची. **पुण्यात त्यांचे आणखी एक श्रध्दास्थान म्हणजे नरुभाऊ लिमये हे होते.** त्यांना भेटले म्हणजे ते अगदी मनापासून खूष व्हायचे. पक्ष म्हणून कॉंग्रेस पक्षाची वैचारिक घसरण फार होत आहे. असे मत जवळच्या माणसाजवळ ते बोलून दाखवित अन् या साठीच पक्षापेक्षाही सहकाराकडे त्यांचा कल अधिक होता.

धनंजयराव गाडगीळ यांना अपेक्षित असलेली सहकाराची सर्व मूलतत्वे प्रत्यक्ष आचरणात आणली तर खेड्यापाड्यात आमूलाग्र बदल घडवून आणता येतील, यावर त्यांची श्रध्दा होती. वेदांमध्ये सर्व काही आहे अशा गर्विष्ठ वाटणाऱ्या मानसिकतेच्या जवळ जाणारी त्यांची भूमिका सहकार क्षेत्राबद्दल असायची. मोजके अन परिणामकारक बोलणे हे त्यांचे सूत्र असायचे. पण निवडणुकांचेवेळी एकेका दिवसात २-३ सभा ते गाजवीत. कमरेखाली वार न करता त्यांच्या खास शैलीत विरोधकांतील दोष ते सामान्य माणसासाठी सोपे करून सांगत. आवर्जून तालुक्यातील जमेल तेवढ्या लग्नप्रसंगी ते उपस्थित राहत. एकेका दिवशी अगदी दोन दोन लग्ने लावायला उन्हातून ते जायचे.

वास्तविक ३५-४० वर्षांपुर्वी शस्त्रक्रियेत त्यांचे एक फुफ्फुस काढून टाकले होते. पुढे त्यांना रक्तदाबाचा विकारही जडलेला होता. अगदी अलीकडच्या काळात पित्ताशयाची व प्रोस्टेस्ट ग्रंथी काढण्याच्या दोन

17436

मोठ्या शस्त्रक्रिया झाल्या होत्या. त्यावेळी काही काळापुरते ते अगदी अत्यवस्थ होते. पण या सर्वांवर मात करून ते पुन्हा कामात व्यग्र होत.

माणसावर प्रेम करणे हाच त्यांचा स्वभावधर्म होता. देवगडचे महाराज असोत की सोनईचे महाराज असोत किंवा बाबामहाराज सातारकर असोत, सर्वांपुढे ते नम्रपणाने जायचे. लोक त्यांना मानतात ना मग मी सर्व लोकांपैकी एक नाही का? अशा भावनेने ते सर्वसामान्य माणसांच्या श्रध्दास्थान आणि सामान्यांची गर्दी असलेले स्थळ हेच त्यांच्या लेखी पवित्रस्थळ. त्यांच्या जाण्याने शेवगांव नेवासा परिसरातील एक मितभाषी सुजाण सुसंस्कृत मनमिळावू अन सर्वसमावेशक व्यक्तीमत्व गेले आहे. सार्वजनिक श्रेत्रातल्या त्यांच्या दोन्हीही मुलांवर त्यांच्या व्यक्तिमत्वाचे शिवधनुष्य पेलण्याची फार मोठी जबाबदारी येऊन पडलेली आहे. अन् त्यांना ती पार पाडायची आहे. भाऊसाहेब कुठेही प्रवासाला गेले तरी शेवगांव नेवासा भागात जाण्यासाठी कायम उत्सुक असत. माहेरवाशीणीला माहेराची ओढ असते, तसेच याबाबतीत त्यांचे होते. नगरला किंवा अगदी कारखान्यावर राहण्याचेही ते शक्यतो टाळीत. दहिगांवने त्यांना सर्वांत प्रिय होते. सकाळचे विधी आटोपून घराजवळच्या शेतात सकाळचे ऊन अंगावर घेणे तिथे फेरफटका मारणे त्यांना आवडायचे आणि आता लिफ्ट केली आहेत त्या स्थळावर सूर्यास्ताचे वेळी ते ओढले जात. सूर्यास्ताचा तांबूस रंग गोदावरीच्या पाण्यात उतरला आहे अशावेळी त्या वातावरणाचाच एक भाग बनून जावे हे त्यांना आवडे. **कवी ग्रेस यांच्या कवितेत म्हटल्याप्रमाणे 'बघता बघता सांज प्रवाही अलगद बुडून जावे' ही त्यांची वृत्ती होती.**

आठ जुलैच्या सकाळी असेच ते नेहमी प्रमाणे सकाळची कामे उरकून दहिगावहून शेवगावी गेले. पंढरपूरला जाणाऱ्या दिंडीला त्यांनी निरोप दिला आणि काही कामासाठी पुढच्या गावाकडे रवाना झाले. तिथे लोकांची कामे समजावून घेत असतांना अस्वस्थ वाटते आहे असे ते म्हटले. गाडी पुन्हा वळविण्यात आली सुध्दा, थोडेसे पाणी त्यांनी घेतले. छातीत बारीक दुखले म्हणून कुणीतरी छाती चोळण्याचा प्रयत्न केला पण अगदी पंढरीच्या या वारकऱ्यासाठी खास विमान आले आणि एका फुप्फुसावर जगणाऱ्या या माणसाने शेवटचा श्वास घेतला. **शेवगांव नेवासा परिसराने मात्र जणू प्राणवायूच गमावला !**

✧ ✧ ✧

# सहकारातील कुशल मार्गदर्शक

**श्री.निवृत्ती गणपतराव मोटे पाटील – बडाळा बहिरोबा**

(माजी व्हाईस चेअमन - श्री ज्ञानेश्वर स. सा. का. लि.)

श्री.मारूतराव पाटील आणि मी गेल्या ५० वर्षांपासून राजकारणात आहे. शेवगांव-नेवासा तालुक्या राजकारण, सहकार, समाजकारण, अर्थकारण, जिल्हा परिषद, तालुका पंचायत इ. सर्वच कामात आम्ही खांद्याला खांदा लावून काम केले. श्री ज्ञानेश्वर साखर कारखान्याच्या उभारणीपासून आतापावेतो त्यांच्या नेतृत्वामुळे कारखान्याने जी प्रगतीची मजल मारली आणि उत्पादनाचे विक्रमी उच्चांक प्रस्थापित केले त्या सर्वांचा मी साक्षीदार आहे. कारखान्याचे व्हाईस चेअरमन म्हणून १९९४ ते १९९९ पर्यंत त्यांच्याच सहकार्याने मी कामही पाहिले आहे. त्यांचे कुशल मार्गदर्शन, स्वच्छ प्रशासन याचा लाभ सर्वच उत्पादक शेतकऱ्यांना आजपावेतो होत आला आहे, हे सांगण्यास मला आनंद होत आहे.

पुष्कळ महत्वाच्या कामाचे निर्णय घेतांना आम्हा सर्वच कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन काम उरकण्याची त्यांची हातोटी काही विलक्षणच आहे. अशा परस्परविश्वासामुळेच जिल्हा पातळीवरही त्यांचे नेतृत्व प्रभावी ठरले आहे. त्याच्या राजकीय विचाराला जिल्हा व तालुक्याच्या पातळीची मर्यादा नव्हती. राज्यपातळीवरही त्यांच्या शब्दाला व विचाराला एक आदरयुक्त स्थान आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच आजही 'ज्ञानेश्वर'चा कारभार चालू आहे, ही फार गौरवाची गोष्ट आहे.

✧ ✧ ✧

# मारुतरावजी घुले पाटील सुसंस्कृत सात्विक विचारांचे व्यक्तीमत्व

**आर.एम.जगधने** बी.एसस्सी (ॲग्री)
सेवानिवृत्त कार्यकारी संचालक
सौभाग्य १७६/१ ब सावेडीरोड, अहमदनगर.

सोमवार दिनांक ८/७/२००२ ज्येष्ठ वद्य त्रयोदशी काळा दिवस ! अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून फोन आला की, घुले पाटीलसाहेब गेले. भरवसा बसेना. चार ठिकाणी चौकशी केली. दुःखद बातमी खरी असल्याची खात्री झाल्यावर त्वरीत शेवगांव मार्गे दहिगांवला जाणेचे ठरविले. शेवगांवात पोहोचलो. सर्वत्र शुकशुकाट. सर्व व्यवहार ठप्प. तिथे समजले की, अंत्यविधी कारखान्यावर सायंकाळी ५/६ चे सुमारास होणार आहे. लगेच कारखान्यावर गेलो. तिथे अंत्यविधीची झटपट तयारी चालू होती. साहेबांच्या निधनाची बातमी वाऱ्यासारखी पसरली. त्यामुळे गेस्ट हाऊसचे उत्तरेकडील ५/६ एकरांत पंचक्रोशीत शेवगांव नेवासा तालुक्यातील, जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील अफाट जनसमुदाय लोटला होता.

श्री. अभंग साहेब भेटले. संयम ठेवण्याचा प्रयत्न केला तरी अतिशय दुःखावेगाने रडू कोसळले. साहेब अवेळी गेले असे उदगार निघाले. समोर चित्र पाहून गत कालांतील स्मृती चलत् चित्राप्रमाणे सरकू लागल्या.

**महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अधिवेशन**

आदरणीय साहेब विधान सभेवर १९६२ साली निवडून गेल्यानंतर १९६४ ते १९७२ चे कालावधीत ते जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष असतांना १९६४ साली महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अधिवेशन कै.डॉ. बाबुराव तनपुरे यांचे आग्रहास्तव राहुरी सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर भरविण्यात आले. ते अधिवेशन यशस्वी करण्यात कै.साहेबांचा सिंहाचा वाटा होता. त्यांत कै.विनायकरावजी पाटील प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी यांचीही मोलाची साथ लाभली. राहुरी कारखान्याचा एक अधिकारी म्हणून कामकाज



जवळून पाहाण्याचा योग आला. त्याच वेळी कै.साहेबांच्या भेटण्याचाही वेग आला. तशी बडोद्याकडून नातेसंबंधातील माहिती होती.

**जिल्ह्यातील जादा उसाच्या गळीताचा प्रश्न**

१९६८-६९ साली जिल्ह्यांतील ऊस क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणांत वाढ झाल्याने जिल्ह्यांतील कारखान्याकडून गळीत होणे बिकट झाले. गळीतास ऊस घेतला नाही म्हणून कित्येक ठिकाणी ऊसाला आग लावण्याचे प्रसंग आले. अशा परिस्थितीत शेवगांव नेवासे तालुक्यातील ऊसकरी शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याचे दृष्टीने मा.कै.साहेबांनी व मा.आमदार गडाख साहेबांनी विशेष प्रयत्न केले. व जिल्ह्यांतील साखर कारखाने कार्यक्षमतेकडे थोडे दुर्लक्ष करुन जादा कालावधीपर्यंत चालविणेस व ऊस गळीतास घेणे भाग पाडले.

राहुरी कारखान्याचा शेतकी अधिकारी म्हणून मला शेवगांव तालुक्यातील ऊस गळीतास घेणेचा आदेश कारखान्याकडून मिळाल्यानंतर साहेबांनी ऊसवाल्या शेतकऱ्यांची सभा घेवून ऊस तोडणी प्रोग्रॅमची स्वतः आखणी केली व कारखान्याच्या अधिकाऱ्यांच्या तोडणी कार्यक्रमात ढवळाढवळ न करणेचे बजावले. त्यामुळे ऊस तोडणी प्रोग्रॅम व्यवस्थीत पार पडला. साहेबांनी चांगले काम झाले म्हणून कौतुक केले.

**शेवगांव नेवासा तालुक्यासाठी साखर कारखाना**

ऊसाच्या विल्हेवाटीचा प्रश्न कायम सुटणेसाठी या भागांत साखर कारखाना उभारणे गरजेचे असल्याची जाणीव झाल्याने कै.डॉ. पदमश्री विठ्ठलरावजी विखेपाटील (देशातील पहिल्या साखर कारखान्याचे जनक) यांच्या सहकार्याने माननीय साहेबांनी प्रयत्न केले. नगर जिल्ह्यातील साखर कारखान्यांची असलेली संख्या विचारांत घेता जिल्ह्यात नवीन साखर कारखान्यास परवानगी देवू नये अशा सरकारी धोरणामुळे साखर कारखाना उभारणीचे स्वप्न साकार होणे अवघड होउन बसले. परंतु आदरणीय साहेबांनी चिकाटी न सोडता सरकार दरबारी वजन वापरून, विषयाचे गांभीर्य आपल्या उत्तम व अमोघ वक्तृत्वाने पटवून देणे शक्य झाले. व १९.१०.१९७० रोजी कारखान्यास रजिस्ट्रेशन मिळाले. त्याच सुमारास माळीनगर (अकलूज) कारखान्याने १२५० टनी साखर कारखान्याची ऑर्डर बकाउल्फ (पुणे) कंपनीस दिली होती. परंतु त्यांचा विचार बदलल्याने लायसन्स सदर मशिनरीचा व्यवहार मा.साहेबांनी या भागासाठी केला. कारखाना उभारणीसाठीचे इंडस्ट्रीयल लायसन्स २७.४.१९७३ ला मिळविले व कै.वसंतदादा पाटील यांचे हस्ते ७.८.१९७३ ला मुख्य कारखाना इमारतीची पाया भरणी केली.

आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने अविश्रांत परिश्रम करून साहेबांनी कारखाना उभारणी पूर्ण करून १७.५.१९७५ रोजी त्यावेळचे मुख्यमंत्री मा.शंकररावजी चव्हाण व सहकार मंत्री मा.यशवंतराजी मोहिते



यांचे हस्ते चाचणी हंगामाची सुरूवात केली व जायकवाडी धरणामुळे विस्थापित झालेल्या धरणग्रस्त शेतकऱ्यांचे स्वप्न साकार झाले.

**ज्ञानेश्वर कारखान्यावर सेवेची संधी**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या या पुण्य भूमीत साकारत असलेला साखर कारखारनारूपी महायज्ञ त्यासाठी घुले पाटील साहेबांचे अविरत प्रयत्न कारणीभूत झाले. अशा या महायज्ञांत लहान लहान ऊसकरी शेतकऱ्यांची सेवा करण्याच्या रूपाने दोन समिधा टाकणेचे भाग्य मला लाभले. त्याला केवळ साहेबांचे आशिर्वाद कारणीभूत आहेत. त्यांच्या निवडीला कोणत्याही प्रकारे कमीपण येईल असे काम न केल्याने मला सुमारे एक तप कारखान्याचा कार्यकारी संचालक म्हणून काम पाहाणेची संधी मिळाली. (सप्टेंबर १९७९ ते जून १९९०) व या कालावधीत साहेबांची काम करण्याची पध्दती व अनेक तेजस्वी पैलू दृष्टीपथात आले.

सहकारी साखर कारखाना उभा राहिला म्हणजे त्या भागाचे विकासासाठी एक दालन उभे राहते हे मा.साहेबांना इतर ठिकाणच्या कारखान्याचे अवलोकन केल्यामुळे माहिती होते आणि हे केवळ सहकारामुळेच अशी त्यांची खात्री होती.

पूज्य महात्मा गांधीजींच्या सहकारी चळवळीविषयी वाचतांना आलेले विचार खाली उद्‌धृत करत आहे.

''सहकारी चळवळीचे यश सोसायट्यांची संख्या किती यावरून ठरवायचे नसते तर ते सभासदांच्या नैतिक अधिष्ठानावरून ठरवावयाचे असते, सहकारी चळवळ समाज उभारणीतून राष्ट्र उभारणीसाठी नवचैतन्य निर्माण करण्यासाठी आहे. जेणेकरून आदर्श मानव, आदर्श समाज, आदर्श राष्ट्र निर्माण होईल. मानवा - मानवांत एकमेकांच्या सहाय्याने न्यायनिती, बंधुभाव व स्नेह निर्माण करून आपसातील वर्गविग्रह, तेढ आणि संघर्ष टाळून सुखी जीवन निर्माण होईल.'' .........महात्मा गांधी

मा. साहेबांनी याच विचारानुसार सहकाराच्या माध्यमातून विविध योजना हाती घेतल्या.

**१. धरणग्रस्तासाठी कार्य**

जायकवाडी धरणाची प्राथमिक आखणी पैठणचे पूर्वेस ४० कि.मी. वर होती परंतु त्यांत बदल होवून पैठणच्या पश्चिमेस २ कि.मी. वर धरण बांधणी हाती घेतली. त्यामुळे नगर जिल्ह्यातील धान्याचे कोठार म्हणून प्रसिध्द असलेल्या गंगथडी (गोदावरी) काठची २०-२२ गांवची काळीभोर एका पावसावर भरपूर उत्पन्न देणारी जमीन धरणाचे पाण्याच्या फुगवट्यामध्ये गेली शिल्लक राहिला तो कुसळेही उगवणार नाही असा भाग ! परिणामी सर्व लोक हवालदिल झाले. मा.साहेबांनी यासाठी फार मोठा लढा देवून विरोध



केला. परंतु राष्ट्रीय हित लक्षात घेवून मान तुकवावी लागली. परंतु त्यानंतर काळ्या आईची सेवा करणाऱ्या धरणग्रस्तांसाठी, शेतकऱ्यासाठी साहेबांनी खूप कष्ट घेतले, प्रयत्न केले.

१. पुनर्वसन व्यवस्थित व्हावे म्हणून प्रयत्न.

२. सरकारचा विरोध असता प्रकल्पग्रस्तांसाठी साखर कारखाना निर्मिती.

३. बॅंक वॉटरचे पाणी उचलून घेता यावे म्हणून जिल्हा बॅंके मार्फत संपूर्ण पाण्याखालील सर्व बुडीत गांवांच्या उर्वरित क्षेत्राचा सर्व्हे करून उपसा जलसिंचन योजनेचे प्राथमिक अहवाल तयार केले. त्याचा परिपाक म्हणूनच साधारण १००० एकर क्षेत्राठी एकअशा १४ लिफ्ट योजना चालू केल्या.

४. खानापूर योजनेचे सुमारे (५००० एकराचे) काम हाती घेतले.

५. कारखान्याच्या व बॅंकेच्या माध्यमातून वैयक्तिक व सामुदायिक लिफ्ट उभारणेस सहाय्य केले (सुमारे २५०० एकर)

६. धरणामुळे बुडीत गावठाणासाठी योग्य जागा निवडणे, रस्त्याची शैक्षणिक, आरोग्य या दृष्टीने प्रयत्न करणे याचाच परिपाक म्हणून १९६७ च्या विधानसभेवर आमदार म्हणून साहेबांची मोठ्या मताधिक्याने निवड झाली.

**२. साखर कारखान्याचे माध्यमातून कार्य**

अ) शाश्वत ऊस पुरवठ्यासाठी ऊसास लागणारे योग्य पाणी उपलब्ध व्हावे म्हणून उपसा जलसिंचन योजनांची आखणी.

ब) ऊस विकास योजना - १) रस्ते विकास २) वायरलेस सेट ३) ताजे व सुधारित जातीचे बेणे पुरवठा ४) कंपोस्ट खत प्रकल्प ५) हिरवळीचे खत ६) व्हर्मी कल्चर योजना इत्यादी योजना हाती घेणे.

क) कारखाना विस्तार - ऊसाचे गळीत वेळेत व संपूर्ण व्हावे म्हणून १२५० टी.सी.डी. वाढवत ५००० टी.सी.डी. क्षमतेपर्यंत वाढ.

ड) पुरक उद्योग - आसवनी व त्यावर आधारित उद्योग या व अशा अनेक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष योजना साहेबांच्या विचाराने कार्यान्वित झाल्या. हे सर्व साहेबांचा या भागांतील लोकासाठीचा कळवळा व दूरदृष्टी हे म्हणावी लागेल.



**३. शैक्षणिक विकास**

कारखाना कार्यस्थळावर श्री.मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्था स्थापून बालवाडी, जिल्हा परिषद प्रायमरी शाळा, जिजामाता माध्यमिक व कनिष्ठ विद्यालय, जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय निर्माण केले. त्यामुळे परिसरातील गरीब शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणाचा लाभ घेता येणे शक्य झाले या माध्यमातून चार ते पाच हजारावर विद्यार्थी लाभ घेत आहेत.

हे शिक्षण घेवूनही सर्वांना नोकऱ्या मिळणे अवघड आहे याची जाण ठेवून जिजामाता औद्योगिक प्रशिक्षण केंद्र निर्माण केले व तेथून वेगवेगळे ट्रेड सुरू केले.

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून कृषि पदविका व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व हॉर्टीकल्चर मध्ये तर पदवी परिक्षा कोर्स या केंद्राद्वारे करणे सुविधा आहे. कारखान्याच्या माध्यमातून कार्यक्षेत्रातील शिक्षण संस्थाना काही प्रमाणात अर्थ सहाय्याच्या योजना अवलंबवल्या आहेत.

शिक्षण घेतल्यानंतर तरूणांना स्वतःच्या पायावर आपल्या स्वतःच्या शेतीचे माध्यमातून उभे राहता यावे म्हणून त्यांना मार्गदर्शन व्हावे म्हणून काही योजना कार्य स्थळावर आखण्यात आल्या आहेत.

१. आदर्श फळ बाग योजना
२. रेशीम उद्योग
३. व्हर्मीकल्चर
४. फळे भाजीपाला सोसायटी
५. दुग्धोत्पादक प्रकल्प

याचा फायदा सुशिक्षीत तरूण घेवून आपल्याकडील शेतीच्या आधारावर आपले जीवनमान उंचावण्यासाठी उपयोग करू शकतील.

**४. कामगारांविषयी**

साखर कारखाना चालवितांना ऊस उत्पादकांबरोबरच कामगारांचा सहभाग महत्वाचा आहे. कामगारांची नियुक्ती करतांना शक्यतो कार्यक्षेत्रांतील कामगारांना प्राधान्य देण्याचा मा.घुले साहेबांचा दृष्टीकोन असायचा, तरीही तांत्रिक ज्ञान, शैक्षणिक पात्रता, कामाचा अनुभव इत्यादी बाबी लक्षात घेतल्या जात. या धोरणामुळे कारखाना चालवितांना फार उपयोग झाला. कारखान्यातील कामगार म्हणजे बऱ्याच प्रमाणात सभासदांची मुले. त्यांना कारखान्याच्या कामकाजात आत्मियता राहाते. त्यातून कार्यकुशल माणसे नेमल्याने कारखाना चालविण्यास मदत होवून परिणामी कारखाना कार्यक्षमता चांगली राहते असा साहेबांचा विश्वास होता.



ऊस उत्पादकांप्रमाणेच कामगार हाही महत्वाचा घटक मानून त्यांना योग्य वेतन व चांगली वागणूक दिली पाहिजे तरच त्यांचेकडून उत्तम कामाची अपेक्षा ठेवता येते असा साहेबांचा विश्वास होता व तसे सर्व खाते प्रमुखांना सांगितले जायचे. साहेब कामगारांना योग्य वेतन, बोनस, आवश्यक त्या सर्व अनुषंगिक सोयी सवलती पुरविणेस मागे पुढे पहात नसत. म्हणुनच कामगार युनियन व व्यवस्थापन यांच्यात कधीही संघर्ष झाला नाही हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

खाते प्रमुखाची निवड करताना त्याच्या खात्याच्या कामकाजाविषयी चांगली माहिती असणारा हाताखालील स्टाफ कामगार यांचेवर योग्य नियंत्रण ठेवणारा विश्वासू प्रामाणिक असावा असे साहेबांचे मोजमाप असायचे म्हणूनच कारखान्याचा कारभार उठावदार दिसे.

या अनुषंगाने उदाहरणादाखल सध्याचे कार्यकारी संचालक श्री.एस.एन.थिटे यांचे देता येईल. श्री.थिटे साहेब यांची कारखान्याचे चिफ इंजिनिअर म्हणून १९८४ साली निवड करणेत आली ती वरील पध्दतीने तावून सुलाखून हजर झाल्यानंतर थोड्याच दिवसांत त्यांनी कारखाना विस्तारीकरणाक्ष्या तांत्रिक दृष्ट्या कार्यक्षमता संबंधीच्या योजना सुचविल्या. त्यास मा.साहेबांनी मान्यता दिली. त्याची उपयुक्तता दृष्टोत्पत्तीस आल्यावर काही कालावधी नंतर त्यांना जनरल मॅनेजर म्हणून काम पहाणेस सांगितले. (पदोन्नती वर) मध्यंतरी काही कारणामुळे त्यांनी माळेगांव सह.सा.कारखान्यावर जाणेचा विचार केला अर्थात या बाबतीतही त्यांनी साहेबांचा विचार घेतला होता.

आपल्या कारखान्याचे कामकाजांत काही तरी अडचणी वाटताहेत असे दिसताच श्री.थिटे यांचे बाबत माहिती असल्याने मा.साहेबांनी त्यांना परत बोलावले. दि.१६.५.२००० रोजी रूजू झालेवर त्यांनी ५००० टी सी डी विस्तार वाढ पूर्ण करण्याचे दृष्टीने काम सुरू करणेस सांगीतले बऱ्याच तांत्रिक सुधारणा करून चालू हंगाम २००२ - २००३ चांगल्या तऱ्हेने पूर्ण कॅपॅसिटीने व कार्यक्षमतेने चालत असल्याने अलीकडेच मला पहाणेचा योग आला. मा.साहेबांचा निर्णय कसा योग्य होणार हे यावरून दिसून येते. म्हणूनच साहेबांनी त्यांना कार्यकारी संचालक म्हणून काम पहाणेचे सांगीतले असे म्हटले तर वावगे होणार नाही.

**घुले पाटील साहेबांविषयी माझे विचार**

सहकारी साखर कारखानदारीत मी जवळ जवळ तीन तपे ॲग्री ओव्हरसिअर सारख्या लहान हुद्यापासून ते कार्यकारी संचालक हुद्यापर्यंत काम पाहिले. परंतु मा.घुले पाटील साहेबांचे अधिपत्याखाली साधारण एक तपाची सेवा करतांना त्यांच्यासारखा कुशल प्रशासक प्रथमच पाहावयास मिळाला.

अगोदर सांगितलेप्रमाणे अधिकाऱ्यांची योग्य निवड करून त्याच्या कुवतीनुसार काम देवून कारखान्यासाठी योग्य प्रकारे काम करून घेणे. एकदा तो विश्वासास पात्र आहे अशी खात्री झाली की पूर्ण विश्वास टाकून

त्याला कामाचे स्वातंत्र्य देणे, जो पर्यंत तो योग्य प्रकारे काम करतो आहे तो पर्यंत त्याच्या कामा ढवळाढवळ न करता दुरून नजर ठेवणे, एखाद्यावेळी चुकला तर सुधारणेची संधी देणे, नंतर मात्र दय क्षमा न करणे. साहेबांच्या अशा तऱ्हेच्या दराऱ्यामुळे कामावर तत्पर राहून आपले काम शिस्तीने व प्रामाणिकपणे करण्याची एक सवयच होई. कदाचित बढती, जादा पगार यासाठी ज्ञानेश्वरचा कामगार, अधिकाऱ्यांनी जाहिरातीनुसार प्रयत्न केला तर मुलाखतीत ज्ञानेश्वरचा कामगार अधिकारी म्हणून प्राधान्य दिले जाई हे कशाचे द्योतक ? तर साहेबांनी लावलेल्या शिस्तीचे शिकवणूकीचेच नव्हे काय ?

आदरणीय साहेबांच्या प्रशासकीय धोरणामुळे कामगार, खातेप्रमुख कार्यकारी संचालक इतकेच काय परंतु त्यांचे सहकारी संचालक या सर्वांना साहेबांबद्दल एक आदरपूर्वक दरारा वाटे. अगदी जवळचा प्रेमाचा माणूस असला तरी त्यांचे कडून कारखान्याच्या हितास बाधा येईल असे काही घडले तर साहेब एकदम अस्वस्थ होत.

ज्ञानेश्वरचा कार्यकारी संचालक म्हणून एक तपाची सेवा करतांना साहेबांनी माझेवर अपार प्रेम केले. पूर्ण विश्वास टाकला. अडचणीचे काळात शेतकरी अॅडव्हान्स मागणेस येत. प्रथम संचालक, चेअरमन साहेब यांना भेटून विनंती करीत. अडचण समजून काही प्रमाणात शेतकऱ्यांने दिलेल्या माहीतीनुसार शिफारस केली जायची. त्यावर ऑफिसची योग्य माहिती घेवून नाराज होवून तो साहेबांना भेटे. त्यावर साहेब त्यांना स्पष्ट सांगत की, ''अधिकाऱ्यांनी सांगीतले तेच बरोबर.'' असाही विश्वासाचा प्रकार साहेबांना विश्वासास पात्र राहून तन मनाने सेवा केली. ३०.६.१९९० रोजी सेवानिवृत्ती घेतली.

निवृत्ती स्विकारायच्या विचाराशी आदरणीय साहेब सहमत नव्हते. साहेबांसह कारखान्यांत माझ्या नंतर येणाऱ्या कार्यकारी संचालक (श्री. कसार) यांचे सह राऊंड घेत असत. कारखाना वाढीचे दृष्टीने चर्चेतून माझे काही विचार मी सांगत असता साहेब लगेच म्हणाले, '' मग तुम्हीच रहाता आणखी दोन वर्षे? आम्ही सरकारी परवानगी आणतो.'' केवढा भरवसा ! केवढे प्रेम साहेबांचे, त्याला तोड नाही. मी भारावून गेलो व नम्रतापूर्वक माझा निश्चय सांगितला.

३०.६.१९९० रोजी मोठ्या आदर युक्त भावनेने मी सेवा निवृत्ती स्विकारली. तरीही मा. साहेबांना माझी तज्ञ संचालक म्हणून संचालक मंडळावर सात आठ वर्षे नियुक्ती केली.

माझे विषयी त्यांना वाटणारी आत्मियता प्रेम हे मुद्दाम नमुद करावेसे वाटते की, साहेब सावेडी रोडचे बाजूस आले तर थोडा वेळ गाडी थांबवून माझी चौकशी करत. प्रसंगी चहा कॉफीचा आग्रह केला तर बंगल्यात येत असत ! कारखान्याविषयी चर्चा करत. त्यामुळे मला खूप समाधान वाटे. अगदी अलीकडे कारखान्याचे प्रशासकीय अधिकारी श्री.काकडे साहेब भेटले. मा.साहेबांच्या अचानक जाण्याबद्दल विषय

निघाला तेंव्हा त्यांनी सांगीतलेली हकीगत साखर धंद्याचे अनुषंगाने महत्वाची वाटते. त्यांनी सांगीतलेली हकिगत अशी की, मा साहेबांचा स्वर्गवास दि.८.७.०२ रोजी झाला. तत्पूर्वी मे महिन्याचे शेवटच्या आठवड्याध्मये मा. साहेबांनी सर्व कामगार अधिकरी, यांची संयुक्त सभा बोलावली. भविष्यात साखर धंद्यापुढे येणाऱ्या अडचणीबद्दल विचार मांडले. भारतातील साखर उत्पादन, शिल्लक साखर साठा भारतातील दरडोई खप, दररोज कोसळणारे साखरेचे भाव. उत्पादन खर्चामध्ये झालेली वाढ, दर एकरी / हेक्टरी होणारी ऊस उत्पादनातील तूट व एकूण साखर धंद्यासमोर असलेले भयाण चित्र साहेबांनी उभे केले. जागतिक स्तरावर आपण स्विकारलेली खुली अर्थव्यवस्था संपुर्ण जग ही एकच बाजारपेठ त्यामुळे जागतिक स्पर्धेमध्ये उभा असलेला फाटका तुटका शेतकरी व कामगार यांच्यापुढील समस्या याबाबतील मुद्देसुद विचार मांडले. भविष्याचा अचूक वेध भाषणामध्ये घेवून कामगार या संदर्भात मॅनेजमेंटला काय मदत करू शकेल याबाबत सूचना लिहून पेटीमध्ये टाकण्याचे आवाहन केले. कामगारांनी रोख पगार काही प्रमाणात कमी होवून ठेव स्वरूपात ठेवावा असे आवाहन केले.

अशाप्रकारे मा.साहेबांनी साखर धंद्याचे भविष्य किती अचूक हेरले. हे आजच्या स्थितीवरून दिसून येते. भविष्यात येणारे संकट येण्यापूर्वीच साहेबांनी सर्वांना जागृत केले होते. त्यांच्या नियोजनाच्या कल्पना साकार होण्यापूर्वीच काळाने त्यांना आपल्यातून हिरावून नेले. **एकट्या 'ज्ञानेश्वर'चेच नव्हे तर संपूर्ण साखर जगतातील एक जाणते नेतृत्व गेल्याने आपण सर्व गांगरून गेलो आहोत.**

अशा आर्थिक अडचणीचे वेळी तुम्ही सर्वांना अंशतः सहभाग केला तर काही प्रमाणात ही कामधेनू जगविण्याचा प्रयत्न होवू शकेल. तेव्हा तुम्ही सर्वांनी पगाराच्या १०/२० टक्के कमी घेवून ती कारखान्याकडे ठेव म्हणून ठेवावी व परिस्थितीत सुधारण झाल्यावर ती परत करणे शक्य होणार आहे. तेव्हा त्या दृष्टीने आपण सर्वांनी विचार करून काय ते ठरवा. त्यांनतर थोड्याच दिवसांत साहेबांना काळाने वेढले. पण साखर धंद्याविषयी पुढचा विचार साहेब करत होते हे स्पष्ट होते.

आदरणीय घुले पाटील साहेबांचे बाबत त्यांच्या जवळच्या काही मान्यवरांचे विचार मुद्दाम उद्‌धृत करून माझे साहेबांबाबतचे विचार पूर्ण करतो.

साहेबांचे व्यक्तिमत्व व कर्तृत्व विशाल होते. आचार विचार व उच्चार यांचा त्रिवेणी संगम असलेली ती आकाशगंगा आहे. आकाशाएवढे मोठे आणि गंगेसारखे निर्मळ मन असलेले मारूतरावजी एक सुसंस्कृत सात्विक विचाराचे राजकारणी आहेत.

**आमदार यशवंतराव गडाख – साप्ताहिक नेवासा टाईम्स दिपस्तंभ**

साहेबांचे जीवन म्हणजे तळपत्या सूर्यासारखे तेजोमय भासते तर उगवत्या चंद्रासारखे आल्हाददायी वाटते, गंगेसारखे पवित्र वाटते.

**माजी आमदार पांडुरंग अभंग** – साप्ताहिक नेवासा टाईम्स – दीपस्तंभ

१९७६ साली कार्यस्थळावर आयोजित शेतकरी मेळाव्यास आदरणिय यशवंतरावजी चव्हाणसाहेब आले असता भाषणाचे ओघांत साहेबांबाबत बोलले की, १९६२ साली मारूतराव या तरूणास आमदारकीचे तिकीट दिले. अल्पकाळात हा तरूण जिल्ह्याचा नेता झाला. यशस्वी कारखानदार झाला. श्री. मारूतरावांची दृष्टी म्हणजे ज्ञानेश्वरांसारखी प्रेममय दृष्टी आहे.

या चतुरस्त्र, सर्वांच्या आदरास पात्र असलेल्या आदरणीय साहेबांनी आपल्या उत्तम व अमोघ वक्तृत्वाने समाजाला मंत्रमुग्ध केले. त्यातून नेतृत्वाची धुरा त्यांचे अंगावर पडली व ती पेलत असता आपल्या अंगच्या कर्तृत्वाने यश संपादन केले.

लहानथोर, गरीब, श्रीमंत, वरिष्ठ कनिष्ठ, अशा सर्वांना तसेच विरोधकानांही हवाहवासा वाटणारा लाखाचा पोशिंदा काळाआड गेला.

मा.साहेबांच्या अचानक जाण्याने सर्वांना धक्का बसला आणि त्याचेच प्रतिबिंब अंत्यविधीसाठी अल्पावधीत ५/६ एकर क्षेत्र भरले जाईल इतका समाज जमला होता. परिसरातील, जिल्ह्यातील, राज्यभरातील ज्यांना शक्य झाले असे सर्वजण, मंत्री, नेते, अधिकारी, आबालवृध्द स्त्री पुरूष जमा झाले हे कशाचे द्योतक !

माननीय साहेबांसारखा माणूस होणे नाही !

✧ ✧ ✧



# सत्संस्कारसंपन्न सर्वस्नेही

**श्री. के. वाय्. बनकर पाटील**
पढेगांव

मारूतराव घुले पाटील हे पूर्वाश्रमीचे विश्वनाथ दादाजी बनकर. पढेगांवी त्यांचा जन्म दि.१५-९-१९३० भाग्यवती माता विठाबाई यांचे पोटी झाला. गांवातलं हे सुखवस्तु कुटुंब. भरपूर जमीन जुमला, घरी नोकर चाकर, चौसोपी वाडा, घरी सर्व प्रकारची समृध्दी, रूपयाची पाटीलकी. पिता श्री.दादा पाटील महान देवभक्त. सकाळीच स्नान करून उघड्या अंगाने मारूतीला पाणी घातल्याशिवाय अन्य व्यवहार नाही. थोरले भाऊ आनंदराव उर्फ भाऊसाहेब समाजकारण, गांवकीचा कारभार पहाणारे सुसंस्कृत उमदे व्यक्तिमत्व. त्यानंतर रावसाहेब हे शेतीनिष्ठ शेतकरी. उत्कृष्ट शेती व शेतकरी म्हणून अनेक प्रशस्तिपत्रके मिळालेली. तिसरे अण्णासाहेब हे लहानपणीच निवर्तले. दोन बहिणी सौ.हिराबाई व सौ.छबुताई, सौ.हिराबाई पंढरपुरात देहूकरांच्या घरात व सौ.छबुताई मुसळवाडी येथे धुमाळांच्या घरात दिलेल्या.

अमृतवाहिनी प्रवरेच्या तीरी पढेगांवी विश्वनाथचे प्राथमिक शालेय शिक्षण सातवीपर्यंत झाले. पुढील शिक्षणासाठी थोरले भाऊ भाऊसाहेबांनी त्याला श्रीरामपूरला मॉडर्न हायस्कूलमध्ये पाठविले. त्या काळात त्याची निवास व भोजनाची व्यवस्था शेतकरी मराठा बोर्डिंगमध्ये केली. शालेय जीवनातच असलेली हुशारी, समंजसपणा, मिळुन मिसळुन वागण्याची वृत्ती, खेळांची आवड, सांधिक वृत्ती, सभा संमेलनांमधून वक्तृवस्पर्धात भाग घेणे या गुणांचा विशेष विकास विद्यालयीन शिक्षणकाळात झाला. त्यामुळे शिक्षकप्रिय विद्यार्थी म्हणून त्याची प्रतिष्ठा होती. शाळेत तो सतत प्रथम क्रमांकावरच असे. सुरवातीपासुन त्याचा पिंड नेतृत्वाचा. साने गुरूजी व महात्मा गांधी यांचा त्यांच्यापुढे आदर्श होता. राष्ट्र सेवा दल वसतिगृह शाखेचा संघनायक, वर्गात वर्गप्रमुख, बोर्डिंगमध्ये भोजनप्रमुख, शाळेत विद्यार्थीप्रतिनीधी, अशा विविध अंगानी त्याच्यातील नेतृत्व या गुणचे दर्शन होत होते.

त्याला शिक्षण मध्येच सोडून दहिगांवी घुल्यांच्या घरात दत्तक म्हणून जावे लागले. शालेय व विद्यार्थी जीवनात त्याच्या अंगच्या नेतृत्व व सेवावृत्ती या गुणांचे लोभस दर्शन त्याच्या पुढील जीवनात अंगीकारलेल्या सहकार व राजकारण या क्षेत्रात त्याच्या उत्तुंग व्यक्तिमत्वाला आकार देण्यात झाली.

माझा भाऊबंद वर्गमित्र व सहकारातील मार्गदर्शक म्हणून गेली ६५ वर्षे त्यांचा व माझा ऋणानुबंध आहे. मराठी शाळेत असताना गांवाकाठच्या ओढ्यात सुटीच्या दिवशी गुरे चारणारा, मित्रांबरोबर चिल्या आट्यापाट्या खेळणारा, प्रसंगी भांडाभांडी आणि मारामाऱ्या करणारा माझा मित्र विश्वनाथ शेवगांव नेवासा मतदारसंघात १९६२ व १९६७ विधानसभा व १९७२ ला विधान परिषद यात काँग्रेसचा आमदार होतो. राज्य व राष्ट्रीय पातळीवर प्रश्नांची उकल करून त्यावर उपाय सुचवतो याचे मला राहून राहून आश्चर्य वाटते. वसतिगृहात रहात असतांना प्रसंगी गुळाचा व कधी कधी दूध न मिळाल्यामूळे कोरा चहा पिणारा विश्वनाथ पुढील आयुष्यात महाराष्ट्रातील अग्रेसर अशा श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचा आद्य प्रवर्तक व संस्थापक अध्यक्ष होतो आणि आजतागायत सर्वेसर्वा म्हणून परिसरातील जनसामान्याच्या हृदयसिंहासनावर आरूढ होतो हे पाहून आम्हा पढेगांववासीय बनकर कुटुंबातील या शेंडीफळाचा व त्याच्या कर्तृत्वाचा साऱ्या पढेगांवकरांना सार्थ अभिमान वाटतो.

त्याच्या शालेय जीवनातील एक प्रसंग. गॅदरिंगचे वेळी वक्तृत्वस्पर्धेत तो पहिला. परंतु नाटकात प्रमुख भूमिका करूनही व त्याच्या अभिनयाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊनही बक्षीसांच्या यादीत मात्र त्याला दुसरा क्रमांक दिला गेला. त्यामुळे नाराज झालेला विश्वनाथ निवड समितीशी भांडला. शाळेच्या हेडमास्तरांनी त्याची खूप समजूत काढली. परंतु थोड्याच वेळात त्याला आपण केलेल्या आडदांडपणाचा पश्चाताप झाला आणि झालेल्या चुकीची प्रकट क्षमाही मागितली. शालेय जीवनात जोपासलेल्या या समंजस वृत्ती व निगर्वीपणाचं प्रकटीकरण उत्तरायुष्यातही होत राहिले.

पढेगांवकर पुढे दहिगांवकर झाला तरी त्याची जन्मभूमीची ओढ आहे तशीच राहिली. या ना त्या कारणाने पढेगांवी ते वारंवार येत. बनकर कुटुंबियांशी आणि गांवकऱ्यांशी त्यांच्या स्नेहसंबंधात अल्पसाही परकेपणा त्यांनी येऊ दिला नाही. पढेगांवी काही धार्मिक, सामाजिक, कौटुंबिक वा राष्ट्रीय कार्यक्रमांना मारूतरावांची उपस्थिती गावकऱ्यांना मोलाची वाटे.

काही घटना प्रारब्धाधीन असतात असे म्हणावेसे वाटते. ऐन तारूण्यात दत्तक गेल्यावर मारूतरावांना टी.बी. आजाराने घेरले. नगरच्या बूथ हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर मोठी शस्त्रक्रिया होऊन त्यांच्या तीन फासळ्या काढाव्या लागल्या. ती शारिरिक कमजोरी आयुष्यभर राहिली. दुसरे असे की, मारूतरावांना गृहसौख्य अल्पकाळच लाभले. ऐन तारूण्याच्या मध्यावरच त्यांची धर्मपत्नी सौ.जिजाबाई इहलोक सोडून गेल्या. त्यांच्या सुखी संसारावर हा भयंकर आघाता होता. मुले-मुली अजून लहान होती. सध्याचे श्रीज्ञानेश्वर कारखान्याचे अध्यक्ष श्री.चंद्रशेखर (शेखर भाऊ) त्यावेळी अवघे सहा महिन्याचे होते. आप्तेष्टांनी दुसरे लग्न करण्याचा आग्रह केला. परंतु मुलांच्या भवितव्यासाठी त्यांनी स्वतःच्या सुखावर पाणी सोडले. मुलामुलीच्या मातृत्वाची भूमिका पित्यालाच बजवावी लागली. त्यांनी मुलांना आईचे प्रेम दिले, वाढविले;



उच्च शिक्षित सूज्ञ नागरिक बनविले. त्यांच्यात नेतृत्व गुणाची पेरणी केली. थोरले चिरंजीव नरेंद्र हे आमदार, धाकटे शेखर भाऊ कारखान्याचे चेअरमन आणि मधले चिरंजीव राजेंद्र हे उच्चविद्याविभूषित होऊन अमेरिकेत इंजिनिअर म्हणून कार्यरत आहेत. मुली चांगल्या घराण्यात दिलेल्या असून आपापाल्या प्रपंचात सुस्थिर झालेल्या आहेत.

पढेगांवी सद्यस्थितीत त्यांचे थोरले पुतणे श्री.अच्युतराव हे श्रीरामपूर जिल्हा दूध संघाचे माजी चेअरमन व प्रगतिशील शेतकरी आहेत. अनिलकुमार जिल्हा बँक अधिकारी, विजय लाईफ इन्शुअरन्स प्रतिनिधी, प्रकाश औषध निर्मिती कारखान्यात विक्री प्रतिनीधी. सर्वच सुस्थितीत व सुस्थिर जीवन व्यतीत करताहेत. सौ.हिराबाई या देहूकर घराण्यात (पंढरपूर) आणि सौ.छबूताई धुमाळांच्या घराण्यात (मुसळवाडी) दिलेल्या आहेत. मारूतरावांच्या पश्चात पढेगांवी काळजी करण्यासारखं काहीच नाही.

मारूतरावांचे प्रामुख्याने शेवगांव-नेवासा तालुके जरी कार्यक्षेत्र झाले तरी आपले जन्मगांव तालुका यांचा त्यांना विसर पडलेला नाही. कारखान्याचे कामानिमित्त अनेकदा भेटी घेऊन त्यांचे मार्गदर्शन घेण्याचा योग आला. अशोक स.सा. कारखान्याच्या अडचणींच्या प्रसंगी यंत्रसामुग्रीची मदत त्यांनी केली आहे. राजकारणात त्यांच्या प्रगल्भ विचारसरणीचा फायदा श्रीरामपूर तालुक्याला नेहमीच होत आला आहे. कारखान्याचे अध्यक्ष श्री.बी.के. मुरकुटेसाहेब मारूतरावांच्या विचाराने प्रभावित आहेत. अगदी अलिकडेच दि.२६.६.२००२ रोजी अशोक सहकारी बँकेच्या टाकळीभान शाखेचे उदघाटन मारूतराव पाटलांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्यांनी लोकनेते श्री.मुरकुटे साहेब व अशोक स.सा.कारखाना यांचे तोंड भरून कौतुक केले.

दत्तक विधान झाल्यावर विश्वनाथ दादाजी बनकर यांचे मारूतराव घुले पाटील असे नामकरण झाले आणि लगेचच लग्नाचा घाट घातला गेला. तोपर्यंत मालक शेवगांव परिसरात चांगलेच रूळले होते. दत्तक घराणे मुळातच मालदार, मोठा जमीन जुमला, शेतीवाडी, भव्यवाडे, गोठे, भाऊबंदांचा मोठा जथा, त्यांचेकडे शेती करणारा मजूरवर्ग. त्यामुळे विवाहही त्याच इतमामाने व भव्य दिमाखात व्हावयास पाहिजे ही वरपक्षाची अपेक्षा. बेलापूरगांव येथील बाबासाहेब नाईक जहागीरदार यांनी आपली सुकन्या चि.सौ.कां.जिजाबाई हिचे सालंकृत कन्यादान करून वरपक्षाची अपेक्षा पूर्ण केली. पाहुण्यांची राजेशाही बडदास्त ठेवली गेली.

अशा या शाही विवाह सोहळ्यासाठी दहिगांवहून ३०० बैलगाड्या व घोड्यांचे ५० तांगे यातून वऱ्हाड सवाद्य बेलापूरला आणण्यात आले. पोळ्याला सजवितात तसे गाडीचे बैल व तांग्यांचे घोडे सजविले होते. बहुतेक लोकांच्या डोक्यांवर तांबडे फेटे होते. गाड्या व तांगे यात वऱ्हाडाची व्यवस्था अगदी पूर्ण



होती. वऱ्हाडाच्या बैलगाड्यांची अशी मैलभर रांग हा बघणाऱ्यांच्या कौतुकाचा विषय झाला होता. वाटेत नेवासा, पढेगांव येथे वऱ्हाडाला चहापाणी, जेवण, फराळ तसेच जनावरांना चारा घालून विश्रांतीची व्यवस्थाही केलेली होती. बेलापूरच्या जहागीरदारांच्या घरचे लग्न म्हणून सारे गांव दिमतीला होते. बैलगाडीने आलेल्या वऱ्हाडी मंडळीपुढे सनईचा ताफा उखळी दारूचा दणका यांनी सारे गांव चैतन्याने भारून टाकले. उभय परिवारांच्या आणि बेलापूरकरांच्या कायम स्मरणात राहील असा हा विवाह दोन दिवस संपन्न झाला.

✧ ✧ ✧



# सुसंस्कारित लोकसेवक

**ॲड. श्री.बी.एल्.कुंदे**
श्रीरामपूर

विश्वनाथ दादाजी बनकर माझा वर्गमित्र. पढेगांवी सातवी इयत्तेपर्यंतचे शिक्षण झाल्यावर तो पुढील शिक्षणासाठी श्रीरामपूरला आला. श्रीरामपूर येथे पहिल्यांदाच मॉडर्न हायस्कूल इ.स. १९४५ त सुरु झाले. त्याच साली श्रीरामपूर येथेच शेतकरी मराठा बोर्डिंगही सुरु झाले. आम्ही दोघेही मॉडर्न हायस्कूलचे पहिल्या बॅचचे विद्यार्थी. तसेच बोर्डिंगचेही पहिल्याच बॅचचे.

१९४७ ते १९५२ हा रेशनिंगचा काळ. रेशनिंगवर अमेरिकन मका व मिलो मिळायचा. बोर्डिंग चालवतांना खूप अडचणी यायच्या. मिळणारी मका व मिलो पुरेशी नसत. जवळ दुसरें धान्य घ्यायला पैसे नसत. त्यावेळी यशवंतराव गोविदराव टेकावडे हे बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदत करीत. शेतकरी कुटुंबातला विद्यार्थी शिकून सवरुन पुढे यावा, अशी त्यांना खूप तळमळ असायची. कधी ते धान्याचे पोते आणून देत. कधी कधी पैसेही देत. ही बोर्डिंग चालविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.

लहानपणापासूनच नेतृत्व हा गुण विश्वनाथचे अंगी होता. वर्गात तो मॉनिटर होता व बोर्डिंगमध्ये विद्यार्थीप्रमुख होता. शाळेत वक्तृत्वस्पर्धेत, सांस्कृतिक कार्यक्रमात, नाटकांमध्ये तो भाग घेत असे. त्याला खेळाची आवड असायची. पण प्रत्यक्ष खेळात भाग घेत नसे. वक्तृत्वस्पर्धेत, नाटकात भाग घेतल्यामुळे त्याला अनेक पारितोषिकेही मिळाली. क्रीडास्पर्धांसाठी प्रोत्साहन देण्यात विश्वनाथ सर्वात पुढे असे.

बोर्डिंगच्या व्यवस्थापनात त्याची भूमिका महत्वाची होती. प्राथमिक शालेय जीवन व विद्यालयीन जीवनात आम्ही दोघे एकत्र होतो. त्याची प्रकृति यथातथाच असायची. मात्र इतर सर्वच कार्यक्रमात त्याची आघाडी असायची. पढेगांवी प्राथमिक शाळेत शाळेचे मुख्याध्यापक श्री. रामचंद्र गोविंद ढुमणे गुरुजी आणि मॉडर्न हायस्कूलचे हेड मास्तर श्री. कचरे ह्या दोघा आदर्श शिक्षकांच्या पठडीत त्याची जडण

घडण झाली. त्यांनी घालून दिलेला आदर्शांचा वस्तुपाठ विश्वनाथच्या पुढील जीवनात कायम राहिला. राष्ट्र सेवादल शाखेचे प्रमुखपदी तोच होता.

दहावीपर्यंतचे शिक्षण आटोपल्यावर त्याला पढेगांवी दत्तक जावे लागले. आणि विश्वनाथ दादा बनकर तेव्हापासून मारुतराव शंकरराव घुले बनले. बालपणापासूनच त्यांचे अंगी असणाऱ्या वक्तृत्व, नेतृत्व, सांघीक वृत्ती, धर्मिक विचारांची ओढ व समंजसपणा या गुणांनी मारुतराव पुढील जीवनात खूप मोठे झाले. बालपणीच्या संस्कारांचा प्रकट प्रभाव पुढील कार्याच्या मुळाशी होता.

✧ ✧ ✧



# एक कुशल नेतृत्व

**श्री. सुभाष रा. जोशी**
फिरोदिया हायस्कूल, अहमदनगर

दक्षिणेची काशी समजले जाणाऱ्या पैठणच्या पंचक्रोशीत दधीची ऋषींच्या तपश्चर्येने पावन झालेले दहिगांव या गांवाचा गावगाडा ज्या पाटीलवाड्यातून चालविला जात होता, त्या पाटीलवाड्याचे मालक मारुतराव ! चार दशकांहून अधिक काळ जिल्ह्याचे सामाजिक आणि राजकीय जीवनात आपल्या कर्तृत्वाचं योगदान देणारा हा खानदानी मराठा पूर्वाश्रमीच्या बनकर कुटुंबातला कर्ता पुरूष दहिगांवचा पाटील झाला आणि रयतेच्या कुंडलीत नवपंचम योग आला. ग्रामीण जीवनाचा अभ्यास करून गांवाचा चेहरा मोहरा बदलण्याचा निर्धार केला. जात, धर्म, पंथ या सर्व भिंती ओलांडून शिक्षणप्रसाराची तळमळ बाळगणाऱ्या मालकाने गांवात बोर्डिंग सुरू केलं - बहुजनहिताय बहुजनसुखाय ! इ. स. १९६० मध्ये गांवात माध्यमिक विद्यालय सुरू केलं.

**जे खळांची व्यंकटी सांडो ।**
**तयां सत्कर्मी रति वाढो ।**

या माउलींच्या इच्छेप्रमाणे दुष्टांचा दुष्टपणा आणि सज्जनांचा सुस्तपणा घालविला. साम - दाम - दंड - भेदाचा वापर करून **गांवचा पाटील मालक केव्हा झाला, हें कळलंच नाही.** सहकार, शिक्षण, राजकारण, सांस्कृतिक विकास यांना चालना देऊन संपूर्ण नगर जिल्ह्याचा सहकाराच्या माध्यमातून विकास साधण्याची धडपड सुरू झाली. १९६० पासून मा. ना. यशवंतराव चव्हाणांच्या सामाजिक, राजकीय विचारांचे आपल्या विकासकार्यात अधिष्ठान देणारा एक मुत्सद्दी आणि संयमी राजकारणी म्हणून जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदाची धुरा त्यांचेवर सोपविली गेली. राजकारणाला अध्यात्माची बैठक लाभली तर राजकीय शुचिता कशी निर्माण होते याचे उत्तम उदाहरण म्हणजे मारुतराव ! विचारातील सूज्ञपणा नियोजनातील सुसूत्रता आणि कृतीतील प्रामाणिकपणा ही त्यांच्या समाज आणि राजकारणाची त्रिसूत्री होती.



या त्रिसूत्रीच्याच आधारावर राजकीय पटलावर आलेल्या या नेत्याने जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष, जिल्हा सहकारी बँक अध्यक्ष, श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना अध्यक्ष, विधानसभा, विधानपरिषद सदस्यापर्यंत सर्व पदांवर आपल्या कार्याचा ठसा उमटविला. जो जें वांछील तो तें लाहो असं सामान्य शेतकऱ्यासाठी पसायदान मागणाऱ्या या नेत्याने माळरानावर ज्ञानेश्वर कारखान्याचं इवलंसं रोप लावून त्याचा वेलु गगनावरी नेला. याच कारखान्याने त्यांना उत्तम राष्ट्रीय उत्पादकता, इंदिरा प्रियदर्शिनी, सहकारभूषण आदि सन्मानांनी पुरस्कृत केलं.

परमेश्वराने दिलेलं लोभस व्यक्तिमत्व, कर्तव्यबुद्धीने प्रेरित प्रज्ञा, दीनदलितांविषयी कणव आणि व्यवहारचातुर्य ही गुणसंपदा लाभलेल्या मारुतरावांनी जिल्हायात सहकाराचं नंदनवन फुलवलं. सहकारपंढरीच्या या वारकऱ्याने शेती, सहकार, अर्थशास्त्र आणि उद्योगाचा सखोल अभ्यास केलाच परंतु लोकसमूहातून लोकसंस्कृति निर्माण करण्याचा एक नवा आदर्श राजकारण्यांपुढे मांडला. कोणताही राजकीय नेता जेंव्हा सकारात्मक भूमिकेतून कार्य करतो तेव्हाच तो लोकादरास पात्र ठरतो. याचं उत्तम उदाहरण म्हणजे मारुतराव. शक्ती योग्य मार्गाला लावली म्हणजे त्या शक्तीकडून प्रचंड कामे होऊ शकतात, याची प्रचीती जायकवाडी धरणग्रस्तांचे पुनर्वसन करतांना मारुतरावांनी तत्कालीन राजकीय नेत्यांना करुन दिली. सामर्थ्य हे आंधळे आणि चैतन्यहीन असतें, पण मारुतरावांसारखी बुध्दिमान माणसं त्याचा योग्य उपयोग करुन घेऊ शकली.

ऐन तारुण्यात पत्नीच्या निधनाने मोठ्या कौटुंबिक आपत्तीला त्यांना सामोरे जावे लागलें. लहान मुलांचं संगोपन क़रण्याची, मातृत्वाची व पितृत्वाची अशी दुहेरी जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. **अशा वेळी स्थितप्रज्ञ मारुतरावांनी घरचा संसार सावरीत सावरीत हजारोंच्या संसारांना हातभार लावणाऱ्या सहकारी संस्था निर्माण केल्या.**

ज्ञानमंत्र जेव्हा कार्यप्रवृत्त होतो तेव्हाच तो लोकजीवनाला प्रकाश देऊ शकतो. अंधारात ठेचाळणाऱ्यांना दीपस्तंभ होतो. सकल मंगलाचा वर्षाव करुन समाजकल्याणाची चिंता वहाणाऱ्या मालकाने समाजपरिवर्तनासाठी ईश्वरनिष्ठेची गरज असते हे आपल्या आचरणातून दाखवून दिले. नामसप्ताहाचे आयोजन, गांवातल्या देवळांचं नूतनीकरण, प्रार्थनास्थळांची उभारणी असा सर्वधर्मसमभाव आजीवन आचरला. घरातील कुलधर्म कुलाचार पाळण्यावरही त्यांचा कटाक्ष होता. **लोकमान्यांची देशभक्ती, गांधीजींची साधनशुचिता, पंडितजींची आधुनिकता आणि यशवंतरावजींची चातुर्यता यांचा सुरेख मिलाप त्यांच्या जीवनात झालेला होता.**

✧ ✧ ✧



# आदर्श समाजसेवक : मारुतराव घुले पाटील


**श्री. सुदेश भालेराव,**

सहकार्यवाह,

अहमदनगर एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर


दहिगांव ने येथील श्री. मारुतराव घुले पाटील यांचा मालक या नांवानेच माझा परिचय झाला. आमच्या कुटुंबाचे आणि डॉ. श्री. वि. निसळ व मा. बाळासाहेब भारदे यांचे सलोख्याचे संबंध आहेत. मा. बाळासाहेब भारदे शेवगांवचे. त्यांच्यामुळे श्री. मारुतराव पाटील यांचे संबंध आले. राजकारण व व्यवसाय यातून हे संबंध अधिकच दृढ होत गेले. त्यांच्या सहवासातील किती तरी स्मृती चित्तात कायम स्वरुपी ठाण मांडून बसल्या आहेत.

व्यवसायनिमित्त माझे त्यांच्याकडे सतत जाणे येणे असे. मी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचा सहकार्यवाह झाल्यापासून ते मला सेक्रेटरी म्हणूनच संबोधीत. राजकारणात राहूनदेखील मारुतराव पाटलांचा विविध विषयांचा व्यासंग दांडगा होता, हे त्यांच्या सहवासात राहून त्यांच्याशी चर्चा करतांना वारंवार अनुभवायला मिळत असे. असाच एकदा त्यांच्या श्रीज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्यावर कामानिमित्त गेलो होतो. तेव्हां कारखाना नियोजनाबाबत आपल्या काही सूचना आहेत का म्हणून सहज गमतीने विचारलें. तेव्हा त्यांना अत्यंत धाडसाने एक सूचना केली ती अशी की - आपल्या कारखान्यास माल पुरविणारे अनेक लोक दूरवरुन व वेळेवर येतात. मीटिंग सुरु व्हायला उशीर झाल्यास त्यांना बराच वेळ बसून रहावे लागतें. त्यासाठी अशा वेळेस आपण शक्य झाल्यास एखादी गेस्ट हाउसमधील रुम उघडून दिल्यास त्यांची गैरसोय दूर होईल. त्यांनी तात्काळ सूचना स्वीकारली. आणि तेव्हापासून आमची सर्वांची व्यवस्था झाली वास्तविक कारखान्याला माल पुरविणारे आम्ही विक्रेते आणि कारखाना ग्राहक. परंतु 'बालादपि सुभाषितं ग्राह्यम्' या न्यायानुसार आपल्या एका सहकाऱ्यानें केलेली चांगली सूचना त्यांनी ती स्वीकारली आणि तिची लगेचच अंमलबजावणीही केली गेली. त्यांच्या मनाचा सामान्य माणसाविषयीचा मोठेपणा डोळ्यात भरण्यासारखा आहे.

माझे एक स्नेही श्री. अरुण डावरे यांचे जिल्हा सहकारी बँकेत एक महत्त्वाचे काम होते. त्याबाबत मालकांना बोललो. त्यानंतर सुमारे वर्षभराने आम्ही त्यांना भेटायला गेलो. आम्हाला बघताक्षणीच ते म्हणाले, तुमचें काम लक्षात आहे. तुम्ही श्री. मंत्रीसाहेबांच्या कानावर घाला. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी मा.शेरकर साहेबांकडून ते काम झाल्याचे समजलें. एखाद्या कार्यकर्त्याला दिलेला शब्द आठवण ठेवून पाळणारी राजकारणी माणसे आज खूप दुर्मिळ झालीत. पण समाजातील प्रत्येक घटकाशी सामाजिक बांधिलकीच्या नात्याने काम करणारा मारुतरावांसारखा समाजसेवक एखादाच असतो. याचा पुनःप्रत्यय वारंवार येतो.

श्री. मारुतराव पाटील आणि डॉ.श्री.वि.निसळ म्हणजे राजकारणातील सभ्यता, सुसंस्कृतता, संवेदनशीलता आणि नम्रता यांचा एक आदर्श नमुनाच म्हणावा लागेल. छोट्या मोठ्या प्रसंगांमधून त्यांनी नाती घडविण्याचे आणि जोडण्याचे काम केलें. व्यवसायानिमित्त नेवाश्याच्या पंचक्रोशीत अनेकदा जाण्याचे प्रसंग आले त्या त्या वेळी परिसरातील प्रत्येक खेडूत मालकांनी परिसरात केलेल्या कायापालटाचा आवर्जून उल्लेख करीत असल्याचें दिसले. अगदी सामान्य माणसाच्याही डोळ्यांत मालकांविषयी कृतज्ञतेचा भाव तरळत असलेला आजही दिसत आहे.

ग्रामीण समाजजीवनातलें अर्थशास्त्र त्यांच्या नसानसात जणू भिनले होते. मारुतराव पाटलांनी कारखन्याच्या माध्यमातून कृषिऔद्योगिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली आहे. त्यामुळे समृध्दीच्या पानाफुलांनी इथला भाग बहरुन गेलेला दिसतो. प्रत्येकाच्या मनात परिसराचे वैभव पाहून एकच विचार घर करुन बसलेला आहे -

**झाले बहु, होतील बहु, आहेतही बहु**
**परंतु या सम हा.**

✧ ✧ ✧



# लोकोपकारी नेतृत्व

**पै. मन्सूरभाई पठाण**
दहिगांव

पढेगांवहून दहिगांवी श्री. मारूतराव पाटलांना वयाच्या अठराव्या वर्षी यावे लागलें. येथें शंकरराव पाटलांकडे त्यांचे दत्तकविधान झाले. दत्तकविधानाचा कार्यक्रम यथासांग पार पडला. नंतर त्यांनी गांवचे पोलीस पाटील म्हणून सूत्रे हाती घेतली.

गांवची आर्थिक परिस्थिती तशी चांगलीच होती. मात्र तो काळच असा होता की, सर्वसामान्य माणूस, शेतकरी, मजूर यांच्यात सुरक्षिततेची भावना नव्हती. दररोज रात्री चोरी होऊन घरे फुटत. शेतात पिकविलेल्या धान्याबाबतही असेंच होतें. शेतात सोंगून ठेवलेला शेतमाल, शेतीची औजारें चोरीस जात. श्री. मारूतराव पाटलांनी पाटीलकीची सूत्रे हाती घेतल्यावर पहिल्याच स्वातंत्रदिनी गांवकऱ्यांपुढे ध्वजवंदन झाल्यावर भाषण केलें. त्यांनी सर्वांनाच सुरक्षिततेचे आश्वासन दिले. शेतातली औजारे शेतातच राहू द्या, शेतात सोंगून ठेवलेली पिके शेतातच राहू द्या, त्याला कोणी हात लावला तर ती मी माझी जबाबदारी समजेन. असे त्यांनी समस्त ग्रामस्थांना प्रकट आश्वासन दिले. गांवातील जनमानसात असलेल्या असुरक्षिततेचें त्यांनी सूक्ष्म अवलोकन केले आणि ही असुरक्षितता संपविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपायांवरही गांवच्या दहा पाच जाणत्या माणसांना हाताशी धरून विचार विनिमय केला. श्री. मारूतराव पाटलांनी बन्शी मोरे (नाईक) व दौलत खंडागळे (जागल्या) यांना दोन घोड्या घेऊन दिल्या. गांवात रात्रीची गस्त घालण्याचें काम त्यांच्यावर सोपविले. पाटीलकीची सूत्रे हाती घेतल्यावर सेवेचा श्रीगणेशा असा झाला. त्या वेळेपासून आजपावेतों दहिगांवात व आसपासच्या परिसरात चोऱ्या - माऱ्या, लूटमार इ. झाली नाही. दिलेल्या आश्वासनांची पूर्ति मारूतराव पाटील करतातच याचे सर्व लोकांना प्रत्यंतर आलें.

गांवातच त्यांची बैठकीची एक खोली होती. दररोज पाटील त्या खोलीत येऊन बसत. आजूबाजूच्या भागात होणारी भांडणे, तंटे बखेडे गांवातल्या गावातच मिटविले जावेत म्हणून या बैठकीचा उपयोग



लोकन्यायालय म्हणून सुरू करण्यात आला. मारूतराव पाटील भांडण - तंट्यांची, तंटे - बखेड्यांची नीटशी कारणमीमांसा करीत आणि त्यावर सर्वमान्य तोडगा काढीत. तो दोन्ही पार्ट्यांना मान्य असे. आज लोकन्यायालयांची जी संकल्पना पुढे आली आहे तिचे आद्य प्रवर्तक आमचे पाटीलच आहेत, हे मुद्दाम सांगायला मला खूप आनंद होत आहे. लोकन्यायालयात गावातले भांडण - तंटे इ. मिटविण्याची हातोटी काही विलक्षणच होती. आतापर्यंतही सामाजिक संघर्षावर सर्वमान्य तोडगा काढून त्यांची यथायोग्य अंमलबजावणी होतें की नाही हें पाहण्याचे जिकिरीचे कामही पाटील स्वतः पहात. गांवातले असे वर्षानुवर्षे चाललेले कितीतरी तंटे-बखेडे लोकन्यायालयात निकाली काढले गेले. शासन दरबारी, कोर्ट कचेऱ्यात नाहक हेलपाटे घालावे लागत. या सर्व त्रासातून पाटलांनी अनेकांना मुक्त केले.

आमच्या गांवातील शेख बालूभाई व शेख रसूलभाई माडीवाले हे दोन्ही प्रतिष्ठित मुसलमान घराण्यातले गृहस्थ. (मामा आणि भाचा) या मामा-भाच्यात जमिनीचे कारणावरून १५-२० वर्षे वाद सुरू होता. साहेबांनी या वादावर तोडगा काढून तो वाद मिटविला. दोन्ही पार्टीचे असें मनोमीलन घडवून आणलें की, त्यांच्यात सोईरसंबंधही प्रस्थापित झाले.

शंकरलाल हरिराम राठी व मोतीलाल हिरालाल बोरा यांचा आपसातला जुना वाद कोर्टात गेला होता. पंधरा वीस वर्षे त्यांच्यात तो तसाच धुमसत राहिला. काही केल्या त्यांच्यात तडजोड होत नव्हती. शेवटी तो वाद साहेबांपुढे आणण्यात आला. त्यांच्यात संमान्य तडजोड घडवून आणण्यात साहेब यशस्वी झाले, आणि आणखी एका जुन्या वादावर कायमचा पडदा पडला. लोकन्यायालयात मारूतराव पाटलांच्या शब्दाबाहेर जायला कुणीही धजत नसत. अद्यापही गांवकऱ्यांमध्ये ही भावना आहे तशीच कायम आहे. गांवात आणि शेवगांव-नेवासा परिसरातल्या लोकांत सामंजस्य अखंड राखण्यात मारूतराव पाटलांना कधी कधी खूप मानसिक ताण होई. परंतु मानवतेची सेवा हीच परमेश्वराची सेवा आहे, अशी त्यांची दृढ श्रद्धा असल्याने त्यांना हें ताणतणाव सहन करावेच लागत.

गांवकऱ्यांच्या सोयीसुविधांसाठी जें काही करणे आवश्यक होते अशा सर्व कामात ते सर्वांच्या पुढे असत. कोणत्याही विषयावर शब्दांची रणे माजविण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीवर त्यांचा भर होता. गांवातील विहिरी, बारव, आड यातला गाळ काढण्याचें काम सर्वांच्या श्रमदानातून पूर्ण झाले. अरे, हें काम आपलं सर्वांचं आहे. सर्वांनी मिळूनच ते करायला हवें असे ते आरंभीच सांगून टाकत. आणि सर्वाआधी स्वतःला कामास जुंपून घेत. सगळ्यांना बरोबर घेऊन काम करण्याची, उक्ती आणि कृती यांच्यात मेळ घालण्याची त्यांची हातोटी काही विलक्षण होती. ''मी कर्ता वा नेता नाही, सेवेकरी मात्र निश्चित आहे'' असे ते अट्टाहासाने सांगत.



**राजकीय कर्तृत्व**

गांवपातळीवर आणि तालुका पातळीवरही पाटलांनी चांगलाच जम बसविला होता. त्यांच्या कामाचे जिल्हा पातळीवरही कौतुक होऊ लागले. काँग्रेस पक्षातर्फे विधान सभेसाठी (M.L.A) त्यांना तिकीट दिले गेल्यास त्यांचा संघटनकौशल्याचा पक्षला खूपच फायदा होईल, असं नेत्यांना आणि कार्यकर्तांनाही जाणवू लागले. असेच एकदा त्यांना या कामी गळ घालण्यासाठी आबासाहेब निबांळकर दहिगांवला आले. त्यांनी मारूतराव पाटलांना विनंती केली. तसा आग्रह धरला. प्रथम मारूतराव पाटलांनी निंबाळकरांच्या त्या म्हणण्याला नकार दर्शविला. परंतु शेवटी आबासाहेबांच्या आग्रहाला त्यांना मान देणें भाग पडले. १९६२ च्या विधान सभेसाठी काँग्रेस पक्षातर्फे त्यांना तिकीट मिळाले. आणि शेवगांव-नेवासासाठी लोकप्रतिनिधी (Member of Legislative Assembly) म्हणून ते ११००० मताधिक्यानें निवडून आले. राजकीय क्षेत्रातील त्यांच्या या विजयामळे यशवंतराव चव्हाणसाहेब, शरदरावजी पवार, आबासाहेब निंबाळकर या दिग्गजांशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित झाला.

जायकवाडी प्रकल्प होण्याचे निश्चित झाले. शेवगांव-नेवासा तालुक्यातील गोदावरी काठच्या ६०-७० गांवातील हजारो शेतकऱ्यांवर विस्थापित व्हायची वेळ आली. हजारों लोकांवर बेघर होण्याची आणि बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली. राजहट्टापुढे त्या बिचाऱ्यांचे काय चालणार ? अशा दुर्धर प्रसंगी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन कार्यासाठी शासनदरबारी हेलपाटे मारून कागदपत्रांची पूर्तता इ. करण्यासाठी **आमच्या साहेबांनी अक्षरशः जिवाचे रान केले.** त्यांच्या सेवाकार्याचा सुगंध असाच सदैव दरवळत राहील. साहेबांच्या ऋणातून आम्ही कधीच उतराई होऊ शकणार नाही.

✧ ✧ ✧



# लोकमान्य मारुतरावजी घुले पाटील


**श्री. एम्.टी.लहारे**

अहमदनगर


मारुतराव घुले पाटीलका जन्म १५-९-१९३० मे एक किसान के घर हुआ। बचपन पढेगांव (ता.श्रीरामपूर) मे बीता। उनकी प्राथमिक शिक्षा पढेगांव में तथा हायस्कूल शिक्षा श्रीरामपूर में हुई। वे छात्रनिवास में रहे। विद्यार्थी जीवन में वे खेलकूद में अग्रेसर रहे। वे विद्यार्थियों के नेता थे तथा भाषण कला वृध्दिंगत हुई। बचपन से ही वे शांत स्वभाव के तथा मिलनसार थे।

वे दहिगांव (ने) यहा आए और जनता की सेवा के लिए पुलिस पाटील का सूत्र हाथ में लिया। गरीब छात्रों के लिए छात्रावास शुरु किया। नवजीवन विद्यालय की नींव डाली। महाविद्यालय, तांत्रिक कृषि औद्योगिक शिक्षा का आरंभ किया। सभी जाति के लोगों को साथ लिया और गांव का कारोबार शुरु किया।

उनका कार्य मा.बाळासाहेब भारदे तथा स्व.यशवंतरावजी चव्हाण ने देखा। सन १९६२ ई. में वे शेवगांव नेवासा के काँग्रेस पक्ष के आमदार चुनकर आए। तथा १९६७ ई. मे भी आमदार बने। शांत स्वभाव के घुले पाटील ध्येयपूर्तीसे अपना काम पूरा करते थे। मीठी वाणीसे लोगोंके साथ बातें करते। सोसायटी, बँक, गरीबों के लिए अस्पताल खोले। शेवगांव में जिनिंग प्रेसकी नींव डाली। गरीब लोगोंका ढाढस बँधाते थे। धीरे धीरे वे पूरे जिलेके मालिक बन गए।

ज़ायकवाडी प्रकल्पमें लोगों की खेती सकरकार ने ली। उस वक्त लोगों का धीरज बढाया। लोगों को न्याय प्राप्त कर दिया। बाद में श्रम और प्रतिष्ठा से स्वावलंबन से जीवन जीने के लिए उन्हों ने ज्ञानेश्वर सहाकरी साखर कारखाने की नोंवडाली। लोगों के जीवनमें परिवर्तन आया। कर्मण्येवाधिकारस्ते इस गीता की उक्तीके अनुसार वे अपना काम लगन से करते रहे। इसी की अच्छी सफलता उन्ही को मिली। सन १९८५-८६ इसवी में कारखाने के लिए पहला पुरस्कार प्राप्त हुआ। जिला सहकारी बैंकने उन्हे सहकार भूषण से सम्मानित किया। सन १९९४ ईसवी में इंदिरा गांधी प्रियदर्शिनी तथा सन १९९७ ई. में भारतीय उद्योगरत्न भारत देश की ओरसे पुरस्कार देकर उन्हें सम्मानित किया।



छोटे छोटे देहातों की ओरसे भी उनका ध्यान था। अच्छे रास्ते बनाये तथा वहाँ तक बस की सुविधा उपलब्ध करा दी। सभी लोग उन्हें देवता समझने लगे। उनका व्यक्तिमत्व स्वभाव से ही तेजस्वी था। सभी धर्मो का वे सम्मान करते थे। जाति-पाति का भेदभाव न करते तथा गरीब लोगोंकी तरफ ममता से दृष्टी रखते। वे स्वभावे नम्र और शालीन थे। अपनी सादगी, सरलता, सत्यनिष्ठा, त्याग एवं कर्तव्यनिष्ठा से मारूतरावजी घुले पाटील नें पूरे महाराष्ट्र के जनमानस पर अपनी अमिट छाप छोडी थी। श्री. मारुतराव पाटील के व्यक्तित्व से और कृतित्व से हमें प्रेरणा प्राप्त होती थी। सब कें लिए वे एक आदर्श एक शक्ति, एक संस्था थे। राजनीतिक क्षेत्र में वे एक अच्छे संघटक, अधिक त्याग करनेवाले, कष्ट और यातना झेलनेवाले थे।

उनके व्यक्तित्व में अद्‌भुत प्रभाव था। उनके उद्देश्य पूर्णतः स्पष्ट और संदेह से परे थे। उनके व्यक्तित्व में शक्ति, सामर्थ्य, शांत प्रकृति, दृढ निश्चयी भाव का अद्‌भुत सामर्थ्य था। तथा कार्यमें गतिशीलता निर्माण करने की उन में महान क्षमता थी। महाराष्ट्रके सभी लोगों के प्रति उनके अंतःकरण में अपार सहानुभूती थी। आखिर तक वे काँग्रेस पक्ष के प्रति निष्ठावान रहे। पूरे महाराष्ट्रके नेताओं के साथ कंधे से कंधा लगाकर वफादारी से कार्य किया। इसी लिए सभी लोग सभी नेता उनका सम्मान करते थे। सभी नेता उनको अजातशत्रू मानते थे। सन १९९५ ईसवी में आमदार चुनाव में खडे होने से इन्कार करना उनके आध्यात्मिक प्रवास का निर्णायक चरण था।

मारुतरावजी पाटील का गृहस्थी जीवन सीधा-सादा था। धर्मपत्नी सौ. जिजाबाई के देहान्त के पश्चात् उन्हों नें बच्चों के लिए माँ और पिताजी की भूमिका निभाई। बडे प्यारसे उनका पालन किया। परिवार में वे सदा हसमुख रहते। रिश्तेदारों का भी सम्मान रखते। माताजी की भी उन्हों ने सेवा की उन्हों ने सभी के सामने आदर्श पुत्र आदर्श रखा। उन्हे बहुत सी अच्छी अच्छी किताबें पढने में विशेष रूचि थी। जीवन में संघर्ष करते समय क्रोधित न होकर सभों के दिल कों स्नेह से जितने थे। खेता के तरफ भी उनका ध्यान था। वे एक आदर्श किसान थे। उन का जनसेवा का कार्य आमदार श्री. नरेंद्रजी पाटील और मा. चंद्रशेखरजी पाटील अच्छी तरह से कर रहे हैं। वे अपने पुत्रों के सच्चे पथदर्शक रहें। उनका समय पोते-नाती के साथ अच्छी तरह से बीतता था।

८ जूलै २००२ उसी दिन उन्हों नें सुबह हनुमानजी का दर्शन किया। उस दिन दहिगांव से धार्मिक जुलुस पंढरपूर जानेवाला था तों उन्हों नें भजन सुना। बाद में लोगों का प्रश्न हल करने के लिए शेवगांव गए। लेकिन वहा अचानक दिल का दौरा पडा और वे चल बसे। लोगों के इस माउली के देहनें चिरशांति ली। उनका यशः शरीर बहुत विस्तृत रूप में अमर हो गया। यह लोगों नें तब अनुभव किया जब उनका अर्थी दहिगांव से ज्ञानेश्वर कारखाने की ओर चली। शाम छः बजे से ही लाखों की भीड इकठ्ठी हो गयी



थी। जनता का सागर उमड पडा था। ऐसे महान् दुःख का प्रदर्शन महाराष्ट्र में न भूतो न भविष्यति ऐसा ही था।

उनका जीवन सच्चे कर्मयोगी का जीता-जागता दृष्टान्त था। उन्हों नें जो स्वार्थत्याग, तपस्यां और परोपकार तथा निष्ठा का मार्ग अपनाकर देश के सामने एक ऐसा दुष्टान्त रखा कि जिसनें लाखों लोगों को मार्ग दिखाया। वे एक ऐसे अचल दीपक बने कि उनसे छोटे छोटे अनगिनत दीपक जल गये। वे महान तपस्ती, दृढ विश्वासी और एक महान नेता थे।

घुले पाटील स्वभाव के विनम्र किंतु लक्ष्य के प्रति सजग और निष्ठावान थे। **उनका साहस कभी लडखडाया नही और उनका आशावाद आखिरतक अदम्य रहा।** सभी के साथ मैत्री और ईमानदारी दोनों का निर्वाह वे कुशलतापूर्वक कर ले जाते थे। उनकी ऐसी मानसिक बनावट के कारण उनका राजतीतिक कार्य बहुत कुछ आसान हो गया था। राजनीतिक उलझनों को सुलझाने के सभी गुणों के कारण ही बराबर जिम्मेदारी के कार्यो से घिरे रहे। निर्णय लेने में विवेक और शासकीय दक्षता दोनों का समन्वय उनमें था। इस प्रकार स्व. **मारुतरावजी घुले पाटीलजी का जीवन सभी का प्रेरणास्त्रोत रहेगा। वे सचमुच महात्मा थे।**

✧ ✧ ✧



# मारुतरावजींची अर्धशतकाची मैत्री

**शांतीलाल बोरा**
**माजी चेअरमन, मर्चट बँक, अहमदनगर**

दिवस कसे भराभर निघुन जातात समजत नाही. पढेगावच्या बनकर पाटील कुटुंबातून मारुतराव दहिगांवच्या घुले पाटिल घराण्यात दत्तक म्हणून आले. तेव्हापासूनची आमची मैत्री, मारुतराव लहानपणापासून मुत्सदी, मितभाषी होते. त्यांच्या लग्नाच्या वेळी शंभर बैलगाड्यातून दहिगावचे वऱ्हाड बेलापूरला गेले होते. इतके धुमधडाक्यात झालेले लग्न मी पुन: पाहिले नाही. त्याच्या चावडीवरचे न्यायनिवाडे हेच सामाजिक बांधीलकीचे प्रतिक आहे. दहिगांव व पंचक्रोशीतली भांडणे कधी न्यायालयात गेली नाहीत. मारुतरावांनी गोरगरीब मुलांसाठी गावात बोर्डींग सुरू केले. शासनाच्या मदतीविना ते यशस्वीरित्या चालविले त्यामुळे परिसरातील हजारो गोरगरीब मुले विद्येच्या प्रांगणात येऊ शकली.

सुपारी फोडायला दगड मिळायचा नाही इतकी भारी जमीन जायकवाडी धरणाखाली जाण्याची वेळ आली तेव्हा मारुतरावजींचे हृदय भरून आले. मात्र या धरणासाठी उदात्त भावनेने सहकार्य करण्याची तयारी त्यांनी दाखवली. त्याचवेळी धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी आग्रह धरला, शेवगांव - नेवासे हा परिसर कम्युनिस्टांचा बालेकिल्ला समजला जाई. त्यातच १९६२ मध्ये एरंडगावला गोळीबार झाला. अशा खडतर स्थितील काँग्रेसने मारुतरावांना विधानसभेची उमेदवारी दिली आणि आश्चर्य म्हणजे ते विक्रमी मतांनी विजयी झाले. १९६७ मध्येही विक्रमी मतांनी विजयी झाले. विधानसभेत त्यांनी समर्थपणे काम केले.

महाराष्ट्राचे नेते मा. ना. यशवंतराव यांच्यावर मारुतरावजींचे विलक्षण प्रेम, त्यांच्याच विचाराची विचारधारा मारुतरावच्या प्रवाही वक्तृत्वात व सात्विक व्यक्तीमत्वात जाणवते.

मारुतरावजींच्या पत्नी सौ. जिजाबाईंचे निधन झाले. तो प्रसंग मोठा हृदयद्रावक होता. या घटनेमुळे त्यांच्यावर मोठा परिणाम झाला. तीन मुले व दोन मुली लहान असतांना जिजाबाई देवाघरी



गेल्या मात्र तरुणवय असताना मारुतरावांनी पुर्नविवाहाचा विचार केला नाही. पाचही मुलांचे ते आई बनले व त्यांची सुयोग्य जोपासना करुन त्यांच्यावर त्यांनी सुसंस्कार घडविले.

ज्ञानेश्वर कारख्यान्याची उभारणी चालू असतांना भेंड्याच्या उजाड माळरानावर ते खुर्ची टाकून चोवीस तास कामावर देखरेख करीत. स्वत:च्या घरचे काम चालू असतांना कुणी इतके बारकाईने लक्ष देणार नाही. तितके मारुतरावजींनी त्यावेळी दिले म्हणून कारखाना लवकर उभा राहीला. व्यापारी तत्वाने निर्णय घेऊन काटकसरीने त्यांनी कारभार केला म्हणून कारखान्याचा राज्य व राष्ट्रीय स्तरावर नावलौकीक झाला. अचुक व पारदर्यक निर्णय घेण्याची त्याची क्षासीयत आहे. म्हणुन त्यांना आतबट्ट्याचे व्यवहार कधी आवडत नाहीत.

मारुतरावजींच्या दूरदर्शीपणामुळे ज्ञानेश्वर कारखानयची प्रगती झाली. नगर जिल्हा बँकेचे संचालक व अध्यक्ष म्हणून त्यांनी बँकेला समर्थ नेतृत्व दिले. त्यांच्या सर्वच सेवाकार्यत त्यांच्या वेगळेपणाचा ठसा स्पष्ट उमटलेला दिसत आहे.

✧ ✧ ✧



# अनेक अंगांनी बहरणारे नेतृत्व

**श्री. शेख सर**
माजी मुख्याधपक
नवजीवन विद्यालय, दहिगांवने

विश्वनाथ दादा बनकर हें साहेबांचं मूळ नांव. पढेगांव (ता. श्रीरामपूर) हे त्यांच जन्मगांव. प्राथमिक शिक्षण पढेगांवी झाल्यावर पुढील शिक्षणक्रम श्रीरामपूरच्या मॉडर्न हायस्कूलमध्ये पूर्ण केला. मॅट्रिकचे वर्गात असतानाच दत्तक विधान होऊन १९४९ त त्यांना दहिगांव-ने येथे यावें लागले. श्रीरामपूर येथे विद्यालयीन शिक्षण घेत असता ते शेतकरी बोर्डिंमध्ये रहात. बोर्डिंगची संपूर्ण देखभाल, व्यवस्था तेथे राहाणाऱ्या विद्यार्थ्यांकरवी विश्वनाथ बनकर हा विद्यार्थीप्रिय विद्यार्थीच पाही. शालेय जीवन चालू असतानाच ते काँग्रेस सेवादलात दाखल झाले. त्यामुळे त्यांचे चित्तावर गांधीजी, टिळक, नेहरू यांच्या राजकीय विचाराचा प्रचंड प्रभाव पडला.

विद्यार्थीदशेत त्यांची शरीरप्रकृती अत्यंत नाजूक राही. तशातच आजाराची साथसंगत सुरू झाली. उपचारार्थ पाचगणी येथे वर्ष दीड वर्ष रहावे लागले. पाचगणी येथे उपचारकालात त्यांना बराच निवांतपणा मिळाला. डॉक्टरांनी सक्तीची विश्रांती आवश्यक असल्याचे सुचविले. हे त्यांच्या वृत्तीत न बसणारं होतं. त्यांना ही इष्टापत्ती वाटली. सदर काळात त्यांनी आचार्य विनोबा, पू. साने गुरूजी, महात्मा गांधी, फुले, शाहू, आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, गो. ग. आगरकर, चिपळूणकर, शि. म. परांजपे प्रभृतींच्या समृद्ध साहित्याचा मनमुराद आस्वाद घेतला. रुग्णकालाचा असा सद्‌विनियोग केला गेला. आजारातून पूर्ण बरे होण्यास जवळ जवळ दोन अडीच वर्षांचा काळ गेला.

आजारातून पूर्णपणे बरें झाल्यावर मग पाटील साहेबांनी गांवासाठी काय काय करता येईल अथवा करणे अगत्याचे आहे याकडे लक्ष द्यायला सुरवात केली.

**पहिले काम हाती घेतलें**

गांवात मागील पाच पन्नास वर्षांपासून चालू असलेली भांडणे, तंटे-बखेडे, झगडे, गांवातल्या गांवातच



मिटविता आले तर उभयपक्षी त्या आर्थिक, शारीरिक, मानसिक त्रासातून मुक्त होऊ शकतील, असे मारूतराव पाटलांना वाटलं. कोर्टात चालू असलेल्या केसेस काढून घेण्यात आल्या.

गांवातच पाटलांची बैठकीची एक खोली होती. तिथें पाटील सकाळीच आठ नऊचे दरम्याने येऊन बसत. पाटलांपुढे गांवातील भांडणतंट्यांच्या केसेस येऊ लागल्या. पाटील त्या केसेसवर सखोल विचार करून निर्णय देत. तो निर्णय दोन्ही पार्ट्यांना मान्य असे. पाटलांची ही खोली म्हणजे Judgement Seat of Vikramaditya (विक्रमादित्याचे न्यायसिंहासन) असे. तिथे कितीतरी केसेस हाताळल्या जात आणि हातावेगळ्या केल्या जात.

वाड्यातून बाहेर पडून गांवगाड्याला असा व्यवस्थितपणा देण्याचं पहिलं काम आमच्या मालकांनी सर्वप्रथम हाती घेतलं. मला वाटतं लोकन्यायालयाच्या संकल्पनेची मूहूर्तमेढ दहिगांवातच रोवली गेली असं यथार्थपणे म्हणायला हरकत नसावी.

**ग्रामसुधार आणि सोयी सुविधा**

तसं आमच्या गांवात म्हणावी अशी सुरक्षितता नव्हती. शेतात सोंगून पडलेल्या पिकांच्या चोऱ्या-माऱ्या होत. औजारे चोरीस जात तिकडे मालकांनी लक्ष वळविले. गांवच्या सुरक्षेसाठी दोन जणांची नेमणूक करुन त्यांना गस्तीसाठी दोन घोड्या घेऊन दिल्या. गांवातले रस्ते, पाणी पुरवठा, शांतता, स्थैर्य, एकोपा यात लक्ष घालून बरीचशी कामे श्रमदानातून साकारली. या वेळी त्यांनी ज्या उत्साहाचे दर्शन घडविलें ते अपूर्व असेच म्हणावे लागेल. एक प्रकारचे झपाटलेपण त्यात होतें.

**विविध कार्यकारी सोसायटी**

विविध कार्यकारी सहकारी सोसायटीची स्थापना करण्यात आली. सहकारी सोसायटीच्या माध्यमातून शेतकरी वर्गाच्या आर्थिक शोषणास मोठ्या प्रमाणात पायबंद बसला.

**विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह**

आमच्या गांवी सन १९४१ मध्ये स्थापन झालेले एक वसतिगृह होते. श्री.अनाजपुरे गुरुजी या ध्येयवादी शिक्षकानें ते स्थापन केले होते. १९४९ नंतर त्या वसतिगृहाचं कामकाज मारुतराव पाटील पाहू लागले. त्या काळात शासकीय अनुदान (Government grant) वगैरे मिळत नसे. गांवातील काही उदारधी माणसांच्या मदतीतून त्याचा खर्च भागविला जाई. १९४९ ते १९६० पर्यंत साहेबांनी कामकाज नेटाने चालू ठेवले. नंतर शासकीय अनुदान मिळू लागले. श्री वकीलराव लंघे या वसतिगृहाचे पाच सात वर्षे विद्यार्थी होते. त्या काळात सदर वसतिगृह नेवासा, शेवगांव, पाथर्डीचा काही भाग तसेच पैठणकडील काही भागातील विद्यार्थ्यांचा आधार बनून राहिले.

आतापर्यंत गांवच्या शाळेत प्राथमिक शिक्षणाचीच सोय होती. माध्यामिक शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना परगांवी म्हणजे नगरला जावे. लागे. गांव व परिसरातील विद्यार्थ्यांची गैरसोय व कुचंबणा दूर करण्याच्या उद्देशानें मारूतराव पाटलांनी पुढाकार घेऊन दहिगांवीच 'जनता शिक्षण प्रसाकरक मंडळ' ही विश्वस्त संस्था निर्माण केली. आणि या संस्थेमार्फत नवजीवन विद्यालय सुरू केले. विद्यार्थ्यांची संख्या वाढली. त्यांच्यासाठी सदर विद्यालय अपुरे पडू लागल्याने याच संस्थेंमार्फत भातकुडगांव, मुंगी, हातगांव, लाडजळगांव, देवगांव, आव्हाणे, वडुले या गांवांत विद्यालये सुरू करण्यात आली. श्री ज्ञानेश्वर कारखान्याचा जो शैक्षणिक निधी असतो त्यातून शेवगांव, नेवासा या दोन्ही तालुक्यातील सुमारे २५-३० हायस्कूलसाठी प्रत्येकी रू. ५०,०००/- चे अर्थसाह्य देण्यात आले. हें साह्य देतांना पक्ष, राजकारण, जात-पात, तालुका इत्यादी भेदभावांना दूर ठेवण्यात आले.

जायकवाडी प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या हजारों कुटुंबांतील विद्यार्थ्यांचा शिक्षणावर जो विपरीत परिणाम आणि आघात झाला होता त्याचे शब्दांनी वर्णन करता येणे अशक्यच १९७२ चा कालखंड. त्यावेळी पाटील आमदार होते. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन कार्यानिमित्त मुख्यमंत्री, मंत्री, शासकीय अधिकारी यांच्या अनेकदा सभा होत. त्यातून वरील विषयासंबधी विस्तृत चर्चा होत. नेवाश्यापासून तो थेट कऱ्हेटाकळीपर्यंतच्या परिसराच्या व्यथावेदनांना उजळा मिळे. लोकप्रतिनिधी या नात्याने मारूतराव पाटलांना शासकीय अधिकाऱ्यांसमवेत जावेच लागे. विस्थापितांच्या समस्या निवारण करण्यासाठी शासन दरबारी साहेबांना जी पायपीट करावी लागली, त्यांच्या जिवाची जी ससेहोलपट झाली - आबाळ झाली ती आमच्यासारख्यांना कशी वर्णन करता येईल.?

प्रकल्पग्रस्तांच्या अडीअडचणी समजून घेण्यासाठी मा. ना. श्री. वसंतराव नाईक - मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी एक भव्य शेतकरी मेळावा आयोजित केला होता. विस्थापितांच्या अडचणी आपल्याच समजून साहेबांनी त्या पोटतिडकीने मुख्यमंत्र्यांपुढे जाहीरपणे सांगून टाकले.

✧ ✧ ✧



# लोकसेवाव्रती याज्ञिक

**श्री.पद्माकर रा.जोशी**
दहिगांव-ने.

अजूनही चांगला आठवतो तो प्रसंग. पढेगांवच्या बनकर पाटलांच्या घराण्यातील विश्वनाथ दहिगांवला श्रीमंत शंकरराव घुले पाटलांच्या वाड्यात दत्तक म्हणून आला. तो दत्तक विधान सोहळा अजूनही नजरेसमोर ताजा आहे. त्यावेळी मीहि त्या सोहळ्यात उपस्थित होतो. माझें वडील श्री.सोन्याबापू व चुलते श्री.बाबासाहेब यांनी हें दत्तक विधान केले. या सोहळ्यात पौरोहित्य करण्यासाठी वडिलांच्या जोडीला प्रवरासंगम व पैठण क्षेत्रीचे आणखी अकरा ब्रह्मवृंदही निमंत्रित केले होते.

यानंतर दोन महिन्याच्या काळात मारूतराव पाटलांनी गांवची एकूण परिस्थितीची पाहणी केली. तो रझाकाराचा जमाना होता. १९४२ त बापूसाहेब पाटील निवर्तले. त्यानंतर गांवचा आणि इस्टेटीचा सर्व कारभार बारा वर्षे त्यांच्या दोन्ही माता गं.भा.आक्का व गं.भा.ताई यांनी बापूसाहेबांचे दिवाणजी श्री.विश्वनाथ ठाकर यांचे मदतीने पाहिला. बापूसाहेब अत्यंत सुखभावी, सरळ मनाचे होते. गोरगरिबांना अडीअडचणीचे काळात मदत करण्यात त्यांनी कधी मागे पुढे पाहिले नाही. त्यामुळे ते गरिबांना आधारवड वाटायचे.

गोदावरीच्या पलिकडे मराठवाडा हद्द सुरू होते. तिकडे रझाकारांचा हैदोस सुरू होता. शेतीची औजारे चोरीस जात शेतात सोंगून ठेवलेला माल रातोरात लंपास केला जाई. गांवातही चोऱ्या-माऱ्या, भांडण-तंटे यांचा कहर होता. अशा बिकट परिस्थितीत मारूतराव पाटलांना पाटीलकीचा पदभार मिळाला. गांव आणि परिसर, समाजस्थिती यांची बारीक सारीक माहिती करून घेतली. एकूण परिस्थिती हाताळण्यासाठी काही कार्यकर्त्यांची फळी तयार केली. त्यात लालचंद नारायणदास गांधी, भानुदास रामचंद्र जोशी, बाबू पवार, मन्सूरभाई पठाण, विश्वनाथ ठाकर, यांची एक पंचकमिटी तयार केली त्यांच्या मदतीने गांव, परिसर, वाडी-वस्ती यावरील सर्व चोऱ्यांचा तपास सुरू केला. चोरांना, अपराध्यांना, समाजकंटकांना बैठकीत आणून चांगला चोप दिला. त्यावेळेपासून गांवात चोरी म्हणून झाली नाही. गांवात शांतता नांदायला लागली. साहेबांच्या या कार्याची वार्ता तालुक्यात पोचली. मग पोलीस

अधिकारी, महसूल खाते पाटलांशी विचारविनिमय करू लागले. गांवात व परिसरात सुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले. तेथून पुढे समाजसेवेचा श्रीगणेशा सुरू झाला.

शिवजयंजीच्या मुहूर्तावर गांवात धनिक शेतकऱ्यांकडून धान्य गोळा करून ग्रेन डेपो स्थापन केला. तिथे जमविण्यात आलेले धान्य गोरगरिबांना बिगरव्याजी दिले जात असे. १९५२ मध्ये ग्रामपंचायत स्थापन झाली. वि.का.स.सोसायटीची स्थापना १९५४ मधे झाली. बरेच प्रश्न मार्गी लागले.

तालुक्याचे ठिकाणी वर्षातून एकदा 'पाटील दरबार' भरत असे. तालुक्यातील सर्व गांवचे पाटील, तलाठी, सर्कल, प्रांत अधिकारी, फौजदार इतर सरकारी अधिकारी एकत्र येत. तालुक्यातील एकूण परिस्थितीबाबत पाटलांची भाषणे होत. जेव्हा मारूतराव पाटील आपल्या गांवची माहिती द्यायला उभे राहून भाषण करीत त्यावेळी त्यांच्या भाषणावर टाळ्या पडत असत. तालुका पातळीवर त्यांच्या कामाची चर्चा होई. खरेदी विक्री संघाच्या इमारतीच्या भूमिपूजनप्रसंगी मा. ना. यशवंतरावजींच्या हस्ते भूमीपूजन व्हायचे होते. त्यामुळे मारूतराव पाटलांचें कार्य व संघटन कौशल्य यशवंतरावजींच्या कानावर पडले. त्यांनी मारूतराव पाटलांची तडफ, उमेद, जिद्द, पाहिली आणि मारूतराव पाटलांच्या पाठीवर हात ठेवून ''मारूतराव शेवगांव तालुक्याचं नेतृत्व आता तुम्हीच करा'' असा आशिर्वाद दिला. १९६२ च्या विधानसभेसाठी साहेबांना काँग्रेस पक्षातर्फे उमेदवारी दिली गेली. ते ११००/- मतांनी निवडून आले. नंतर पुढच्या १९६७ ते १९७२ साठीही तेच आमदार झाले.

गोदावरी नदीवर पैठणजवळ जायकवाडी धरणाची घोषणा झाली. दहिगांवी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे अध्यक्षतेखाली शेतकरी परिषद झाली. सदर परिषदेसाठी कॉ.दत्ता देशमुख, ना.शंकरराव चव्हाण, तसेच अनेक तज्ज्ञ इंजिनिअर उपस्थित होते. मारुतराव पाटलांनी या परिषदेपुढे धरणग्रस्तांच्या सविस्तर अडचणी मांडल्या आणि पुनर्वसन कायदा करण्याचा आग्रह धरला. धरणग्रस्तांच्या कमिटीचे ते अध्यक्ष होते. कितीतरी अडचणींचे डोंगर त्यांच्या वाटेत उभे होते. किती तरी आव्हानें उभी होती. त्यांनी निर्धारपूर्वक सर्व धरणग्रस्तांना परिस्थितीतून योग्य मार्ग काढण्याचे आश्वासन दिले. खूप पायपीट करावी लागली. स्वतःकडे लक्ष द्यायला त्यांना वेळच मिळाला नाही.

स्वतःच्या कौटुंबिक जीवनात त्यांना कसलीही ददात नव्हती. सर्व काही संपन्नता होती. त्याच जोडीला परोपकार करण्याची वृत्तीही होती. तीन मुले, दोन मुली असा आटोपशीर संसार. ऐहिक जीवन असे सुसंपन्न व सत्संस्कारांनी अलंकृत होते. सर्व काही भरल्या गोकुळासारखं. पण मध्यंतरीच एक मोठा आघात ओढवला. त्यांच्या पत्नी सौ.जिजाबाई अल्पशा आजाराने देवाघरी निघून गेल्या. अर्ध्यावरती डाव मोडला. 'ईश्वरेच्छा बलीयसी' असे म्हणत त्यांनी तो आघात सहन केला आणि जनसेवेचे व्रत असेच निर्धारपूर्वक पुढे चालू ठेवले.



**सेवाव्रती जिवनयज्ञाची सांगता**

आमचे पाटील सेवाव्रती होते. त्यांचे जीवन हाच एक यज्ञ होता. दि. ८.७.२००२ हा दिवस उजाडला. सकाळीच ते उठले. प्रातर्विधी, स्नान वगैरे आटोपून देवदर्शनासाठी 'नरेंद्र उद्यानात' श्री दत्तदर्शनासाठी गेले. देवदर्शन घेउन शेतावर फेरफटका मारून आले. हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घेतले. दरवर्षी दहिगांवाहून पंढरपूरला आषाढी वारीसाठी पायी दिंडी जाते. या वर्षीही बरीच मंडळी पंढरीस जाण्यासाठी मंदिरासमोर जमली होती. पाटलांनी दिंडीचे दर्शन घेतले. दिंडीत थांबून दोन चार अभंग ऐकले. आणि 'सांगा देवा नमस्कार' असे म्हणून दिंडीला निरोप दिला. नंतर वाड्यात आले. त्या दिवशी त्यांची तब्बेत ठीक नव्हती. रक्तदाबाचा त्रास जाणवू लागला होता. तरीही नित्य नियमानुसार सर्व कार्यक्रम पार पाडले. शेवगांवहून कुठल्याशा गांवी काही कार्यकर्त्याबरोबर कार्यक्रमाला जायचे होते. सकाळपासून प्रकृती अस्वस्थच होती. तरीही तिकडे विशेष लक्ष न देता ते जाण्यासाठी गाडीत बसले. रस्ता खराब होता. त्यांना अधिकच त्रास होऊ लागला. रक्तदाब मर्यादेपलिकडे वाढू लागला होता. ड्रायव्हरने गाडी लगेचच परत शेवगांवकडे वळविली. शेवगांवी नित्यसेवा हॉस्पिटलमध्ये त्यांना दाखल केले. डॉक्टरांनी शर्थ केली. पण ...... डॉक्टरी उपचारांचा काही उपयोग झाला नाही. पाटलांनी राम म्हणत शेवटचा श्वास घेतला आणि सर्व शांत झाले. जीवनयज्ञाची सांगता झाली.

✧ ✧ ✧



# मारूतराव पाटील - एक द्रष्टा राजकारणी

**श्री. बापूसाहेब भोसले**
दहिफळ

साहेबांना मी मला समज आल्यापासून परिचित दहिफळ आणि दहीगांव अगदी जवळ जवळ. त्या पट्यावर कम्युनिस्ट विचारसरणीचा जबरदस्त प्रभाव होता. त्यामुळे आम्ही त्या कम्युनिस्ट पार्टीच्या थोरामोठ्यांच्या सहवासात वावरत होतो. (कॉ. एकनाथराव भागवत, आबासाहेब काकडे) याच भागात त्यांची शिबिरें, चळवळी सतत चालत. म्हणून डाव्या विचारांशी सांगड निर्माण झाली. जायकवाडी धरणाच्या निर्मितीला विरोध करण्यासाठी राज्यातून कम्युनिस्ट पार्टीचे आणि डाव्या चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या मंडळींचा एरंडगांव येथे तळ असायचा. आणि शिक्षणासाठी १९६४ ते ६६ मध्ये मीही एरंडगांवीच होतो. त्या काळात क्रांतिसिंह नाना पाटील, राजाराम बापू सातारकर (कॉम्रेड), कॉ. तुळपुळे, कॉ. पी. बी. कडु पाटील, बापूसाहेब भापकर, दत्ता देशमुख आणि इतर सर्व कॉम्रेड मंडळींनी आगरानांदूरला गोदावरी धरण परिषदेची स्थापना केली. जायकवाडी धरणाच्या भिंतीच्या कामावर सत्याग्रह केले. गोदावरीच्या पट्ट्यात घरंदाजपणाच्या नांवाखाली स्त्रियांसाठी गोषा पद्धत होती. असे असूनही त्या वेळी सदर सत्याग्रहात सुमारे ३०-४० हजार स्त्रियांनी सत्याग्रहात भाग घेतला होता. ही एक ऐतिहासिक घटना होती. या सर्व परिस्थितीत १९६७ साल उजाडले, आणि महाराष्ट्र विधान सभेच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले. या सर्व तापलेल्या परिस्थितीतही शेवगांव - नेवासा मतदार संघात काँग्रेसचे उमेदवार म्हणून श्री. मारूतराव पाटील उभे होते. त्यांना विरोधी उमेदवार म्हणून कम्युनिस्ट पार्टीचे श्री. वकीलराव लंघे पाटील उभे होते. एकंदरीत कम्युनिस्ट पार्टींच्या सर्व बैठका व खाजगी चर्चेत कम्युनिस्ट पार्टीचा उमेदवारच विजयी होणार असा सगळीकडे सूर होता. परंतु दहिगांवच्या पाटलांवर गोदावरीचा पट्टा पक्षनिरपेक्ष प्रेम करतो, असं मला त्या वेळी प्रकर्षानं जाणवलं आणि घुले पाटील त्या वेळीही विजयी झाले. बघता बघता १९७१ साल उजाडले आणि मारूतराव पाटलांच्या मनस्थितीची पुनश्च एकदा जाणीव झाली. १९६२ पासून स्वतःकाँग्रेसचे आमदार, १९६२ पासून जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष असे असूनही All India Congress Committee



` ने जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षांना एक अधिकार दिला होता - ज्या विधानसभा मतदारसंघात उमेदवारीबाबत एकमत होत नाही, त्या मतदार संघात अध्यक्षाने उमेदवाराची निवड करायची होती. तत्क्षणी राहुरीला श्री. रामनाथजी वाघ या तरूण उमेदवाराला संधी दिली गेली. आणि सागरासारखं विशाल ह्यदय असल्यामुळे स्वतःचा मतदार संघ मात्र कुठलाही उमेदवारीचा वाद नसताना जिल्ह्याचं नेतृत्व करील, राज्याचं नेतृत्व करील असा शिष्य हेरून यशवंतराव गडाखांना उमेदवारी दिली गेली. योगायोग असा की, गडाखांच्या उमेदवारीचा पराभव घुले साहेबांना स्वीकारावा लागला. तरीही असं जाणवलं की - न बोलता पुढे चालत राहाणं आणि ठरलेल्या योजनांना आकार देत राहाणं या सद्‌गुणांचा पुन्हा एकदा प्रत्यय आला.

जिल्हा परिषदेच्या निवडणुका तोंडावर होत्या. जिल्ह्यात काँग्रेसचे बरेच उमेदवार पराभूत झाले होते. परंतु विधान सभेचे पराभूत उमेदवार श्री. रामनाथजी वाघ श्री. गडाखसाहेब यांना जिल्हा परिषदेला उभे करून, निवडून आणून, त्यांना जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष करून (१९७१ मधे) विधान सभेचे वेळी आलेले अपयश धुवून काढले. दरम्यानचे काळात मुळा धरणाचें काम पूर्णत्वास आले होते. १९७२ पासून मुळा धरणाचे पाणी शेतीस मिळू लागले होते. तत्पूर्वी १९६८-६९ साली काही घटना घडल्या शेवगांव - नेवासा तालुक्यांत उत्पादित झालेला ऊस शेजारच्या सहकारी साखर कारखाण्यांनी तोडून नेताना जी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची पिळवणूक केली, ती थांबवण्यासाठी मारूतराव पाटलांनी प्रयत्नांची शर्थ केली, पण व्यर्थ. भेटी, चर्चा, विनंत्या कशाचाच काही उपयोग झाला नाही. काही ऊस गळितावाचून शेतात तसाच उभा राहिला. काहींनी स्वतः ऊस तोडून शेताच्या बांधावर टाकला. १९६८,६९,७० साली घडलेल्या या दुर्दैवी घटनांनी मारूतराव पाटील पुरे व्यथित झाले, घायाळ झाले. एका बाजूला जायकवाडी धरणामुळे विस्थापित झालेल्या लोकांचा पुनर्वसनाचा प्रश्न आणि दुसऱ्या बाजूला सहकारी बँक, भूविकास बँक यांच्या माध्यमांतून शेतकऱ्यांना पीक-कर्जे देऊनही शेतात उभा केलेला ऊस तो ही गळितास जाईना. याही परिस्थितीत या दुष्काळी तालुक्यांना, धरणग्रस्तांच्या मुलांना वरदान ठरेल असें धोरण मारूतराव पाटलांनी अवलंबिले. दुहेरी संकटात सापडलेल्या सर्वांसाठी मारूतराव पाटलांच्या सर्वंकष प्रयत्नातून श्री ज्ञानेश्वर कारखान्याला जन्म दिला गेला. Necessity is the mother of invention - गरज ही शोधाची जननी असते. या म्हणीचा प्रत्यय मारूतराव पाटलांनी आणून दिला.

श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, जिल्हा सहकारी बँक, जायगवाडी धरणाच्या बॅक वॉटरवर उभ्या केलेल्या जलसिंचन योजना, शेतकऱ्यांसाठी खाजगी पाईप लाईन योजना, श्री ज्ञानेश्वर कृषिविज्ञान फार्म, दूध शीतकरण केंद्र, विविध शैक्षणिक संस्था - हे सगळं पाहतांना असं जाणवतं की, या प्रत्येक बाबतीत साहेब विशेषज्ञ आहेत. हें सगळं होत असताना कुठलीही नवीन गोष्ट करायची असेल तर ती यापूर्वी कुणी केलेली आहे का ? आणि त्यात तो कितपत यशस्वी झाला हें तपासल्याशिवाय पुढे जायचे नाही, असा त्यांचा दंडक होता.

कृषि औद्योगिक क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्रचे शिल्पकार यशवंतराव चव्हाणसाहेब यांचे खरे वारसदार म्हणून आपल्या साहेबांकडे पाहिले जाते. त्यातील सत्यता प्रकर्षाने जाणवल्यावाचून रहात नाही. राजकीय जीवनाची साम, दाम, दंड, भेद, नीति अशी पाच अंगे सांगितली जातात. ती वापरताना मुत्सद्दी राजकारणी आणि सामाजिकतेचे पूर्ण भान असलेला नेता अशा द्विविध व्यक्तिमत्वांचा सुरेख संगम साहेबांमधे झाला होता.

घुले पाटीलसाहेब विधान परिषद सदस्य (M.L.C.) असताना १९७७ त लोकसभेच्या निवडणुका आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर होत असतां जनता पक्ष नुकताच जन्मास आला होता. एके दिवशी स्वतः आजारी असूनही एका जीपमध्ये ते माझेकडे आले . आणि मला बरोबर घेऊन डॉ. अण्णासाहेब शिंदे यांचे प्रचारार्थ निघाले. ड्रायव्हरची भूमिका मलाच निभावून न्यावी लागली. जीपमध्ये घुले पाटील, मी, बाबासाहेब नरवडे पाटील व विक्रम बुधवंत अशी चारच माणसे होतो. तालुक्याचा प्रचार दौरा चारच दिवसांत पूर्ण केला. अण्णासाहेब प्रचंड मतांनी निवडून आले. आणि शंकरराव चव्हाण हे मुख्यमंत्री पदावरून जाऊन त्या जागी वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. (१९७७) या काळात शेतीसाठीच्या विद्युत् मोटारींचे मीटर्स जाऊन हॉर्स पॉवर पद्धतीनुसार विजेची आकारणी होऊ लागली. जायकवाडी धरणाच्या निर्मितीप्रसंगी काँग्रेसनें दिलेली आश्वासने म्हणजेच कोपरे धरण, ताजनापूर उपसा जलसिंचन योजना, तसेच धरणग्रस्ताचें विविध प्रश्न यावर चळवळीला सुरवात झाली. आणि सुरवात होते न होते तोच वसंतदादा पाटील यांचे सरकार जाऊन मा. शरचंद्रजी पवारसाहेब यांचे नेतृत्त्वाखाली पुलोद (पुरोगामी लोक दल) चे मंत्रिमंडळ अस्तित्वात आले. काँग्रेसच्या दृष्टीने हा संक्रमणाचा काळ होता, तर काँग्रेसचे धुरीण असलेल्या मारूतराव पाटलांसारख्यांसाठी कसोटीचा काळ होता. देशात इंदिराजी गांधी एकीकडे, तर यशवंतराव चव्हाणसाहेब दुसरीकडे. तसेच महाराष्ट्रात चव्हाणसाहेब, वसंतदादा पाटील, शरदराव पवारसाहेब ही त्रयीसुद्धा अत्यंत अवघड वळणावर होती. अशा अस्थिर राजकीय परिस्थीतीत तालुका व जिल्हास्तरावरही सर्वांगीण विकासाच्या कामाची हेळसांड होऊ नये म्हणून घुलेसाहेबांना खूप तारेवरची कसरत करावी लागली. त्यांचा कामाचा आवाका व उरक सामान्य कार्यकर्त्यांच्या आवाक्याबाहेरचा होता.

अशाही विषम परिस्थितीत १९७८ साली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. शरदराव पवारसाहेब यांनी मारूतराव पाटलांना नागपूर येथे भेटीसाठी बोलावून घेतले. ताजनापूर उपसा जलसिंचन योजना, कोपरे धरण, जायकवाडी प्रकल्पामुळे विस्थापितांचे प्रश्न इ. अनेक विषयांवर चर्चा करण्यासाठी नागपूरला गेले. डॉ. नाथ पाउलबुधे हेही बरोबर होते. डॉक्टरांनी प्रवासाला परवानगी नाकारली असताही स्वतःच्या अस्वास्थ्याचें कारण दूर ठेऊन साहेब नागपूरला गेलेच. चर्चेला उपस्थित राहिल्यानंतर मा. मुख्यमंत्र्यांनी ताजनापूर भूमिपूजनाचा निर्णय तिथल्या तिथेच घेतला. चर्चेसाठी समाधानकारक वातावरण नव्हते.



तरीही रागावलेले घुले पाटील मी अद्यापही कधी पाहिले नाहीत. ताजनापूर भूमीपूजन नागपूर अधिवेशन संपल्यानंतर लगेचच झाले. आणि १९७९ त जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका लगेचच लागल्या. १२ पैकी ६ सदस्य (जि.प. २ व पं.स.४) घुले पाटलांच्या नेतृत्वाखाली निवडून आले. तेव्हापासून तालुक्यात असलेल्या सर्व संस्थांच्या मुख्य पदाधिकाऱ्यांना समान संधी लागू करण्यात आली. **घुले पाटील हे सरकारचे मार्गदर्शक आहेत की काय, असे कधी कधी वाटते. त्यांनी द्रष्टेपणाने घेतलेले निर्णय सरकारने त्यानंतर लागू केलेले दिसतात.**

त्यांची प्रयोगशीलता, कल्पकता, संशोधनवृत्ती, प्रत्येक पाऊल उचलतांना त्यावर त्यांनी केलेले सखोल चिंतन या सर्वांच्या मुळाशी असणारें त्यांचे द्रष्टेपण डोळ्यात भरणारे आहे.

✧ ✧ ✧



# मारुतराव घुले पाटील एक सेवावृत्ती नेतृत्व


**अनिलराव दत्तात्रय मते पाटील.**

B.A. Hons. L.L.B.

संचालक-श्री ज्ञानेश्वर सह. सा. का.

गोगलगांव. ता. नेवासा


१९२० मध्ये टिळकांच्या निधनानें भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे एक पर्व संपले. पुढे गांधीयुग सुरू झाले. गांधीयुगात सर्व जहाल-मवाळ एकत्र आले. ब्रिटिश सत्तेविरूद्धचा लढा अधिक तीव्र झाला. ध्येयप्रेरित निस्पृह अशा अनेक नेत्यांच्यामुळे भारत १५ ऑगस्ट १९४७ मध्ये स्वतंत्र झाला. परकीय सत्तेचे जोखड दूर केले गेले. स्वराज्य आले. आता त्या स्वराज्याचे सुराज्य करायचे काम तत्कालीन पं. जवाहरलालजी, महात्मा गांधी, लाला लजपतराय अशा कितीतरी नेत्यांच्या प्रेरणेनें देशभर सुरू झाले. इथली गरिबी, अज्ञान, दुःख, बेरोजगारी, निरक्षरता याविरुद्धचा हा संग्राम आता सुरू ठेवण्यात आला.

महाराष्ट्रातही स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करण्याच्या कामी यशवंतराव चव्हाणांचा आदर्श व नेतृत्व समोर ठेवून पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे, राजाराम बापू पाटील, तात्यासाहेब कोरे, नागनाथ अण्णा, भाऊसाहेब थोरात, मारूतराव घुले पाटील, शंकरराव काळे, शंकरराव मोहिते, शंकरराव कोल्हे अशी ज्ञात-अज्ञात नेते मंडळी पुढे आली. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी यशवंतरावजींनी कृषि औद्योगिक तंत्रज्ञान, पंचायत राज, सहकार चळवळ या माध्यमांची कास धरायला सांगितले. यशवंतरावजींसारख्या महाराष्ट्राच्या द्रष्ट्या नेत्याचे अनुसरण सर्वांनी केले. महाराष्ट्रभर सहकारी संस्थांचे जाळेच विणले गेले. सहकार चळवळ महाराष्ट्रभर फोफावली. तिचे सामर्थ्य सहकारी साखर कारखानदारीच्या माध्यामातून घडलेल्या परिवर्तनातून नेत्रदीपक ठरले.

महाराष्ट्राची सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि आर्थिक अशी सर्वच स्तरावरची महानता सिद्ध झाली ती यशवंतराव चव्हाण साहेबांच्या द्रष्ट्या व क्रांतिकारी नेतृत्वामुळेच. **ही यशवंतनिष्ठा मारूतराव घुले पाटलांचा जीव की प्राण होती.** नगर जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीची साक्ष देण्याला घुले पाटलांचे लोकमान्य नेत्वृत्वच पुरेसे ठरावे असे आहे. ग्रामीण भागातील शेतकरी सावकारशाहीच्या आर्थिक शोषणातून मुक्त व्हावा या उद्देशानेच स्थापन झालेल्या अहमदनगर जि. म. सहकारी बँकेचे ते संस्थापक संचालक होते. बहुजन समाजाविषयीच्या त्यांच्या तीव्र तळमळीतूनच उभा राहिलेल्या श्री ज्ञानेश्वर स.



सा. कारखान्याची संस्थापना त्यांनी केली. शेवगांव-नेवासा परिसराच्या समग्र परिवर्तनाचे ते अग्रदूत होते. त्यांचे प्रथम दर्शन झाले ते एका सभेत त्यांच्या भाषणप्रसंगी श्री. सुदामरावजी मते पाटलांसह मी गेलो होतो. साहेबांची ती अधिकार वाणी, तडफदार नेतृत्व, धाडसी निर्णयक्षमता, निर्णयातील अचूकता, दूरदर्शीपणा व **या सर्व सद्गुणांवर शिरपेच ठरावा असा त्यांचा सेवाभाव !**

लोकनेतृत्व करीत असता त्यांनी स्वतःच्या लौकिक सुखदुःखांकडेही लक्ष दिले नाही. स्वतःचे शरीरस्वास्थ्य दुर्लक्षितच राहून गेले. ऐन उमेदीच्या काळात पत्नी निधनाचा भयंकर आघातही त्यांनी असाच पचवून टाकला होता. कठोर नियतीशी दोन हात करीत त्यांनी राजकीय नेतृत्वाची धुरा सांभाळली. हें सारं करीत असता त्यांची कसोटी पणास लागल्याची दिसते. एरव्ही त्यांच्या मतदारसंघाचा हा भाग कम्युनिस्ट विचारांच्या प्रभावाखाली होता. परंतु अंगच्या संघटनकौशल्यानें त्यांनी असंख्य तरूण कार्यकर्त्यांची काँग्रेसच्या विचारानें एक भक्कम फळी उभी करून एक परिवर्तन घडवून आणले. आणि या परिवर्तनाच्या प्रकाशात परिसराच्या प्रगतीला नवी दिशा दिली.

जायकवाडी धरणाची निर्मिती हा नेवासा-शेवगांवसाठी शाप होता. पण हा शापच वरदान ठरविण्याची किमया साहेबांनी केली. धरणग्रस्तांना त्यांच्या दुस्थितीतून वर काढण्यासाठीच श्री ज्ञानेश्वर कारखान्याची निर्मिती झाली. **हा नवनिर्मितीचा प्रकल्प नगर जिल्ह्यासाठीच नव्हे तर महाराष्ट्रातील सहकारी कारखारदारीचा शिरोभूषण ठरला आहे.**

त्यांनी केलेले राजकीय कार्य पूर्णतया लोकाभिमुख होते. अगदी तळागाळातल्या माणसासही गर्तेतून वर काढण्यासाठी साहेबांनी परिश्रमांची पर्वा केली नाही. त्यांच्या ह्यदयीच्या सेवावृत्तीचे प्रत्यक्ष दर्शन त्यांनी उभे केलेल्या व राबविलेल्या सर्व सहकारी प्रकल्पातून घडून येते. राजकारणात राहूनही सत्तेने धुंद न होता त्यांनी आपली सत्वशीलता कायम राखली. हा त्यांच्या नेतृत्वाचा एक आगळा विशेष जिल्ह्यातील काँग्रेसी पुढाऱ्यांच्या डोळ्यात भरणारा ठरला होता.

साखर कारखाना हा परिसरविकासाचा केंद्रबिंदू असून तदनुषंगाने शाळा, महाविद्यालये, तंत्र शिक्षण, दुग्धविकास प्रकल्प, ज्ञानेश्वर कृषि विज्ञान फार्म, कंपोस्ट खत प्रकल्प, ऊस वाहतूक संस्था, कामगारांसाठी गृहरचना संस्था असे कितीतरी प्रकल्प उभे राहिले. या सर्व विकासप्रकल्पांमुळे मारूतराव पाटलांच्या रूपाने परिसरासाठी **'अजि सोनियाचा दिनु'** उजळला होता, असे म्हटल्यास अतिशयोक्त ठरू नये.

✧ ✧ ✧



# साहेब श्रीकृष्ण - मी सुदामा

**श्री.मोहन मारुती पवार**

दहिगांव ने.

घुले पाटलांच्या घराण्याशी माझा ६०-७० वर्षापासूनचा संबंध आहे. श्री.मारुतराव पाटील दत्तक विधान होऊन इथे आले, त्याआधीपासून मी श्री.बापूसाहेबांच्या (श्री.शंकरराव पाटलांना बापूसाहेब म्हणत) सहवासात आहे. पढेगांवहून मारुतराव पाटील इथे कधी आले, तो वार तिथी नक्की सांगता येणार नाही. परंतु ते १७-१८ वर्षाचे असताना दहिगांवी बापूसाहेबांकडे दत्तक म्हणून आले. बापूसाहेबांना दोन पत्नी होत्या. दोघीही बेलापूरकर जहागीरदारांच्या घरातील असून दोघी सख्ख्या बहिणी होत्या. पैकी एकीला एक मुलगी होती. ती बडोद्याला जगधने घराण्यात दिली होती.

पाटलांच्या घरात श्रीदत्तात्रयाची पूर्वापार उपासना होती. वर्षभरातले दत्तजयंती, गुरूपौर्णिमा इ. उत्सव नित्यनेमाने साजरे करीत असत. गुरूवारचे उपवासाचे व्रत होते. दत्तकृपेनेच आपल्या घरी वैभव नांदत आहे, अशी बापूसाहेबांच्या पत्नींची दृढ श्रध्दा होती. मारुतराव पाटलांचे दत्तक विधान झाल्यावर शंकरराव पाटलांनी गांवाजवळच्या मळ्यात छोटे दत्तमंदीर बांधले. मंदिरात दत्तमूर्तीची शास्त्रानुसाार पूजाअर्चा करून यज्ञयाग करून प्राणप्रतिष्ठा केली. त्यासाठी काशीच्या पंडितांना आणले होते. सगळ्या गांवाला भोजन दिले.

घुले पाटलांच्या घरात (वाड्यात) नेहमी धार्मिक वातावरण राहात होते. दाराशी आलेल्याला दानधर्म केला जाई. वाड्यात देवघरासाठी एक नीटनेटकी जागा होती. तिथे देवघरात दररोज पूजापाठ, नैवद्य, आरती, करीत. दाराशी आलेल्याला किंवा घरी आलेल्या अतिथिला भोजन देऊन तृप्त केल्याशिवाय जेवायचं नाही असा मारुतराव पाटलांच्या दोन्हीही आईचा नियम होता. अगदी पूर्वीपासून धार्मीक कार्यक्रमात कधीच खंड पडला नाही. तसेच पंढरपूरची महिन्याची वारी मोठ्या निष्ठेने चालू होती. तीत कधी खंड पडला नाही.



मारुतराव पाटलांच्या लग्न सोहळ्याची गोष्टही अशीच मजेदार आहे. पढेगांवची मंडळी आणि बेलापूरची जहागीरदार मंडळी या दोन्हीही मालदार असाम्या. मग सोहळ्यात कशाची कमी असणार ? लग्नाची निमंत्रणे गावकरी आणि सर्व सोयऱ्या धायऱ्यांना धाडली. वऱ्हाड बैलगाड्यातून नेण्याचे ठरले. तीनशे बैलगाड्यांना (वऱ्हाडी मंडळीना ऊन लागू नये म्हणून) तट्टे बांधले. लग्नाआधी हे काम एक महिनाभर चालू होते. लग्नाआधी गांवजेवण ३-४ दिवस चालू होते. घरच्या परंपरेनुसार लग्नापूर्वी जागरण गोंधळाचा कार्यक्रमही उरकण्यात आला. वऱ्हाड निघण्याच्या आदल्या दिवशीच वऱ्हाडी मंडळीसाठी भोजन साहित्य भरून सात बैलगाड्या नेवाश्याला पोहोचल्या. श्री मोहन पाटवाले यांच्याकडे दुपारच्या जेवणाची व्यवस्था होती. नंतर दुसऱ्या दिवशी बैलगाड्या वऱ्हाडासह पढेगांवी पोचल्या. बेलापूर येथील केशव गोविंदाच्या मंदिरासमोर सर्व वऱ्हाड आले. त्यांची सवाद्य मिरवणूक काढली. तिथला धार्मिक विधी यथासांग पार पडला. नंतर सायंकाळी लग्नसोहळा अगदी शाही थाटात पार पडला.

लग्नासाठी झाडून सारा दहिगांव गेला होता. त्याच दिवशी गांवात एक कुसारे नावाचा म्हातारा वारला. त्याच्या अंत्ययात्रेला गांवात पुरूष माणूस नव्हता. अशावेळी दहा पाच महिलांनीच त्याचा अंत्यविधी केला. पाटलांच्या घरात मी अगदी पहिल्यापासून सुदाम्यासारखी सेवा केली. कृष्ण गोकुळात होता. सांदीपनी गुरुंच्या आश्रमातही होता. नंतर तो द्वारकेचा राजा झाला. तरीही श्रीकृष्ण सुदाम्याला विसरला नाही. कृष्णाकडून सर्वांना प्रेमच मिळाले. तसे घुले पाटलांनी सर्वांना प्रेमच दिले. मारूतराव पाटील आणि शंकरराव पाटील यांचे वेळेपासून मी त्यांच्या घरात सुदाम्यासारखीच सेवा केली. त्यांचे घरात आणखीही असेच सेवेकरी होते. त्या सर्वांना त्यांनी सांभाळून घेतले. पाटलांच्या घरात माणसांना सांभाळून घ्यायची प्रथा फार पूर्वीपासूनच होती आजही ती आहे.

✧ ✧ ✧



# मार्गदर्शक मालक

**श्री.शिवाजीराव पा.भराट**

हातगांव.

आमचे हातगांव नगर व मराठवाड्याच्या सरहद्दीवरचें गांव. हें आमचं जहागीरदारी वतनाचं गांव. येथून अवघ्या पंधरा किलोमीटर अंतरावर श्रीसंत एकनाथ महाराजांचं प्रतिष्ठान क्षेत्र. गंगथडीच्या मुंगी, कांबी, हातगांव, पिंगेवाडी ही शेवगांव तालुक्यातली गांवे तशी शेवगांवपासून बऱ्याच अंतरावर असणारी. दहिगांवपासूनही जरा दूरच पडणारी हीं गांवे मा.श्री.मारुतराव पाटील यांचे मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांचे जाळे उभे करुन गंगथडीच्या या लहान लहान गांवांनी शेती, सहकार, शिक्षण, इत्यादी विषयात प्रगतीचे बरेच टप्पे पार केले आहेत. मालकांचे अमोलिक मार्गदर्शन व सहकार्य गंगथडीच्या गांवांना सतत लाभत आले आहे.

श्री. मारुतराव पाटलांशी आमच्या कुटुंबाचे आणि घराण्याचेही कौटुंबिक जिव्हाळ्याचे संबध. त्यामुळे त्यांचा एक विशेष जिव्हाळा लाभलेला.

आमच्या गांवची लोकसंख्या सुमारे सहा सात हजाराच्या आसपास. या छोट्याशा गांवात सर्व जाती-धर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत. सर्वांना सहकार-सेवेच्या कार्यात मारुतराव पाटलांनी सामावून घेतले आहे. शेवगांव तालुक्याच्या सरहद्दीवर असलेल्या आमच्या या गावी साहेबांनी ग्रामीण विकासाची गंगा आणून सोडली आहे.

**विकास – कामांची त्रोटक माहिती**

१) हातगांव विकास सोसायटी - स्थापना १८-२-१९११. पूर्वकाळातच स्थापन झालेल्या या संस्थेतील कारभाराकडे पाटलांचे जातीने लक्ष आहे.

२) अहम्दनगर जि.म.स.बँकेची शाखा स्थापना मारुतराव पाटलांच्या शुभ हस्ते दि. २-२-१९७५ रोजी झाली.



३) हत्तेश्वर पाणी पुरवठा सहकारी संस्था मारुतराव पाटील व किसनराव पाटील यांचे सहकारातून स्थापना दि. ८-४-१९८७

४) दहिगांव-ने येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ या शिक्षण प्रसारक मंडळाची एक शाखा आमचे गांवी २५-७-१९९२ रोजी स्थापन झाली. (श्रीरामेश्वरदास विद्यालय हातगांव)

इ.५ ते १० वी पर्यंतच्या शालेय शिक्षणाची व्यवस्था असून ४०० ते ५०० विद्यार्थी माध्यमिक शिक्षणाने लाभान्वित.

विद्यालयाच्या एस्.एस्.सी. च्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम आहे. या विद्यालयातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाकडे आणि विद्यार्थ्यांच्या विकासाकडे पाटलांचे विशेष लक्ष असते. वर्षातून २-४ वेळा तरी त्यांचेकडून प्रत्यक्ष पाहणी केली जाते. त्यांचे या योगदानाबद्दल समस्त गांवकरी त्यांचे ऋणी आहेत.

✧ ✧ ✧

# सेवेची सुरुवात गावापासूनच


## श्री.मारुतराव सू. थोरात गुरुजी

आगर नांदूर

आगर नांदूर हे आमचं ९०० लोकवस्तीचं गांव. दहिगांवपासून अवघ्या पाच मैलांवर. दहिगांव त्यां मानानं शेवगांव तालुक्यातलं एक बऱ्यापैकी मोठं गांव. माझं पाचवी ते सातवी पर्यंतचं प्राथमिक शिक्षण दहिगांवलाच झालं. नंतर माझ्या गांवीच मी शिक्षक म्हणून पंचवीस वर्षे नोकरी केली. नऊशे लोकवस्तीच्या गांवात माझ्या शाळेत हजेरी पटावर विद्यार्थीसंख्या दोनशे पंच्याहत्तर होती. गांवचा शेक्षणिक विकास साधण्यात बरेच यश लाभले होते.

आमच्या या भागात त्यावेळी कम्युनिस्ट पक्षाचं प्राबल्य होतं. श्री.मारुतराव पाटील दहिगांवी १९४९ च्या दरम्यान आले. त्यांनी आल्यावर आठ-दहा महिन्यातच गांवचा कारभार पहाण्यास सुरवात केली. कॉ. एकनाथराव भागवत १९५२ ते ५७ या काळात कम्युनिस्ट पक्षाचे या तालुक्याचे आमदार होते. कम्युनिस्ट विचारांनी भरलेल्या व भारलेल्या लोकांना श्री. मारुतराव पाटलांनी कुशलपणें काँग्रेस पक्षाकडे वळविले. विविध विकास कामांची सुरवात गांवापासूनच केली.

✧ ✧ ✧



# समाजाला देव मानणारा नेता

**श्री.चंद्रभान गणपतराव उंदरे**

ढोरचांदगांव (वय ९५ वर्षे)

आमचा गांव दोन चार हजार लोकवस्तीचा. ढोरा नदीकाठी वसलेला. १९६५ मध्ये जायकवाडी धरण व्हायचे असे जाहीर झाले. गोदावरीकाठची सुमारे ५०-६० गांवे धरणात जाणार हे कळल्याने आम्ही धसका घेतला. चौदा महिन्यात गांवे सोडावी लागतील अशा नोटिसा शासनाने बजावल्या.

मा. वसंतराव नाईक त्यावेळी मुख्यमंत्री होते. त्यांनी दहिगांव-ने येथे शेतकरी मेळावा घेतला. ह्या मेळाव्यात आमचे आमदार श्री. मारुतराव पाटलांनी विचार मांडले -

मुळा धरणामुळे दहिगांव, चांदगांव, आगर बांदूर, देवळणें, घेवरी, कर्जत या गांवांना मुळेचे पाणी मिळून हा भाग बागायती होतोय. (मुळा धरणाच्या लाभक्षेत्रात अशी गांवे होती.) आणि हीच गांवे जायकवाडी धरणात बुडून जातील. या सुपीक व बागायती जमिनी आणि सारें उत्पन्नही बुडुन जाईल.

त्यावेळी मा. मुख्यमंत्र्यांनी निर्वाळा दिला की -

ज्या गांवांना मुळा धरणाच्या पाण्याचा लाभ होतो अशी गांवे या जायकवाडी धरणात जाऊ देणार नाही. असे स्पष्ट व जाहीर आश्वासन देऊनही शेवगांव तालुक्यातली हीं गांवे धरणात गेली.

धरणग्रस्तांना धरणात गेलेल्या जमिनींची नुकसान भरपाई व रक्कम सरकारकडून मिळवून देण्यासाठी आमच्या मारुतराव पाटलांनी आटोकाट प्रयत्न केले. पुनर्वसनाचे कामी त्यांनी मा.जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, सचिवालय या स्तरांवर प्रयत्नांची पराकाष्टा केली. आमच्यासारख्या धरणग्रस्तांना आमची मूळ गांवे सोडून नवीन गांवी वस्ती करावी लागली. जननी आणि जन्मभूमी स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ आहेत. असे असूनही आमच्या कडून त्या हिरावून घेतल्या गेल्या. त्या वेळी आम्हाला आमच्या डोळ्यातले पाणी आवरतां आले नाही. अशा जिकिरीच्या प्रसंगी आमच्या भावनांशी समरस होऊन मारुतराव पाटलांनी जी आपुलकी दाखविली ती सर्वथा विसरता येणे अशक्यच.



प्रत्येक धरणग्रस्त कुटुंबाला प्लॉट, प्लॉटवर घरें बांधण्यासाठी कर्ज मिळवून दिलें. नवीन गांवठाणांची निर्मिती करुन पुनर्वसनासाठी सामाजिक व शासकिय पातळीवर सर्व साहाय्य केले सर्वांना कमांडच्या जमिनी मिळवून दिल्या. नवीन गांवठाणावर घरें, रस्ते, शाळा, मंदिर, पाणीपुरवठा इ.सर्व सुविधा देण्यासाठी मालकांनी हाडाची काडे केली. धरणग्रस्त मग तो कोणत्याही जातीचा, धर्माचा, वयाचा किंवा तो गरीब वा श्रीमंत असो, सर्वांची गाऱ्हाणी ते सारख्याच कळवळ्याने ऐकून घेत. त्यांचा जिव्हाळा सर्वांसाठी सारखाच होता.

आणि मला हे सांगायला अभिमान वाटतो की, मारुतराव पाटील आजही आम्हाला विसरले नाही. वर्षातून निदान दोन तीन वेळा तरी पुनर्वसित गांवात जाऊन ते आमच्या सुखदुःखांची विचारपुस करतात. दीन, दुःखी, पीडित अशांसाठी त्यांचा सरळ, मनमोकळा भाव, उच्च विचार असणारा त्यांच्यासारखा लोकनेता पुन्हा होणे नाही. दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करण्याच्या वृत्तीनें त्यांनी केलेली समाजसेवा व त्यांच्या ऋणातून आम्ही कधीच उतराई होणार नाही.

✧ ✧ ✧



# धरणग्रस्तांचा त्राता

## श्री. दगडू पाटील उभेदळ

जायकवाडी धरणाची निवडलेली जागा धरणासाठी योग्य आहे की नाही, ही पाहाणी करण्यासाठी चाफेकर, दुधाणे या इंजिनिअरांना समवेत घेऊन श्री. वकीलराव लंघे पाटील श्रीराम पाटील थोरात (आगर नांदूर) मी , आणखी दोन चार कार्यकर्ते, तसेच श्री. पी. बी. कडू पाटील, श्री. दत्ता देशमुख आणि आमचे आमदार श्री. मारूतराव पाटील अशी सर्व मंडळी निघालो. आम्ही गोदावरी काठच्या बीड जिल्ह्यातील रामपुरी ते वैजापूर अशा संपूर्ण गांवांची पहाणी केली. सदर पहाणीला आम्हाला तब्बल बारा तास लागले. या कामी श्री. चाफेकर, श्री. दुधाणे या तज्ज्ञ इंजिनिअर्सना मा. श्री. मारूतराव पाटलांनी खास आमंत्रित केले होते. सध्याच्या जायकवाडी धरणाच्या जागेबाबत त्यांचा निर्णय काय आहे, याची साहेबांनी विचारपूर्वक छाननी केली. श्री. वकीलराव लंघे पाटील, श्री. श्रीराम पाटील, श्री. पी. बी. कडू पाटील, श्री. दत्ता देशमुख, मी आणि बरोबरच्या अभ्यासू कार्यकर्त्यानी मुळा डॅमवरच रात्रौ जेवणानंतर जागा पाहणीच्या निष्कर्षावर खूप वेळ चर्चा केली. त्यानंतर ते दोघे इंजिनिअर्स व श्री. दत्ता देशमुख पुण्याला गेले. श्री. मारूतराव पाटील, रामराव पा. थोरात श्रीराम पाटील व मी असे चौघेजण रात्री दोनचे सुमारास परत दहिगांवी येण्यास निघालो. गाडीत चालकासह आम्ही चौघे असे पाचच होतो. दिवसभराच्या प्रवासाने चालक थकून गेला होता. कशी कुणास ठाऊक, गाडी रस्त्यालगतच्या खडीच्या ढिगाऱ्यावर गेली. मारूतराव पाटील मोठ्याने ओरडले आणि ड्रायव्हरला गाडी थांबवण्यास सांगितले. त्यांनी ड्रायव्हरला गाडीत मागच्या बाजूस बसण्यास सांगितले आणि स्वतःच गाडी चालवू लागले. रात्रौ ३-३० ला दहिगांवी सुखरूप पोहोचलो. मोठा अपघात टळला.

१९६९ मध्ये आमच्या आठ दहा गांवातील सुमारे दीडशें कार्यकर्त्यांना मारुतराव पाटलांनी मुंबईस नेले. धरणग्रस्तांच्या अनेक प्रश्नांना सरकारपुढे मांडण्यासाठी हे डेप्युटेशन होते. त्यावेळी मा.ना. शंकरराव चव्हाण हे महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री होते. शेवगांव तालुक्यातील गोदावरी काठच्या (धरणात



गेलेल्या) जमिनी, जमिनीचा कस, जमिनीमधील ज्वारी, हरबरा, गहू यांचे प्रचंड उत्पन्न याबाबत शासनापुढे सांगोपांग चर्चा झाली. आम्ही काही कार्यकर्त्यांनी हरबऱ्याचा टहाळ दोन चार पोत्यात भरून नेला होता. तो हरभरा चार फूट उंच वाढला होता. धरणात नेवासा - शेवगांवच्या गोदाकाठच्या जमिनी गेल्याने शेतकऱ्यांचे केवढे आर्थिक नुकसान होईल याकडे मारुतराव पाटलांनी परोपरीने शासनाचे लक्ष वेधले. ज्यात अनेकांचे हित आहे अशा गोष्टी करतांना काहींनी त्यागाची तयारी ठेवली पाहिजे, असे शासनाचे म्हणणे होते. राजहट्टापुढे काही मात्रा लागू पडेना आणि बीड जिल्ह्यातील रामपुरीजवळ असलेल्या जायकवाडी येथील नियोजित धरण पैठणजवळील जायकवाडी येथेच करण्याचे निश्चित झाले.

धरणाच्या बांधकामास १९७० मध्ये सुरवात झाली धरणामुळे विस्थापित झालेल्याचे पुनर्वसनाचे कार्य सुरू झाले. शासनातर्फे संपादित केलेल्या जमिनीसाठी शेतकऱ्यांना एकरी ८०० ते १२०० रुपयांप्रमाणे पेमेंट करतानाही त्याचे दोन हप्ते केले गेले. वाडवडिलांच्या वारशावर आम्हाला आमच्या डोळ्यांदेखत पाणी सोडावे लागले. विस्थापितांच्या करूण कहाण्या कितीही सांगितल्या तरी त्या संपणार नाहीत. आज पाच पंचवीस वर्षे पुनर्वसनाचे काम चालू आहे. अजूनही ते पूर्ण होऊ शकले नाही.

शासन दरबारी आमची गाऱ्हाणी नेऊन पोचवितांना **अक्षरशः आमच्या मालकांच्या पायाचे तुकडे पडले.** जिवाचे रान त्यांनी केले. आमच्या व्यथा वेदनांनी तेही विव्हल झाले. लोकप्रतिनीधी या नात्याने त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. धरणात गेलेल्या जमिनी, शासनातर्फे दिली गेलेली नुकसान भरपाई, पुनर्वसनासाठी दिली गेलेली गांवठाणे, धरणग्रस्तांचा अडीअडचणी या सर्वांचा मेळ घालून शासनविरोधी दावे दाखल करण्यासाठी नासिक येथील कुंडलीक कंपनी कडे ते काम सोपविण्यात आले. यासाठी मारुतराव पाटलांनी शेवगांव तालुक्यातील खिर्डी या गांवी धरणग्रस्तांच्या एक प्रचंड मेळावा आयोजित केला. या सर्व गोष्टीसाठी आमच्या मालकांनी अहोरात्र जे परिश्रम घेतले, त्याला खरोखर तोड नाही.

✧ ✧ ✧



# सर्वसामान्यांचे नेतृत्व

## श्री. विश्वनाथ सूर्यभान उंदरे

ढोरचांदगांव

आमचे गांव दहिगांवाच्या शिवेला लागूनच आहे. जायकवाडी धरण होण्याआधीपासूनही आमचे आणि घुले घराण्याचे कैक पिढयांपासूनचे स्नेहसंबध आहेत. आज आमचं गांव धरणात गेलं. आम्ही आयुष्यातून उठलो. आमच्यासारखी हजारों कुटुंबे प्रकल्पामुळे प्रभावित होऊन अनेक आपत्तींच्या आगीत अक्षरशः होरपळून निघाली. अशा आपत्तिकाळात मारूतराव पाटलांनी आम्हा विस्थापितांना मदतीचा हात देऊन जे उपकार केले, ते आमच्या ह्यदयात कायम आहेत. मारूतरांव पाटील हे आमचे कुटुंबप्रमुख आहेत असं आम्हा सर्व धरणग्रस्तांना वाटत आलं आहे.

आमच्या कुटुंबातील आम्ही सर्व भाऊ, वडील, चुलते मारूतराव पाटलांना त्यांच्या राजकीय कामात गेल्या ४०-५० वर्षे त्यांच्यासोबत आहोत. त्यांची साथ-संगत नेवासा-शेवगांव परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी कायमची आवश्यक आहे.

मी दहिगांव-ने येथील वसतिगृहात होतो. कधी काळी, कशाची अडचण भासलीच तर आम्ही विद्यार्थी पाटलांचा वाडा आपलंच घर समजून त्यांच्या कोठीतून धान्य वगैरे आणीत असू. सर्वांना सर्वकाळी, सर्व प्रसंगी मदतीचा हात देउन वर ओढून घेणं, ही त्यांची वृत्ती सर्वांसाठी सारखीच होती. त्यामुळे **सर्वसामान्यांना प्रेमाने ह्यदयाशी कवटाळणारा जिवंत देव** अशीच आमची त्यांच्याविषयीची भावना आहे.

✧ ✧ ✧

17436



# लोकचिंतावाहक नेता

**श्री.विश्वनाथ पाटील कदम**

शहरटाकळी - वय ८० वर्षे

मला चांगलं आठवतं. त्यावेळी मी वीस पंचवीस वर्षांचा तरी असेन. आमच्या शेजारच्या दहिगांवी श्री. शंकरराव घुले यांचेकडे गांवची पाटीलकी होती. ते पाटीलकीवर असताना गांवातले सगळे लोक सुखासमाधानाचं जिणं जगत होते. पुढे १९४२ त ते स्वर्गवासी झाले. नंतर मात्र गांवात पहिल्यासारखी परिस्थिती राहिली नाही. दिवसा ढवळ्या चोऱ्यामाऱ्या, लूटमार शेतातला माल कापून नेणं, गांवातल्याच मंडळींना त्रास देणं असे प्रकार सुरु झाले. लोक नेहमी काळजीत असत. पुढे चार सहा वर्षांनी पढेगांवच्या बनकर घराण्यातील विश्वनाथ नांवाच्या एका मुलाला कै.शंकरराव तथा बापूसाहेबांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांनी दत्तक घेतले. पढेगांवी आल्यावर त्यांनाच मारुतराव असे नांव मिळाले. इथे आल्यावर पाच सहा महिन्यातच पाटीलकीची सूत्रे त्यांनी हाती घेतली.

गांवात काय काय सुधारणा करता येतील याची त्यांनी काही जोडीदार मिळून पाहणी केली. त्यांनी श्रमदान सप्ताहात सर्वांनी भागीदार होण्याची सर्वांना हाक दिली.. त्यांना बरेच कार्यकर्ते मिळाले. मारुतराव पाटलांनी दहिगांवची बरीच सुधारणा केली. तसेच आमदार झाल्यावर आसपासच्या गोरगरीब शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात खूप मदत केली. सोसायटीमार्फत, सहकारी बँकेतून विहरीसाठी, घरांसाठी कर्ज मिळवून देण्यात मोलाचे सहकार्य केले. आमच्या गावांवर त्यांचा विशेष लोभ होता. सारा गांव त्यांच्या पाठीशी उभा केला. आमच्या तालुक्याचे आमदार म्हणून भागातल्या शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शिक्षणाच्या सोयीही करुन दिल्या.

कुडगांव फाटा ते दहिगांवपर्यंत पक्की सडक करुन, तिचे डांबरीकरणही करुन दिलें. एस्.टी. ची सोय करुन दिल्यामुळे आसपासच्या गांवांच्या शेवगांव, नेवासा तालुक्याशी दळणवळण सुरु झाले.

त्यांनी केलेली विशेष भरीव कामगिरी म्हणजे आमच्या भागात सहकारी साखर कारखाना काढला ही होय. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उसाची व्यवस्था लागली. या भागातील लोकांची पोटापाण्याची सोयही झाली. परिसरातील सगळे लोक त्यांना आदरानें मालक म्हणत.

✧ ✧ ✧

# विस्थापितांच्या वेदनांचा हुंकार

**श्री. दादा पाटील उभेदळ**
हिंगणगांव - शे.

जायकवाडी धरण होणार अशी कुणकुण १९६५ मधे लागली. आणि या धरणामुळे शेवगांव, नेवासा तालुक्यातल्या सुमारे ६०-६५ गांवांना आपल्या मूळ गांवांना कायमचेच मुकावे लागणार अशा भीतीने आम्हाला ग्रासून टाकले. या गोष्टीची नुसती कल्पनाही किती भयानक असेल याचे चित्र आम्ही रंगवू लागलो. आमच्या शेकडो पिढ्या इथे गुण्यागोविंदाने नांदल्या. भरल्या गोकुळासारखा आमचा सारा परिसर आमच्या डोळ्यापुढून कायमचा नाहीसा होणार होता. सारेच हवालदिल झाले.

प्रस्तुतची जायकवाडी धरणासाठीची जागा प्रथम रामपुरी (बीड जिल्हा) या गांवी निश्चित करण्यांत आली होती. परंतु महाराष्ट्र शासनाने नंतर जागेत बदल केला व जायकवाडी (पैठणजवळील) ही जागा निश्चित केली गेली.

आमच्या गांवातील हजार दोन हजार लोकांवर पूर्णपणे विस्थापित होण्याची वेळ जसजसी जवळ येत चालली तसतसी आमच्या उरात धडकी भरली. ज्यांच्या जमिनी धरणात जाणार होत्या अशा सर्वांनाच शासनातर्फे नोटिसा बजावण्यात आल्या विस्थापितांना शेतजमिनी, घरदारे यांच्या होणाऱ्या नुकसानीबद्दल भरपाई देण्यात येईल असे शासनाने जाहीर केलें. परंतु शासनातर्फे मिळणारी ही भरपाई अत्यंत तुटपुंजी होती. त्या रकमेतून तगाई, सोसायटी कर्जे, बँकांची कर्जे, थकबाक्या शासनाने वसूल केल्या. उरलेल्या रकमेचे पेमेंट दोन हप्त्यात (१९६६-६७ व १९७१-७२ मधे) केले गेले.

धरणासाठी शासनाने संपादित केलेल्या जमिनीमुळे विस्थापित झालेल्यांच्या पुनर्वसनाची आधी सोय करा अशी शेतकऱ्यांनी मागणी केली. त्यासाठी मोर्चे, मेळावे, सभा, धरणे इ. मार्गांचा अवलंब करण्यात येऊं लागला. परंतु शासकीय हट्टापुढे शेतकऱ्यांच्या, विस्थापितांच्या हक्कांची पायमल्ली होत गेली. आमची अक्षरशः मुस्कटदाबी झाली. शासन म्हणजे राजहट्ट तो पुरविला जाणारच, याची आम्हाला जाणीव होती. निदानपक्षी त्याविरूद्ध आवाज तरी उठवावा म्हणून तालुक्याचे लोकप्रतिनिधी श्री. मारूतराव पाटील



यांचेमार्फतही आमचे दुखणे वेशीवर टांगले. विस्थपितांच्या व्यथा-वेदना आपल्याच व्यथा-वेदना मानून त्यांनीही अगदी पोटतिडकीने आमचे नेतृत्व केलें. आमची गाऱ्हाणी शासन-दरबारी मांडण्यात त्यांनी बिलकूल कसूर केली नाही. आम्हा विस्थपितांच्या वेदनांवर फुंकर घालण्यासाठी, त्यांना सर्वतोपरी साहाय करण्यासाठी त्यांनी स्वतःच्या कौटुंबिक सुखाकडे पाहिले नाही. पुनर्वसनाच्या कार्यात शासनाकडे सर्व प्रकारे पूर्तता करतांना त्यांना ती तारेवरची कसरत करावी लागली, त्यांच्या जीवाची जी ससेहोलपट झाली ती आम्ही कधीच विसरू शकणार नाही. लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी स्वकर्तव्याची पराकाष्ठा केली. त्यांचे आम्हा सर्वांवर मोठे ऋण आहे. आम्ही त्यातून कधीही उतराई होऊ शकणार नाही. या भागातील प्रत्येक शेतकऱ्याची अशीच भावना बनून गेली आहे.

✧ ✧ ✧



# धरणग्रस्तांचे कृपाछत्र

श्री मोहनराव मुरकुटे
ढोरचांदगांव

दहिगांवच्या पूर्वेला थोड्याच अंतरावर वसलेले आमचें चांदगांव, सुमारे ३-४ हजार लोकवस्तीचं गांव. गावची सर्व मंडळी तशी सुखीच. जायकवाडी धरणाखाली शेवगांव तालुक्यातली जी ३३ गांवे जाणार होती, त्यात आमचेही गांव होते. आम्हाला सरकारतर्फे नोटीसा आल्या. दुसरी नोटीसही आली. सरकारतर्फे आम्हाला एकरी १३०० ते १४०० रूपये देण्यात आले पहिला हप्ता मिळाल्यावर दुसरा हप्ता तीन चार वर्षांनी देण्यात आला. पहिल्या हप्त्यातून आमच्या सोसायटी थकबाक्या, बँकाच्या थकबाक्या, तगाई हप्ते यांच्या वसुली केल्या. त्या जाऊन मिळालेल्या पैशांवर डोळा होता. अर्धे मुर्धे मिळालेले पैसही त्यांच्या घशात गेले. अशा तऱ्हेने मिळालेल्या पैशांच्या कवड्या रेवड्या झाल्या. तशातच दुष्काळाची आपत्ती कोसळली. आम्हाला पुनर्वसनाच्या ठिकाणी जाण्याचे आदेश देण्यात आले. गांव सोडून जातांना आम्हा शेतकऱ्यांना भयंकर मानसिक यातनाही भोगाव्या लागल्या. त्या शब्दांनी सांगता येण्यासारख्या नव्हत्या. पुनर्वसनाच्या ठिकाणी जाण्यासाठी बिऱ्हाड बादले बांधुन ठेवले. अशा वेळी भागात चोऱ्या माऱ्या वाढल्या. त्यामुळे आमचा अर्धा जीव नवीन गांवात व अर्धा जीव जुन्या गांवात. लगेच आम्ही दहिगांवला जाऊन अशा घटना आमचे आमदार श्री. घुले पाटलांच्या कानावर घातल्या. त्यांनी लगेच जिल्ह्याचे पोलीसप्रमुख श्री. बारवकर यांना चौकशीचे आदेश दिले. चौकशीही झाली, परंतु त्यातून निष्पन्न काहीच झालें नाही.

घर सोडल्यावर अंगण परकं होतं, असं म्हणतात. तशी अवस्था झाली. नवीन गांवात सारंच परकं. तिथं एकूण परिस्थितीशी समरस व्हायला बऱ्याच समस्या आडव्या येत होत्या. अशाही परिस्थितीत **धरणग्रस्तांचे मायबाप घुले पाटील** आमच्या पाठीशी उभे होते. आमच्या जमिनी धरणात जाण्याआधीही त्यांचे कृपाछत्र आमच्यावर होतेच. आजही आहे. नवीन गांवी आम्हाला जमिनी, जागा, कर्जपाणी इत्यादी मिळवून देतांना त्यांनाही खूप पायपीट करावी लागली. त्यांनी आमच्यावर केलेल्या उपकारांची आठवण आमच्या ह्रदयात सतत घर करून आहे.

✧✧✧



# आदर्श व्यक्तीमत्व

## रामेश्वर चुनीलाल करवा, नाशिक

B.Sc., A. N.S.I.

साखर उदयोगात गेल्या ३०-३२ वर्षात काम करीत असताना मला खूप मोठमोठया उत्तुंग व्यक्तीमत्वाचा सहवास लाभला. या कालखंडात माझ्यासारख्या अधिकाऱ्यावर कोणते व्यक्तीमत्व ठसले ? असे जर कोणी मला विचारले तर क्षणाचाही विचार न करता, उस्फूर्तपणे जे नाव माझ्या मुखातून बाहेर पडेल ते एकमेव व्यक्तीमत्व म्हणजे आदरणीय श्री. मारूतरावजी घुले पाटील साहेब !

माननीय साहेबांचे व्यक्तिमत्व लोभस तर होतेच ! परंतू सर्वसमावेशक, अजातशत्रू ह्या गुणांचा प्रत्यय कित्येक प्रसंगातून सर्वांना जाणवत होता, अनुभव करून देत होता. आमच्या पिढीला तर ते आश्वासक व पितृतुल्य वाटत असत. आपलेपणाची आगळीवेगळी छटा नेहमीच त्यांच्याकडे लोहचुंबकाप्रमाणे खेचून घेत असायची. साहेबांबद्दल त्यांच्या सहवासात आलेल्या सर्वांचे अनुभव कितीतरी समृद्ध आहेत ! असतील !! त्या सर्वांची पुनरावृत्ती करण्याची गरज भासत नाही. परंतु तरीही काही सांगण्याचा मोहच आवरत नाही.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी १४/१५ वर्षे मिळाली व त्यामुळेच आजच्या साखर उदयोगात खारीचा वाटा उचलण्याचा योग प्राप्त झाला ! संधी मिळाली ! माझी साखर उदयोगातील मॅन्युफॅक्चरींग केमिस्ट ते कार्यकारी संचालक या वाटचालीत मा. घुले साहेबांच्या गुणग्राहकता गुणाचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. त्यानीच मला कारकिर्दीचा पाया घालण्याची संधी प्राप्त करून दिली व कारकीर्द विकसित करण्यासाठी दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक बनले.

ज्ञानेश्वर कारखान्याचा विकास, प्रगती व त्यातून परिसरातील सामान्य माणूस हा केंद्रबिंदू हा एकमेव ध्यास साहेबांनी जीवनभर जोपासला, पूर्णत्वास नेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्यासाठी असीम त्याग, तनमनाची समर्पितता हयानांच आयुधे मानली. स्वताच्या प्रकृतीचीहि तमा बाळगली नाही. कौटुंबिक दुःखाची फिकीर केली नाही. कारखान्याची कार्यक्षमता वाढावी, दोन पैसे सामान्य माणसास जादा मिळावे त्यासाठी द्रष्टेपणाने आधुनिकतेची कांस कारखान्याच्या सुरवातीपासूनच धरली व काळाप्रमाणे कारखान्यात नवीन तंत्रज्ञानाचा समावेश करण्यासाठी नेहमीच आम्हा तंत्रज्ञांना उत्तेजन दिले.



त्यामुळेच तत्कालीन कालखंडानुसार मिलवर सुरवातीस फायबरायझर, पुढील काळात प्रेशर फिडर सिस्टीम, बॉयलरवर इकॉनोमाइझर बसविणे. प्रोसेससाठी मायक्रोप्रोसेसर, पी. एच. कंट्रोल सिस्टीम, मीस्ट क्रिएशन सिस्टीम, फ्ल्युइडाइजड् बेड हॉपर इ. अनेक नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा (Latest Technology) समावेश माझ्या सारख्या तंत्रज्ञाच्या सुचनांचा स्वीकार करून सर्वांना प्रोत्साहन देत होते. आपली मते निर्भिडपणे मांडण्यास परवानगी देत असत. खातेप्रमुखांवर पूर्ण विश्वास व त्यांना मनाप्रमाणे काम करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देत असत. हया गोष्टी नेहमीच काही तरी अतिशय चांगले करण्याची प्रेरणा देत होत्या. धडपड करण्याची जिद्द वाढवित होत्या.

चांगल्या कामांची दिलखुलास पावती व शाबासकी हे साहेबांचे आणखी एक वैशिष्ठ्य व माझी ज्ञानेश्वर कारखान्यावर चिफ् केमिस्ट म्हणून जी नेमणूक हे त्याचे प्रत्यंतर. ध्यानीमनी नसतानांही साहेंबानी मी चिफ केमिस्ट म्हणून यावे असी सुचना करताच मी दुसऱ्या कारखान्यावरून ताबडतोब हजर झालो व साहेबांनी त्याचा उल्लेख भर सभेत केला. एवढा आपलेपणा अनुभवणे दुर्मिळच.

भारतात Commercial scale वर पहिला कंटिनीअस पॅन ज्ञानेश्वर कारखान्याचा निर्णय साहेंबांनी माझ्या सुचनेचा विचार करून घेतला ही बाब मला अजूनही रोमांचित करून जाते. त्यावेळेस साहेंबांना काही नामवंत तंत्रज्ञांनी कंटिनीअस पॅन चा निर्णय घेण्याची घाई करू नका, अतिशय नविन टेकनॉलॉजी आहे, कमीतकमी परदेशी तंत्रज्ञान व डिझाइन असलेला कंटिनीअस पॅन घ्यावा असे सल्ले दिले. साहेबांनी मला फक्त विचारले, आपल्या निर्णयाबद्दल तुला पूर्ण खात्री आहे ना ? मी होय म्हणताच साहेबांनी ठरविलेला कंटिनीअस पॅन घेण्याचा निर्णय जाहिर केला. एवढा साहेबांचा आपल्या अधिकाऱ्यांवर विश्वास होता व हा विश्वासच आम्हा तरूण तंत्रज्ञांना पुढे जाण्याचा मार्ग दाखवित होता.

मला नमूद करण्यास अभिमान वाटतो की देशात पहिली व्हर्टीकल कंटिनीअस सेंट्रीफयुगल मशीनची (B/W Make) उभारणी ज्ञानेश्वर कारखान्यात १९७८ साली झाली व देशात पहिल्या कंटिनीअस पॅनची उभारणी ज्ञानेश्वर कारखान्यात १९८८ साली झाली. दोनही निर्णय साहेबांचे ! काळाबरोबर अचूक निर्णय घेण्याची अलौकीक क्षमता साहेबांची !! वरिल दोनही विषयांवर तांत्रिक प्रबंध लिहण्याची संधी त्या वेळी मला मिळाली.

हयाप्रमाणे प्रशासनाकरिता आवश्यक असलेले सर्व उत्तम गुणांबरोबर काटकसर, सोधेपणा इ. गुणांमुळेच मा. घुले साहेबांची सार्वजनिक जीवन समृध्द व आपलेपणाचे होते. जिल्हा सहकारी बँक असो, शिक्षण संस्था असो, लिफट इरिगेशन संस्था असो संपूर्ण साखर परिसरात व सहकार क्षेत्रात मा. मारूतरावजी घुले पाटील साहेबांचा एक वेगळाच ठसा उमटला गेला आहे. अशा या थोर, साधी राहणी, उच्च व आधुनिक विचारसरणी असणाऱ्या सर्व सामान्यांच्या कैवाऱ्यास कोटी कोटी अभिवादन.

✧ ✧ ✧



# श्रमप्रतिष्ठेचा पुरस्कर्ता

**श्री. एन्. एस्. तथा बबनराव पवार,**

सरचिटणीस

**श्री. जगन्नाथराव काळे,**

अध्यक्ष, नेवासा ता. राष्ट्रीय साखर कामगार संघ

महाराष्ट्राचे भाग्यविधाते स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी महाराष्ट्रात कृषिउद्योगप्रधान समाजरचना निर्माण करण्याचे स्वप्न पाहिले होते. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी सहकारी साखर कारखानदारीची मुहूर्तमेढ रोवली. स्व. वसंतदादा पाटील, तात्यासाहेब कोरे, रत्नाप्पा कुंभार आदि सहकारातील समर्थ नेत्यांनी सहकारी साखर कारखानदारीच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्याचे ऐतिहासिक कार्य जाणीवपूर्वक केले. तोच वारसा आणि राजकीय, सामाजिक दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेऊन या भागाचा कायापालट करण्याचे उद्दिष्ट मनाशी बाळगून समर्थ नेतृत्व व परिपक्व विचार बरोबर घेऊन, सर्वसामान्य समाजाला, शेतकऱ्यांना उभे करून कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर करून त्यांना न्याय मिळण्याचे दृष्टिकोनातून या भागात पहिला सहकारी प्रकल्प ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या रूपाने मारुतराव पाटलांनी कार्यान्वित केला. तसेच या परिसरात सहकारी संस्थांचे जाळे निर्माण करून कार्याकर्त्यांची मोठी फळीच त्यांनी निर्माण केली.

त्यांचा आणि आमचा जो संबंध आला तो समविचारातून आला. श्रमाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, मातीचं सोनं करणाऱ्यांना न्याय मिळायला हवा, यातूनच इंटकच्या विचाराची कामगार संघटना त्यांच्या प्रेरणेने उभी राहिली. त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत आमच्या कामगारांना, शेतकऱ्यांना त्यांच्या श्रमाची प्रतिष्ठा कायम राहील अशी विधायक दृष्टी सतत जोपासली होती. त्यामुळे कामगारांच्या मागण्यासंदर्भात टोकाची भूमिका संघटनेला कधीच घ्यावी लागली नाही. हे नमूद करायला आम्हाला विशेष आनंद होत आहे.

कारखान्यातील कामगार हा कामगार आहे व अल्पभूधारक शेतकरीही आहे असे उदाहरण याच उद्योगात पहावयास मिळत असल्याने कामगारांनी कधीही आततायी धोरण स्वीकारून औद्योगिक शांततेचा भंग केलेला नाही. मा. मारुतराव पाटलांच्या विचारांची ही शिदोरी बरोबर घेऊनच या कारखान्याने



उत्पादनाचे अनेक विक्रमी उच्चांक प्रस्थापित करून राज्यपातळीवरील आणि राष्ट्रपातळीवरील अनेक पारितोषिके मिळविली आहेत.

संघटनात्मक बाबींचा विचार करता संघटनेचे महत्त्व जाणून सर्व क्षेत्रांमध्ये संघटनेशिवाय पर्याय नाही या विचारांची शिदोरी दिल्यानेच आमचे संघटनेच्या इवल्याशा रोपाचे रूपांतर वटवृक्षात झाल्याने सार्थ अभिमानाने सांगावेसे वाटते की, राज्यामध्ये, देशामध्ये संघटनात्मक काम करण्याची जी संधी मिळाली तिचे सोने होऊन राज्यातल्या पासष्ट ते सत्तर सहकारी साखर कारखान्यांमध्ये या विचाराची संघटना कार्यरत आहे.

या परिसराचा, जिल्ह्याचा विकास प्रकल्प राबविण्याचा ध्यासच जणू या लोकमान्य लोकनेत्याने घेतला होता. जिल्हा आणि राज्यस्तरावर लोकप्रतिनिधी म्हणून कार्य करताना त्यांनी आपल्या सर्वोदयवादी विचारांना कुठेही व कधीही बाधा येऊ दिली नाही. उभे आयुष्य चंदनाप्रमाणे झिजवून समाजसेवेचे आपले व्रत तडीस नेले. असा आमचा नेता शरीररूपाने या जगातून गेला असला तरी विचार आणि कार्यरूपाने तो चिरंजीव झाला आहे. या नेत्याला कोटि कोटि प्रमाण.

✧ ✧ ✧



# एका सहकार प्रेषिताचे पुण्यस्मरण

**गुलाबराव घुले**
अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, अहमदनगर

महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक लोकजीवनावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारी 'ज्ञानोबा ते विनोबा' या प्रदीर्घ परंपरेशी नाते सांगणारी कितीतरी माणसे आजवर होऊन गेली. 'बहुरत्ना वसुंधरा' ह्या वचनाला सत्यता देणारी ही माणसे होती. मासांच्या जगात अशी माणसे सदा सर्वदा दुर्मिळच असावीत असा जणू विधिसंकेतच असल्यासारखा वाटतो. सत्य, अहिंसा, प्रेम, नीति, सेवा अशा अनेक जीवनमूल्यांना आपल्या जीवनात प्रतिष्ठित करून त्यांच्या आधीष्ठानावर लोकजीवनाचे उन्नयन करण्याचा प्रयत्न ही मंडळी करत असतात. कालप्रवाहावर ज्यांच्या सेवाकर्तृत्वाच्या पाऊलखुणा चिरंतन राहतात अशा थोरांच्या जातकुळीशी संबंध सांगणाऱ्या स्व. मारुतराव घुले पाटील यांना या मर्त्य जगातून गेल्याला आज वर्ष उलटून गेले आहे. ज्येष्ठ वद्य त्रयोदशीला दि. ८-७-२००२, सोमवार रोजी त्यांनी त्यांच्या दहिगावाहून पंढरीला आषाढी वारीसाठी जाणाऱ्या पायी दिंडी नेणाऱ्या वारकऱ्यांना प्रेमाचा निरोप दिला आणि त्याच दिवशी हा सहकार पंढरीचा वारकरी कधीही न संपणाऱ्या वारीसाठी निघून गेला. विश्वबंधुत्वाचे उद्‌गीथ गाणारा हा महाराष्ट्राचा वारकरी संप्रदाय. याच वारकरी संप्रदायाचे बाळकडू त्यांना बालपणापासून मिळाले होते. त्याच संस्काराचं मूर्त रूप म्हणजे स्व. मारुतराव घुले पाटलांचे सेवाजीवन होते. त्यात कर्तृत्वाचा सुगंध दरवळत होता.

एरव्ही शेवगाव-नेवासा मतदारसंघ हा कम्युनिस्ट विचाराने प्रभावित पट्टा, असे असतानाही १९६२ च्या विधानसभा निवडणुकीत घुले पाटील काँग्रेस पक्षातर्फे मोठ्या मताधिक्याने आमदार म्हणून निवडले गेले आणि १९६७ ते १९७२ यासाठी ते पुन्हा आमदार झाले. तसेच १९७२ ते ७८ पर्यंत विधान परिषदेचे प्रतिनिधी (M. L.C.) म्हणून निवडून आले. राज्यपातळीवरील नेते मंडळींचा मारुतराव पाटलांच्या कार्यावर जबरदस्त विश्वास होता आणि म्हणूनच १९६४ ते १९७४ या दहा वर्षांसाठी जिल्हा काँग्रेसच्या नेतेपदाची धुराही त्यांच्याच खांद्यावर टाकली गेली. जिल्हा काँग्रेसच्या दृष्टीने हा कसोटीचा कालखंड होता. पण या अशाही परिस्थितीत पक्षसंघटनेचे जिकरीचे काम त्यांनी सहज निभावून नेले. दहिगावची ते

येण्याआधीची परिस्थिती, त्यांची प्रकृतीची अक्षमता, ऐन तारुण्यात पत्नीवियोग, जायकवाडी धरणग्रस्तंचे पुनर्वसन, त्यातून उद्‌भवलेली बेरोजगारीची समस्या अशा अनेकविध प्रतिकूलतेला धैर्याने तोंड देत ते चालत राहिले. राजकारण, अर्थकारण, धर्मकारण हे सारे काही शेवटी समाजकारणासाठीच असते या विचारावर ते ठाम राहिले आणि सत्तेचा उपयोग सेवेसाठी व्हायला हवा हे त्यांचे जीवनव्रत होते. सहकारातून स्रवणारा हा ऊर्जास्त्रोत सर्वसामान्यांपर्यंत पाहोचविण्यासाठी त्यांनी अगदी तळमळीने प्रयत्न व परिश्राची शर्थ केली.

माणूस हाच त्यांचा देव होता आणि त्याची सेवा हाच त्यांचा धर्म होता. मानवतावादी धर्माच्या या उपदेशकाने आयुष्यभर माणूस जोडण्याचे काम केले. यशवंतराजींच्या राजकारणाचे 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' हे मुख्य प्रयोजन होते. हीच 'यशवंती निष्ठा' घुले पाटलांच्या जीवनात साकार झाली होती.

"सहकार ही जीवननिष्ठा आहे" असं ते वारंवार सांगत. त्यांनी तालुक्यात उभ्या केलेल्या सर्व सहकारी संस्था आणि श्रीज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना व उद्योगसमूह म्हणजे त्यांच्या सहकार-सत्ता-सेवा यांचे संगमतीर्थ आहे. त्या सर्वांमधून त्यांच्या 'एक विश्वस्त' या भूमिकेचेच दर्शन होते. त्यांची भूमिका केवळ 'प्रेषिता'ची होती. या सहकार प्रेषिताचं हे पुण्यस्मरण.

✧ ✧ ✧



# सहकार क्षेत्रातील क्रियाशील कार्यकर्ता

## जयराम देसाई , पुणे

आषाढी यात्रेच्या दिंड्या देहू - आळंदीहून निघाल्या. या काळातच सहकार पंढरीचा एक वारकारी न संपणाऱ्या वारीसाठी निघून गेला. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या सहकार ग्रंथाचा एक रकाना कायमसाठी रिकामा झत्तला. नगर जिल्ह्याच्या सहकारी चळवळीतील जेष्ठ नेते मारुतराव घुले पाटील यांच्या निधनाने राजकीय, सामाजिक व सहकारी चळवळीची फार मोठी हानी झाली आहे. शेवगाव नेवासा तालुक्यातील कृषी औद्योगिक विकासाचे ते शिल्पकार होते. धरणग्रस्त, भूमीहीन, शेतमजूर , सुशिक्षित बेरोजगार यांना त्यांनी रोजगार उपलब्ध करून दिला. शेतकऱ्यांना जोडधंदा मिळावा म्हणून त्यांनी या जिल्ह्यात धवलक्रांती घडवून आणली.

माझ्या पहिल्या भेटीतच मला घुले यांचे साधेपण जाणवले. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ते त्या वेळी अध्यक्ष होते. सहकारातील एक निर्मळ माणूस त्यांच्या रूपाने मला पहावयास मिळला. साधी राहणी, नेहरूशर्ट पांढरी खादीची टोपी, खादीचे धोतर, गळ्यात माळ, शाल पांघरलेली अशा साध्यावेषात ते रहात असत. वारकरी सांप्रदयाचे एक प्रसंन्नलोभस व्यक्तिमत्त्व म्हणजे घुले पाटील होत. ते राजकारणातील आणि सहकारातील एक अबोल; पण क्रियाशील कार्यकर्ते होते. बालपणापासूनच त्यांना समाजसेवेची आवड होती. मारुतरावांची सहकारावर अपार निष्ठा होती. साने गुरुजींच्या वांङ्मयाचे त्यांनी वाचन केले होते. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे शेवगाव-नेवासा तालुक्यातील ग्रामीण जनतेचा सर्वांगीण विकास होऊ शकला. अजातशत्रू मारुतरावांना गरिबांबद्दल अत्यंत कणव होती. श्रीरामपूर तालुक्यातील पढेगावचे ते बनकर पाटील.

मारुतरावांनी आपल्या गावची सेवा सहकारी सोसायटी, ग्रामपंचायत या आदर्श संस्था बनविल्या, गावच्या पसरिसराच्या शेती विकासास त्यांनी चालना दिली. माणुसकी, सहृयता, जिव्हाळा, प्रेम, सहिष्णुता या गुणांचा त्यांच्या अंगी ठेवा होता. समाजात वावरताना त्याचे प्रत्यंतर दिसून येत होते. शेतीमध्ये नव्या तंत्राचा वापर करुन शेती उत्पादनवाढ कशी करता येते, ते खते, बी-बियाणे, औषधे यांच्या प्रात्यक्षिकांसह



शेतकऱ्यांना दाखवून दिले. एक आदर्श शेतकरी म्हणून त्यांचा लौकिक झाला. पाण्याशिवाय कृषी-औद्योगिक विकास अशक्य आहे, असे त्यांचे मत होते. म्हणूनच 'सडेताजनपूर उपसा जलसिंचन योजना' त्यांनी राबविली व तेथील शेतकऱ्यांचा आर्थिक कायापालट घडवून आणला.

आपल्या कल्पक आणि दूरदृष्टीमुळे शेवगाव येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था त्यांनी सुरु केली. त्यातून शेकडो प्रशिक्षणार्थी तंत्रशिक्षण घेऊन बाहेर पडले. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य बाजारभाव मिळावा म्हणून जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्थेची त्यांनी उभारणी केली. त्या भागात ही एक आदर्श संस्था म्हणून प्रसिद्ध आहे. शेतकऱ्यांच्या मालाला किफायतशीर भाव मिळावा म्हणूप शेवगाव तालुका सहकारी खरेदी-विक्री संघाची त्यांनी स्थापना केली. प्राथमिक सेवा सहकारी सोसायटी व खरेदी-विक्री संघामार्फत मालतारणाचा व्यवहार करुन शेतकऱ्यांना त्यांनी आर्थिक साहाय्य मिळवून दिले. याबरोबरच या संघामार्फत शेती उत्पादनासाठी लागणारा माल, खते, बी-बियाणे, औषधे, अवजारे योग्य दरात शेतकऱ्यांना कशी मिळतील, हे त्यांनी जातीने पाहिले.

आशिया खंडामध्ये अग्रगण्य अशा अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती ससहकारी बँकेच्या स्थापनेपासून संचालक म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. पुढे लोकनियुक्त प्रतिनिधी (संचालक) म्हणून ते बँकेवर निवडून आले. १९७७ ते १९७९ या दोन वर्षाच्या काळात ते कार्याध्यक्ष होते. त्यांच्या कारकिर्दीत बँकेच्या कार्याचा विस्तार झाला. बँक शेतकऱ्यांच्या झोपडीपर्यंत जाऊन पोचली. नेवाशाचे ज्ञानेश्वर महाविद्यालय, नवजीवन विद्यालय आदी शिक्षण संस्थांना त्यांनी नेतृत्त्व दिले. जिल्हा परिषदेत पदाधिकारी म्हणून काम करताना विकासाची गंगा ग्रामीण भागात सामान्य माणसापर्यंत पोहोचविली. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बाबासाहेब नरवडे पाटील यांच्या सहकार्याने नेवासा तालुक्यात भेंडा बुद्रुक येथे ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचा १९७५ मध्ये शुभारंभ केला. साखरेच्या उताऱ्यामध्ये राज्य आणि राष्ट्रीय स्पर्धेतील प्रथम क्रमांकाची पारितोषिके त्यांनी कारखान्याला मिळूवन दिली.

अहमदनगर जिल्हा काँग्रेसचे ६४ ते ७४, अशी दहा वर्षे अध्यक्ष म्हणून मारुतराव यांनी यशस्वी काम केले. महाराष्ट्र विधानसभेचे दहा वर्षे व विधान परिषदेचे सहा वर्षे, अशी सोळा वर्षे ते आमदार होते. कायदे करताना शेतकऱ्यांचे हित कसे साधले जाईल, याकडे त्यांचा कटाक्ष असे.

मारुतराव घुले पाटील यांच्या निधनामुळे सहकार, राजकारण, समाजकारणातील एक सच्चा जनसेवक हरपला आहे. सहकारातील या थोर सेनापतीला विनम्र आदरांजली !

✧ ✧ ✧



# घुले पाटीलसाहेब - एक सेवाव्रती दीपस्तंभ

**साथीराम ना. थिटे** बी.ई. (मेकॅनिक)
कार्यकारी संचालक

एकोणीसशे चौऱ्यांशीमध्ये कारखान्यात चीफ इंजिनिअर म्हणून माझ्या सेवेचा श्रीगणेशा झाला. मा.श्री.जगधनेसाहेब कार्यकारी संचालक होते. मा. साहेबांसारखा तेजस्वी मार्गदर्शक व श्री. जगधनेसाहेबांसारखा शिस्तप्रिय कुशल प्रशासक लाभलेल्या श्री ज्ञानेश्वरमध्ये सेवेची संधी मिळाली हें मी माझे महद्‌भाग्यच समजतो.

साहेब हे या संस्थेची आधारशिला आणि दीपस्तंभ दोन्हीही होते. इथे चीफ इंजिनिअर पदावर काम करताना त्यांच्या प्रोत्साहनपर मार्गदर्शनामुळेच तांत्रिक कार्यक्षमतेबद्दल -

१) मिलमधील उत्कृष्ट तात्रिक कार्यक्षमतेबाबत राष्ट्रीय कार्यक्षमता पारितोषिक (१९८७ -८८) - अन्न व नागरी पुरवठा खाते, भारत सरकार नवी दिल्ली.

२) उत्कृष्ट कार्यक्षमता द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक (१९८८ - ८९) - नॅशनल फेडरेशन ऑफ को ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरिज नवी दिल्ली.

३) रिड्यूस्ड ओव्हरऑल रिकव्हरीबद्दल द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक (१९९३-९४) - वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे.

४) उत्कृष्ट कार्यक्षमतेचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक - (१९९५-९६) - राष्ट्रीय उत्पादकता परिषद, नवी दिल्ली.

अशी चार पारितोषिके कारखान्यास मिळाली. साहेबांच्या दृष्टीतून प्रोत्साहन जणू पाझरायचे. अमुक एक काम आपल्याला करायचं आहे असं सूतोवाच त्यांनी करायचा अवकाश की ते काम पूर्ण झालंच हे ठरलेलं होतं. त्यांचे प्रोत्साहन, मार्गदर्शन हे कारखान्याला लाभलेलं ईश्वरीय वरदानच होते. त्यामुळे काम

करताना येणाऱ्या अनेक अडचणीवर मात करता आली. आणि हाती घेतलेल्या कामात यशस्वी होत गेलो. त्यांच्या प्रोत्साहनाची थाप पाठीवर पडल्यामुळेच चीफ इंजिनीअर, वर्क्स मॅनेजर, कार्यकारी संचालक अशा जबाबदाऱ्या समर्थपणे निभावता आल्या. हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

मध्यंतरी १९९७ मध्ये कारखाना सोडून माळेगांव सहकारी साखर कारखान्यात जावे लागले. परंतु साहेबांच्या इच्छेमुळे पुन्हा इथे येणे झाले आणि संचालक मंडळ व साहेबांच्या मार्गदर्शनाखाली अवघ्या चारच महिन्यामध्ये प्रतिदिन ५००० टी.सी.डी. चे विस्तारवाढीची ऐतिहासिक कामगिरी पार पडली. मा.साहेबांचा धाडसी व अचूक निर्णय आणि त्यांचा कामगार व अधिकाऱ्यांवरील गाढ विश्वास यामुळेच ही अशक्य कोटीतील गोष्ट प्रत्यक्षात उतरविणे शक्य झाले.

मशिनरी विस्तारवाढ (Expansion) पूर्ण होऊन कार्यक्षमतेने कारखाना चालू झाल्यानंतर मे २००२ मध्ये मा. साहेबांनी कार्यकारी संचालक ही जबाबदारी माझ्यावर टाकली. हे सर्व काम पहायला सुरवात केल्यानंतर पुढे साहेबांनी दि.८-७-२००२ सोमवार रोजी या जगाचा निरोप घेतला. **दिलेल्या सर्व आश्वासनांची विश्वस्ताच्या भूमिकेतून पूर्तता झाल्याची तृप्ती ते बरोबर घेऊन गेले.**
साहेब शरीराने आपल्यात नाहीत. परंतु त्यांच्या कार्यरूपाने व त्यांनी दिलेल्या प्रेरक विचारांच्या रूपाने ते आहेतच. त्यांच्या जाण्याने शेवगांव-नेवासा या परिसराचे छत्रच जणू हरवल्यासारखे झाले आहे.

त्यांचा महनीय आदर्श सतत डोळ्यापुढे ठेवून त्यांचे सुपुत्र श्री.नरेंद्र पाटील (आमदार) व श्री.चंद्रशेखर भाऊ चेअरमन यांनी हे संस्थेचे सेवाकार्य असेच नेटाने पुढे नेत साखर धंद्याच्या अडचणींच्या काळातही सीझन २००२-२००३ मध्ये उत्पादनाचे विक्रमी उच्चांक प्रस्थापित केले आहेत. स्व.साहेबांच्या शिकवणुकीने हे आपण करू शकलो. त्या महात्म्याचे आशिर्वाद आपल्या सर्वांच्या पाठीशी सतत राहोत अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

✧ ✧ ✧

# सकळांचा जीवलग सोयरा

**काकासाहेब आबासाहेब शिंदे** बी.एससी. (ॲग्री)
सेक्रेटरी, ज्ञानेश्वर नगर

आदरणीय घुले पाटलांशी तसे कौटुंबिक संबंध. पण त्यांचा निकट सहवास लाभला तो १९७६ पासून कॉलेज सुटल्यांनतर कारखान्यात नोकरीच्या निमित्ताने रूजू झालो सप्टेंबर १९७६ मध्ये. तेव्हापासून तर साहेबांच्या अखेरच्या श्वासापर्यंत तो मिळत राहिला. त्यांचे आदर्श व्यक्तिमत्व सतत डोळ्यासमोर ठेवून आतापावेतो प्रवास झाला.

त्यांच्या शालेय जीवनापासून तसेच जन्मदात्रीकडून सत्संस्काराचे बाळकडू त्यांना मिळाले होते. श्रीरामपूर येथे हायस्कूलमध्ये असताना बोर्डिंगचे कामकाजासोबतच राष्ट्रसेवादलाचे शाखानायक या पदाची जबाबदारीही पेलत गेल्यामुळे जनसेवेची वृत्ती अंगी बाणली होती. केवळ स्वतःच्याच प्रपंचाकडे बघत बसणे त्यामुळेच त्यांना कधी मानवले नाही. एरव्ही साहेबांनी शेवगांव-नेवासा तालुक्यांच्या विकासकामांकडे, सहकारी प्रकल्पाकडे, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाकडे सहज नजर टाकली तर त्यांनी या संस्थांच्या निकोप वाढीसाठी स्वतःच्या लौकिक जीवनाकडे व शरीरस्वास्थ्याकडेही दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. आयुष्याच्या ऐन उमेदीच्या काळातच पत्नीवियोगाचे दुःख त्यांनी गिळून टाकले आणि मुलाबाळांच्याविषयी सर्व कर्तव्ये निभावून नेत असताच स्वीकारलेल्या सामाजिक नेतृत्वातही कुठे कसर पडू दिली नाही. आणि हे करीत असता यशवंतराव गडाख, सुदामरावजी मते अशा तरूणांना योग्य मार्गदर्शन करून त्यांच्यातल्या नेतृत्वगुणाची वाढ त्यांनी केली. आजचे राजकीय वारे कसेही वहात असले तरी गडाख साहेबांचा राजकीय पिंड घुले पाटलांनी घडविला हें कुणीही नाकारणार नाही.

दोन्ही तालुक्यांच्या विकासाचा प्रपंच करीत असतांना साहेबांना कार्यकर्त्याच्या वैयक्तिक प्रपंचातही नेहमीच लक्ष पूरवून त्यांना त्यांच्या अडीअडचणीच्या काळात सर्वतोपरी मदतीचा हात दिला. आजही हजारो कार्यकर्त्यांच्या आठवणी या संदर्भात ताज्या आहेत. लग्नकार्ये, शिक्षण, आर्थिक व्यवहार खरेदी अशी अनेक प्रकारची कामे घेऊन जो कुणी त्यांचेकडे येई तेव्हा साहेब त्याला सहानुभूतीने समजून घेत असत व नेहमीच मदतीचा हात देत असत. दुसऱ्याला समजून घेणाऱ्याच्या अंगी आंतरिक निर्मळता व गोड



बोलणे या दोन गोष्टी आवश्यक असतात. त्यांच्या अभावी दुसऱ्याच्या सुखदुःखाशी समरस होताच येत नाही.

तुका म्हणे सुखे पराविया सुखें ।
अमृत हें मुखे स्त्रवतसे ॥

असं साधुत्वाचं दर्शन साहेबांच्या त्या मदतकार्यात घडून येई. त्यांच्या शब्दातील गोडवा, वाणीतील मधुरता, विचारातील तत्परता, दुसऱ्याचं अंतःकरण जाणून घेण्याची वृत्ती अशा विविध गुणांनी साहेब-

तो मज व्हावा तो मज व्हावा ।
वेळावेळा व्हावा पांडुरंग ॥ (ज्ञानदेव अभंग गाथा)

असे सर्वांनाच हवेहवेसे वाटत. दुसऱ्याशी, सर्वसामान्यांशी जवळीक साधणारे असे अनेक गुण साहेबांच्या ठायी होते. आणि त्यामुळेच त्यांचे लोकनेतृत्व लोकमान्य झाले होते. आपण करीत असलेले राजकारण हे समाजासाठीच तर आहे, अशी पक्की खूणगाठ साहेबांनी अंतरी बांधून ठेवलेली होती. त्यामुळे त्यांच्या राजकीय जीवनात राजकारण हा दुय्यम भाग ठरून समाजसेवेच्या वृत्तीला सहजच महत्वाचं स्थान लाभलं होतं. त्यांच्या राजकारणातला हा अतिशय मौलिक भाग होता. त्यांच्याकडे आलेला माणूस त्यांचाच होऊन जाई. माणुसकीच्या सूत्रात माणसांना बांधून ठेवण्याची विलक्षण किमया त्यांना साधली होती. त्यामुळे त्यांचे समग्र जीवन आणि स्वतःसाहेब हे सकळांचा जिवलग सोयरा बनून गेले होते. यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या समाजवादी लोकशाही विचाराचे निष्ठावंत पाईक म्हणवून घेण्यात त्यांनी आपल्या ऐहिक जीवनाची कृतार्थता मानली होती.

**दूरदृष्टीचे लेणें –**

भविष्याचा वेध घेणारी दूरदृष्टी साहेबांना लाभली होती. कोणत्याही संस्थेच्या उभारणीत पुढे येणाऱ्या अडचणींचा सुगावा ते आगावूच घेत. या दूरदृष्टीमुळे कोणत्याही योजना साकारीत असतांना व कार्यान्वित करताना कितीही अडचणी आल्या तरी त्यातून मार्ग काढून अंतिम ध्येय गाठले जात असे. तसेच संस्थेच्या निकोप वाढीसाठी व्यवहारातील नीटनेटकेपणा व काटकसरीचे धोरण ठेवण्याकडे साहेबांचा विशेष कटाक्ष असे.

✧ ✧ ✧



# त्याचा वेलू गेला गगनावरी

**विलासराव बापूसाहेब काकडे,**
प्रशासकीय अधिकारी, B. Com. L.L.B.
ज्ञानेश्वरनगर

**तें त्रिभुवनैक पवित्र । अनादि पंचक्रोश क्षेत्र ।**
**जेथ जगाचें जीवनसूत्र । श्रीमहालया असे**
**(श्रीज्ञानेश्वरी अ - १८)**

त्रिभुवनात जिच्या पावनतेची प्रसिद्धी आहे, अशी निधिनिवासाची भूमी म्हणजे सध्याचे नेवासे. ऐतिहासिक, पौराणिक पाश्वभूमी असलेल्या नेवाश्यात श्रीमद्‌भगवद्‌गीतेवर श्रीज्ञानदेवांनी मराठीत अजोड असे 'ज्ञानेश्वरी' हें भाष्य लिहिलें. याच पंचक्रोशीत भेंड्याच्या उजाड माळरानावर श्री. मारुतराव घुले पाटील यांनी श्रीज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचें 'सहकार शिल्प' सहकाराच्या माध्यमातून उभे केलें.

**मग आर्तांचेनि वोरसें । गीतार्थ ग्रथनमिसें ।**
**वर्षला शांतरसें । तो हा ग्रंथ ॥**
**असं आपल्या ज्ञानेश्वरीचं स्वरुप सांगून झाल्यावर तिचे -**
**पुढती पुढती पुढती । इया ग्रंथपुण्यसंपत्ती ।**
**सर्व सुखी सर्व भूतीं । संपूर्ण होईजो ॥ (ज्ञाने. अ. - १८)**

असें प्रयोजन श्रीज्ञानदेवांनी स्पष्ट केले आहे.

श्रीज्ञानेश्वर कारखान्याची - या सहकारशिल्पाची निर्मिती ही देखील अशा थोर उद्देशातूनच झाली आहे, केली गेली आहे असें साभिप्राय नमूद करावेसें वाटते. श्री. मारुतराव घुले पाटील यांनी राजकीय नेतृत्व लोकसेवेसाठी राबविले. सत्ता हें सेवेंचे माध्यम आणि साधनही असते ह्याचा आदर्श वस्तुपाठ त्यांनी घालून दिला आहे. कोणतीही सहकारी योजना राबविताना तिच्या उभारणीपासून विकासाचे शिखर गाठीपर्यंत लागणारी दूरदृष्टी, संयोजनासाठी लागणारें नियोजनकौशल्य, त्या कार्यात मधून मधून येणाऱ्या अडचणींवर मात करण्याचें धाडस या सर्व कार्यकौशल्यगुणांचा आढळ मारुतराव पाटलांच्या ठायी मूळचाच

होता. त्यांना स्वप्रयत्नांची जोड देण्यात त्यांनी आपले जीवनसर्वस्व वाहिले. आणि नेतृत्व व कर्तृत्व यांच्या जोडीला प्रयत्नांची पराकाष्ठा लाभल्यामुळे हा 'वेलू गगनावरी' गेला.

ते लोकनेते तर होतेच, पण **त्यांच्या नेतेपणाला 'जाणतेपणा'ची सुंदर किनार होती.** मानवसेवा हीच ईश्वरसेवा अशा मानवतावादी दृष्टीचे अधिष्ठानही होते. त्यालाच पुढे यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' अशी अत्युच्च ध्येयवृत्तीची जोड मिळाली. त्या विचारांच्या संगतीनेच त्यांनी आपल्या **'सेवेसाठी सत्ता' या ध्येयाला आपल्या जीवनात प्रतिष्ठित केले होते.** नेतृत्वासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व गुणांचे मीलन त्यांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा सर्वच योगदानात झाले होते. राजकारणात जवळजवळ चार पाच दशकांहून अधिक काळ राहूनही त्यांची राजकीय कारकीर्द कुठेही कलंकित झाल्याचे दिसत नाही. त्यांच्या ठायी मुळातच वास करणाऱ्या सत्त्वशीलतेचाच हा परिपाक होता. त्यांचे नेतृत्व लोकमान्य झाल्याचें दर्शन जिल्ह्यातील सर्व राजकारण धुरंधरांना, दिग्गजांना सतत घडत राहिले आहे. आजही तें तसेच पूर्वीच्या तेजानेच घडत आहे.

आदरणीय साहेबांच्या व्यक्तिमत्वाला बहुविध पैलू होते. त्यांनी उभे केलेल्या सर्वच सहकारी प्रकल्पांतून त्या तेजस्वी पैलूंचे दर्शन आजही घडते. पुढेही चिरंतन घडत राहील.

### सेवावृत्तीला करुणावृत्तीचे अधिष्ठान

कारखान्याच्या कामगारांचा बोनसचा प्रश्न घेऊन जेव्हा जेव्हा संघटनेचे पदाधिकारी त्यांचेकडे जात आणि 'कामगारांना इतका बोनस मिळालाच पाहिजे' असा आग्रह धरीत, तेव्हा सर्वसामान्य ऊस उत्पादकाकडे, शेतकऱ्याकडे बोट दाखवून ते म्हणत, ''अरे, यांच्याहीकडे जरा लक्ष असू द्या. आज पंचवीस - तीस वर्षे झालीत. त्यांच्या छपरांवरचं पाचट निघालं नाही. त्यांच्याही खिशात दोन पैसे जाऊ देत.'' साहेबांच्या या बोलण्याने 'आपलं मागणं अवाजवी' असल्याचं मागणाऱ्यांच्या लक्षात येईल.

**प्रभावी वक्तृत्व** – साहेब अनेक सभा - संमेलनांमधून भाषण करीत. कारखान्याच्या कार्यस्थळावरही हंगाम सुरू होतांना बंद होतांना वा अन्यत्र अनेक कामांसाठी सभा होत. त्यावेळी साहेबांचे जे भाषण होई, ते ऐकतच रहावे वाटायचे. एक प्रकारची खोली त्यांच्या भाषणांना असे. तिथे उक्तीला कृतीचें अधिष्ठान असे. त्यामुळे वक्तृत्वाचा प्रभाव प्रकट होई. त्यांच्या भाषणात कसचा उपदेश वगैरे नसे, पांडित्याचें अवडंबरही नव्हते. एक वेगळेच आकर्षण त्यात राही. त्यांनी आजवर अभ्यासलेल्या कितीतरी सकस व समृद्ध साहित्याचा परिणाम मात्र त्यामधून सहज जाणवत असे.

### अध्यात्माचे अधिष्ठान

आजकाल शिकून सवरून शाळा-कॉलेजमधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांजवळ देव, धर्म, अध्यात्म,



परमार्थ इ. विषयी अनास्था, उदासीनता असते. अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणे असतें. तरुण वर्गात आढळून येणाऱ्या उदासीनतेमुळे तरुण पिढी दांभिकतेकडे, नैराश्याकडे झुकलेली दिसत असते. साहेब हें पाहून विषण्ण होत. त्यांच्या विचारांना मात्र बऱ्याचदा हें खटकत असे. अशावेळी न राहवून ते लगेचच म्हणत -'' अरे, तूच काही सगळं करणारा नाहीस. तू निमित्तमात्र आहेस. अंतिम सत्ता कुणाची तरी आहे, इकडे लक्ष असू दे. Man is an architect of his own fate - माणूस आपल्या भविष्याचा शिल्पकार आहे हें **विधान म्हणजे अर्ध सत्य आहे.** अंतिम सत्ता जी आहे, तिचं सामर्थ्य कल्पनातीत आहे. म्हणून 'मी कर्ता' असं म्हणू नकोस.

**सहज बोलणे हाचि उपदेश**

साहेब संत होते असा दावा मी करीत नाही. **परंतु संतप्रवृत्तीचे राजकारणी होते** हें विधान मला करावेसे वाटते. सांस्कृतिक मंडळातर्फे कार्यस्थळावर अनेक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात असे. वर्षभरातून त्यांपैकी पाच सहा वेळा तरी ते आवर्जून उपस्थित रहात. कामगार, महिला मंडळ, बालगोपाल यांचेसमोर ते उद्‌बोधक भाषण करीत. अशाच एका प्रसंगी तिळगूळ वाटपप्रसंगी साहेबांनी तिळगूळ देण्याघेण्यामागील एक सांस्कृतिक हेतू प्रकट केला. ते म्हणाले, ''आपण तिळगूळ देतो व घेतो, तसेच दररोज एकमेकांच्या गाठी-भेटी होताना आपण 'रामराम' करतो. यातही फार खोल अर्थ आहे. तो असा - 'तूही राम व मीहि राम' असे असल्यावर मग कलहाचे कारणच उरत नाही. सहकारातही असेंच परस्परप्रेम अपेक्षित असते.''

**चिंतनाची पार्श्वभूमी –**

**कोणतंही काम हाती घेतांना त्याचा आरंभ, मध्य, शेवट अशा त्रिस्तरांवर ते दहादा विचार करीत. मग निर्णय पक्का झाला की येणाऱ्या अडचणींना सामोरे जाण्याची दिक्कत वाटत नसे. साहेबांच्या प्रत्येक विधायक विचाराला चिंतनाची अशी व्यापक पार्श्वभूमी असे.**

'हात लावीन तिथं सोनं' अशा सामर्थ्याचे दैवी सद्‌गुणांचा परिस्पर्श साहेबांनी परिसरात उभारलेल्या सर्वच सहकारी प्रकल्पांना सतत होत राहण्याचें भाग्य लाभल्यानें हें 'इवलेसें रोप' विशाल वृक्षात परिणत होऊन **'त्याचा वेलू गेला गगनावरी' हें पहाण्याचे भाग्य तुम्हा–आम्हाला लाभले आहे.**

✧ ✧ ✧

# साहेब - सहकारातील अर्थतज्ज्ञ

**विठ्ठलराव बा. चौधर** (B.com)
अर्थव्यवस्थापक, ज्ञानेश्वरनगर

ऑक्टोबर १९७७ पासून कारखन्याच्या लेखा विभागात लेखापाल म्हणून मी सेवेत आहे. कारखान्याचे आद्य प्रवर्तक मा. मारुतराव पाटील यांची प्रशासनातील आर्थिक नियोजनाची दृष्टी संस्था, ऊस उत्पादक सभासद आणि कामगार या तीनही घटकांच्या कल्याणाचा मूलगामी विचार करणारी कशी होती याचा अगदी जवळून प्रत्यय घेतां आला. अर्थव्यवस्था आणि अर्थनियोजन कोणत्याही संस्थेच्या शरीरातील प्राणतत्त्व असते. संस्थेच्या प्रवर्तन प्रक्रियेतील हा महत्त्वाचा घटक असल्याने तो अत्यंत कुशलतेने हाताळावा लागतो. हें कौशल्य मा. साहेबांच्या सर्वच निर्णयातून दृष्टिगोचर होत असे.

मा. आर्. एम्. जगधने साहेब हे कार्यकारी संचालक म्हणून सेवेत रुजू झाले. त्यांच्या कार्यकालात मला डेप्युटी चीफ अकौंटंट म्हणून पदोन्नती मिळाली. तदनंतरच्या काळात चीफ अकौंटंट आणि सध्या फायनान्स मॅनेजर म्हणून काम करण्याची संधी मिळाली. मा. साहेबांचे मार्गदर्शन आणि श्री. जगधने साहेबांचे कुशल प्रशासन या दोन्हीच्या संगमात कारखान्यची आर्थिक घडी चांगलीच मजबूत बसली. कारखाना हा एक रथ असून ऊस उत्पादक शेतकरी व कामगार ही त्या रथाची दोन चाके आहेत. त्यामुळे या दोहोत संतुलन राखण्यासाठी मा. साहेबांचे नियोजन कौशल्य पणास लागत होते.

**विशेष समदृष्टीचे लेणे**

या भागातला कोणीही येवो मग तो कार्यकर्ता असो, एखाद्या संस्थेच्या पदाधिकारी असो, शेतकरी वा कामगार असो - त्या प्रत्येकाकडे पहाण्याची, त्याच्या अडचणीचा विचार करण्याची मा. साहेबांची समदृष्टी असायची. तिथे आपपर भाव, कार्यकर्ता वा विरोधक असा भेदभाव मुळीच नव्हता. सर्वसामान्य माणूस हा त्यांच्या दृष्टीने देव होता. त्याची सेवा म्हणजेच ईश्वरी सेवा आहे, असं ते त्यांच्या भाषणांतून वारंवार सांगत. समदृष्टीचे हे लेणे साहेबांना मोठ्या भाग्यानेच लाभले होते, असे म्हणावेसे वाटते.

कोणत्याही सहकारी संस्थेचे यशापयश हे तिच्या आर्थिक नियोजनावर अवलंबून असतं. जेव्हा एखाद्या भागात सहकारी साखर कारखानदारी उभी राहते, तेव्हा त्या भागातल्या सुमारे एक लाखाहून अधिक माणसांच्या जीवनाला - उदरनिर्वाहाला - आधार होत असतो. सहकारातून सर्वोदय शक्य होतो,

पण तो नियोक्त्याच्या नियोजन कौशल्यावर अवलंबून असतो. हें नियोजनकौशल्य मा. साहेबांच्या अंगी मूळचेच होते. ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे पेमेंट, तोडणी कंत्राटदारांचे पेमेंट आणि कामगारांचे दरमहाचे पगार, बोनस इ. करीत असतां संस्थेचे हित सर्वप्रथम जोपासण्याकडे त्यांचा विशेष कटाक्ष असे. हे करीत असतां त्यांच्यात कधीही आजपावेतो दुरावा झालेला नाही. सहकारी साखर कारखाना ही मुख्य औद्यौगिक वास्तु व तदनुषंगाने येणारे इतर प्रकल्प उदा. आसवनी प्रकल्प, उपसा जलसिंचन योजना, कंपोस्ट खत प्रकल्प, फळबाग प्रकल्प, शाळा - कॉलेज - तांत्रिक शिक्षण संस्था इ. शैक्षणीक प्रकल्प, नागरी पतसंस्था, दुग्धविकास प्रकल्प इत्यादींचा विकास तेवढ्याच गतीने होत राहाण्यात मा. साहेबांची दूरदृष्टी मूळ कारण होती. श्रीज्ञानेश्वर कारखाना हा शेवगांव नेवासा परिसराच्या विकासाचा केंद्रबिंदू आहे. नगर जिल्ह्यातील साखर कारखानदारीतला मानाचा तुरा ठरावा असा लौकिक केवळ साहेबांच्या आर्थिक दूरदृष्टीचा व निर्णायक धोरणांमुळे आहे.

कारखान्याच्या आर्थिक व्यवहाराबाबत मा. संचालक मंडळाच्या सभेत निर्णय होत. त्या निर्णयांची कार्यवाही कार्यकारी संचालकांमार्फत होई. परंतू झालेल्या निर्णयानुसार कार्यवाही होत आहे की नाही, याची संपूर्ण माहिती साहेबांना असे. त्या त्या वेळचा आर्थिक आढावा त्यांच्याजवळ अलिखित स्वरुपात तयार असे.

**प्रभावी आर्थिक नियोजनाची काही उदाहरणे**

कारखान्याची प्रतिदिन गाळप क्षमता ३००० टीसीडी वरुन ५००० टीसीडी असा विस्तारीकरणाचा निर्णय झाला. प्रत्यक्ष विस्ताराचे काम १९९९ - २००० च्या ऑफसीझनमध्ये सुरु झाले. स्वभांडवलातून सुरवातीचे काम सुरु केले. दीर्घ मुदतीचे कर्जासाठी I. F. C. I कडे कर्जप्रकरण सादर केले. प्रस्ताव तपासणी झाली. प्रस्तावानुसार रु. २२.६० कोटी पैकी ५०% कर्ज बँक व वित्तीय संस्थांकडून ४०% कर्ज एस.डी.ए.एफ व १०% स्वभांडवलातून अशी प्रोजेक्ट कॉस्ट निश्चित झाली. सदर विस्तारवाढीचे काम ऑफ सीझनमधेच होणे आवश्यक होते. स्वभांडवलाची रक्कम संपली. जि.म.सह.बँकेकडून ५३० लाख रुपये मध्यम मुदत कर्ज उचलले. विस्तार वाढीसाठी आर्थिक उपलब्धता आणखी व्हायला हवी होती. I.F.C.I. Ltd. कडे फंडस् उपलबधता नसल्याने अन्य बँकेकडून पैसा उपलब्ध करणेसाठी N.O.C. दिली. त्यावर मा. साहेबांनी बँकेशी संपर्क साधून त्वरित अंतरिम कर्ज उपलब्ध करुन दिले आणि नंतर रेग्युलर मध्यम मुदत कर्ज ६०० लाख रुपये मंजूर करुन घेऊन ऑफ सीझन संपण्याआधीच विस्तारवाढीचे मशिनरी उभारणीचे काम करुन घेतले. मा. साहेबांच्या कल्पक आर्थिक ध्येयधोरणांमुळे व सततच्या परिश्रमातून हे Expansion चे स्वप्न साकार झालें. शरीराची कार्यक्षमता शरीरात संचारणाऱ्या प्राणशक्तीवर अवलंबून असते. **'श्रीज्ञानेश्वर 'च्या संस्थारुपी शरीरात मारुतराव पाटील हे असेच प्राणतत्व होते.**

✧ ✧ ✧



# परिसराचा मायबाप

**रामदास वि. कदम,** M.Sc. (Agri)
कृषि व्यवस्थापक, ज्ञानेश्वरनगर.

आमचं शहरटाकळी गांव. दहिगांवच्या दक्षिणेस पाच मैलांवर गांवात प्राथमिक शिक्षणाची सुविधा फक्त होती. इथेच सातवीपर्यंतचा शिक्षणक्रम मी पूर्ण केला. पुढील शिक्षणाची माझ्या वडिलांना चिंता पडली. वडील स्वातंत्र्य सैनिक होते. आणि आमच्या भागाचे आमदार मा. श्री. मारूतराव पाटील यांचे एक निष्ठावंत कार्यकर्तेही होते. १९६६ चा तो काळ. त्यावेळी दहिगांवला हायस्कूल होते. शेवगांव हे तालुक्याचे गांव. पण आमच्या गांवापासून बऱ्याच अंतरावर. त्यामुळे माझे वडील साहेबांकडे गेले. ''पोरगा सातवी पास झालाय. त्याला प्रथम श्रेणी व चांगले मार्क मिळालेत. त्याला तुमच्या हायस्कूलमध्ये शिक्षणासाठी आणून घालतो'' असं त्यांना म्हणाले, ''घाल ना आणून. अडचण काय आहे ?'' साहेब म्हणाले, ''अडचण तशी धान्य देण्याची आहे. मी फक्त दोन पोतीच देऊ शकेन. तेवढ्यावर भागवून घ्या'' वडील विनवून म्हणाले. साहेबांचे हृदय द्रवले. ते म्हणाले, ''अरे बाबा, अगोदर पोराला हायस्कूलला आणून घाल, बाकीचं नंतर पाहू.''

सर्वसामान्य माणसांना त्यांच्या अडचणीच्या परिस्थितीत हातभार देण्याची व त्याला तीमधून बाहेर काढण्याची माउलीची ममता साहेबांच्यात होती. त्यांच्या सगळ्याच सेवाकार्याला असं प्रामाणिक सेवावृत्तीचं अधिष्ठान होतं. आमच्या तालुक्याचे लोकप्रतिनिधी नुसते लोकप्रतिनिधी म्हणून कधी मिरवले नाहीत. लोककल्याणाची खरी तळमळ त्यांच्यात उपजतच होती. तिचे लोभस दर्शन सतत होते. लोकांनी दिलेली सत्ता लोकांसाठीच वापरली जायला हवी असा त्यांचा दंडक असे. **लोकांविषयीचा कृतज्ञतेचा भाव त्यांच्या अंतःकरणात सतत जागता होता.**

जायकवाडी धरणात जमिनी गेल्यामुळे हजारो शेतकरी विस्थापित झाले. त्यांच्या वेदनांनी साहेबही विव्हळ झाले. अशा दुर्धर परिस्थितीत विस्थापितांचं पुनर्वसन योग्य रीतीने व्हावं म्हणून शासन दरबारी प्रयत्न करतांना या माणसाने जिवाचे रान केले. त्या भागातल्या शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शेवगांवी तांत्रिक शिक्षणाची सुविधा शासनातर्फे करवून घेतली. त्यांना नवीन गांवठाणे जी दिली गेली तिथे सर्व मूलभूत सुविधा प्राप्त करून देण्यासाठी परोपरीने प्रयत्न केले. धरणग्रस्तांच्या हालअपेष्टांना खरोखर पारावार



नव्हता. त्यांच्या वेदना आपल्याच समजून त्यांचा उपशम करण्याच्या उद्देशाने शेवगांव-नेवासा तालुक्यात एखादा सहकारी तत्त्वावर साखर कारखाना काढण्यावर त्यांनी कार्यकर्त्यांशी विचार-विनिमय केला. भागात त्यासाठी बैठका सुरू झाल्या. त्या बाबींवर सर्वांगीण चर्चा होऊ लागल्या. धरणात जमिनी गेल्यामुळे बेरोजगारीची गंभीर समस्या निर्माण झाली होती. साखर कारखान्यामुळे हा प्रश्न बऱ्याच अंशी निकालात निघेल असा विश्वास कार्यकर्त्यांत निर्माण केला गेला. त्या दिशेने कार्यवाहीची चक्रे फिरू लागली. नवीन साखर कारखाण्यास परवाना मिळणें सोपी गोष्ट नव्हती. अनेक शासकीय अडचणी वाटेत उभ्या होत्या. परंतु साहेबांनी मा. ना. अण्णासाहेब शिंदे यांचे मदतीने परवाना मिळविलाच.

कारखान्याच्या उभारणीसाठी आर्थिक अडचणीही भरपूर होत्या. साहेब जिल्हा सहकारी बँकेत सुरवातीपासून संचालक म्हणून होते. या बँकेतून सहकारी सोसायट्यांच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून दिले.

आमच्या लोकप्रतिनिधीना लोकांविषयी कमालीची आपुलकी होती. त्यांचं राजकारण लोकाभिमुख होतं. सत्तेचा वापर लोकसेवेचे साधन म्हणून केल्यामुळे जिल्ह्यात त्यांच्या शब्दाला खूप वजन होतं. त्यात नैतिकतेमुळे लोकांना साहेबांविषयी आदरबुद्धी वाटायची. एखादे काम हाती घेतले की ते पूर्ण झाल्याशिवाय थांबायचे नाही. यामुळे एक प्रकारचा आत्मविश्वास यायचा.

साहेबांची स्मरणशक्ती काही अलौकिक होती. माणूस पारखण्याची त्यांची खासी हातोटी इतर पुढाऱ्यांत विशेषकरून न दिसणारी गोष्ट होती. १९७४ मध्ये कारखान्यासाठी शेअर कलेक्शनसाठी आम्ही परिसरात घरोघरी गेलो. रात्रंदिवस काम करावें लागे. परंतु कामाचा कधी बोजा वाटला नाही किंवा कोणी कामाचा बाऊ केला नाही. हाती घेतलेल्या कामात 'शेंडी तुटो का पारंबी तुटो' असा अदम्य प्रयत्नवाद साहेबांचा होता. त्यामुळे आलेल्या किंवा येणाऱ्या प्रसंगात ते कधी डगमगले नाहीत.

आमच्या तालुक्याचा सर्वांगीण कायापालट करण्यात साहेबांचा सिंहाचा वाटा होता. हें काम आपल्या सर्वांचे आहे. सर्वांनी मिळूनच ते प्रामाणिकपणे ते केले पाहिजे. आपली भूमिका सेवकाची ठेवावी असे ते म्हणत.

परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी साहेब आणखी पंधरा वीस वर्षे हवे होते, असं सगळ्यांना मनापासून वाटे. पण ईश्वरेच्छा बलवान असते. तीनुसार सर्व काही होतं. साहेब आज शरीराने आपल्यात नाहीत. त्यांनी उभे केलेले कार्य आणि त्यांचे विचारधन आपल्यापुढे आहे. परिसराचा मायबाप असलेला हा संतवृत्तीचा माणूस आपल्याला लाभला होता.

✧ ✧ ✧



# सहकारातील ज्ञानेश्वर


**प्राचार्य डॉ. के. एस्. सोनवणे**

(M. Sc. Ph.D.)

जिजामाता कला व विज्ञान महाविद्यालय, ज्ञानेश्वरनगर


माझा मराठाचि बोलु कौतुके ।
परी अमृतातेही पैजा जिंके ॥
ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ॥ - (श्रीज्ञानेश्वरी)

सुमारे ७०० वर्षांपूर्वी 'पैस' ला साक्षी ठेवून मराठीचा सार्थ अभिमान ज्यांनी सांगीतला ते ज्ञानीयांचे ज्ञानी, गुरुंचे सद्गुरु व चिंतकांचे चिंतामणी संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वर माउलींच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या ज्ञानेश्वरनगर, नेवासेच्या ह्या पावन भूमीत २० व्या शतकाच्या उत्तरार्धात **श्री. मारुतराव घुले पाटील ह्यांच्या रुपाने सहकारातील ज्ञानेश्वरच अवतरले होते** असे प्रकर्षाने जाणवते. अशा ह्या सहकारातील ज्ञानेश्वरांचे नेतृत्व व कर्तृत्वाचा जबरदस्त पगडा ह्या नेवासा - शेवगांवच्या तसेच नगर जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रावर सुमारे गेली ४ ते ५ दशके होता, ह्यांत कोणतीही शंका नाही.

महाराष्ट्राचे थोर सुपुत्र महात्मा ज्योतिबा फुले ह्यांनी ग्रामीण महाराष्ट्राच्या दुर्गतीची जी कारणमीमांसा केली, ती स्वातंत्र्योत्तर काळात आजही तंतोतंत लागू पडते. ग्रामीण महाराष्ट्राच्या दुर्गतीला आर्थिक दुरावस्था जितकी कारणीभूत आहे तितकीच शैक्षणिक अवस्था देखील कारणीभूत आहे. महात्मा फुलेनंतर ज्या काही नरोत्तमांना हे समजले त्यात महर्षी कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, कर्मवीर थोरात, हिरे इ. चा समावेश होतो.

या सर्वांच्या कामापेक्षा घुले साहेब ह्यांच्या कामाला अधिक एक संदर्भ जोडलेला आहे. नगर जिल्ह्याच्या दक्षिणेकडील ग्रामीण भागात क्रांतीकारक व आर्थिक बदल घडवून आणणारी सहकारी साखर कारखनदारी घुले पाटलांनी सुरु केली, ती महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री - एक सच्चे भूमीपुत्र कै. यशवंतराव चव्हाण यांच्या वैचारिक वारशातूनच. सहकारी तत्वांशी असलेली बांधीलकी, अजोड अथक परिश्रम व खंबीर एकमुखी नेतृत्व ह्या त्यांच्या गुणांमुळेच नगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील पहिल्या सहकारी साखर



कारखान्याचा ह्या इवल्याशा वेलुचे १९७० साली रोपण झाले व पहिल्या गळीत हंगामाच्या रुपाने पहिली पालवी फुटली ती १९७४ साली नेवासा - शेवगांवच्या मध्यावर असलेल्या भेंडयाच्या ह्या उजाड, ओसाड एकेकाळी उघड्या - बोडक्या असलेल्या माळरानावर औद्योगिक क्रांतीचे, शैक्षणिक संस्कृतीचे नवीन रोपटे लावले गेले. त्याचेच रुपांतर आज ज्ञानेश्वर उद्योग समुहरुपी वटवृक्षात झाले आहे, व त्याच्या सुखद छायेखाली अनेकांचे संसार बहरत आहेत. अनेक वर्षे दारिद्र्याच्या छायेत वावरणाऱ्या भूमीपुत्रांच्या जीवनात नंदनवन फुलले हे सुध्दा ह्या ज्ञानीयांच्या राजांमुळेच.

माणसं जन्माला येतात, परिस्थितीनुरुप घडतात. कधी - कधी परिस्थिती त्यांच्यावर मात करते तर कधी ते परिस्थितीवर मात करतात. परिस्थितीतून मिळणाऱ्या आव्हानांना सामोरे जाणारे कर्तृत्व नेहमीच बहरुन गेलेले अपाणास थोरा-मोठ्ठ्यांच्या चरित्रातून वाचावयास मिळते, समाजात पहावयास मिळते. जिद्द, चिकाटी, अथक परिश्रम, सचोटी, दूरदृष्टी इ. सद्गुणांचे पाठबळ जोडीला असले म्हणजे कोणत्याही कार्यासाठी आकाशाची सीमा देखील कमी पडते. अशाच खडतर, पाटपाण्याची फारशी सोय नसलेल्या, कायम दुष्काळाचे सावट असणाऱ्या नेवासा-शेवगावच्या भागातील उपेक्षित व अज्ञानी समजल्या जाणाऱ्या त्या वेळच्या गोरगरीब शेतकऱ्यांना संघटीत करुन भगीरथ प्रयत्नाने ज्ञानेश्वरच्या माध्यमातून सहकाररुपी गंगा ह्या परिसरात आणली ती घुले पाटील साहेबांनीच.

त्यांनी उभारलेल्या ह्या सहकार गंगेमुळे, सहकार पंढरीमुळे - ह्या साखर कारखानदारीमुळे समाजातील - विविध जाती धर्मातील लोकांना - रोजगार मिळाला व कारखान्यात 'कांदा-मुळा-भाजी, अवघी विठाई माझी' अशी अवस्था झाली ग्रामीण, अडाणी व दारिद्याने पिचलेल्या शेतकऱ्यांच्या हातात पैका मिळू लागला व त्याच्या अंगणी समृध्दी डोकावू लागली. महात्मा फुलेंच्या विश्लेषणाप्रमाणे वित्त हातात आले. तरीही ग्रामीण शेतकऱ्यांच्या जीवनात जे परिवर्तन ह्या ज्ञानियास अपेक्षित होते ते घडतांना दिसत नव्हते. विद्येविना मति जाते हे लक्षात ठेवून घुले साहेबांनी ह्या कारखाना परिसरात शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ रोवून ज्ञानाची कवाडे भूमिपुत्रांसाठी खुली केलीत. सहकारातून शिक्षण व शिक्षणातून सुसंस्कृत माणूस घडवला पाहिजे असे स्वप्न ह्या ज्ञानियाने पाहिले व ते वास्तवात आणण्याच्या दृष्टीने अथक प्रयत्न केलेत.

ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रचार व प्रसार झाला पाहिजे हा शिक्षणमहर्षी भाऊराव पाटलांचा बीजमंत्र विचारात घेवून त्यांनी १९७९ साली शिक्षण संस्थेची स्थापना केली. तसेच सदर शिक्षण संस्था स्वतःच्या मालकीची व आप्तेष्टांची न करता विश्वस्त मंडळाच्या मालकीची केली. सदर संस्थेची घटना देखील अजोड व अतुलनीय अशीच आहे. ज्या - ज्या वेळी कारखान्याचे संचालक मंडळातील संचालक आणि कार्यकारी संचालक निर्वाचित होतील व नेमले जातील ते - ते नवीन संचालक आपोआप ह्या विश्वस्त



मंडळाचे विश्वस्त म्हणून काम पहातील. त्यांची वेगळी नेमणूक करण्याची आवश्यकता रहाणार नाही. त्याचप्रमाणे संचालक पदावर न राहिलेले संचालक विश्वस्त म्हणून आपोआपच निवृत्त समजण्यात येतील. अशा पध्दतीने शिक्षण संस्थेची संपूर्णपणे लोकशाहीवादी घटना ही आजच्या खाजगीकरणाच्या काळात अतुलनीय अशीच म्हणता येईल.

शिक्षणसंस्थेच्या माध्यमातून घुले साहेबांनी परिसरातील कष्टकऱ्यांच्या मुलांसाठी माध्यमिक, उच्च माध्यमिक तसेच उच्च शिक्षणाची सुविधा अनुक्रमे जिजामाता विद्यालय व महाविद्यालयाच्या स्वरुपाने उपलब्ध करुन दिली. त्याचप्रमाणे औद्यौगिक प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून तांत्रिक शिक्षणाची तसेच कृषि- विद्यालयाच्या माध्यमातून कृषी - शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्यात. त्याच प्रमाणे परिसरातील शेतकऱ्यांना कृषि मार्गदर्शनासाठी १९९० साली त्यांनी ज्ञानेश्वर कृषि विज्ञान फार्म सुरु केला व ह्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकले, व ह्या भागाचा औद्योगिक व शैक्षणिक दृष्ट्या चेहरा - मोहराच बदलला. घुले पाटील साहेब खऱ्या अर्थाने ह्या भागाचे शिल्पकार होते. अनभिषिक्त सम्राट होते. सामान्य माणसांच्या हृदयसिंहासनावर कळत नकळत विराजमान झाले होते. त्यामुळे समाजमनाकडून त्यांना आदराने उत्स्फूर्तपणे मालक ही उपाधी मिळाली होती.

वास्तवात मात्र ते ज्ञानेश्वर उद्योग समुह व शिक्षण संस्थेचे व त्यातील घटकांचे चालक होते. ह्याच वेळी सर्वांचा अंतरात्मा मात्र म्हणत असतो की ते आमचे 'पालक' देखील होते.

त्यांच्या रुपाने एक चारित्र्यसंपन्न व निर्मळ व्यक्तीमत्व अशी प्रतिमा त्यांनी जनतेसमोर कायम ठेवली. सत्ता हे अळवावरचे पाणी आहे, या नीतीने ह्या परिसरात त्यांनी कारभार चालविला होता. जातिपातिच्या आधारावर चाललेल्या राजकारणास त्यांचा प्रखर विरोध होता. शेतकरी हीच आमची जात व मानवता हाच आमचा धर्म हे त्यांचे तत्त्व होते व ते त्यांनी जीवनाच्या अंतिम श्वासापर्यंत पाळले. तसेच दिलेल्या शब्दाला जागणे हा त्यांचा स्वभाव-विशेष होता. ते एक कर्मयोगी होते. सहकारक्षेत्र व शिक्षण क्षेत्रातील अशा ह्या महामुनींचे विविध क्षेत्रातील अनन्य योगदान व महती क्रेंद्र शासनाकडून त्यांना १९९५ साली इंदिरा गांधी प्रियदर्शिनी पुरस्कार मिळाला अशा या महामानवाचे जीवन दैदीप्यमान होते, दिव्य होते.

त्यांच्या परम पावन स्मृतीस शतशः वंदन.

✧ ✧ ✧

# परिवर्तनयुगाचा प्रेरणास्त्रोत - मारुतराव पाटील

**भय्यासाहेब देशमुख**
(बी. ए., बी. एड्.)
उपप्राचार्य, जिजामाता माध्यमिक विद्यालय,
उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, जि. अहमदनगर

नव महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण साहेबांनी महाराष्ट्राला प्रगतीची व विकासाची एक नवी दिशा दिली. कार्यकर्त्यांना ते सांगत, ''आता आपल्याला देश घडवायचा आहे. त्यासाठी सर्वांनी एकत्र यायला हवे. देशविकासाची लांबच लांब सफर सुरू झाली आहे. लोकशाही समाजवादाच्या या दिंडीत आपण सर्वांनी सामील झाले पाहिजे.'' त्यांच्या या आवाहनाला अहमदनगर जिल्ह्यातील सर्वश्री. आबासाहेब निंबाळकर, पद्मश्री विखे पाटील, शंकरराव काळे, अण्णासाहेब शिंदे, भाऊसाहेब थोरात, बाबुराव बापूजी तनपुरे, शंकरराव कोल्हे, मारुतराव घुले पाटील अशा ज्ञात अज्ञात हजारो कार्यकर्त्यांनी उत्कृष्ट साद दिली. या परिवर्तनाच्या गंगेतला आपण एक बिंदू आहोत अशी सर्व कार्यकर्त्यांची धारणा त्यावेळी होती. मा. यशवंतरावजींच्या नवविचाराचे असे महाराष्ट्रभर स्वागत झाले. लोकशाही समाजवादाची व कृषि औद्योगिक विचाराची पताका खांद्यावर घेवून जो तो विकासकार्याला लागला. सामूहिक नेतृत्वाचा पाठपुरावा करीत श्री. मारुतराव पाटील यांनीही गावपातळीपासून जिल्हापातळीपर्यंत त्या माध्यमातून जनसेवेच्या कार्यात स्वतःला झोकून दिले. त्यांची सेवावृत्तीची प्रेरणा जिल्हास्तरावरदेखील कार्यकर्त्यांना प्रेरक ठरत होती.

माणसे मोठी होतात ती त्यांच्या कर्तृत्वाने. समाजकारण, राजकारण, सहकार ही लोकसेवेची माध्यमे आहेत. भूतकाळाचा आधार घेत वर्तमानाच्या राजमार्गावरून भविष्यातील यशोमंदिराकडे सातत्याने वाटचाल करीत राहाणे हे मारुतराव पाटलांचे जीवन होते. त्यांची यशवंतनिष्ठा त्यांना या वाटचालीत अखंड साथ देत राहिली होती. चव्हाणसाहेबांच्या नवविचारांना त्यांनी आपल्या जीवनात प्रतिष्ठित केले होते. ती तत्त्वे प्रत्यक्षात उतरविली होती. उच्च विचार, आचार, कृतिशीलता यांचे सुरेख संमेलन मारुतराव पाटलांच्या जीवनात आणि त्यांनी अंगिकारलेल्या सर्वच सेवाकार्यात घडून येत होते. शेवगांव-नेवासा परिसरात आज जो सर्वांगीण विकास झालेला दिसून येतो त्या सर्वांच्या बुडाशी मारुतराव पाटलांची कर्तृत्वशीलता आहे,



हे सांगायला कुणा एखाद्या दैवज्ञाची आवश्यकता नाही. गावपातळीवरून त्यांच्या सेवेचा श्रीगणेशा झाला. सहकारी सोसायटीची स्थापना, जनता शिक्षण संस्था, ग्रामपंचायतीचा लोकाभिमुख कारभार, सहकारी तत्त्वावरचा ग्रेनडेपो, मत्स्यव्यवसाय संस्था, श्रमदानातून श्रमप्रतिष्ठा इ. कार्ये सुरू झाली. गांवच्या ग्रामपंचायतीचे सरपंचपद एका मागासवर्गीय महिलेकडे वीस वर्षांपासून आहे. गांवचा कारभार असा सर्वसमावेशक आणि लोकाभिमुख ठेवण्यात आला होता.

शेवगांव तालुका मार्केट कमिटी, खरेदी विक्री संघ, शेतकी संघ, जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी या संस्थांवर व जिल्हा सहकारी बँकेवरही स्थापनेपासून संचालकपदावर काम करून त्यांनी आपल्या सेवावृत्तीची मुद्रा कोरली. त्यांच्या ग्रामीण नेतृत्वाची सीमा जिल्हा पातळीवर गेली. आबासाहेब निंबाळकर, बाळासाहेब भारदे आदींनी मारुतरावांना काँग्रेसच्या कार्यासाठी प्रेरित केले. कार्यकर्त्यांची एक प्रचंड फळी उभी केली. महाराष्ट्र भूषण यशवंतरावजींनी १९६२ मध्ये त्यांना शेवगांव-नेवासा मतदार संघातून विधानसभेसाठी उभे केले आणि सतत १० वर्षे या भागाचे आमदार म्हणून ते प्रचंड मताधिक्याने निवडून आले. नंतरही ६ वर्षे विधानपरिषदेचे आमदारपदही त्यांनी भूषविले. जिल्हा काँग्रेसचे अध्यक्षपदावरही ते सतत (१९६४ ते १९७४) दहा वर्षे होते. राहुरीत झालेल्या अखिल महाराष्ट्र काँग्रेसचे अधिवेशन पार पाडण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. राहुरी कृषि विद्यापीठ, मुळा व जायकवाडी धरणांच्या कामी त्यांचा पुढाकार होताच. धरणामुळे विस्थापितांसाठी पुनर्वसनाचा कायदा करण्यासाठी त्यांनी सरकारला भाग पाडले.

केवळ विचारांवरच विसंबून न बसता विचारांना कृतीची जोड त्यांनी दिली. जायकवाडी धरणामुळे विस्थापित झालेल्या हजारो शेतकऱ्यांच्या जीवनाला स्थिरता देण्याच्या प्रयत्नातून या भागात सहकारी साखर कारखाना काढण्याचा निर्णय झाला. यातून उभा राहिलेला श्रीज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना आज महाराष्ट्रातील साखर कारखानदारीचा शिरपेच ठरला आहे. कच्च्या मालाच्या उत्पादनासाठी पुरवठा व्हावा म्हणून जायकवाडीच्या बॅकवॉटरवर कारखान्याच्या सहकार्याने अनेक उपसा जलसिंचन योजना उभ्या करून उसउत्पादन समृद्ध केले. सर्वसामान्य माणसांच्या जीवनात पत आणि अर्थ निर्माण करून समृद्धीचा पाझर निर्माण केला. आर्थिक सक्षमता, उत्कृष्ट नियोजन, अचूक निर्णय यामुळे कारखान्याने उत्तरोत्तर प्रगती करून राज्य व राष्ट्रीय पातळीवरचे चार पुरस्कार मिळवून दिले. परिसर विकासाच्या सर्वच कार्यात त्यांनी विश्वस्ताची भूमिका जोपासली होती. परिसराने त्यांना 'मालक' ही उपाधी दिली होती. ती त्यांना नकोशी वाटे. 'मी तुमचा विश्वस्त आहे' असे ते अनेकदा नम्रपणे म्हणत.

बदलत्या काळाच्या पाऊलखुणा ओळखून साखर उद्योगाला पूरक ठरणाऱ्या आसवनी प्रकल्प, कंपोस्ट खत प्रकल्प, कृषि विज्ञान फार्म तसेच कामगारांच्या मुलांमुलींच्या शिक्षणाची सुयोग्य सुविधा व्हावी म्हणून



मारूतराव घुले पाटील शिक्षणसंस्था अशा अनेक संस्था उभ्या केल्या. या सर्वच कार्यात थोरामोठ्यांचे मार्गदर्शन व सहकार्य घेण्यात त्यांनी कधीच कमीपणा वाटू दिला नाही.

Work is worship अशा ध्येवादातून कारखाना कार्यस्थळावर १७-७-१९८० पासून सुरू झालेल्या सदर शिक्षण संस्थेचा आज विशाल वटवृक्ष झाला आहे. पुस्तकी शिक्षणाबरोबरच तंत्रशिक्षण संस्था, कृषि मार्गदर्शन संस्था, सीनिअर कॉलेज अशा अनेक संस्थांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची सुरुवातीची संख्या वाढत जाऊन या शिक्षणसंकुलात आज ५ हजारावर पोचली आहे.

सहकार आणि सत्ता यांच्या जोडीला सेवावृत्ती असेल तर सर्वांगीण विकासाची किती शिखरे सर करता येतात हे मारुतराव पाटलांनी त्यांच्या ठायी उपजतच असलेल्या समर्पण भावनेने दाखवून दिले आहे. त्यांचे लोकजीवन विकासाचे स्वप्न त्यांच्या कार्यांच्या स्मरणाने आपल्याला पुरे करायचे आहे. ते करीत राहाणे हीच त्यांना श्रद्धांजली ठरेल.

✧ ✧ ✧



# एक दूरदृष्टी नेतृत्व

**कल्याणराव म्हस्के**
(डि.सी.ई.) जनसंपर्क अधिकारी
ज्ञानेश्वरनगर

कारखान्याच्या सेवेत १९८७ पासून आहे. त्याच्याही आधीपासून परिसरविकासाचे शिल्पकार आदरणीय साहेबांनी आमचे गांवावर केलेल्या उपकारांची स्मृती अगदी ताजी आहे. १९८०-८२ चा तो काळ. गांवचा बराच भाग जिरायती शेतीचा व कालव्यावर अवलंबून असलेला. गांवापासून अवघ्या मैल दोन मैलांवर जायकवाडी धरणाचा बॅकवॉटरचा पट्टा येतो. तिथून पाईप लाईन केल्यास सुमारे तीन-चारशे एकर क्षेत्र ओलिताखाली येअू शकणार होते. काम बरेच मोठे आणि मोठ्या खर्चाचे होते. युक्ती तशी खूप नामी, पण या भागातील गरीब शेतकऱ्यांकडे दामाजी कुठले ? येअून जाअून काम अडतं ते इथं. पैशाचं सोंग आणतां येत नाही असं म्हणतात, याची आमच्या गांवच्या आर्थिक दृष्टीने दुर्बल शेतकऱ्यांना सत्यता पटली. श्री. सुदामरावजी मते यांचे समवेत गांवची काही जाणकार व कर्ती मंडळी एक दिवस मा. साहेबांकडे आली. साहेबांपुढे प्रस्ताव मांडला. प्राप्त परिस्थितीचा उपयोग करुन घेण्याची दूरदृष्टी असलेल्या साहेबांनी उपाय शोधून काढला. साहेब त्या वेळी जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन होते. त्यांनी बँकेमार्फत जायकवाडी बॅकवॉटर पाईपलाइन कर्जप्रकरणे मंजूर केली. आणि बॅकवॉटरचे पाणी गांवाच्या शिवारात आणून सोडले. या भागातील उसाचे क्षेत्र वाढले. हळूहळू गांव कर्जमुक्तही होत आले आहे. पण आम्ही ? साहेबांच्या ऋणातून कसे मुक्त होणार ?

कारखान्याच्या इरिगेशन विभागात गेल्या बारा वर्षांपासून आहेच. गेल्या दोन अडीच वर्षांपासून चेअरमन साहेबांचा स्वीय सहाय्यक (Personal Assistant) व जनसंपर्क अधिकारी असल्यापासून तर आदरणीय साहेबांच्या सतत संपर्कात आहे. त्यांच्याकडे काम घेअून येणारी व्यक्ती असो वा एकाद्या संस्थेचे पदाधिकारी असोत, त्यांच्याशी प्रेमाने बोलणे, आणलेल्या कामाची चर्चा करणे, उपाय सुचविणे इत्यादी गोष्टीत अगदी मोकळेपणा असायचा. साहेबांच्या बोलण्यात औपचारिकतेचा (formality) लवलेशही नसे. श्रीज्ञानेश्वर माअुलींच्या पदस्पर्शानें पुनीत झालेल्या या पंचक्रोशीत त्यांनी सर्वांना माअुलीची ममता



दिली होती. गांवातले असोत किंवा संस्थेतले असोत, कितीही गुंतागुंतीचे प्रश्न असोत - त्या प्रश्नांची उकल करण्याची साहेबांची हातोटी विलक्षण प्रभावशाली होती.

तालुक्याच्या कुठल्याशा गांवची काही मंडळी एकदां साहेबांकडे काही समेटाचा प्रश्न घेऊन आली. साहेबांना जाणं भागच होतं.

दिनांक ८ जूलै २००२. चा दिवस. आदल्या दिवसापासूनच साहेबांची तब्येत ठीक नव्हती रक्तदाबाचा थोडासा त्रास जाणवू लागला होता. दररोज दिसणारी प्रसन्नता चेहऱ्यावर नव्हती. ते थकलेले दिसत होते. त्यामुळे भाऊसाहेब, आज घरीच आराम करा. बाहेर जाऊच नका असं दोन्ही चिरंजीवांनी वडिलांना विनवून पाहिलं पण छे! ते कसले ऐकतात ?

बाहेरगांवी जातांना ते मारुतीचं दर्शन घेऊन निघत. मंदिरात जाऊन दर्शन घेतले. त्याच दिवशी आषढी वारीसाठी पंढरीला दहिगांव ते पंढरपूर अशी पायी दिंडी जाणार होती. भजनी मंडळी, भाविक मंदिरापुढे जमा झाले होते. दिंडीला निरोप दिला आणि दिंडीचे दर्शनही त्यांनी घेतले.

आयुष्यभर माणसं जोडण्यासाठी धडपडणारा हा मोठा माणूस - माणसं जोडीत असताच - माणसांचं जग सोडून गेला. साहेबांच्या त्या अंतिम क्षणी मी त्यांचेजवळ होतो.

✧ ✧ ✧



# क्रांतिकारी महापुरुष

**भाऊसाहेब सावंत, भेंडा**
(बी. एस्सी., एम. ए., बी. एड्.)

नेवासा-शेवगांव परिसर म्हणजे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांच्या पदस्पर्शाने पावन झालेला परिसर. संस्कृतमधील ज्ञानभांडार सामान्य जनांसाठी खुले करून ज्ञानेश्वरांनी क्रांती केली. येथूनच त्यांनी विश्वकल्याणाची प्रार्थना केली... दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्य पाहो । जो जे वांछील तो ते लाहो । प्राणीजात ॥ त्यांच्या या प्रार्थनेत समग्र मानवजातीच्या कल्याणाचे महासूत्र आहे. ज्ञानेश्वरांच्या या विचारापासून सहकारापासून सहकारमहर्षी स्व. मारुतराव घुले पाटील यांनी प्रेरणा घेऊन परिसरात क्रांती घडवून आणली. समाजाला नवा विचार दिला. कष्टकऱ्यांना दुःखमुक्त केले. नवी सृष्टी निर्माण करून परिवर्तन घडवून आणले. म्हणून संपूर्ण महाराष्ट्राचा स्वातंत्र्योत्तर इतिहास अभ्यासायचा झाला तर स्व. घुले साहेबांचे योगदान समजावून घेणे अपरिहार्य ठरते.

या भागात गरिबांच्या अनेक पिढ्या दारिद्र्यात पिचत होत्या. टिचभर पोट त्यांना लाचार करत होते. अस्मानी आणि सुलतानी फेऱ्यात अडकून सामान्य माणूस मरण येत नाही म्हणून जगत होता. शेतीला पाणी नाही, रझाकारांचा अनानुष जुलुम, अज्ञान आणि जीवघेणे कष्ट. दारिद्र्याशी झगडता-झगडता एक दिवस झिजून जगाचा निरोप घेणे हेच हेच येथील जनतेच्या भाळी लिहिले होते. अशा या अंधारमय जीवनात सुबत्तेचा व संपन्नतेचा सोनेरी किरणे खेचून आणण्याची तीव्र इच्छाशक्ती असलेला महापुरुष दहीगावसारख्या खेड्यात अवतरला आणि कष्टकऱ्यांचे जीवन उजळून निघाले.

स्वातंत्र्यपूर्व काळातील हुतात्म्यांचे बलिदान, म. गांधी व पं. नेहरुंचा त्याग, संतांचा आदर्श यापासून घेतलेल्या प्रेरणेमुळे त्यांनी स्वतःला समाजकार्यात झोकून दिले.

महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर महाराष्ट्राचे शिल्पकार मा. ना. यशवंतराव चव्हाणसाहेब यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांवरील अन्याय व शोषणाची तीव्रता कमी करण्याचे प्रयत्न झाले. शोषित शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी स्व. चव्हाण साहेबांनी अनेक अनुयायी तयार केले. त्यात स्व. मारुतरावजी घुले पाटील हे अग्रभागी होते. कष्टकऱ्यांविषयी घुले साहेबांनी सदैव संवेदनशील मनाने सहानुभूती बाळगली. अंगी असलेल्या बुद्धिमत्ता, उदारता, चातुर्य या गुणांच्या बळावर या भागाचा कायापालट केला.

लोकप्रियतेच्या अत्युच्च शिखरावर असताना त्यांनी ग्रामजीवनाला नवी दिशा देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. सर्व सत्ता आपल्याच घरात असू नये या विषयी ते सदैव जागृत राहिले. अनेक सामान्य



कार्यकर्त्यांना त्यांनी कर्तृत्वाची संधी दिली. त्यात जात-धर्म-पंथ याला केव्हाही स्थान दिले नाही. दहिगावातील ग्रामपंचायतीत व सहकारी सोसायटीत त्यांनी स्थापनेपासून बिनविरोध निवडणूका घडवून आणल्या. मागासवर्गीय व स्त्रिया यांना सामजिक प्रवाहात आणले. सत्तेत सहभाग दिला. आणि आपल्या ज्ञानाच्या, कृतीच्या व श्रद्धेच्या जोरावर असंख्य दीनदुबळ्यांचे संसार नि:स्वार्थीपणे उभे केले.

साहेबांनी सर्वसामान्यांचे दु:ख सदैव आपले मानले व त्यात सदैव आत्मियतेने सहभागी झाले. म्हणूनच जनतेने त्यांना दोन वेळा विधानसभेवर, एक वेळा विधानपरिषदेवर आपले प्रतिनिधी म्हणून प्रचंड मताने निवडून दिले. त्याही संधीचे त्यांनी सोने केले. जायकवाडी धरणामुळे विस्थापित झालेल्या बांधवांच्या पुनर्वसनासाठी लढा दिला. धरणग्रस्तांसाठी कायदा करण्यास शासनास भाग पाडले. बँक वॉटरचे पाणी शेतकऱ्यांना मिळवून देऊन हरितक्रांती केली. शेतकऱ्यांच्या मालकीचा ज्ञानेश्वर स. सा. कारखाना निर्माण केला व महाराष्ट्रातील अग्रगण्य कारखाना म्हणून त्यास नावलौकिकही मिळवून दिला. आशिया खंडातील अग्रगण्य अशा अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ते प्रथमपासून संचालक राहिले व याच बँकेचे सात वेळा चेअरमन म्हणूनही बिनविरोध निवडले गेले. स्वच्छ व पारदर्शी प्रशासन देवून सहकार क्षेत्रात त्यांनी नवा आदर्श निर्माण केला. जिद्द, चिकाटी, मितभाषीपणा, स्पष्टवक्तेपण, नि:स्पृहता, निग्रह आदी गुण त्यांच्यात असल्यामुळे व उपजतच प्रतिभेची देणगी लाभल्यामुळे त्यांचे कर्तृत्व आभाळाला भिडले.

शेवगाव-नेवासा तालुक्यात दुर्गम भागात सुरू झालेल्या माध्यमिक शाळा, महाविद्यालये, खेड्यापाड्यांना जोडणारे डांबरी रस्ते, शेताशेतात जाऊन पोहोचलेले धरणाचे पाणी, घराघरात गेलेली वीज, दूरध्वनीचे जाळे, दूध शीतकरण केंद्रे, फलोद्यान, रेशीम उद्योग, उपसा जलसिंचन योजना, औद्योगिक प्रशिक्षण संस्था... एकंदरीत शेवगाव-नेवासा तालुक्याने आजवर शेती, शिक्षण, उद्योग, वीज, पाणी, आरोग्य याबाबतीत जे काही मिळविले आहे, याचे सर्व श्रेय स्व. घुले साहेबांनाच आहे. या भागाचे ते विकासाचे शिल्पकार होत. राष्ट्रपातळीवर त्यांच्या कार्याची नोंद झाली. 'इंदिरा प्रियदर्शिनी पुरस्कार', भारतीय उद्योगरत्न पुरस्कार, 'सहकार भूषण पुरस्कार' आदी प्रतिष्ठीत पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले. स्व. घुलेसाहेबांच्या अलौकिक कार्याचा वसा त्यांचे सुपुत्र लोकप्रिय आमदार श्री. नरेंद्र पा. घुले व कारखान्याचे चेअरमन श्री. चंद्रशेखर पा. घुले हे समर्थपणे चालवत आहेत. इवलेसे रोप लावियले द्वारी । त्याचा वेलू गेला गगनावरी । हाच अनुभव येथे येत आहे. स्व. घुलेसाहेब आज आपल्यात नाहीत, परंतु त्यांनी पेरलेले संस्काराचे बीज मात्र तरारून रुजले आहे. वेल पल्लवित झाला आहे. वेलीवर आलेल्या सुगंधी फुलांचा गंध त्यांच्या कर्तृत्वाचा सुगंध दरवळत ठेवणार आहे. त्यांच्या पवित्र स्मृतीस कोटी कोटी प्रणाम..

✧ ✧ ✧



# मारूतरावजी घुले पाटील - संक्षिप्त जीवन व कर्तृत्वालेख

| | |
|---|---|
| नांव | **मारुतराव शंकरराव घुले पाटील** |
| जन्मतारीख | १५.९.१९३० |
| शिक्षण | इं टर आर्टस् |
| सन १९५४ | दहिगांवने, तालुका शेवगाव येथे सहकारी सोसायटी स्थापना. |
| सन १९५८ | शेवगाव तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक व शेवगाव तालुका मार्केट कमिटीचे संचालक |
| सन १९५९ | दहिगांवने तालुका शेवगाव येथै नवजीवन विद्यालय व हॉस्टेल सुरु केले. आशिया खंडात अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संस्थापक सदस्य व संचालक. आजतागायत सदर बँकेचे संचालक म्हणून काम पहात आहेत. |
| सन १९६० | भारताचे भाग्य विधाते पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी नगर जिल्ह्यास भेट दिली त्यावेळी काँग्रेस कमिटीचे सक्रीय कार्यकर्ते म्हणून सहभाग. |
| सन १९६१ | अखिल भारतीय कृषक समाज नवी दिल्लीचे सदस्य, नवी दिल्ली येथे शेतकरी परीषदेस हजर शेवगांव तालुका शेतकरी संघाचे अध्यक्ष. |
| सन १९६२ | शेवगांव नेवासा मतदार संघातून (नं.२३९) आमदार म्हणून निवडून आले. |
| सन १९६४ | अहमदनगर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सलग १० वर्षे (सन १९७४ पर्यंत) जिल्हाध्यक्षपदाची धुरा अत्यंत यशस्वीपणे सांभाळली. |
| सन १९६५ | राहुरी येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या शिबीराचे नियोजन व संयोजन कुशलतेने केले. |
| सन १९६६ | जायकवाडी प्रकल्प ग्रस्तांचे सुशीक्षित बेरोजगार मुलांसाठी रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून शेवगांव औद्योगीक प्रशिक्षण संस्था सुरु केली. ज्ञानेश्वर कारखान्याची स्थापना करणेसाठी २७-६-१९६६ रोजी पहिली सभा घेतली. |
| सन १९६७ | शेवगाव नेवासा मतदार संघातून दुसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आले. |
| सन १९६८ | ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा हे कॉलेज सुरु करणेसाठी महत्वाचा सहभाग. |
| सन १९६९ | कै. यशवंतरावजी चव्हाण, कै. वसंतराव नाईक व कै. वसंतदादा पाटील यांचे मार्गदर्शनाखाली जायकवाडी प्रकल्पग्रस्तांसाठी श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची स्थापना. दिनांक १९.१०.७० रोजी कारखान्यास केंद्र सरकारकडून रजिस्ट्रेशन मिळाले. (कारखान्याच्या प्रगतीचा अहवाल सोबत जोडला आहे.) |

ग्रंथ खराब केल्यास किंमत
वसूल केली जाईल



| | |
|---|---|
| सन १९७२-७८ | अहमदनगर विधान परिषद मतदार संघातून आमदार (M.L.C) विधान परिषदेवर निवड. |
| सन १९७३ | दि. २७.४.७३ ला केंद्र सरकारकडून ज्ञानेश्वर कारखान्यास औद्योगिक परवाना मिळाला. |
| सन १९७५ | सन १९७४-७५ चा पहिला चांचणी गळीत हंगाम दि.१९.५.१९७५ ला १२५० मे.टन/दिनी गाळप क्षमतेने सुरु करणेत आला. (सासवड माळी स.सा. कारखान्याचे मशिनरीची ऑर्डर वर्ग करुन अगदी थोडक्या अवधीत कारखान्याची उभारणी केली.) सदर वेळी कारखान्याचे कार्यक्षेत्र २१५ गावांचे (नेवासा तालुक्यातील ९३ व शेवगांव तालुक्यातील १२२ गांवे) व सभासद संख्या ४ हजार एवढी होती व शेअर भांडवल रुपये १.१५ कोटी होते. |
| सन १९७८-७९ | सन १९७८ मध्ये अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन व त्यानंतरही ८ वेळा बिनविरोध चेअरमनपदी निवड. बँकेच्या संस्थापनेपासून संचालक. |
| सन १९७०-९४ | संस्थापक/मुख्य प्रवर्तक श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना. सरकार नियुक्त पहील्या मा. संचालक मंडळात सन १९७० ते १९७७ पर्यंत चेअरमन. दुसऱ्यांदा सन १९८३-८७ पर्यंत चेअरमन तसेच सन १९९४ पासून फेब्रु.९९ पर्यंत चेअरमन |
| सन १९९४ | ऑल इंडिया नॅशनल युनिटी कॉम्फरन्स पदी दिल्ली यांचा इंदिरा गांधी प्रियदर्शनी पुरस्कार. |
| सन १९९७ | इंडियन इकॉनॉमिक डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च असोसिएशन, नवी दिल्ली, यांचा 'भारतीय उद्योग रत्न पुरस्कार १९९६' प्रदान. |
| सन १९९७ | सहकार व सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेतर्फे 'सहकार भूषण' पुरस्कार प्रदान |
| सन १९९७-९८ | कारखान्यातील कामगारांसाठी घरकुल योजना राबवून कामगारांना मारुतराव घुले पाटील गृहनिर्माण संस्थेतर्फे घराची योजना आखणारा महाराष्ट्रातील पहिला बहुमान मिळविला. |
| सन १९९९-२००० | आय एस. ओ. ९००२ प्रमापत्र : उत्पादन व उत्पादनांची गुणवत्ता, कार्यक्षमता, कुशल व्यवस्थापन यासाठी श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्यास आय. एस. ओ. ९००२ चे प्रमाणपत्र मिळाले. |
| सन २०००-२००१ | श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची दैनंदिन गाळप क्षमता ३००० मे. टनावरून ५००० मे. टन प्रतिदिनी विस्तारीकरणाचे यशस्वी कार्य. अहमदनगर जिल्ह्यातील आर्थिक सक्षमतेचा कारखाना म्हणून नावलौकीक. |
| ८.७.२००२ | निर्वाण. |

Jijamata Science & Arts College
17436
Bhende Newasa